म. ग्रं. सं. ठाणे
विषय
स. क्र.

फिरोज रानडे



RFFBK-0026219

# काबुलनामा

फिरोझ रानडे

REFBK-0026219

श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

प्रकाशक
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

© फिरोझ रानडे

प्रकाशनकाल
प्रथमावृत्ती : १७ जून १९९०

मुखपृष्ठ : कमल शेडगे

मूल्य साठ रुपये

मुद्रक
चिंतामणी सदाशिव लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव पेठ
टिळक रोड
पुणे ४११ ०३०

# काबुलनामा

श्री. राम पटवर्धन यांना—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

दिल्लीतल्या जानेवारी महिन्यातले कडक थंडीचे दिवस होते जेमतेम सकाळचे नऊ-साडे-नऊ झाले होते, तरीही मी तडातडी कचेरीत आलो होतो

आणीबाणी लागू होऊन चार-पाच महिने झाले होते. तेव्हापासून ह्या वेळेवर येण्याचा ताप सुरू झाला होता ह्या एक जाच सोडून दिला तर आम्हा सरकारी नोकरांना, निदान बांधकाम खात्याच्या लोकांना, आणीबाणीचा काही त्रास नव्हता उलट आणीबाणीमुळे थोडी शिस्त आली म्हणून बऱ्याच जणांनी आनंद व समाधान दाखवले होते

तसा लवकर येऊन काही कागदपत्र पाहात होतो मी येण्याआधीच चपराश्याने टेबलाखालचा हिटर लावून ठेवला होता. त्यामुळे खोली समाधानकारक उबदार झाली होती. तेवढ्यात चपराश्याने माझ्या नावाचा खास सरकारी खाकी रंगाचा एक लिफाफा आणून दिला तो परदेश व्यवहार खात्याकडून आला आहे हे बघताच माझं हृदय थोडं धडधडलं. लिफाफा फोडून आतला मजकूर वाचेपर्यंत जीवाची थोडी चलबिचल झाली

अफगाणिस्तानला पाठवण्याकरता माझे नाव × निवड समितीच्या बैठकीतच पक्के झाल्याचे मला सांगण्यात आले होते पण ते सगळे तोंडी होते कपात आणि ओठात फार अंतर असते अशी एक इंग्रजी म्हण आहे. तसेच सरकारी कारभारात ' तोंडी ' व ' लेखी '-तही फार अंतर असतं तोंडी हो 'चे लेखीत ' नाही ' पुष्कळ कारणामुळे घडू शकतं हे मी सरकारी नोकरीत वीस-बावीस वर्षे राहून चांगलं शिकलो होतो आनंदाची गोष्ट म्हणजे ह्या वेळी तोंडी ' हो ' लेखीतही ' हो 'च राहिला होता.

माझी काबूल म्युनिसिपालिटीकरता आर्किटेक्ट / प्लॅनर म्हणून निवड पक्की झाल्या बाबतच ते पत्र होते ते पत्र वाचताक्षणीच पहिलं म्हणजे माझा जीव भांड्यात पडला

दुसरं म्हणजे गेले कित्येक महिने मी दाढी वाढवायची असं म्हणत होतो तो बेत आता पक्का केला गेला ह्या दाढी ठेवण्याचा विचाराचा व काबूलला जाण्याचा काही संबंध नव्हता काही दिवसांपासून माझे मलाच वाटायचे की छानपैकी दाढी वाढवावी बहुधा चांगली दिसेल. आता मी दिसतो त्यापेक्षा काही जास्त वाईट दिसणार नाही ह्याची खात्री होती पण ह्या सगळ्यापेक्षा दाढी वाढवण्यात फार मोठी सोय होती थंडीच्या दिवसांत सकाळी-सकाळी दाढी करायची म्हणजे फार हाल होत दाढी करायला वेळही

बराच लागे दाढी वाढवली तर हे सगळे प्रश्न मिटणार होते. मागे सुद्धा मी असा दोन-चार वेळा तसा प्रयत्न केला होता

पण साध दाढी वाढवणं ही वाटते तेवढी सोपी गोष्ट नाही तस पाहिलं तर आपली दाढी आपणच वाढवत असतो पण त्याच्याकरता सुद्धा लोकांची पर्वा करायला लागते. व्हायच काय की दाढी वाढवायची म्हणून मी एक-दोन दिवस दाढी केली नसली की नेमके मन्त्रीमहोदयाकडे वा कोणा वरिष्ठ अधिकाऱ्याकडे जायचं ठरायचं तशा एक दोन दिवसाच्या वाढलेल्या दाढीनं कोणाकडे जाणं फार ओंगळ वाटायच तेव्हा दाढी करायला लागायची म्हणजे माझ्या दाढी वाढवण्याच्या बेतावर अगदी बोळा जरी नाही तरी दाढीचा ब्रश फिरला जायचा !

पण आता तशी काही भीती नव्हती मी थोड्या दिवसाचा सांबती असल्याकारणानं आता मला महत्त्वाची काम देण्यात येणार नव्हती किंवा माझ्यावर महत्त्वाच्या बैठकींना जाण्याचा प्रसग येणार नव्हता तेव्हा आता मनाला येईल तस करायला काही आडकाठी नव्हती त्यातून मी काबूलसारख्या नवीन जागी जात होतो मी पूर्वी कसा दिसत असेन ह्याची तिथ कोणी पर्वा केली नसती त्यातून अफगाणिस्तान हा तर दाढीवाल्यांचाच देश व तिथेच तर मी जाणार होतो

सहज हौस व सोय म्हणून वाढवलेली दाढी मला अफगाणिस्तानात फार कामी आली बरेच लोक मला पाकिस्तानी वा भारतीय मुसलमान समजायच कोणी मला ‘ हाजी ’ म्हणजे हाजची यात्रा करून आलेला समजायचे त्यामुळे कित्येक वेळा माझी कामे पटापट होऊन जात

अशी एकदरीत मला दाढी नफ्यात पडली असली तरी ह्याच दाढीमुळे मी एकदा स्वत च्या जीवाला मुकणार होतो पण हे पुष्कळ पुढचं

आयटेक-कार्यक्रमाखाली माझी अफगाणिस्तानाकरिता निवड झाल्याचं पत्र मला १९७६ च्या जानेवारी महिन्यात मिळालं व महिन्याच्या आत म्हणजे फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मला काबूलला पोहोचायला हव होतं

ह्या आयटेक म्हणजे Indian Technical and Economic Co-operation Programme खाली भारत सरकार वीस ते पंचवीस देशांना आर्थिक व तांत्रिक मदत करतं काही देशांतून हॉस्पिटल्स बाधून देऊन ती चालवली जातात काही देशांना पैशाची मदत दिली जाते काही देशांत फक्त तंत्रज्ञ पाठवले जातात व तिथल सरकार आपल्या तन्त्रज्ञांना पगार देतं अफगाणिस्तानासारख्या काही देशात आपल्या तन्त्रज्ञांचा पगार-भत्ता वगैरे भारत सरकारच देत

भारत सरकार ह्या आयटेक योजनेखाली सगळ्यात मोठी मदत अफगाणिस्तानला देत

मी ज्या वेळी काबूलला गेलो त्या वेळी जवळ जवळ ७०–८० आयटेक तज्ज्ञ व तंत्रज्ञ अफगाणिस्तानात होते त्यात आय ए एस प्रशासक होते, आर्किटेक्टस् होते, इंजिनियर्स होते, शेतकी तज्ज्ञ होते, इंग्रजीचे शिक्षक होते, एवढेच काय पण एक संगीत शिक्षक व एक हॉकीचा कोच पण होता अर्थात हे सगळे काबूल शहरातच होते असे नाही, तर बाहेरच्या गावातून विखुरलेले होते

काबूल म्युनिसिपॅलिटीने नव्या दमाने मोठी-मोठी कामे हाती घ्यायचे योजले होते त्या-करता त्याना भारत सरकारकडून चार जणाची एक टीम हवी होती एक आर्किटेक्ट प्लॅनर, एक डिझाईन्स बनवण्याकरता, एक इमारती उभारण्याकरता व एक रस्ते बांधणीचा असे तीन इंजिनियर्स हवे होते मी सोडून बाकी तिघेजण काबूलला पोहोचून कामावर रुजूपण झाले होते

निवड समितीपुढे जाण्याआधी परदेश संबंध खात्यात दहा–बारा पानाचं माहिती पुराण पाठवलं होतं. त्यात नियम, पोटनियम, पगार, परदेश भत्ता वगैरे सगळी माहिती दिली होती

पक्क्या सरकारी नोकराप्रमाणे मी प्रथम काय वाचले असेल तर तिथे भत्ते काय व किती मिळणार होते ते ! अधिकाऱ्याला भारतात मिळणाऱ्या पगारावर त्याचे इथले भत्ते अवलंबून होते जितका पगार जास्त तितके भत्ते जास्त साधा हिशोब ! भत्त्यांचा आकडा पाहून मी मोठा खजिल झालो आपल्याला युनायटेड नेशन्सच्या लोकांइतका काही पैसा मिळणार नाही ह्याची मला कल्पना असली तरी तो इतका कमी मिळेल असेही मला वाटले नव्हते

निवडीकरता झालेल्या बैठकीत मी हा विषय काढला. त्या वेळी अर्थ खात्याचा सदस्य मला म्हणाला,

" हे बघ, रानाडे , ( हो, ते सगळे उत्तर भारतीय माझ्या आडनावाचा " रानाडे " असाच उच्चार करतात. ) ह्या पत्रिकेत दिलेल्या भत्त्याच्या आकड्यांवर तू जाऊ नकोस तुला वाटतात तितके काही हे पैसे कमी असणार नाहीत मी काय म्हणतोय ते तुला काबूलला गेल्याशिवाय कळायचे नाही. "

अर्थ खात्याच्याच अधिकाऱ्याने इतका दिलासा दिल्यावर मी माझ्या मनातली शंका-जळमटं झटकली व काबूलला जाण्याच्या मानसिक तयारीला लागलो, म्हणजे ती नियमा-वली जास्त खोलात जाऊन वाचली

त्या एवढ्या दहा बारा पानाच्या पुरवणीत एका शब्दानेही अफगाणिस्तानचा उल्लेख नव्हता. काबूल शहराबद्दल जशी काही माहिती नव्हती तशीच अफगाणाबद्दलही काही माहिती नव्हती

जशी काही माझी पाठवणी मुंबईला वा कलकत्त्यालाच होणार होती सरकारच्या हिशोबी जसं कलकत्ता वा मुंबई तसंच काबूल ! जसे बंगाली वा मराठी तसेच अफगाण ! आहे काय अन् नाही काय काही माणस कोठे तरी पाठवावयाची आहेत, त्या जागा

भरल्या की झाल ' हा सरकारी खाक्या आणि माणस परदेशी पाठवावयाची ही सरकारी पद्धत अफगाणिस्तानाचे व आपले राजकीय संबंध कसे आहेत, त्या दृष्टीने आमच्यावर काय जबाबदारी आहे, त्याबाबत काहीसुद्धा सूचना दिल्या नव्हत्या तिथली भाषा, संस्कृती, इतिहास काय आहे, ह्याबद्दल काही म्हणजे काही माहिती दिलेली नव्हती

अफगाणिस्तानातील राजकीय परिस्थिती, तिथल्या लोकांचा धर्म ह्या दृष्टीन आपल वागण कस असायला हवं ह्याची कांडीमात्र जाण मला करून देण्यात आली नव्हती, तशीच सरकारने पाठवलेल्या इतर कोणा भारतीयाना पण करून देण्यात आली नव्हती

पण काबूलला गेल्यावर व तिथ काही दिवस राहिल्यावर व एक-एक भारतीय सोंगं पाहिल्यावर मात्र सरकारने काहीतरी जबाबदारीन आपल्या लोकाना परदेशी पाठवल पाहिजे अस तीव्रतेन जाणवल

नतर जे एक राजदूत आले होते त्याना ही जाणीव होती त्यानी एक छोटीशी समिती बनवली व त्या समितीकडे माहिती-पुस्तिका बनवण्याचं काम दिल. पण ती पुस्तिका तयार होईपर्यंत अफगाणिस्तान अफगाणिस्तान राहिला नव्हता

सरकारी कामानिमित्त जाणार होतो, तेव्हा सरकारी पासपोर्ट मिळणार होता पास-पोर्टच्याही तीन तऱ्हा असतात सर्वसामान्य नागरिकाकरता निळ्या रंगाचा, सरकारी कामाकरता जाणाऱ्याकरता रुपेरी रंगाचा व वकिलातीतल्या उच्च अधिकाऱ्याकरता डिप्लो-मॅटिक पास-पोर्ट आमच्या पासपोर्टची, तिकिटांची सगळी व्यवस्था परदेश-व्यवहार खात पाहणार होतं त्यामुळे तो काही ताप मला नव्हता

दिल्लीसारख्या कडक थंडीच्या गावी गेली कित्येक वर्षं राहात असल्यामुळे, हिवाळी कपडे, सूट वगैरे गोष्टी तयार होत्याच काही वर्षांपूर्वी विलायतेत घेतलेले उनी कपडे अजूनही काम देत होते त्यातून काबूलला परदेशी वस्तू व परदेशी कापड-चोपड चिकार स्वस्त मिळत हे कळल होतं. त्यामुळे इथ काहीही खरेदी करायची नव्हती

शेवटी सहा फेब्रुवारी १९७६ हा निघण्याचा दिवस म्हणून मुक्रर करण्यात आला

मी महिन्याभरातच परदेशी जाणार असल्याकारणानं माझ्यावर कामाचा भार अगदी कमी होता त्यामुळे मी मोकळा होतो व उन्हाळ्याच्या सुट्टीत शाळेतली मुल जशी उडारतात तसा उंडारत होतो ह्याला भेट, त्याला भेट अस चालल होत

काही दिवसापूर्वी हिन्दुस्थान-टाईम्स 'च्या प्रमिला कलहन ह्या पजाबी बाईशी ओळख झाली होती म्हटल आपण काबूलला जातो आहोत वगैरे सांगून तिच्यावर भाव मारावा तर तिनेच माझ्यावर भाव मारला. मी काबूलला जाणार आहे हे सांगताच ती म्हणाली,

" काबूल काही मला नवीन नाही आम्ही दहा वर्षापूर्वी तेथे चागली दोन वर्षं होतो."

" तुम्ही कोणत्या खुषीत काबूलला गेला होनात ? " मी पजाबी पद्धतीने विचारल

" तेथे सध्या ' काबूल-टाईम्स ' म्हणून जो पेपर आहे, तो माझ्या नवऱ्यान सुरू केला होता. त्या पेपरचा पहिला संपादक होता तो. "

" अस्स ! मोठं मजेशीरच आहे हे सगळं. " मी हे जरी म्हटलं तरी माझ्या मनात मग ' तुझा नवरा आता कुठे आहे ? ' असं विचारायचं आलं होतं. पण तसं विचारणं बरं दिसलं नसतं आणि विचारलं नाही ते बरंच केलं. कारण तो तरुणपणीच कॅन्सरनं वारला होता.

प्रमिला कलहन त्या वेळी नवीनच निघालेल्या ' मॉर्निंग-एको 'ची संपादिका झाली होती. त्या दैनिकात तिनं माझी मुलाखत छापली, अगदी माझा फोटो वगैरे देऊन ! मुलाखत देताना मला मनोमनी खूप हसू येत होतं. एकतर ही माझी पहिली अशी मुलाखत होती. दुसरं असं एक मनात येत होतं की वर्तमानपत्रात येणाऱ्या पुष्कळशा मुलाखती अशा संपादकांशी असलेल्या मैत्रीच्या जोरावर छापून येत असतील, नाही ?

प्रमिला कलहनने माझी मुलाखत तर छापलीच पण काबूलच्या इंडियन एयर लाईन्सच्या मॅनेजरला ' माझं नाव सांगून जरूर भेट ' म्हणूनही सुचवलं.

इंडियन एयर लाईन्सच्या मॅनेजरचं नाव सलीम अली. चांगला उंच-निंच, भरलेल्या शरीराचा, घाऱ्या लकलकणाऱ्या डोळ्यांचा, गोरापान असलेला हा सलीम अली उत्तर प्रदेशातल्या कोणा छोट्या संस्थानाचा नबाब होता. स्वभावाने व वृत्तीनेही नबाबासारखा, उमदा व सगळ्यांना मदत करण्याच्या वृत्तीचा. काबूलला गेल्यावर त्याची व आमची चांगली ओळख झाली. एयर लाईन्सतर्फे होणाऱ्या सगळ्या समारंभांना तो आम्हाला आवर्जून बोलवायचा.

ह्या सगळ्या गोष्टींबरोबर मी काबूलशी पत्रव्यवहार ठेवून होतो. आमच्या खात्यातलाच एक अधिकारी तिथे होता. त्याचप्रमाणे अगदी काबूल म्युनिसिपॅलिटीतच कुलकर्णी नावाचा एक इंजिनिअर होता. त्यांना पाठवलेल्या पत्रांची उत्तरं आली होती. त्यावरून काबूलबद्दल थोडी कल्पनाही आली होती.

बाहेर माझे हे असे उद्योग चालले होते तर घरी वेगळेच. घरी-दारी मोठं आनंदाचं वातावरण पसरलं होतं. शेजारी-पाजारी काबूलला जाण्याची जाहिरात करून झाली होती. बाबा परदेशात जाणार व नंतर आपणही जाणार ह्या खुषीत मुलं होती. मुलं फार मोठी नाहीत फार लहान नाहीत अशा ' कच्च्या-लिंबू ' गटातली होती.

आधीच मला किरकोळ काव्य करण्याची हौस, आता तर काय त्याला मद्य मिळालं गेलं होतं. लगेच मी माझ्या काबूलच्या जाण्यावर दोन ओळी ठोकल्या.

बाबूल मोरा काबूल गया।
रोये जीया घडी घडी ॥

सहा फेब्रुअरीला दुपारच्या अडीच वाजतानाच्या अफगाण एयर लाईन्सने जायचं माझं पक्कं झालं. विमान दुपारी अडीच वाजता सुटणार होतं तरी दोन तास आधी विमान-तळावर जाऊन " रानडे, हाजीर है ! " अशी हजेरी देणं आवश्यक होतं.

विमान प्रवासाचा गोंधळ झाला नाही तर तो मराठी लेखक कसला ? मी त्या वेळी लिहू लागलो नव्हतो, तरीही माझ्या प्रवासाचा गोंधळ झाला. त्यावरून तरी मी पुढे मागे लिहू लागेन असा अंदाज करायला हरकत नव्हती.

ठरल्याप्रमाणे आम्ही बारा-साडेबाराला पालम विमानतळावर पोहोचलो. काही मित्र-मंडळी आली होती, कचेरीतले काही सहकारी आले होते, घरची मंडळीतर होतीच. विमान-तळावर पोहोचल्या पोहोचल्या आम्हाला सांगितलं गेलं की विमान दोन-अडीच तास उशिरा सुटणार आहे.

म्हटलं बोंबला ! आता चार-साडेचार वाजेपर्यंत करायचं तरी काय ? आणि चार साडे-चारला तरी विमान सुटण्याची खात्री कुठं होती ? तेव्हा कचेरीच्या लोकांना व मित्र-मंडळींना निरोप दिला. मग कुठे कॉफी पी, कुठे पान खा वगैरे गोष्टींत मन रमवू लागलो.

काही वेळान परत सांगण्यात आलं की विमानात काही तांत्रिक बिघाड झाला आहे, तेव्हा विमान रात्रीच्या बाराच्या आधी काही सुटणार नाही. जे कोणी दिल्लीत राहणारे प्रवासी असतील, त्यांनी परत घरी जावे, त्यांना आम्ही टेलिफोन करून कळवू.

आम्ही परत घरी आलो. शेजाऱ्यापाजाऱ्यांनी इतक्या हौशीनी निरोप दिला होता, त्यावर पाणी पडलं होतं. काही वेळ घरात काढला. पण आता घरातही बसवत नव्हतं. तेव्हा मुलांना घरीच ठेवून सिनेमाला नेलो. कोणा फिल्म सोसायटीनं आयोजित केलेला फ्रेंच सिनेमा होता. सिनेमा चांगला होता तरी त्यात मन लागत नव्हतं, सारखं वरखाली होत होतं. वाटत होतं की आपण इथं सिनेमा-बिनेमा पाहात बसलोय आणि तिकडे विमान दुरुस्त होऊन भुर्रकन उडूनही गेलं म्हणजे ? अर्थात असं काहीही होणार नव्हतं, उगाच आपले मनाचे खेळ.

सिनेमा संपला तरी रात्रीचे फक्त नऊ वाजले होते. घरी आलो, कपडे बदलले व 'काबूलकी ऐसी की तैसी ' म्हटलं आणि फर्स्ट क्लास तण्णावून दिली. रात्री काही तरी बारा-साडेबारा वाजता टेलिफोन खणाणला. रात्रीचा टेलिफोनचा आवाज किती कर्कश वाटतो, नाही ? " आत्ता तासा दीड तासात तुमचे विमान सुटेल. तेव्हा तावडतोब विमान-तळावर या. "

दिवसभर इकडे-तिकडे करण्यात वेळ घालवला होता, आता त्याचे उट्टे निघत होते

परत धावपळ व आवराआवरी सुरू झाली आम्ही विमानतळावर पोहोचलो त्या वेळी रात्रीचा दीड वाजला होता दुपारी अडीच वाजता सुटणारं विमान आता रात्री अडीच वाजता सुटणार होतं, म्हणजे तब्बल बारा तासानी !

इतर प्रवासी पण आमच्यासारखेच घाईगर्दीने येत होते त्यात बहुतेक हिंदी प्रवासी होते. ते पुढे युरोप-अमेरिकेला जाणारे होते अफगाण सेवेन गेलं की तिकीटभाड्यात खूप सवलत मिळते म्हणून त्याची गर्दी आयटेकचा मी एकटाच होतो बरेचसे सरदरजी होते. पण ते अफगाण होते, भारतीय नव्हते अफगाण सरदारांना ओळखण्याची पक्की खूण म्हणजे त्याची पगडी बांधण्याची वेगळी पद्धत

प्रवाशांनी आतल्या कक्षात जाव म्हणून सांगितलं गेलं तेव्हा मी प्रतिभाशी व मुलाशी हस्तांदोलन केल व आत गेलो. सामान असं काही नव्हतच, फक्त बॅग होती. बाकी सामान आधीच पाठवलं होत बॅग तपासली गेली त्या वेळी सिक्युरिटी चेक होता की नाही हे आता आठवत नाही, पण बहुधा नसावा

विमान अफगाण वेळेप्रमाण रात्रीच्या साडेतीन-चार अशा अडनाडी वेळेला काबूलला पोहोचणार होत. पण मला त्याची फारशी काळजी नव्हती कारण आपल्या वकिलातीचा माणूस मला घ्यायला विमानतळावर येणार होता

हवाई सुंदरीच्या आग्रहानुसार प्रथम मी पट्टे बांधले. नतर तिच्याच सूचनेवरून ते सोडले काय खायला दिल ते खाल्ल आणि जे डोळे बंद केले ते सुंदरीनं परत पट्टे बांधायला सांगितल्यावरच उघडले '

विमान खाली उतरल बाहेरचं काही दिसत नव्हत भल्या पहाटे सुटतो तसा भिर-भिरता वारा सुटला होता त्यामुळे थंडी जास्तच जाणवत होती त्या तशा अंधारात जे काही दिसल त्यावरून विमानतळाची इमारत लहानखोरी असावी असं वाटल

इमारतीच्या तळमजल्यावर दिव्याचा प्रकाश होता. काही सात-आठ माणस काचेच्या मोठ्या दाराच्या मागे उभी होती. आम्ही सगळे प्रवासी जवळजवळ धावतच त्या इमारती-कडे गेलो. तेथे पोहोचताच त्यातल्या एका उंच, गोऱ्या व लांब नाकाच्या आणि काश्मिरी उंच टोपी व बुलनचा लांब डगला घातलेल्या माणसानं 'तुम्हीच रानडे ना ?" म्हणून माझ्याचकडे चौकशी केली मी 'हो, मीच रानडे' म्हणताच त्याने माझा हात हातात घेऊन हलवला व म्हणाला,

"तुमचे काबूलला स्वागत असो मी बी एम् चावला, भारतीय वकिलातीतर्फे आलो आहे."

असं स्वागत वगैरे झाल म्हणजे बरं वाटत, तस मला बरं वाटल थोडं उचावल्या-सारख वाटलं

चावला विमानतळावर घ्यायला आल्यामुळे उचावल्यासारखं तर वाटलच पण सुटकेचा निश्वासही सुटला हो, काही कारणान हा चावला विमानतळावर आला नसता तर अशा

अडाणी वेळी मी काय केलं असतं ? कुठे गेलो असतो ?

माझं फारसं सामान नव्हतंच, त्यामुळे तपासणीत फार वेळ गेला नाही आम्ही दोघ बाहेर उभ्या असलेल्या काळ्याशार लांबच्या गाडीत जाऊन बसलो काबूल शहर विमान-तळापासून काहीतरी दहा बारा किलोमीटर्स दूर आहे

शहराकडे निघालो बाहेर बघण्यासारखं काही असलं तरी त्या संधी-अंधारात म्हणजे ज्यात जास्त अंधार आहे, काही दिसत नव्हतं गाडीत चावलानं मी कोण, कुठला, खातं कोणतं, हुद्दा काय वगैरे चौकशी केली, व उलट पक्षी मी त्याची त्या थोड्या वेळातही खऱ्या सरकारी नोकराप्रमाणे त्याला फार काम पडतं, त्याच्याइतके बाकी सहकारी मन लावून काम करत नाहीत वगैरे त्यानं सांगितलंच

शहराच्या मध्यवर्ती असलेल्या 'हॉटेल काबूल' मध्ये पोहोचलो तेव्हा साडे-चार वाजले होते हॉटेल अंधारात गुडूप झोपलं होतं हॉटेलचं मुख्य दारच मुळी बंद होतं पण चावल्यान थोडी खटपट केली त्याला सगळे ओळखत असावेत असं दिसलं नव्यांचं स्वागत करून त्यांना हॉटेलात पोहोचवण्याचं त्याचं नेहमीचं काम असावं हॉटेलच्या रजिस्टरात नाव लिहायचं वगैरे सोपस्कार पुढल्या दिवसावर ढकलून चावला गेला हॉटेलच्या माणसाबरोबर दोन जिने चढून मी माझ्या खोलीवर आलो

हॉटेल काही वर्षांपूर्वी बांधले गेले असल्याकारणाने त्या वेळच्या पद्धतीचे होते म्हणजे खोली चांगली लांब-रुंद ऐसपैस होती बाहेर एवढी थंडी पडली होती तरी खोलीत त्याची काही जाण नव्हती गरम हवा खेळवून ती चांगली उबदार केली होती आता माझ्या डोक्यात फक्त एक विचार होता, तो म्हणजे मस्तपणे झोपून जाण्याचा जेमतेम कपडे बदलले व तडक अंथरुणात शिरलो आणि झोपेला घट्ट मिठी मारली

उठलो तो साडेनऊ वाजलेले ! चहा मागवला उठलोच होतो तर हातासरशी खिडक्यांचे पडदे पण बाजूला केले

काबूल शहरानं आपला रात्रीचा बुरखा आता बाजूला केला होता. इराणी वा अफगाण सौंदर्याचा नमुना होता वर निळेभोर आकाश, दूरवर एस्किमो घालतात तसे पांढऱ्या शुभ्र बर्फाचे कोट घातलेले डोंगर, त्यावर पडलेले सोनेरंगी ऊन, ह्यांनी तबियत अगदी खूष होऊन गेली प्रवासाचा सारा शीण तर गेलाच पण वाटलं की बरं झालं दुपारी विमान आलं नाही ते नाहीतर संध्याकाळचं काबूलच दर्शन झालं असतं संध्याकाळचं कोणतही गाव पाहणं म्हणजे कोणा सुन्दर स्त्रीला उतार वयात पाहण्यासारखं आहे अर्थात पॅरिस शहर सोडून—पॅरिस ही चिरयौवना आहे

माझी खोली कोपऱ्यावरची असल्याकारणानं दोन बाजूंना भिंतींना खिडक्या होत्या त्यामुळे शहराचा मोठा भाग दृष्टीच्या टप्प्यात येत होता आजुबाजूच्या इमारतींवर बर्फ होते तसेच रस्त्यावर पण होते. काही ठिकाणी रस्त्यावरचे बर्फ गोळा करून ठेवले होते रस्त्यावर तशी तुरळकच गर्दी होती. समोरच्या खिडकीतून लांबच्या लांब अन भव्य अशी

दोन मजली ' बँक–ए–मेली 'ची इमारत दिसत होती ही अफगाणिस्तानची रिझर्व्ह बँक पुढील चार वर्षं मी ह्याच बँकेतून पगार व भत्ते घेतले, आणि ह्याच बँकेच्या दुसऱ्या मजल्यावरून हॉटेल काबूलमध्ये आलेल्या डब्ज नावाच्या अमेरिकन राजदूताला गोळ्या घालून ठार करण्यात आल होत

दुसऱ्या बाजूच्या खिडकीतून एक फार मोठी नाही अशी मशीद दिसत होती मशीद फार तर साठ-सत्तर वर्षांपूर्वीची असेल मशिदीच्या पुढे खूप मोठी बाग असावी मात्र सध्या तिथं फुलझाडं वा गवत वगैरे काही नसून फक्त बर्फ होता बाकी सगळ्या इमारती अनोळखी होत्या

चहा आला, त्याचबरोबर शहरवालीतून मला न्यायला साडेदहा अकराच्या सुमाराला कोणी माणूस येणार आहे असा निरोप पण आला

शहरवाली म्हणजे म्युनिसिपॅलिटी देश स्वतंत्र असला व लोकांची भाषा हीच राजभाषा असली म्हणजे कसा फरक पडतो बघा आता आपल्याकडेही मराठी व हिंदी प्रतिशब्द बनवतात पण त्यात सहजता नसते ते प्रतिशब्द अर्थवाही असतील पण ते रुळण्याला अवजड वाटतात

ह्याच विषयावरची पण थोडी वेगळी अशी गोष्ट काही दिवसांपूर्वी १८७५–७६ सालातल्या मुंबईवरच एक पुस्तक वाचत होतो पेशवाई गेली होती तरी अजुनी भाषा पूर्वीची होती, स्वत:च्या पायावर उभी राहणारी मुंबई विश्वविद्यालयाबद्दल काही माहिती त्या पुस्तकात दिली होती आता विश्वविद्यालय हे चक्क युनिव्हर्सिटीचं भाषांतर आहे त्या पुस्तकात हा भाषांतरित शब्द नव्हता, तर त्यात युनिव्हर्सिटीला ' विद्वान शाळा ' हा शब्द वापरला होता ' विद्वान शाळा ' ' किती अर्थपूर्ण व सहज समावला जाणारा शब्द आपण हा का टाकून दिला तेच कळत नाही फार साधा आहे म्हणून तर ' विद्वानां 'नी तो टाकला नसेल ?

येथे म्युनिसिपॅलिटीला म्हणतात शहरवाली जस कोतवाली तस शहरवाली आणि कोतवालीचा मुख्य जसा कोतवाल, तसा शहरवालीचा मुख्य शहरवाल ! म्हणजे विलायतेतला मेयर व आपल्याकडले महापौर

असे सहजतेने बनवलेले शब्द ऐकण्याचे प्रसंग काबूलमध्ये पुढे बऱ्याच वेळा आले तरंगत तरंगत जात म्हणून विमानाना ' तैयारा ' व मोटारीने सहली करता येतात म्हणून मोटारींना ' सैयारा ' ! किती सोपं काम ' त्यातूनही काही अडचण आली तर ' ए ' प्रत्यय जोडला की झाल जसं मैदान–ए–तैयारा म्हणजे विमानतळ वा कबर–ए–गोरा–कबरे गोरा म्हणजे गोऱ्या लोकांचं कबरस्थान, भुईमुगाच्या शेंगाना जमिन–ए–बादाम–जमिने बादाम '

शहरवालीचा माणूस यायला अजुनी अवकाश होता तेव्हा चहा घेतल्यावर परत लेटलो अर्धा एक तासाने दारावर टकटक झाली म्हटल इतक्या लवकर शहरवालीचा

माणूस आला सुद्धा ! थोड्या अचंब्यानच दार उघडलं तर दारात खास मराठी वाटावा असा चाळीस-बेचाळीस वयाचा माणूस उभा !

माझा एकंदर रूपरंग व दाढीबिढी पाहून तो गृहस्थ थोडा चमकलाच त्याने रानडे म्हणजे कोणा गोऱ्या, घाऱ्या रंगाचे डोळे असणाऱ्या व भुऱ्या केसाच्या माणसाची अपेक्षा केली असणार मी रंगारूपाने देशपांडे वा कुलकर्णी लोकात जमा होण्यासारखा, त्यात ही दाढी !

प्रथम त्याने मीच रानडे आहे ना ह्याची खात्री करून घेतली व मग स्वत:ची ओळख करून दिली तो मागे सांगितलेल्या काबूल शहरवालीत काम करणारा कुलकर्णी नावाचा इंजिनियर निघाला सगळ्यात मजेची गोष्ट म्हणजे ह्या कुलकर्णीला पाहिल्यावर का कुणास ठाऊक पण आपण परदेशात आलो आहोत हे प्रखरतेनं जाणवलं

कुलकर्णी आपल्या आडनावाला शोभेलसा, जरा जाडेपणाकडे झुकणारा असा होता. तो शांतपणे सोफ्यावर येऊन बसला व त्याने काबूल, आपली वकिलात, आपले राजदूत, वकिलातीतले इतर अधिकारी, शहरवालीतले आमचे इतर दोन हिंदी सहकारी ह्या सगळ्यां-बद्दल अगदी इत्थंभूत माहिती दिली मी मनाशी म्हटलं, "आता झाली इथल्या आयुष्याला सुरुवात ! आता निदान दोन-तीन वर्षं तरी हे असंच चालणार "

त्या सज्जन माणसाने मला पाचशे अफगाणी म्हणजे आपल्याकडले शंभर रुपये हात-खर्चाला उसने म्हणून दिले जवळ काही डॉलर्स वगैरे असतील तर ते हॉटेलवर वा बँकेत बदलू नकोस कारण तिथला ' रेट ' फार महागात पडतो हा मौलिक सल्लाही दिला

रेट ' ह्या शब्दाचं अफगाण जीवनात महत्त्व मला त्या दिवशी जरी कळलं नाही तरी पहिला पगार झाला त्या वेळी कळलं

कुलकर्णीबाप्पांनी हे सगळे तर केलेच पण घरचा पत्ता देऊन, तिथं कसं पोहोचायचं, कोणती बस जायची वगैरे सांगून संध्याकाळच जेवायला बोलावलं. ' नंतर कचेरीत भेटूच ' असं आश्वासन देऊन तो निघून गेला

तो गृहस्थ जाताच प्रथम मी चांगली थंड पाण्यानं आंघोळ केली खोली उन्हाळ्यात असते तशी गरम होती, त्यात मला थंड पाण्यानं आंघोळ करायची प्रचंड हौस ! मग काय विचारता ? यथेच्छ पाणी घेतलं नंतर कपडे वगैरे केले तोपर्यंत शहरवालीचा माणूस खाली येऊन थांबल्याची खबर मिळाली, तसा मी खालच्या मजल्यावर जायला निघालो

माझी खोली दुसऱ्या मजल्यावर होती काल रात्री जे दिसलं नाही व बघण्याचं मनही नव्हतं, ते आता स्पष्टपणे दिसत होतं हॉटेलची रचना हल्ली बहुतेक हॉटेलची असते तशी—म्हणजे मधे कॉरीडॉर व दोन्ही बाजूला खोल्या—अशी होती कॉरीडॉरमधे तर गालीचा होताच पण जुन्या पद्धतीच्या मल्या मोठ्या जिन्यावरही चांगला भारीपैकी गालिचा आंथरला होता

पहिल्या मजल्यावरही वरच्या मजल्यासारख्या प्रवासी लोकांच्या खोल्या होत्या. पण

आता जवळ जवळ साडे अकरा वाजत आले असल्याने सगळीकडे शुकशुकाट होता.

तळमजल्यावरच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या हाताला चौकशी कक्ष, व्यवस्थापकाची कचेरी होती, व डाव्या हाताला एक थोरला मोठा बँक्वेट हॉल म्हणजे समारंभाचा हॉल होता बँक्वेट हॉलला भली मोठी काचेची दार होती हॉल चांगल्या भारी गालिच्यांनी आच्छादला होता, हे वेगळे सांगणे नकोच

पुढेही पुष्कळ अफगाणाच्या घरी गेलो तेव्हा नाना प्रकारचे, नाना किंमतीचे गालिचे पाहिले गालिच्यांचा व अफगाणांचा युगानुयुगाचा संबंध असावा गरीब असो की श्रीमत असो प्रत्येक अफगाणाच्या घरात एक तरी गालिचा असनोच असतो असले गालिचे अगदी दोन अडीचशे रुपयापासून तो अगदी लाख दीड लाख रुपयांपर्यंतचे असतात गालिच्यांच्या पण नाना तऱ्हा, नाना तऱ्हेचे आकार व त्यांजवर नाना तऱ्हेची नक्षी काही पायदळी टाकण्याकरता असतात तर काही बैठकीचे म्हणून असतात नमाज पढण्याकरिता जे गालिचे असतात, ते जरा लांबट आकाराचे व एका बाजूला महिरप असलेले असतात

काबूल शहरात कित्येक पदपथावर भारी भारी किंमतीचे गालिचे टाकलेले असतात. प्रथम आपण त्या गालिच्यांवर पाय न देता बाजूबाजूने जातो हो, त्या भारी गालिच्यावर पाय पडला अन् तो दुकानदार ओरडला तर काय घ्या ? पण नतर लक्षात येतं की बाकी लोक अगदी बिनदिक्कतपणे तशा पडलेल्या गालिच्यावरून जाता येताहेत. ते बघून आपण अगदी अवाक् होऊन जातो

खरं म्हणजे आपले गालिचे तसे पायदळी तुडवले जावेत म्हणून दुकानदारानी मुद्दामच टाकलेले असतात त्यात त्याचा लुच्चेपणा असतो गालिचा पायदळी तुडवला गेला म्हणजे तो जुना वाटतो, आणि गालिचा जितका जुना तेवढी त्याची किंमत जास्त होते आहे की नाही मजेशीर गणित ?

मला न्यायला आलेल्या त्या अफगाण तरुणाबरोबर बाहेर पडलो व गाडीत जाऊन बसले. तो तरुण खास अफगाण म्हणता येईल असा नव्हता अर्थात उंच, गोरा वगैरे होता पण धिप्पाड वा धारदार नाकाचा नव्हता आपल्याकडील पंजाबी वा राजस्थानी लोकात तो मोडला गेला असता अफगाणिस्तानाच मला हे वैशिष्ट्य वाटल एवढा लहानसा देश असूनही त्यात लांबच लांब नाकाच्या व धिप्पाड आणि धष्टपुष्ट लोकांपासून तो बुटक्या लहानखोऱ्या अन् चपट्या नाकाच्या लोकांपर्यंत सगळ्या तऱ्हेचे लोक आहेत

हा तरुण काहीतरी तेवीस-चोवीस वर्षांचा नीटनेटके कपडे केलेला होता आणि आनंदाची गोष्ट म्हणजे त्याला कामचलाऊ इंग्रजी येत होत

आता आम्ही शहरवालीच्या प्लॅनिंगच्या खात्यात जाणार होतो शहरवालीत अशी बरीच खाती होती. प्रत्येक खात्याच्या मुख्याला प्रेसिडेन्ट म्हणत मी आत्ता जाणार होतो, तिथच मी पुढे काम करणार होतो.

प्लॅनिंग खात्याची इमारत अशीच एक मजली आणि एका भव्य मोठ्या सार्वजनिक

बागेमध्ये होती त्या बागेच नाव ' झरगोना पार्क ' ह्या इमारतीत पूर्वी एक डिपार्टमेन्टल स्टोअर होत पण आता ते स्टोअर काढून टाकून तिथ आमच प्लॅनिंग खात आणल गेल होत

गेल्या गेल्या प्रेसिडेंटची भेट झाली तो बत्तीस-चौतीस वर्षांचा असावा सुकडा, उंच व गोरापान चांगल्या प्रतीचे विलायती कपडे केलेला त्याला चांगलं इंग्रजी येत होतं

त्याच्याकडे चहा झाला तो सात-आठ महिन्यांनी उच्च शिक्षणाकरता इंग्लंडला जाणार होता दहा एक वर्षांपूर्वी मी कोलंबो प्लॅन स्कॉलरशिप मिळवून लंडनमध्ये एक वर्ष काढल होत मला लंडनची होती तेवढी माहिती मी त्याला दिली

" खरं म्हणजे आम्ही तुला घ्यायला म्हणून विमानतळावर येणार होतो " प्रेसिडेन्ट थोड कानकोंडेपणानं सागू लागला, " पण रात्री अडीच-तीन वाजता यायच म्हणजे "

" काही बिघडलं नाही " मी त्याला दिलासा देत म्हटलं, " वकिलातीचा माणूस विमानतळावर आला होताच "

" आता तू हॉटेलवर जा व विश्रांती घे प्रवासाच्या दगदगीनं दमला असशील उद्या सकाळी दहा वाजता शहरवालला भेटायचं ठरल आहे शहरवाली तुझ्या हॉटेलजवळच आहे, तेव्हा आम्हीच हॉटेलवर येऊ व तुला घेऊन जाऊ "

तरा हॉटेलवर परत आलो सकाळपासून फक्त दोनदा चहा झाला होता चांगली कडाक्याची भूक लागली होती बाहेर जेवायला जावं की हॉटेलातच जेवाव असा प्रश्न पडला बाहेर जेवाव तर अजुनी गावाची माहिती झाली नव्हती हॉटेलमधले जेवण खिशाला परवडणार नव्हतं सरकारी नियमांप्रमाणे राहण्याचा खर्च जरी सरकार करणार होत, तरी जेवणाचा खर्च माझा मीच करायचा होता

शेवटी स्वत पैसे द्यायचे आहेत ह्याचे भान ठेवून हॉटेलातच जेवलो व परत खोलीत जाऊन ताणून दिली

उठलो, तो साडे-पाच वाजले होते इथ अंधार लवकर होतो तेव्हा जरा लवकरच या, असं कुलकर्णींनी सुचवल होतं तेव्हा निघण्याच्या तयारीला लागलो कुलकर्ण्यांनी बसचा हॉटेलजवळचा थांबा कुठ आहे, बसचा नंबर, त्यांच्या घराजवळच्या खाणाखुणा सगळ अगदी व्यवस्थित दिल होत, त्यामुळे शहर नवीन असल तरी अडचण पडणार नव्हती

हॉटेलच्या बाहेर पडलो सकाळी पडलेले बर्फ रस्त्याच्या बाजूना सारून ठेवलं होत एका वेळचं ते पांढरे शुभ्र बर्फ आता मळक्या फडक्यासारख दिसत होत पडताना व पडल्यावर पांढरे शुभ्र दिसणाऱ्या बर्फाची ती शोचनीय स्थिती पाहून मला उगाचच हळ-हळ वाटली

बस थांबा हॉटेलच्या मागच्या बाजूला होता इथल्या बसेस म्हणजे एक अफलातून संस्था आहे त्यांच्यातही वेळेवर न येण्याचा दुर्गुण असला तरी इतर बरेच गुणही आहेत

ह्या बसेस सरकारी आहेत म्हणून की काय त्या अफगाण राष्ट्रध्वजाच्या रंगसंगतीत रंगव-लेल्या होत्या म्हणजे लाल, काळ्या व हिरव्या रंगात

काबूलमधे कुठूनही कुठेही जा, बस भाड फक्त दोन अफगाणी म्हणजे आपल्याकडले चाळीस पैसे वेगळी गोष्ट म्हणजे विद्यार्थ्यांना प्रवास चक्करफू असतो. त्यांना तिकीट काढाव लागत नाही पण त्यांना उभ्यानं प्रवास करायला लागतो हे खर असल तरी गरीब विद्यार्थ्यांची खूप सोय होते

चौकशी करत बस थांब्यावर आलो कोणतीही बस थांबली की कंडक्टर खाली उतरे, उतरणारे उतरले व चढणारे चढले की स्वतः बसवर जोरात थाप मारून 'बुरो-बरवाई' ओरडत असे मग बस सुरू होत असे. सगळे कंडक्टर असेच करत प्रथम मला वाटल की 'बुरो-बरवाई' हा काबूल शहराचा आपल्या दादर-माटुंग्यासारखा एखादा भाग असावा, व बस त्या भागात जात असावी पण सगळेच कंडक्टर तसं ओरडताहेत पाहून मनात आल की सगळ्या बसेस बुरो बरवाईला जाणाऱ्या कशा असतील ?

नतर कळलं की 'बुरो' म्हणजे 'निघा' व 'बरवाई' म्हणजे सगळ ठीक आहे तेव्हा 'बुरो बरवाई' म्हणजे सगळं ठीक आहे, आता निघा ! पुढे मी ह्या बुरो-बरवाईचा नेहमीच्या जीवनात उपयोग करून जायला लागला कुणाकडे चहाला वा पार्टीला जायचं असल व प्रतिभा तयार व्हायला वेळ लागायला लागला म्हणजे मी 'बुरो बरवाई' म्हणून ललकारी देत असे व आनंदाची गोष्ट म्हणजे त्याचा चागला परिणामपण होत असे

नवं गाव, नवीन माणस, वेगळी भाषा त्यामुळे सगळीकडे कौतुकाने पाहण्याची वृत्ती होती थंडीमुळे रस्त्यावर गर्दी अशी नव्हती सगळ्या दुकानातून परदेशी माल भरला होता इमारती, दुकान आपल्याकडे असतात त्याच पद्धतीच्या होत्या रस्त्यात एक थिएटर लागलं तिथं हेमामालिनीचा सिनेमा लागला होता तिकिटाच्या खिडकीवर लोकांची मोठी झुंबड उडाली होती अर्थात त्या दिवशी सिनेमाला गेलो नाही तरी पण पुढे वेळ काढण्याच व मन रिझवण्याच हिंदी सिनमा हे चागल साधन ठरल

हेमामालिनी ही इथली फार लोकप्रिय नटी इथल्या बहुतेक दुकानांतून दोन छाया-चित्र अगदी हमखास दिसायची एक हेमामालिनीच व दुसरं दाऊदखानच ' त्या वेळच्या अफगाणिस्तानच्या राज्यप्रमुखाच

आपल्याकडेही इंदिरा गांधी, नेहरू व इतर राजकीय पुढाऱ्यांची छायाचित्रं लावली जातात. पण त्याच कारण त्या व्यक्तीबद्दल वाटणार प्रेम व आदर वाटतो म्हणून अगदी इंदिराजींच्या राज्यात लोक जयप्रकाशजींच चित्र अगदी मोकळेपणी लावत

पण इथ वेगळ आहे इथ ज्याच चित्र लावता त्याच्याशी तुम्ही एकनिष्ठ आहात असा अर्थ केला जातो त्यामुळे सत्ता बदल झाला रे झाला की जुन्या राष्ट्रप्रमुखाच छायाचित्र अगदी ताबडतोब काढलं जात व तेवढ्याच ताबडतोबीन नव्याच लागलं जात नुसतेच सरकारी कचेऱ्यांतूनच नव्हे तर अगदी साध्या साध्या लहान-मोठ्या दुकानातूनसुद्धा तस

तुम्ही केलं नाहीत तर तुम्ही राष्ट्रद्रोही ठरता व त्याबद्दल तुम्हाला देहदंडाचीसुद्धा शिक्षा होऊ शकते म्हणजे तशी ती होतेच

आम्ही चार वर्ष काबूलला होतो तेवढ्या काळात तीन वेळा राष्ट्रप्रमुखाची छायाचित्र बदलली गेली व चवथ जागोजागी लागलं गेलं होतं आणि आपल्याला अभिमान वाटेल अशी गोष्ट म्हणजे आपल्या हेमामालिनीची चित्र मात्र होती तशीच राहिली होती !

योग्य वेळी कुलकर्ण्यांकडे पोहोचलो ह्या माणसाला साऱ्या जगाची माहिती त्यामुळं गप्पा चांगल्या रंगल्या. जेवलो, खाल्लो व फार रात्र होण्याआधी हॉटेलवर परत आलो

हॉटेलच्या बॅन्क्वेट हॉलमध्ये गायनाचा कार्यक्रम चालला होता लग्नाचा स्वागत समारंभ असावा गोरे, उंच, सुदृढ असे पुरुष आणि तेवढ्याच गोऱ्या व सुन्दर बायका सगळे अफगाण पुरुष अगदी सुटाबुटात तर स्त्रिया स्कर्ट, फ्रॉक्स व कफतानमधे हे दृश्यच फार मनोहारी होतं

हॉलचे छत खूप उंचावर असून नक्षीदार लाकडाचं होतं चांगल्या प्रतीची व मोठ्या आकाराची भारी झुंबरे लावली होती. चांगल्या भारी सोफ्यावर सगळी मंडळी बसली होती हॉलच्या समोरच्या एका बाजूला थोड्याशा उंच स्टेजवर एक थोडी जाडी गिड्डी, टाचेपर्यंत लांब झगा म्हणजे कफतान घातलेली बाई माईकसमोर उभं राहून अफगाण गाणं म्हणत होती शब्द समजत नव्हते, पण आवाज जोरकस व उमदा वाटला. तेव्हा मी बाहेर उभं राहून गाणं ऐकत राहिलो

माझ्यासारखे आणखी दोघं-तिघं बाहेरच उभे होते त्यातल्या एकाला ह्या बाई कोण ? म्हणून विचारलं माझ्या अज्ञानाचा त्याला थोडा धक्का बसल्यासारखा दिसला आपल्याकडे भीमसेन जोशींचं गाणं चाललं असता, 'हे गाणारे कोण ?' म्हणून कोणी विचारलं तर आपल्याला कसा धक्का बसेल ? तसाच त्याला धक्का बसला होता.

"हिचं नाव आहे उस्ताद महावेश, अफगाणिस्तानची सगळ्यात श्रेष्ठ गाणारी" त्या गृहस्थाचं उत्तर

"उस्ताद ?" हा शब्द एका बाईच्या संदर्भात वापरलेला बघून माझा अचंबा.

"उस्तादच म्हणतात तिला मोठ्या आदरानं."

"आमच्याकडे थोरामोठ्या गायकांना उस्ताद म्हणायची पद्धतच आहे"

मग आपल्याकडे फक्त फैज खाँ, बडे गुलाम अली अशीच नावं कशी ऐकू येतात ? उस्ताद रसुलन बाई, उस्ताद हिराबाई बडोदेकर वगैरे मी कधी ऐकलं नव्हतं. रसुलनबाई वा हिराबाई ह्या बाकीच्या उस्तादांपेक्षा कमी प्रतीच्या आहेत ?

स्त्रियांना समानता द्यायची म्हणजे नुसती दररोजच्या व्यवहारातच नव्हे तर मान-सन्मानाच्या बाबतीत पण द्यायला हवी, ही गोष्ट अफगाणांपासून शिकण्यासारखी आहे, वगैरे विचार माझ्या मनात येत होते तर कानाकर बाईचं गाणं पडत होतं, त्यात रस निर्माण होत होता पण असं दाराशी उभं राहून किती वेळ गाणं ऐकणार ? तेव्हा तिथून

हलाव लागलं जिना चढून दुसऱ्या मजल्यावर गेलो तरी ते गाण्याचे सूर व अफगाण गाण्यातला विशिष्ट ठसका तळमजल्यावर जाणवला होता, तेवढ्याच तीव्रतेने जाणवत होता

काबूल शहरवालीची इमारत कॉंक्रीटची, दुमजली आणि चौराहीवरची म्हणजे चार रस्ते मिळतात तिथं होती मला हॉटेलमधून जी मशिदीसारखी इमारत दिसली होती तिच्या-मागेच शहरवालीची इमारत होती पण मला जी काल मशीद वाटली होती ती मशीद नव्हती तर मजार होती मजार म्हणजे एखाद्याचं दफन केलं असत तिथ बाधलेली इमारत ही मजार अमीर अबदुर रहमान नावाच्या एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी शेवटी होऊन गेलेल्या अफगाण अमीराची होती हा अमीर मोठा हुषार व इग्रजांच्या तोडीस तोड होता तो असेपर्यंत त्याने ब्रिटिशांना अफगाणिस्तानात प्रवेश करू दिला नाही.

शहरवालीच्या इमारतीची ढब आपल्याकडल्या नगरपालिकेसारखी होती गोंधळ, गड-बडही तशीच तळमजल्यावर पैसे भरण्याची खाती होती कित्येक लोक येत होते, जात होते. कोणी नकाशे पास करून घ्यायला आले होते, तर कंत्राटदार मडळी पैसे घ्यायला आली होती

आपल्या नगरपालिका करत नाहीत असं एक काम काबूल शहरवाली करते. शहरातल्या सगळ्या मशिदीच्या मुल्ला-मौलवींना दरमहाचा पगार इथली शहरवाली देते पगाराकरता जमलेली ती मंडळीपण त्या गर्दीत होती

शहरवालीचं स्वत:चं ऑफिस पहिल्या मजल्यावर होत जिना चढून गेल्यावर दोन्ही बाजूला कचेऱ्या असलेल्या कॉरीडॉरमधून जाऊ लागलो त्या वेळी अगदी हिंदुस्थानात असल्यासारखं वाटत होतं बरोबर खात्याचा प्रेसिडेन्ट व हिंदी सहकारी मंडळी पण होती

भेटीची वेळ आधीच ठरली असल्यामुळ थाबायला लागलं नाही लगोलग शहरवालच्या केबिनमध्ये गेलो आत गेलो आणि आपण हिंदुस्थानात नाही आहोत हे जाणवलं. शहरवालची खोली चागली लांब-रुद व त्यामुळं भव्य अशी वाटत होती छत उच होतं चांगली भारी झुंबरं होती खाली किमती गालिचे पसरले होते दोन किमती सोफासेट पण होते एका भिंतीला लागून चागलं नक्षीकाम केलेली उत्तम लाकडाची काचेची कपाटं होती शहरवाल परदेशी गेला असता त्याला भेट म्हणून मिळालेल्या वस्तू त्या कपाटात ठेवल्या होत्या

शहरवालचं मेज एका कोपऱ्यात खिडकीच्या जवळ होते. त्याच्या खुर्चीच्या मागे सदर-इ-रियासत म्हणजे राज्यप्रमुख दाऊदखानचं भलं मोठ तैलचित्र होतं शहरवालच मेज चागलं मोठ व चागल्या प्रतीच्या लाकडाच बनवलेलं होतं समोर पाच-सहा खुर्च्या ठेवल्या होत्या एकदर शहरवालच्या खोलीला भव्यता व रुबाब होता काबूलचा शहरवाल हा काही आपल्या महापौरांसारखा वा विलायतेतल्या मेयरासारखा निवडून आलेला नसतो

तो एक नेमलेला नोकरदार असतो, तोही बहुतेक वेळा कोणी तज्ञ म्हणजे आर्किटेक्ट किंवा इंजिनिअर असतो देवाच्या दयेने येथे पूर्वी इंग्रजांचं राज्य नसल्यामुळे आय् सी एस वा आय ए एस लोकांसारख्यांचं इथं प्रस्थ नाही एका हौसिंग फायनान्स कॉर्पोरेशनचा अध्यक्ष आर्किटेक्ट होता तसाच हा शहरवाल इंजिनियर होता त्याची नेमणूक सदर इ-रियासतने केली होती

आम्ही शहरवालच्या खोलीत शिरताच त्यानं उठून आमचं स्वागत केलं शहरवाल फार उंच नाही, पण चांगला सुदृढ, गोरापान, नाकेला, चांगला भांग पाडून चापून-चोपून बसवलेले काळे केस व करवती मिश्या असलेला असा चाळीस-बेचाळीस वर्षांचा होता भारी इंग्लिश लोकरी कापडाचा सूट व त्यावर शोभेल असा भारी टाय हसत हसत त्याने प्रथम माझ्याशी व नंतर बरोबर असलेल्या बाकी लोकांशी हस्तांदोलन केलं

आम्हाला बसायला सांगितलं, स्वतः बसला व चहा मागवला नंतर कधी आलास ? प्रवास कसा झाला ? हॉटेल काबूलमधेच उतरला आहेस ना ? वगैरे माझ्याकडे चौकशी केली

शहरवालचं नाव होतं डॉ. नूरजाद त्याने रशियात रोड इंजिनियरिंगचं शिक्षण घेतलं होतं व त्याच विषयात त्याला डॉक्टरेट पण मिळाली होती त्याला मोडकं-तोडकं इंग्लिश येत होतं त्यामुळे प्राथमिक बोलण्याकरिता कोणा दुभाष्याची गरज लागली नाही पण नंतर कामाचं बोलायचं होतं म्हणून दुभाष्याला बोलावण्यात आलं आपलं बोलणं दुभाष्या-मार्फत होत आहे हे बघून मी अगदी हरखून गेलो खरं म्हणजे ती साधी सोय होती तरी पण आपण कुणीतरी महत्त्वाचे आहोत असं वाटायला लागलं आणि एका दृष्टीने मी महत्त्वाचा होतोच भारत सरकारचा मी एक वरिष्ठ अधिकारी होतो पण ह्या दुभाष्यामुळे ती जाणीव एकदम तीव्रतेने झाली

शहरवालने भारत-अफगाणिस्तानचे कसे पूर्वीपासूनचे मैत्रीचे संबंध आहेत हे सांगून भारताने अफगाणिस्तानला कशी वेळोवेळी मदत केली आहे त्याचा उल्लेख केला त्याचबरोबर माझ्याकडून व इतर हिंदी सहकाऱ्यांकडून त्याच्या काय अपेक्षा आहेत ते सांगितलं

मीही आम्हाला अफगाणिस्तानाबद्दल खूप आत्मीयता आहे वगैरे सांगून " तुम्ही हाती घेतलेली कामं आम्ही लवकरात लवकर व चांगल्या प्रकारे पुरी करू " असं आश्वासन दिलं " तुम्ही हाती घेतलेली कामं सर्वसामान्य अफगाणांकरिता आहेत, हे आम्हाला माहित आहे आम्ही गरीब देशातून आलो आहोत त्यामुळे आम्हाला सर्वसामान्य अफगाणांच्या भावना कळतात आपण करत असलेल्या कामाचा फायदा गरीब जनतेला लवकरात लवकर मिळाला पाहिजे "

चहा झालाच होता परत आम्ही शहरवालशी हात मिळवणी केली व निघालो. निघता निघता शहरवाल मला म्हणाला, " आता दोन दिवस विश्रांती घे मग शनिवारपासून कामाला सुरुवात करू. "

मीही ' हो-ला-हो ' केलं पण मनाशी विचार आला की बाकी सगळे वार सोडून ह्या

शहरवालनं कामाची सुरुवात अशा न करायच्या वारी म्हणजे शनिवारी करू या म्हणून का सांगितलं असेल बरं ?

अफगाणिस्तान हा मुस्लिम देश—त्यामुळे गुरुवारी अर्धा दिवस व शुक्रवारी संपूर्ण दिवस सुट्टी असते म्हणजे आपला जो सोमवार तो ह्याचा शनिवार म्हणजे आठवड्याचा पहिला दिवस ! प्रथम प्रथम थोडं जड गेलं, पण पुढे सवय झाली.

पुढल्या चार वर्षांत शहरवालच्या केबिनमधे बऱ्याच वेळा जायला लागले. डॉ. नूरजाद होता त्या वेळी व नंतरही शहरवालची खोली होती तशीच राहिली होती, मात्र भिंतीवरची 'तैलचित्रं' मात्र बदलत गेली व शहरवाल पण बदलत गेला किंबहुना 'तैलचित्रं' बदलत गेली म्हणूनच शहरवाल बदलत गेला होता.

नंतरचे आलेले शहरवाल पण चांगले होते तरी त्यांना डॉ नूरजादचा खानदानीपणा व त्याची तत्परता त्यांच्यात नव्हती नंतर आलेल्या कम्युनिस्ट राजवटीत खानदानीपणा नावाची गोष्टच राहिली नव्हती अन् कोणाचही आसन स्थिर नव्हतं प्रत्येक जण आपल्याच फिकिरीत असायचा त्यामुळे कामावर परिणाम व्हायचा.

असं असलं तरी त्या सगळ्यांची आमच्याशी वागणूक फार सौजन्याची व मित्रत्वाची राहिली आम्हीही आम्हाला दिलेली कामे मोठ्या नेकीनं करत असू कारण आम्ही अफगाणांचे व अफगाणिस्तानचे मित्र होतो कोणा एका व्यक्तीचे वा एका पक्षाचे नव्हतो.

तरीही पण पुढे जेव्हा जेव्हा शहरवालच्या खोलीत गेलो तेव्हा तेव्हा डॉ नूरजादची आठवण् होत असे त्याचा चाणाक्ष चेहरा, त्याची इंग्रजीतून बोलण्याची घडपड आठवा-वयाची आणि मन फार उदास व्हायचं कम्युनिस्टांचे राज्य आल्यावर त्याला त्याच्या घरातच नजरकैदेत ठेवलं गेलं होत आम्ही परकीय, त्यामुळे इच्छा असूनसुद्धा आम्हास त्याला भेटता येत नव्हतं. आपल्याकडे माणस दिसेनाशी होतात ती देवाकडे गेल्यावरच पण असे जिवंत असूनही दिसेनासं होणं पूर्वी कधी ऐकलं नव्हतं की पाहिलं नव्हतं ती संधी नव्या कम्युनिस्ट राजवटीमुळे मिळाली, हे ऋण इथं मान्य करायलाच हवं

शहरवालला भेटलो वगैरे सगळ्या गोष्टी सत्त्यात्तरच्या फेब्रुवारी महिन्यातल्या अठ्या-हत्तरच्या एप्रिलमधली एक आठवण इथच सांगतो

सव्वीस एप्रिल अठ्याहत्तरला दाऊदखानचा सफाया करून अफगाणिस्तानात कम्युनिस्ट राजवट सुरू झाली नूर महंमद तराकी राज्यप्रमुख झाला तो दिवस गुरुवारचा होता काही दिवसांपूर्वी डॉ नूरजाद युरोपच्या दौऱ्यावर गेला होता त्याला काबूलमधल्या घडामोडींची काहीच कल्पना नव्हती ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे तो शुक्रवारी सकाळी विमानाने काबूलला पोहोचला त्या वेळी नवे सरकार आले होते पण त्याची घडी आजुनी बसायची होती

शुक्रवारी रेडियो व टी व्ही वर सांगण्यात आलं की शनिवारी सगळी दुकानं उघडली गेली पाहिजेत आणि प्रत्येकानं कचेरीत हजर राहायलाच पाहिजे. जे असं करणार नाहीत

त्यांना नव्या राजवटीचा शत्रू मानण्यात येईल, आणि नव्या राजवटीच्या शत्रूंना देहान्त प्रायश्चित्ताशिवाय प्रायश्चित्त नव्हत

डॉ नूरजाद व त्याचे सहकारी ही सगळी दाऊदखानची माणस होती. त्याना आपल भवितव्य स्पष्टपणे दिसत होतं ते म्हणजे मृत्यू किंवा आयुष्यभरचा तुरुगवास त्यामुळे शनिवारी शहरवालीत जाऊन किंवा न जाऊन फार काही फरक पडणार नव्हता पण डॉ नूरजादला अजुनी शहरवालच्या जागेवरून काढल नव्हतं त्यामुळे त्याला नव्या राजवटीचे पहिल्या दिवशी म्हणजे त्या शनिवारी शहरवालीत जाण भागच होत

म्हणून डॉ नूरजाद व त्याचे सहकारी त्या दिवशी शहरवालीत गेले वर म्हटल्याप्रमाणे त्यांचे भवितव्य स्पष्ट असले तरी जर ह्या लोकानी नव्या राजवटीविषयी प्रेम व आदर दाखवला असता, दाऊदखानचा निषेध केला असता तर त्याची शिक्षा कदाचित सौम्य झाली असती

पण अफगाण लोक खरंच मोठ्या गट्सचे व खाल्लया अन्नाला जागणारे

कोणी अल्लाला प्यार झालं म्हणजे वारलं की त्याच्या आपल्याला शांती मिळावी म्हणून मुसलमान लोक मशिदीत जाऊन वा कोणाच्या तरी घरी जमून ‘ फतेहा ’ पढतात. म्हणजे कुराणातले काही कलमे म्हणतात. मृत माणसाच्या नातेवाइकावर व मित्रमंडळींवर ती जबाबदारी असते

दाऊदखान व त्याची नातेवाईक मंडळी अशी तीस-पस्तीस माणसं जीवानिशी मारली गेली होती व नवी राजसत्ता प्रस्थापित झाली होती अशा परिस्थितीत दाऊदखानच नुसत नाव काढणंदेखील पाप मानल गेलं असतं आणि त्या पापाचे प्रायश्चित्त होते—मृत्यू ! हे माहित असताना दाऊदखान व त्याच्या कुटुंबियांकरता फतेहा कोण पढणार होत ?

पण डॉ नूरजाद व त्याचे सहकारी अस्सल व प्रामाणिक होते. परिणामांची पर्वा न करता म्हणजे जवळ जवळ मृत्यूला निमंत्रण देऊन त्यानी शहरवालीच्या एका खोलीत जमून फतेहा वाचला. अर्थात त्याची त्याना शिक्षा भोगायला लागली डॉ नूरजाद सोडून बाकी सगळे गोळ्या घालून ठार मारले गेले डॉ नूरजादला मात्र त्याच्या घरात नजरकैदेत ठेवले गेले त्याच्यावर दया दाखवली गेली ह्याचे कारण तो नव्या राजवटीतल्या पंतप्रधानाचा म्हणजे अमीनचा बालपणापासूनचा मित्र होता ते दोघ पगमान नावाच्या छोट्या गावात एकाच शाळेत बरोबर शिकलेले.

कम्युनिस्ट राजकारणात क्वचितच दिसणाऱ्या मित्रप्रेमान पक्ष-प्रेमावर मात केली होती !

डॉ नूरजादने पहिल्या भेटीत सांगितल्याप्रमाणं शनिवारपासून माझ काम सुरू झाल. पहिले दोन-तीन दिवस तर सगळ्यांच्या ओळखी होण्यातच गेले. दर दिवशी नवीन माणसं आणि पूर्वी कधी ऐकली नव्हती अशी मुस्लिम नावं आपल्याला इतिहासातली व राज-

कारणात असलेली मोजकी मुसलमान नाव माहित असतात इथ कोणी सय्यद महमद तर कोणी सुलतान महंमद। त्यातून नावाबिवाबाबतची माझी स्मरणशक्ती दिव्य ! त्यात ही अशी अनोळखी नाव आणि एकाच वेळी इतक्या नव्या लोकाची एकदम इतकी नवी नावं' माझी तर जाम पचाइत व्हायची.

एक बरं होनं की बऱ्याचजणांना बोलण्या-चालण्याइतक इग्रजी येत होत त्याचे कारण या लोकानी अमेरिकन सरकारन काही वर्षांपूर्वी सुरू केलेल्या पोलिटेक्निकमध्ये आर्कि-टेक्चरच शिक्षण घेतलं होत त्यांना इग्रजी येत असल्याकारणान आपल्या कल्पना वगैरे समजावून सागणे तर मला सोपे गेलेच पण इकडल्या तिकडल्या गप्पा मारणं, त्याचे विचार समजावून घेण, गावात काय चालल आहे ते कळून घेणं पण शक्य झाल

आमच्या प्लॅनिंग विभागाचे दोन भाग पाडले होते. हिंदी टीम व त्यांच्याबरोबर काम करणारे काही अफगाण हा एक भाग व दुसरा म्हणजे शौरवी म्हणजे रशियन टीम व त्याच्या बरोबर काही अफगाण

अमेरिकन पोलिटेक्निकसारखच काबूलमध्ये एक रशियन पोलिटेक्निक पण होतं. तिथं सगळे विषय रशियन भाषेत शिकवले जायचे. तिथून शिकून आलेली वा रशियाला जाऊन शिक्षण घेऊन आलेली मडळी शौरवी टीमबरोबर काम करत असत

आमच्या हिंदी टीममध्ये मी आर्किटेक्ट-प्लॅनर, दास नावाचा बंगाली डिझाईनर इंजिनियर, मल्होत्रा नावाचा पंजाबी रस्ता-बांधणी इंजिनियर आणि मागे सांगितलेले आपले कुलकर्णी-बांधकाम इंजिनियर आम्हा चौघांत हुद्द्याने, पगाराने मीच वरिष्ठ होतो, त्यामुळे टीमचे पुढारीपण साहजिकच माझ्याकडे आले

दास चागला हुषार व कामात वाकबगार होता. एका शिष्यवृत्तीवर तो पूर्व-जर्मनीत तीन वर्षं राहून आला होता उंची अगदी कमी आणि काळा म्हणजे आपण ज्याला काळा-ठिक्कूर म्हणू असा आणि सगळ्यात मोठा विनोद म्हणजे त्याचं नाव त्याच्या पालकानी मोठ्या कौतुकानं 'पियूष-कांती' म्हणजे 'ताकासारखी शुभ्र कांती असलेला' असं ठेवलं होत!

मल्होत्रा अगदी चिवट व चामट माणसातला होता त्याला जाण कमी होती तशी त्याच्या विषयातही गती कमी होती त्यामुळे व पजाबी वृत्तीमुळे तो सतत कुठं काय विकत मिळत, जास्त स्वस्त कुठ मिळतं याच चौकशीत असे अशी आम्ही चार दिशाची व चार वेगवेगळ्या वृत्तीची माणसं एकत्र काम करणार होतो

आमच्या टीममधले सगळे अफगाण अगदी तरुण व उत्साही होते. त्यातले खोजा अरेफ, पायडा महंमद चागले लक्षात राहिले पायडाचे वाचन चांगले होते व त्याला चागली विनोदबुद्धी होती

खोजा अरेफ हा शिया पथाचा. तो पाकिस्तानात कराचीला जन्मला होता. "हा कराचीत जन्मला आहे अन् कराचीखाली मरणार आहे." पायडा म्हणायचा कराची

शब्दाचा दुसरा अर्थ म्हणजे सामान वाहण्याची गाडी !

एकदा मी आणि पायडा कॉरिडॉरमध्ये काही बोलत उभे होतो कॉरिडॉर नेहमी असतात तसा अंधारी होता. समोरून दास येत होता त्याला तस येताना पाहून पायडा म्हणाला, "अरे कसे तुम्ही हिंदी नफर ? (नफर म्हणजे माणस) हा दास इतका काळा आहे की तो जातोय की येतोय हेच कळत नाही !"

जशी आमची हिंदी टीम होती तशीच शौरवी म्हणजे रशियन लोकाची पण टीम होती सगळे शौरवी गोरे म्हणजे युरोपियन होते त्याची टीम जास्त शिस्तीची होती. त्याचा मुख्य म्हणजे सर इंजिनियर पोकोस्कि नावाचा आर्किटेक्ट होता. शेवटपर्यंत त्याच्या नावाचा नीटपणे उच्चार मला करता आला नाही

पोकोस्कि चांगला धिप्पाड, उंच-निंच असा होता त्याच्या चेहऱ्यात काहीतरी क्रूरता वाटायची त्याचे डोळे लहान पण भेदक व कपाळ खूप पुढे आलेले त्यामुळेही तो क्रूर वाटत असेल बोल्शेव्हिक शब्दावरून आपल्याला जी कल्पना मनात येते तसा तो दिसायचा रशियातल्या कोणातरी उच्च स्तरावरच्या माणसाचा तो नातेवाईक होता, असं म्हटलं जायचं व ते खरही असेल असे त्याच्या ताठर वागण्यावरून वाटायचं तो ऑफिसात केव्हाही यायचा व जायचा त्याबद्दल जेव्हा मी एकदा चौकशी केली त्या वेळी 'तो घरीच काम करतो' म्हणून सागितलं गेलं

त्यांच्यातल्या रस्ते-बांधणीच्या इंजिनियरचे नाव होत युरी तो जाडा गिड्डा व अत्यंत गोडपणे हसणारा असा होता त्याला इंग्रजी येत नव्हतं पण फारसी चांगल येत होत युरी कवी पण आहे हे आम्हाला पुष्कळ दिवसानी कळल मी त्याच्याशी मोडक्यातोडक्या फारसीमध्ये थट्टाविनोद करत असे त्याला पुष्कळ वेळा आग्रह केला पण त्यान त्याची कविता कधी आम्हाला वाचून दाखवली नाही कदाचित त्याची कविता 'बांधिलकी'ची नसेल, भाळुक भावनाची असेल आणि म्हणून तो ती वाचण्याच टाळत असावा कारण काही असो, रशियन काव्य प्रत्यक्ष कवीच्या तोंडून ऐकायचा योग आम्हाला मिळाला नाही, हे खरं

आणखी दोन शौरवी इंजिनियर्स होते ते काय काम करायचे ते कधीच कळले नाही. त्यातल्या एकाकडे कायम एक कॅमेरा असे. तो ऑफिसात होत असलेल्या प्रत्येक बैठकीचे फोटो घेई एकदा मी त्याच्या ह्या फोटो घेण्याबद्दल खूप आरडाओरड केली त्यानंतर तो कचेरीत येईनासाच झाला काही दिवसांनतर कळल की तो के जि बी चा एजट होता म्हणून !

आतापर्यंत सी आय् ए, के जि बी वगैरे गोष्टी मी फक्त पुस्तका-कादबऱ्यातूनच वाचल्या होत्या. ज्या माणसाबद्दल आपण एवढी आरडा-ओरड केली तोच के. जि बी चा

एजंट आहे, कळल्यावर माझ्या तोंडून "अरे बापरे!" असे उद्‌गार अगदी सहजपणे निघाले

ह्या शौरवी टीममधे पचवीस-सव्वीस वर्षांचा एक तरुण आर्किटेक्ट होता. त्याची एकदर धाटणी कपडे-लत्ते, राहण, वागण अगदी अमेरिकन पद्धतीचं होत तो चागला चित्रकार पण होता त्याने दाऊदखानच एक अतिभव्य म्हणजे तीस फूट उंचीचे व वीस फूट रुंदीचे तैलचित्र बनवलं होत सरकारी उत्सव असेल त्या वेळी काबूल शहरानजिकच्या एका टेकडीवर ते तैलचित्र उभे करून त्याच्यावर मोठाले प्रकाशझोत टाकत ते सगळ्या काबूल शहरातून दिसे

ह्या सर्व रशियनांत मन आकर्षित करेल अशी एक वीस-बावीस वर्षांची, सुरेख व सडसडीत बांधा असलेली मुलगी होती ती इग्रजी चांगल बोलायची पण थोड बोबड-पद्धतीन आधीच ती सुंदर व गोड त्यातून अस बोबडं बोलण, त्यामुळे तिच्याशी गप्पागोष्टी करायला खूप मजा वाटायची

तो अमेरिकन ढबीचा तरुण आर्किटेक्ट व ही मुलगी जोडप्यासारखे राहात म्हणजे त्यांच लग्न वगैरे झालं नव्हतं तरी ती तशी राहात असत अशी बरीच रशियन 'जोडपी' काबूलला होती कोणीतरी बाई कोणातरी पुरुषाबरोबर बायकोसारखी राहात असे सरकारी नियमानुसार किंवा सरकारी सोयीकरता. मलासुद्धा हे सगळ कळायच कारण म्हणजे एका पार्टीत एक रशियन स्त्री माझ्याजवळ मी ज्याला तिचा नवरा समजत होतो त्याच्या-बद्दल अद्वातद्वा बोलू लागली मी आपला चकित! असं साधारणपणे होत नाही, तेव्हा मी तिच्याकडे आश्चर्य व्यक्त करताच 'तो काही माझा नवरा नाही आहे, आम्ही फक्त एकत्र राहतो!' असं तिनं सांगितल

काय ही कम्युनिस्ट पद्धत तरी '

एकदा त्या गोड रशियन मुलीशी गप्पा मारता मारता मी तिला दिल्लीच्या वर्तमानपत्रात आलेली माझी मुलाखत दाखवली तिनं ती तिथच थोडीशी वाचली व म्हणाली, "ऑफिसमध्ये सगळं वाचण काही शक्य होणार नाही, तर हा अक घरी घेऊन जाते व शातपणे वाचून दोन-तीन दिवसानी परत करते"

मला बरंच वाटलं, म्हटल तेवढाच आपला भाव वधारेल तीन-चार दिवसानी तिने तो पेपर परत केला, वर माझ भरघोस कौतुक पण केल

काही दिवसांनी मला कोणीतरी सागितल की रशियन वकिलातीत सगळ्या हिंदी लोकांच्या 'फाईल्स' ठेवण्याची पद्धत आहे व त्याकरता ते माहिती गोळा करत असतात हे ऐकताच माझ्या डोळ्यासमोर माझ्या मुलाखतीचा पेपर व ती गोड मुलगी उभी राहिली "भाव वधारण्याकरता म्हणून आपण तो उद्योग केला आता त्याची कॉपी रशियन

वकिलातीत ठेवली जाणार. ह्यातून काही प्रकरण उद्भवलं नाही म्हणजे मिळवली ."

ते अमेरिकनांप्रमाणे राहणारं सुखी 'जोडप' काबूलमध्ये फार दिवस राहिलं नाही. ती दोघं वकिलातीच्या परवानगीशिवाय पिकनिकला गेली त्याची शिक्षा म्हणून त्यांना परत रशियाला पाठवलं गेल्याचं कळलं. पोकोस्कीला त्याच्याबद्दल विचारलं तर "ती दोघं आजारी पडली तेव्हा उपचाराकरता त्यांना मॉस्कोला पाठवलंय" असं त्यानं सांगितलं व थोड्याच दिवसांत ती दोघं परत येतील असा दिलासाही दिला. अर्थात ती काही काबूलला परत आली नाहीत.

कम्युनिस्ट राज्यात आजारही दोघा-दोघांना एकदम होत असतात ह्याची मला कल्पना नव्हती. ती ह्या प्रकरणामुळे आली !

ह्या रशियन टीमचा आपला एक असा दुभाष्या होता. अबदुल त्याचं नाव. तो रशिया-तल्या दक्षिण भागातला म्हणजे मुसलमानी भागातला होता व मुसलमान होता. पण कम्युनिस्ट राज्यात तो फक्त नावाचा मुसलमान राहिला होता. तो कधी नमाज पढत नसे किंवा मशिदीत जात नसे. म्हणजे त्याला सरकारी नियमानुसार जाता येत नव्हतं. सगळे अफगाण ह्या गोष्टीवरून अबदुल्लाची चेष्टा-मस्करी करत. तशी चेष्टा झाली की त्याचा चेहरा पार पडत असे. पण करतो काय बिचारा ? सरकारी नियम तोडून त्याचं थोडच चालणार असतं ?

हॉटेलात काही कायमचे राहता येणार नव्हते. तेव्हा जागा शोधण्याच्या मागे लागलो. राहण्याची जागा वकिलातच शोधून देते व भाडंही वकिलातच भरते. पण राहणाऱ्या अधिकाऱ्याला ती पसंत करायला लागते. वकिलातीनी पुष्कळ जागा दाखवल्या पण माझ्या पसंतीला कोणतीच उतरेना.

अजूनी माझी 'फॅमिली' आली नव्हती. तेव्हा तात्पुरती सोय म्हणून मला एक बेडरूमचा फ्लॅट दिला गेला. ती जागा मध्यवर्ती असल्याकारणाने मीही ह्या व्यवस्थेला हरकत घेतली नाही.

नव्या जागी मी थोडा स्थिरस्थावर होऊ लागलो होतो. घर कचेरीपासून जवळ व हमरस्त्यावर होतं, त्यामुळे फार सोयीचं होतं. आता जेवणही घरीच बनवायला सुरुवात केली होती. इतक्या थंडीचे दररोज रात्री बाहेर जेवायला जाणं शक्य नव्हतं. त्यातून इथले सगळे पदार्थ जनावरांच्या चरबीत बनवलेले असल्यानं त्यांना एक विशिष्ट कवडा वास येत असे. तो मला सहन होत नसे.

मी पूर्वीच थोडा-थोडा स्वैपाक करायला शिकलो होतो. त्यातून इथं स्वैपाक करणं आणखीनच सोपं होतं. इथं पोळ्या लाटायचा ताप नव्हता. 'नान' आणायचा की झालं काम.

आता थोडं नान् व नान् संस्कृतीविषयी. जवळ जवळ सगळ्या मध्य-पूर्वेत व आपल्या पंजाब व दिल्ली भागातही नानचं प्रस्थ फार आहे नान् म्हणजे गव्हाच्या पिठात इस्ट मिसळून त्याच्या बनवलेल्या रोट्या काही देशांत नान् भाकरीच्या आकाराचा म्हणजे गोल आकाराचा असतो, तर काही ठिकाणी तो लांबडा असतो

अफगाण नान् हा असाच दीड-दोन फूट लांब व नऊ-दहा इंच रुंद सगळ्या काबूलभर आपल्याकडल्या पानाच्या दुकानासारखी नान्-भाईची दुकानं असतात नान्-भाईची दुकानं म्हणजे एकतऱ्हेची भट्टी असते. दोन्ही बाजूला तोंड असलेला मातीचा रांजण जमिनीत गाडलेला असतो. खालून आग दिली जाते व रांजणाच्या आतल्या बाजूला कच्चा नान् हाताने थापला जातो भाजला गेल्यावर तो लोखंडी सळ्यांनी बाहेर काढतात

नान्चं वजन सरकारने ठरवून दिलं आहे जर कोणाचा नान् वजनात कमी भरला तर त्याला जबर शिक्षा होते एका अफगाण अमीराने तर एका नान्भाईला कमी वजनाचा नान् बनवला म्हणून त्याच्याच भट्टीत टाकून दिले होते म्हणे आणि ते खरंही असेल

तेव्हा इथं जेवण बनवायचं म्हणजे असा नान् आणायचा दोन अफगाणी म्हणजे चाळीस पैसे पडत एका नान्ला गरम गरम असेपर्यंत नुसतासुद्धा खायला तो चांगला लागतो, किंवा तो जॅमबरोबर किंवा लोणच्याबरोबर खायचा असा नान् आणायचा, कुकरवर भात टाकायचा, आमटी किंवा पिठलं करायचं की झालं जेवण तयार '

परदेशातले रीतिरिवाज व तिथल्या पद्धती माहित नसल्यामुळं किती तरी मजेशीर गोष्टी घडतात.

बहुतेक हिंदी लोक रोख पैसे देऊन नान् घेत असत. पण अफगाण मात्र हातात काठ्या घेऊन येत असत बरेच दिवस झाले तरी त्यांनी तशा काठ्या आणण्यामागचे प्रयोजन काही केल्या लक्षात येत नसे आमच्या एका मित्राला वाटलं की नान् घेऊन येताना कुत्री वगैरे अंगावर येऊ नयेत म्हणून हे लोक काठ्या आणत असतील पण नंतर कळलं ते अगदी वेगळंच

त्या काठ्या म्हणजे अफगाणांच्या हिशेब वह्या होत्या बहुतेक अफगाण महिन्याच्या सुरुवातीला काहीतरी शंभर सव्वाशे किलो आटा नान्-भाईला देऊन ठेवायचे त्याचे किती नान् होतील ह्याचा त्यांना अंदाज असे मग दररोज किती नान् दिले त्याचा हिशेब काठ्यावर काही विशिष्ट खुणा करून ठेवत महिन्याच्या शेवटी ह्या सगळ्याचा हिशेब व्हायचा

कचेरीतसुद्धा इथं काही वेगळ्याच पद्धती होत्या आपल्याकडल्या सरकारी कचेऱ्यातून येण्या-जाण्याच्या वेळा लिहिण्याकरता 'मस्टर-बुक' असते राजपत्रित अधिकारी सोडून बाकी सगळ्यांनी त्यात सह्या करायच्या असतात. राजपत्रित अधिकाऱ्याचा तो एक हक्क,

शहरवालीतही असे मस्टर असे त्यात लहान-मोठ्या सगळ्या अधिकाऱ्यांना सह्या करायला लागत अगदी शहरवाललासुद्धा सही करायला लागे

ज्या ड्रायव्हर-चपराशी वगैरे लोकांना सही करता येत नसे त्यांच्या नावाची मोहोर असायची ती त्यानी मस्टरमध्ये उठवायची मोहोर उठवणं वगैरे मोठं ऐतिहासिक काळातील वाटायच.

इस्लाम धर्मातच तशी शिकवण आहे की ह्या लोकांच्या संस्कृतीत आहे, कळत नाही, पण इथं एक गोष्ट प्रखरतेनं जाणवली. ती म्हणजे सगळ्याना सारखे वागवण्याची ! अर्थात तुमच्या हुद्द्यामुळे, श्रीमंतीमुळे वेगळी वागणूक मिळते, नाही असं नाही. पण खालच्याला अगदी 'खालचा' म्हणून वागवल जात नाही व त्याहून महत्त्वाच म्हणजे तो खालचा माणूस स्वत च स्वत ला फार खालचा समजत नाही, आणि मला वाटतं समानतेमध्ये हे फार महत्त्वाचं आहे

ह्या वृत्तीमुळे होतं काय की कोणालाही कुणाविषयीही भीती म्हणून वाटत नाही, वा कुणातही कमीपणाची भावना पण नसते

प्रथम जाणवतं ते म्हणजे इथ प्रत्येकजण प्रत्येकाशी हस्तांदोलन करतो आमचा ड्रायव्हर गुल अमीर सकाळी मला न्यायला आला की प्रथम माझ्याशी हस्तांदोलन तर करायचाच पण प्रतिभेशी व मुलांशी पण करायचा वर, 'खूब अस्ती, चतुर अस्ती' म्हणून चौकशी ! पहिल्या पहिल्यांदा प्रतिभा अगदी बावचळून जायची शेक हॅण्ड करायचा व तोही ड्रायव्हरबरोबर !

गुल अमीरला कधी चहा घे म्हटल की तो घरात येऊन चक्क सोफा-सेटवर बसायचा. आपल्याकडे कोणी ड्रायव्हरला असं सोफ्यावर बसू देणार नाहीत आणि मुळात म्हणजे आपल्याकडला ड्रायव्हर असा आपण होऊन येऊन बसणार नाही

हा मुस्लिम देश असल्यामुळे आपल्याला असं वाटत की, इथल्या सगळ्या बायका बुरख्यात बंद असतील, पण तसं काहीही नाही जुन्या काबूलमध्ये कधी दिसला तर, नाहीतर बुरखा क्वचितच दिसत असे. स्त्रियांत शिक्षणाचं प्रमाण फार मोठ आहे कचेऱ्यांतून, बँकेत, पोस्ट ऑफिसातून सर्रासपणे मुली काम करत असतात आमच्या ऑफिसमध्येच अमीना नावाची ज्युनियर इंजिनियर होती आणि माझ्याच टीममध्ये जरिफा नावाची ड्राफ्ट्सवुमन होती. त्यांच्याशी माझी चांगली मैत्री झाली.

ह्या सगळ्या मुली व बायका अगदी युरोपियन पद्धतीचे कपडे घालायच्या, रंग-रंगोटी करायच्या, केस बॉब करायच्या, सगळ्याशी मोकळेपणी शेक-हॅण्ड करायच्या, सिगरेट प्यायच्या मुस्लिमांबद्दल वेगळीच कल्पना असल्यामुळे त्या गोष्टींची आम्हाला खूप मजा वाटायची

कम्युनिस्ट सरकार आल त्याच मला विशेष कौतुक वाटल नाही तरी त्याची एक गोष्ट मला फार आवडली ती म्हणजे त्यांच्या मंत्रिमंडळात एक स्त्री मंत्री होती मला वाटत रशियातसुद्धा पहिले कित्येक वर्षं स्त्री-मंत्री नव्हती सध्यातरी आहे की नाही कुणास ठाऊक; आणि असली तरी तिचं अस्तित्व जाणवत नाही तिचच का ? रशियात कोणत्याही स्त्रीचं

अस्तित्व जाणवत नाही

मोटारीत कुणी कुठ बसायच त्याचीही आपल्याला नवखी वाटेल अशी अफगाण पद्धत आहे आपल्याकडे गाडीचा मालक वा ज्या अधिकाऱ्याची गाडी असेल तो मागच्या सीटवर बसतो व सर्वांतला कनिष्ठ माणूस ड्रायव्हरजवळ असतो अफगाणिस्तानात वरिष्ठ वा मालक ड्रायव्हरजवळ बसतो शहरवाल वगैरे तर सोडूनच द्या, अगदी सद्र–इ–रियासत–राज्य-प्रमुखसुद्धा ड्रायव्हरजवळ बसतो

आपल्यासारखेच इथले चपराशीपण नेहमी कॉरिडॉरमधून बसतात. पण हिवाळ्यात कॉरिडॉर्स काही अधिकाऱ्यांच्या खोल्यासारखे गरम केले जात नाहीत तेव्हा चपराशी मडळी साहेबाच्या खोलीतल्या सोफ्यावर येऊन बसतात त्याचं तसं बसणं कोणाला अवघड तर वाटत नाहीच, उलट आत गेल्यावर अधिकाऱ्यांशी शेकहँड करून ' खूब अस्नी, चतुर अस्नी ' विचारून झालं की चपराश्याशी शेक-हॅण्ड करून त्यालाही ' खूब अस्नी, चतुर अस्नी विचारल जात

ज्या वेळी एखाद्या नकाशावर वा योजनेवर चर्चा असेल त्या वेळी एक फरक प्रखरतेने जाणवायचा कोणाही अधिकाऱ्याला व अगदी डाफ्ट्समनला देखील चर्चेच्या वेळी हजर राहता येत असे. एवढेच नव्हे तर त्यानी काही प्रश्न विचारले तर अगदी शहरवालसुद्धा त्यांची उत्तर देत असे कोणालाही कोणाबद्दल दडपण वा भीती नावाची गोष्टच नसायची

मला हे सगळे अगदी नवीन व आगळं वाटायच आपल्याकडे मंत्रीमहोदय असतील तर ते वा त्या बैठकीतला सगळ्यातला वरिष्ठ अधिकारीच बोलत असतो बाकी कुणी बोललच तर ते फक्त ' हो ला हो ' करण्याकरता प्रश्न विचारणं वगैरे नसतंच

नवीन देशातल्या अगदी बारीक-सारीक गोष्टींबद्दलही कौतुक वाटते विशेषत: ती गोष्ट अगदी साधी असूनही आपल्या कधी लक्षात आली नसती तर फारच कौतुक वाटत.

परदेशी भाषेतल्या शब्दाकरता आपल्या भाषेतले शब्द वापरले गेले पाहिजेत ही चळवळ आपल्याकडे काही नवीन नाही आता तर काय सरकारने विद्वान लोकांच्या कमिट्या नेमून प्रतिशब्द काढण्याचा सपाटा चालवला आहे

टेलिफोनकरता आपण दूरध्वनी हा शब्द आणला व तो आता रूढ पण झाला आहे. पण त्याच दूरध्वनीवरून बोलताना आपण सुरुवात ' हॅलो ' म्हणूनच करतो ' हॅलो ' हा शब्द इंग्रजी आहे हे आपल्याला जाणवतदेखील नाही ' हॅलो 'चा उपयोग आपण टाळला पाहिजे असे आपल्याला वाटतसुद्धा नाही फ्रेंच व इटालियन्स काही ' हॅलो ' म्हणत नाहीत तसेच अफगाणही ' हॅलो ' म्हणत नाहीत ते म्हणतात ' बाले ' हे ' बाले ' कानाला इतके गोड वाटत व ते म्हणणारी स्वतःच गोड असेल तर विचारूच नका देश स्वतंत्र असला म्हणजे वृत्तीतली स्वतन्त्रता अशा लहान सहान गोष्टींतूनही दिसून येते

आजकालचे काबूल शहर म्हणजे दुसऱ्या महायुद्धापूर्वी आपलं पुणं होतं तसंच काहीसं आहे पुण्याला राजकीय व सांस्कृतिक इतिहास आहे तसाच किंबहुना त्याच्यापेक्षाही जुना इतिहास काबूल शहराला आहे जशी मुळा-मुठा जुनं पुणं आणि नवीन पुणं असं विभागते तशीच काबूल नदी जुनं काबूल व शहर–ए–नौवा म्हणजे नवं शहर असं विभागते

पुण्याच्या आजूबाजूला जशा बऱ्याचश्या टेकड्या आहेत तशाच त्या काबूल शहराभोवती पण आहेत एकतर अगदी पर्वतीसारखी आहे पावसाळ्यात ती पर्वतीसारखीच हिरवीगार दिसते तिला 'पाचूची टेकडी' हे नाव पडलय त्या टेकडीवर एक किल्ला पण आहे म्हणून त्या टेकडीला 'बाला–हिस्सार' म्हणजे किल्ल्याची टेकडी असं पण म्हणतात.

मात्र पर्वतीवर देवळं आहेत तशी ह्या पाचूच्या टेकडीवर मशीद वगैरे काहीही नाही. हा फक्त योगायोग आहे असं नाही तर देवळं व मशिदी उभारण्यामागला कार्यकारण भावच वेगळा असतो, हे त्याच्या मागचे कारण आहे

कित्येक मंदिरं उंच डोंगरावर असतात, तर बहुतेक नदीच्या काठावर असतात, पण मशीद कधीही डोंगरमाथ्यावर बांधत नाहीत किंवा मुद्दाम नदीच्या काठी अशी बांधत नाहीत मशीद नेहमी गावाच्या मध्यावर, भर वस्तीत असते जी गोष्ट मशिदींची तीच चर्चसची

ह्याच कारण मंदिरं ही पूजेकरता असतात तर मशिदी वा चर्चेस प्रार्थनेकरता देवळं एखाद्या व्यक्तीच्या वा एखाद्या कुटुंबाच्या पूजेकरता म्हणून बांधली जातात बाकी उपासक पूजेला हजर राहात असतील, पण त्यांचा त्या पूजेत सहभाग नसतो. एक तर मालक स्वतः पूजा करतो वा त्याच्यातर्फे कोणी ब्राह्मण ते काम करतो देवळात खूप लोक यावेत, मोठा समुदाय जमावा अशी अपेक्षा नसते

त्यामुळे देवळं उत्तुंग व दिसायला भव्य असली व अप्रतिम कोरीव कामामुळे मनोहारी दिसत असली तरी आतून ती लहानखोरी व अंधारी अशीच असतात त्यात चांगला प्रकाश यावा, हवा खेळती असावी वगैरे विचार केला जात नाही

मशिदीत वा चर्चमध्ये पूजा होत नाही, तिथं प्रार्थना होत असते प्रार्थनेकरता शेकडो व हजारो लोकांचं येणं होतं प्रत्येकानं मशिदीत वा चर्चमध्ये दररोज गेलंच पाहिजे असा आग्रह असतो त्यामुळे मशिदीत व चर्चमध्ये मोठ्या समुदायाची सोय पाहणं आवश्यक असतं मोठ्या संख्येनं जर लोक ठिकठिकाणाहून दररोज येणार असतील तर मशीद वा चर्च टेकडीवर वा डोंगरावर उभारून कसं चालेल ? ती शहराच्या मध्यवर्ती जागी असणं जरुरीच असतं

मशिदी व चर्चेस बाहेरून भव्य असतात तशीच ती आतूनही मोठी असतात. मुसलमानाच्या व ख्रिश्चनाच्या प्रार्थनापद्धतीत फार फरक असल्यामुळे मशिदीच्या व चर्चेसच्या आतील सजावटीत पण फार फरक असतो मशिदी आतून फार साध्या असतात तर,

चर्चेसमध्ये मोठं कोरीव काम, रंगीत चित्र, सोन्याची वेलबुट्टी वगैरेंची रेलचेल असते पण एकंदर वृत्ती सारखीच, ती म्हणजे मोठ्या संख्येने लोकानी यावे व इमारत त्या सोयीची असावी

महायुद्धापूर्वी पुर्ण होतं तसं आता असलेल्या काबूल शहरात मी आर्किटेक्ट प्लॅनर म्हणून आलो होतो त्या चार पाच लाख वस्तीच्या शहराच्या काही विभागाच्या रचनेचे काम मी करणार होतो, नवीन प्रकल्प तयार करणार होतो

काबूल शहराचा मास्टर प्लॅन बनवण्याच्या योजनेला थोडा इतिहास आहे. ख्रुश्चोव्ह व बुल्गानिन सत्तावन की अठ्ठावन्न साली भारताला भेट देऊन परत जाताना दोन दिवस काबूलला थांबले होते त्या भेटीत त्यानी अफगाणिस्तानशी मैत्रीचे बरेच करार केले एका करारानुसार काबूल शहराचा मास्टर-प्लॅन रशियन आर्किटेक्टस्नी बनवायचा असं ठरवलं गेल त्याप्रमाण रशियनानी चौसष्ट-पासष्ट साली काबूल शहराचा मास्टर-प्लॅन बनवला

खर म्हणजे त्या वेळचा अमीर जाहीर शहा व त्याच्या मन्त्रि-मडळाची इच्छा काबूल शहराचा मास्टर-प्लॅन आतरराष्ट्रीय कीर्तीच्या ला कर्बुझियरन बनवावा अशी होती व ते साहजिकच होत एकतर त्या वेळी कर्बुझियरचे नाव फार गाजत होत त्यातून पडित नेहरूनी कर्बुझियरला पजाबच्या नव्या राजधानीचे म्हणजे चडीगढचे काम दिले होते. कर्बुझियरच्या कल्पनेप्रमाणे चडीगड वसवले जात होते, काही इमारती उभारून झाल्या होत्या

चडीगढ म्हणजे नगररचनेच्या क्षेत्रातला फार मोठा प्रयोग होता तो बराच यशस्वी झाला होता त्याची जगात फार वाहवा झाली होती ताज्या रक्ताच्या व नव्या दमाच्या आर्किटेक्ट्सच चंडीगड स्फूर्तिस्थान झालं होतं तेव्हा काबूल शहराचे नकाशे कर्बुझियरनं बनवावेत असं अफगाण सत्ताधाऱ्यांना वाटणं साहजिकच होतं पण त्याच्या इच्छेप्रमाणे काही होऊ शकलं नाही.

एकदा मी एका वयस्क अफगाण आर्किटेक्टला त्याबाबत विचारलं "अफगाण सरकारनं कर्बुझियरला विचारल होतं" त्या वयस्कानं सांगितल, "पण कर्बुझियरला अगदी वेळ नव्हता, तेव्हा त्याने हे काम नाकारलं."

हे सगळं खर होत की ख्रुश्चोव्हसारख्या दांडग्या माणसाला, नाही म्हणण अफगाणांना शक्य झालं नाही? वर रशिया नुसते मास्टर प्लॅन बनवून देणार नव्हता तर त्याकरता आर्थिक मदतही करणार होता तेव्हा तो मोह अफगाणाना आवरला गेला नाही हे कळलं नाही मला ही मैत्रीची मदत अफगाणाना नंतर फार महाग पडली. त्या वेळपासून रशियाचा अफगाणिस्तानात चचुप्रवेश झाला तो मुसल 'प्रवेशावर थांबला. रशिया ज्या वेळी एखादा

देशात घुसतो, त्या आधी कित्येक वर्षं तो देश वेगळ्या वेगळ्या तऱ्हेनं पोखरून ठेवतो
अफगाणिस्तानला असं मदतीच्या नावाखाली पोखरून ठेवल्याचे पुष्कळ दाखले नंतर आम्हाला मिळाले अफगाण सैन्याचं शिक्षण, तिथल्या तेलाच्या विहिरीतून तेल काढण्याचं काम मदतीच्या कराराखाली रशियन लोकांच्या हाती होतं

भारताचा व रशियाचा काही मैत्रीचा करार झाला आहे असं वाचलं तरी माझ्या छातीचे ठोके चुकतात.

मी शहर सुधारणेचे नवे प्रकल्प बनवणार होतो ते रशियन्सनी आखून दिलेल्या मास्टर-प्लॅनच्या चौकटीत राहूनच बनवणार होतो. कारण तो मास्टर-प्लॅन अफगाण मंत्रि-मंडळानं स्वीकारला होता व त्याला कायदेशीर मान्यता पण दिली होती. त्या प्लॅनप्रमाणं लोकवस्तीचा भाग, कचेऱ्याकरताचा भाग, छोट्या-मोठ्या कारखान्यांकरताची जागा नियोजित केली गेली होती त्या प्लॅनबरहुकूम काही भागातलं रस्ताबांधणीचं काम व इमारती उभारण्याचं काम झालंही होत

शहराचा जो अविकसित भाग मला देतील त्याचे तपशीलवार नकाशे बनवायचे, त्या भागापुरत्या विकास-योजना बनवायच्या असे माझ्या कामाचे स्वरूप होते अशाच तऱ्हेचा शहराचा काही भाग पोमोस्कीकडे पण दिला होता.

कामाची पद्धत अशी राहणार होती, ज्या भू-भागाचा असा तपशीलवार नकाशा बनवायचा असेल त्या जागेची माप, तिथं येऊ घातलेले मोठे रस्ते वगैरे नकाशावर दाखवून ते नकाशे रोड इंजिनियर्सनी मला किंवा पोमोस्कीला, ज्याचं काम असेल त्याला, सुपूर्द करायचे नंतर आम्ही त्याचे तपशीलवार नकाशे बनवणार होतो

मला काबूल शहराच्या अति-उत्तरेच्या भागाचे विकास-प्रकल्प व त्याचेच नंतर तपशील-वार नकाशे बनवण्याचे काम देण्यात आले रोड इंजिनियर्स त्या जागेची मापं वगैरे घेऊन मोजणी नकाशे बनवायला पण लागले ते नकाशे माझ्याकडे यायला थोडा वेळ होता तेव्हा ह्या गोरव्या आर्किटेक्ट्सनी आत्तापर्यंत काय काय काम केलंय, कसं केलंय ते तरी पाहू या, म्हणून मी त्यांनी तयार केलेले नकाशे बारकाईनं पाहू लागलो तर मला धक्काच बसला

कोणत्याही भागाचा प्रकल्प असो ह्यांचे रस्ते आपले सरळ सोट ! आणि त्यांची रुंदी कमीत कमी वीस मीटर म्हणजे साठ फूट व जास्तीत जास्त शंभर मीटर म्हणजे जवळ जवळ तीनशे फूट ! मनात आले की काय हा जमिनीचा अपव्यय !

नॅशनल हायवे असे सरळ असले तर ठीक, म्हणजे ते तसे असायलाच हवेत पण गावातले, लहान वस्तीतले रस्ते इतके रुंदच्या रुंद असायचं काही कारण नव्हतं आणखी एक विचित्र गोष्ट म्हणजे वीस मीटरच्या रस्त्याला तीन मीटरचे फुटपाथ, तर शंभर मीटरच्या रस्त्याला नऊ नऊ मीटर्सचे म्हणजे तीस तीस फुटांचे फुटपाथ ! शंभर मीटर्स

रस्ते लांबवर जाणारे व भरधाव वेगाने जाणाऱ्या गाड्यांकरता—ट्रकसकरता असतात, तर त्या रस्त्यांच्या बाजूने तीस तीस फुटांच्या फुटपाथसची काय गरज होती ? मनाशी म्हटले की ह्या रशियन लोकांना वेडबिड लागल आहे की काय ?

त्र राहण्याच्या घराचा छोटा असा समुच्चय ग्रुप बनवला आहे व तो मोठ्या रस्त्याना जोडलाय असही नाही. आट्यापाट्या खेळण्याकरता खेळपट्टी बनवतात ना, तसे ठराविक अंतरावर उभे आणि आडवे रस्ते दिले होते सगळे रस्ते एकतर अगदी काटकोनात किंवा अगदी समांतर ! आणि असे रस्ते करताना जर मध्ये कोणतीही जुनी ऐतिहासिक इमारत आली वा मोठं झाड आल तर ते भुईसपाट करायच, हा खाक्या ! असे नुसते आडवे-उभे रस्ते करायला टाऊन-प्लॅनरची काय गरज ? ते काम तर कोणी साधा इंजिनियरही करू शकला असता

कोणतीही शहररचना वा लोकांच्या वस्तीची रचना करताना तिथल्या लोकाची जीवन-तऱ्हा, त्यांचे राहणीमान, त्याचे ' जग ' ह्या गोष्टींचा विचार नको का व्हायला ? हे शेवटी अफगाण लोकांकरता वस्त्या बनवत आहेत की रशियनांकरता बराकी ?

चंडीगढचा कर्बुझियर व कम्युनिस्ट रशिया ह्यांची एक कथा आहे. ती आता लिहिता-लिहिता आठवली म्हणून सांगतो

रशियात क्रांती झाली होती नव्या विचाराचे वारे व नव चैतन्य रशियन लोकात व राज्यकर्त्यांत वाहू लागलं होतं त्या नवविचारांच्या लाटेतून काही सुटल नव्हत तर आर्किटेक्चर तरी कसं सुटाव ?

नव्या रशियन सरकारला आपल्या शिक्षणमंत्रालयाकरता एक नवी इमारत बांधायची होती ही नवी इमारत कोणा नवीन विचाराच्या आर्किटेक्टकडून तयार करून घ्यावी असा सगळ्याचा विचार होता आणि त्या वेळी नवीन विचाराचा व नवीन कल्पना असलेला फ्रान्सच्या कर्बुझियरशिवाय दुसरा कोण होता ?

कर्बुझियरनं त्या शिक्षण-मंत्रालयाकरता अप्रतिम अस डिझाईन तयार केल ते रशियन सरकारन मंजूर केलं त्यानतर कर्बुझियरन त्याचे तपशिलातले नकाशे बनवले पण तोपर्यंत स्टॅलिन सर्वसत्ताधीश झाला होता रशियन समाजात काही नवीन विचार यावेत अशी स्टॅलिनची इच्छा नव्हती नवीन विचारानी डिझाईन केलेली इमारत त्याला त्याच्या वैचारिक दृष्टिकोणातून परवडण्यासारखी नव्हती. अशा इमारतीचा जनतेच्या विचारावर काही ' अयोग्य ' परिणाम होईल अशी तर स्टॅलिनला भीती वाटली नसेल ?

परिणामी कर्बुझियरनं बनवलेले नकाशे रद्द करण्यात आले त्याला त्याची फी वगैरे दिली पण त्याच्या योजनेप्रमाणे इमारत काही बांधली गेली नाही त्याऐवजी अशीच एक बथ्थड इमारत उभारली गेली

अगदी पुराणकालापासूनच्या आर्किटेक्चरचा अभ्यास केला तर असं दिसत की, त्या त्या वेळच्या सत्ताधाऱ्याचा त्या त्या वेळच्या वास्तुकलेवर व इमारतींवर फार मोठा परिणाम

झाला आहे रशियात नवीन विचाराच्या लोकांचे राज्य येऊनही नवीन विचाराचे आर्किटेक्चर येऊ नये, त्यावरून तेथल्या राज्यव्यवस्थेत मुळातच काही खोड तर नाही आहे ना असा प्रश्न पडतो.

काबूलला आलेले शौरवी आर्किटेक्टसुद्धी त्याच चाकोरीबद्ध पठडीतले होते.

शौरवी लोकानी केलेल्या कामाचा माझा असा अभ्यास चालला होता, तर वरच्या आघाडीवर बरंच काही घडून गेलं होतं

पहिलं म्हणजे मला एक चागला तीन बेडरूमचा बगला मिळाला होता जाहीरशहाच्या कारकीर्दीत सैन्यात जनरल असलेल्या नसेरीचे एका मोठ्या जागेत तीन बगले होते ते मुख्य रस्त्यापासून थोडे आत असे होते. त्यातला एक मला देण्यात आला माझा बंगला आमच्या कचेरीपासून व आपल्या वकिलातीपासून अगदी जवळ असा होता

बगल्याच्या अवती-भोवती चांगली मोकळी जागा होती प्रवेशाच्या फाटकाला लागून पाढऱ्या गुलाबाचा मोठा वेल होता होता रानटी गुलाब आणि वासपण जरा उग्रच होता पण उन्हाळ्यात त्या वेलाला अगदी शेकडो पाढरी-शुभ्र फुलं यायची जणू काही अमावास्येचं तारानी भरलेलं आकाशच !

बगल्याच्या मागे असलेल्या मोकळया जागेत एक सफरचदाचं झाड होतं. त्या झाडालाही चिक्कार फळ येत. पण ती पिकेपर्यन्तही आमच्या पोराना धीर धरवत नसे पोर ती तशी कच्चीच सफरचंद तोडत, आणि अगदी आबट-ढाण असली तरी मजेन खात किंवा त्यांचा रस काढून त्यात साखर व मीठ घालून मोठ्या आवडीन पीत

म्हटलं, चैन आहे साल्यांची. लहानपणी आमच्या घरी फळं आणली जायची ती म्हणजे केळी किंवा आंबे. मोसबी वगैरे कोणी आजारी असलं तरच आणली जात. सफरचंदाच तर नावही नसे, आणि आमची ही नवी पिढी सफरचंदांचा रस काढून पीत होती !

आमचा बंगला खास अफगाण पद्धतीचा होता सुदैवाने अजुनी बंगल्यांच्या 'पद्धती' अशा राहिल्या आहेत फ्लॅटस् वा अपार्टमेंट्ससारखं बगल्यांच अजुनी झालेलं नाही सगळया जगभर फ्लॅटस साधारण सारखेच असतात. अगदी न्यूयॉर्कपासून ते टिम्बक्टूपर्यंत ! श्रीमान लोकाचे अपार्टमेन्ट्स मोठे असतील व त्यातल्या बेडरूम्स मोठाल्या व जास्त असतील तरीही सगळयाचा साचा जवळ जवळ एकसारखाच असतो त्याना बगल्या-सारखं 'कॅरेक्टर' नसत खास असं लक्षण नसतं

बंगल्याचा तसा साचा झालेला नाही व होणार नाही इंग्लडमधले बंगले वेगळे, स्विस–कॉटेजेस वेगळी, जर्मन बंगले वेगळे तर फ्रेंच शॅटो वेगळे, तसे भारतीय बंगले पण वेगळे

त्या त्या देशात राहणाऱ्या लोकांच्या मनोवृत्तीचा, त्यांच्या परंपरेचा, रीति-रिवाजाचा, आर्थिक परिस्थितीचा व हवामानाचा बंगल्याच्या डिझाईन्सवर फार परिणाम होत असतो

अफगाण बंगल्यांभोवती भली मोठी उंचच्या उंच भिंत असते ती भिंत स्व-रक्षणाकरता असते तशीच ती 'पडदा' कल्पनेतून आलेली असते पडदा म्हणजे प्रायव्हसी—म्हणजे एकान्तता—थोडं खाजगीपण आतल्या जीवनाची बाहेरून काही कल्पना येऊ नये ह्या हेतूनं ह्या भिंती उभारलेल्या असतात ह्याचा 'इस्लाम'शी काही संबंध नाही एकान्तता मिळावी अशी सगळ्यांचीच इच्छा असते त्यामागे फक्त धार्मिक कारण असतं तर बागला-देशात वा काश्मिरमध्येही अशा घराभोवतीच्या उंच भिंती दिसल्या असत्या आपल्या गावातल्या पाटलाच्या वाड्यांना ते हिंदू असूनही नसतात का उंच भिंती ?

सूर्याच्या उन्हाचा जास्तीत जास्त फायदा मिळावा ही दृष्टी ठेवून अफगाण-बंगल्याची मांडणी केलेली असते इथे अगदी वर्षभर चांगली थंडी असते. तशी ती युरोपमध्ये पण असते पण युरोपमध्ये सूर्य जवळ जवळ नसतोच अफगाणिस्तानात तसे नाही इथे चांगले ऊन पडते—अगदी हिवाळ्यातसुद्धा व त्याचा फायदा घेण्याचा लोक प्रयत्न करतात

हिवाळ्यात फुलझाडांची अगदी वाट लागते निदान कुंड्यातली फुलझाडे वाचावीत म्हणून सूर्याचे भरपूर ऊन ज्या खोलीत येत असेल त्यात ह्या कुंड्या आणून ठेवतात त्या खोलीला 'गुल-खाना' म्हणतात. गुल म्हणजे फूल व खाना म्हणजे घर असे गुलखाने फक्त अफगाण बंगल्यातच दिसतात

अफगाणिस्तानात अतोनात थंडी पडत असल्याने घर गरम ठेवण्याच्या वेगवेगळ्या युक्त्या काढलेल्या असतात नव्या अपार्टमेन्ट्समध्ये डिझेल तेलावर किंवा विजेवर खोल्या गरम करायची सोय असते पण ही पद्धत बंगल्यांना सोयीची नसते युरोपात असतात तशा येथे 'फायर-प्लेसेस' पण नसतात, कारण त्यांना लागणारा दगडी कोळसा येथे मिळत नाही

इथे लाकडांवर चालणारी बुखारी असते आपल्याकडल्या पाणी तापवायच्या बंबासारखी असते ही बुखारी फक्त ह्यात पाणी नसते बुखारीचा धूर खोलीच्या बाहेर जावा म्हणून पत्र्याच्या नळकांड्या बसवतात. त्यातून धूर बाहेर सोडला जातो दर हिवाळ्यात अशा बुखाऱ्या बसवतात व हिवाळा संपला की काढून स्टोअरमध्ये ठेवून देतात

मला काबूल शहराचा जो भाग विकसित करायचा होता त्या भू-भागाची मोजणी-माप घेऊन त्यावरहुकूम नकाशे बनवायला इंजिनियर्सनी सुरुवात केली होती. त्यात युरी होता तसाच आमचा मलहोत्रा पण होता त्यांचं काम संपलं की ते तो नकाशा मला देतील व मग आपण आपल्या कामाला सुरुवात करू ह्या विचारात मी होतो

पण एक दिवस मी कचेरीत येऊन पाहिलं तर मलहोत्राने पोकोस्कीला आमच्या खोलीत

बोलावून त्या भू-भागाचा मोजणी-नकाशा त्याला दाखवला आहे आणि पोकोस्कि तिथेच बसून योजनेची स्केचेस बनवतो आहे. मी खोलीत येताच दासने काय झाले होते ते मला सांगितले ते ऐकताच माझ्या तळपायाची आग मस्तकाला गेली. आपल्या कामाची स्केचेस दुसरा कुणी आर्किटेक्ट करतो आहे हे बघून आणखी काय होणार होत ?

माझ्या तळपायाची मस्तकाला गेलेली आग माझ्या चेहऱ्यावर पण दिसू लागली असावी कारण मी माझ्या टेबलाजवळ जाऊन खुणेनेच 'तुम्ही काय करताहात ?' म्हणून विचारताच पोकोस्कि थोडा धास्तावला व चाचरत-चाचरत, 'आम्ही तुझ्याकरताच स्केचेस करतो आहोत' म्हणून सांगू लागला तेव्हा मी त्याला निक्षून सांगितलं की, "हे मला दिलेलं काम आहे, तू त्याची स्केचेस बनवण्याच काही एक कारण नाही तुम्ही तुम्हाला दिलेली काम करा, मी मला दिलेली करेन "

पोकोस्कि तातडीनं निघून गेला तो गेल्यावर मी मलहोत्राला त्याने ते मोजणी-नकाशे पोकोस्कीला का दाखवले म्हणून रागानेच विचारल त्याचे उत्तर साधे होते. त्याला येथे येऊन चार-पाच महिने झाले होते तो म्हणाला, " इथं अशीच पद्धत आहे आम्ही सगळे मोजणी-नकाशे पोकोस्कीकडे देतो तो स्केचेस करतो, मग ड्राफ्टस्‌मन त्याबरहुकूम पुढले नकाशे बनवतात.

" ह्यापुढे अस नाही चालायच " मी त्याला पक्केपणी सांगितल, "ह्याच नाही तर मला दिलेल्या कुठल्याही कामाची स्केचेस माझ्याशिवाय दुसर कुणीही बनवता कामा नये, माझी स्केचेस मीच बनवणार "

असं जरी मी म्हटलं तरी मी काही लगेच स्केचेस बनवायला लागलो नाही माझ्या कामाची पद्धत वेगळी आहे. मी तो मोजणी-नकाशा माझ्या समोरच्या भिंतीवर लावला व त्याच्याकडे बघत हा भाग कसा विकसित करता येईल, रस्ते कुठून काढता येतील, तेसुद्धा सोयीचे व एकमेकांना छेद न देता कसे होतील ह्याचा मनाशी विचार करू लागलो.

ह्याबाबत लंडनला असताना एका ब्रिटिश आर्किटेक्टने सांगितलेले तत्त्व माझ्या मनावर बिंबले होते तो म्हणायचा, " संपूर्ण विचार झाल्याशिवाय चांगल्या आर्किटेक्टने कागदाला पेन्सिल म्हणून लावू नये कारण एकदा का तुम्ही तशी पेन्सिल लावलीत की तुमचा आरंभबिंदू पक्का होतो रेघ काढलीत की जाण्याची दिशा ठरते अन् चौकोन काढलात की तुम्ही स्वत च त्या चौकोनातले कैदी बनता स्वतंत्र व नवीन विचारापासून स्वत ला स्वत होऊन बंदिस्त करून घेता, गुलाम होऊन जाता, मग तुम्हांला वेगळा विचार करणं काही जमायचं नाही "

समोर मोजणी-नकाशा लावला आहे आणि त्याच्याकडे बघत व नुसता विचार करत मी बसलो आहे हे बघून माझे हिंदी सहकारी, शौरवी आर्किटेक्टस् आणि अफगाण मित्र मोठ्या बुचकळ्यात पडायचे. त्यांना प्रश्न पडायचा की ह्या माणसाला काही येतं आहे की नाही ? हा माणूस स्केचेस वगैरे कशी काही बनवत नाही ?

ह्यांना असं वाटणं अगदी साहजिकच होतं कारण शौरवी आर्किटेक्टस्ना काही काम दिलं की ते लोक बोर्डाला कागद लावून भराभरा स्केचेस बनवत व लगेच त्याचे पक्के नकाशे बनवायला घेत. त्यांचं तसं करणं योग्यच होतं. भूमीचा आकार कसाही असो याचे उभे-आडवे रस्ते ठरलेले असत. लहानातला लहान वीस मीटर्सचा व मोठ्यातला मोठा शंभर मीटर्सचा. म्हणजे डोक्याचं काही कामच नाही, फक्त हातानं आडव्या-उभ्या रेघा काढायच्या, बस!

मी रशियन आर्किटेक्ट्सना नावं ठेवतो आहे व पुढे ठेवणार आहे. पण एक गोष्ट येथे सांगितली पाहिजे की, पोक्रोस्कि रशियन चाकोरीतला आर्किटेक्ट असला तरी त्याचे ड्रॉइंग वर्क अगदी उत्तम प्रतीचे होते इमारतींची यथार्थ-चित्रं म्हणजे पर्स्पेक्टिव्ह्ज तो फार छान काढायचा आणि ती सुद्धा खूप मोठाली व भव्य. एक एक चित्र चांगले चार फूट लांब व तीन फूट उंच अशी यथार्थ-चित्रं काढणं फार अवघड असत.

मी केलेल्या योजनेवरून आमची बरीच बोलाचाली व भांडणं झाली. त्यानंतर काही दिवसांनी झालेल्या एका मीटिंगमधे बसल्या-बसल्या त्याने खेळाच्या पत्त्यातून राजा-राणीची दुतोंडी चित्र असतात असं त्याचं व माझं एक चित्र काढलं, आणि त्याच्यावर 'फ्रेन्डशिप' असं लिहिलं व मला सादर केलं त्याचं इंग्रजी फार चांगलं नसल्याने फ्रेंड-शिपचं स्पेलिंग चुकले आहे

पोक्रोस्कीकडे चांगल्या प्रतीचा कागद, रंगीत पेन्सिली, वेगवेगळ्या रंगाच्या शाया होत्या त्यामुळे त्याची ड्रॉइंग्ज फार छान उतरत.

माझे ड्रॉइंग काम चांगले आहे व तशा कामाची मला मनापासून आवडही आहे. पण आम्हाला चांगले कागद, रंगीत पेन्सिली वगैरे काही मिळत नसे आम्हाला ह्या गोष्टी मिळत नाहीत मग ह्या शौरवींना कशा मिळतात असा मला प्रश्न पडे

चौकशी केल्यावर कळलं की अफगाणाचा व शौरवींचा तसा करारच झाला होता. भारत सरकार फक्त आमचा पगार, घरभाडं, भत्ते देत असे. शौरवींचं तसं नव्हतं. त्यांना लागणाऱ्या ड्रॉइंग सामानाचा खर्चसुद्धा त्यांचं सरकार करायचं त्यामुळे त्यांना हवं ते सामान आणता येत असे, तर आम्हाला अफगाण सरकार देईल त्या ड्रॉइंगच्या सामानावर भागवायला लागायचं. अफगाण सरकार आपल्यासारखं गरीब. ते चांगलं, भारीपैकी ड्रॉइंग सामान कुठून देणार? तेव्हा मिळत होतं त्या सामानावरच आम्ही ड्रॉइंग्ज बनवत राहिलो

ह्या ड्रॉइंगच्या सामानाबद्दल एक 'शौरवी' किस्सा आहे अबदुल नावाचा जो शौरवी दुभाष्या होता, तो त्यांना लागणारं ड्रॉइंगचं सामान पण विकत आणायचा. सामान आण-ण्याची पद्धत अशी होती प्रथम शौरवी आपल्याला हवं असलेलं सामान मागवत, त्या बिलावर आमचा प्रेसिडेन्ट सही करत असे व शौरवी वकिलातीला पाठवत असे शौरवी वकिलात बिलाचे पैसे चुकते करत असे किती सामान आले, कोणते आले ह्याची काळजी

आमच्या प्रेसिडेन्टला नव्हती, कारण त्याकरता अफगाण सरकारचे पैसे खर्च होत नव्हते पोकोस्कि वगैरे पण विशेष बारकाईने पाहात नसत

ह्या सगळया गोष्टींचा फायदा घेऊन अबदुल्लान त्यातले काही सामान विकायला सुरुवात केली त्याचे हे असे बरेच दिवस चालले होते मग एक दिवस तो रंगे हात पकडला गेला. त्याची खूप छी थू झाली त्या वेळेपर्यंत माझा व पोकोस्कीचा झगडा झाला असल्या-कारणाने ह्या सगळया गोष्टींचा आम्हाला व आमच्या अफगाण सहकाऱ्यांना फार आनद झाला

काबूलला येऊन मला आता चागले चार-पाच महिने झाले होते 'फॅमिली'ला येऊनही आता महिना झाला होता फॅमिली आल्यामुळे एक तऱ्हेची ऊब आली होती तर उन्हाळा सुरू झाल्यामुळे दुसऱ्या तऱ्हेची ऊब हवेत पसरली होती रस्त्या-रस्त्यावर व अगणात पडलेल बर्फ आता पळून जाऊन पार डोंगरमाथ्यावर बसले होते झाडाना पालवी फुटली होती फुल-झाडाना कळ्या येऊ लागल्या होत्या.

पैसा बऱ्यापैकी मिळत होता मुलाच्या शाळेचंही चागल जमल होत थोडक्यात म्हणजे डोक्याला कोणत्याही तऱ्हेचा ताप नव्हता जणू आम्ही सगळयानी सुखी माणसाचे सदरे घातले होते

येथल्या आमच्यासारख्या हिंदी लोकाचा किंबहुना सगळ्या परदेशी लोकाचा एकच एक सांस्कृतिक कार्यक्रम म्हणजे कोणाला तरी घरी जेवायला बोलवायचे किंवा कुणाकडे तरी जेवायला जायचे बाकी सहज गप्पा मारायला म्हणून येण-जाणं तर नेहमी चालायचेच. तस आमचही थोड जाणं-येण सुरू झाल होत

पण आज पहिल्यांदा 'खास' पार्टीला म्हणून आम्ही नरुला याचेकडे गेलो नरुला पूर्वी भारत-सरकारच्या पोस्ट व टेलिग्राफ डिपार्टमेन्टचे डायरेक्टर जनरल होते व आता युनायटेड नेशन्सच्या डेव्हलपमेंट कार्यक्रमाखाली काबूलला आले होते. त्याची मुलगी इथलं शिक्षण पुरं करून भारतात परत जाणार होती. त्यानिमित्त त्यानी पार्टी दिली होती. अर्थात हे फक्त निमित्त कुठून तरी पार्टी द्यायची हा हेतू

अशा पार्ट्यांतून पोटभर जेवण्याचे एक तंत्र असते डिशमध्ये फार वाढून घेतल तर वाईट दिसत म्हणून थोडं घ्यावं तर परत परत घ्यायला लागत तेही वाईट दिसत. ह्यातून वस्ताद माणस बरोबर मार्ग काढतात तो म्हणजे दुसऱ्याला टेबलाजवळ न्यायचं. त्याला आग्रहाने घ्यायला लावायचे व स्वत पण घ्यायचे प्रतिभा जात्याच संकोची, त्यामुळे ती अशा पार्ट्यांतून बऱ्याच वेळा उपाशी राहायची कित्येक वेळा तर ती घरून जेवूनच पार्ट्यांना जायची

नकाशे बनवायला चांगल्या प्रतीचे ड्रॉईंगचे सामान मिळाले नाही म्हणून काही मी खचून गेलो नाही. कागदाच्या दर्जावर काही कामाचा दर्जा अवलबून नसतो हे मी जाणून होतो.

आता माझे माझ्या योजनेबद्दलचे विचार पक्के होत चालले होते तरी अजुनी मी ड्रॉईंग्ज बनवायला सुरुवात केली नव्हती कोणत्याही योजनेमागे काही तरी विचार असला पाहिजे, काही तत्त्व असले पाहिजे, अशी माझी भावना होती माझ्या मनात येणारे विचार मी हिंदी व अफगाण सहकाऱ्यांना बोलून दाखवू लागलो

घराच्या बाहेर पडले की शौरवी ठेवतात तशा साठ फूट रस्त्याऐवजी चोवीस एक फुटाचा रस्ता ठेवावा एक तर एवढ्या साठ फूट रस्त्याची गरज नाही दुसरं म्हणजे कोणताही रस्ता तयार करणं फार खर्चाचं असतच पण त्याची देखभाल करण व डागडुजी करणंही फार पैसे खाऊ असत. त्यातून काबूलमध्ये बर्फ फार पडत व ते रस्त्यावर साचतं. मोठाले रस्ते ठेवले तर जास्तच बर्फ साठणार ते बाजूला करून वाहतूक चालू ठेवणं फार त्रासाचं व जिकिरीचं नाही का होणार ?

रस्ते लहान द्यायचं व ते असे योजले पाहिजेत की त्यावर रहदारी अगदी कमी राहील. रहदारी कमी असली म्हणजे तिथे राहणाऱ्यांना वाहनांच्या आवाजाचा व उन्हाळ्यात धुळीचा त्रास कमी होईल. अफगाणिस्तान हा वाळवटी प्रदेश असल्यामुळे उन्हाळ्यात धुळीचा फार त्रास होतो.

पण रस्ते नुसते रुंदीला लहान असून चालणार नव्हते. राहण्याच्या वस्तीत सरळ-सोट रस्ते ठेवण योग्य नव्हतं. जिथे वाहतूक जास्त आहे तिथे सरळ रस्तेच योग्य पण लहान वस्तीतून सरळ रस्ते ठेवण्यापेक्षा ते थोडे वळणदार ठेवले तर ? वळणदार रस्त्यावर दोन्ही बाजूला झाड असतील तर ते दृश्य किती मनोहारी दिसेल नाही ? रस्ते मनोहारी असणं फार आवश्यक आहे त्यानं शहराच्या सौंदर्यात भर पडते आणि शेवटी कोणत्याही शहर-रचनेत वा वस्त्यांच्या रचनेत 'माणस' राहणार आहेत, वर्षोन्वर्षं राहणार आहेत, पिढ्यान् पिढ्या राहणार आहेत, तेव्हा तिथे रम्यता असली पाहिजे. मन आनंदित होईल अस वातावरण असलं पाहिजे.

रशियन आर्किटेक्टस् आख्या-पाख्याच्या मैदानासारख्या वस्त्यांच्या रचना करत आहेत, त्या काबूलसारख्या शहराकरता योग्य नाहीत, हे मला तीव्रतेने जाणवले तशा रचना पाश्चिमात्य लोकांकरता कदाचित योग्य असतील, पण आशियाई लोकांच्या वस्त्यांकरता अगदी अयोग्य आहेत, कारण त्या दोघांच्या मनोवृत्तीतच फरक आहे. आपण आशियाई टोळ्या-टोळ्यांनी व चमूंनी राहणारी माणसं तर पाश्चिमात्य व्यक्ती-व्यक्ती म्हणून सुटी सुटी राहणारी त्यामुळे पाश्चिमात्यांची घरे ग्रूपमध्ये नसली तरी चालतात व तशी नसतातसुद्धा. आशियातल्या लोकांचं तसं नाही आपण व मुख्यत' अफगाण घोळक्यानी व टोळ्यानी राहणारी माणस. तेव्हा त्यांच्याकरताची वस्ती-रचना अशी छोटया-छोटया गटांकरता असली पाहिजे

त्याकरता एक-मजली व दुमजली घरांचे छोटे-छोटे गट बनवायचे, त्यांच्यात उचच उच्च इमारती ठेवायच्या नाहीत. उच्च इमारतींचा वेगळा गट बनवायचा असे मी ठरवले

काबूल शहराच्या मास्टर-प्लॅनप्रमाणे गावात दोन-तीन मोठाली पब्लिक पार्क्स असणार होती पण ती शहरात राहणाऱ्या सगळ्याना थोडीच सोयीची पडणार होती ? स्त्रिया, म्हातारी माणसं, लहान मुलं ह्या पब्लिक पार्कपर्यंत कशी पोचणार होती ? तेव्हा ह्या मडळींकरता घरांच्या जवळ छोटया-छोटया बागा असणं फार सोयीचं होणार होतं घरातून निघाल्यावर पाच एक मिनिटांत पोहोचता येईल अशा छोटया बागा द्यायचही मी ठरवलं.

अफगाणाना फुलझाडाची व बागांची फार आवड अगदी गरिबातल्या गरिबाकडेही दोन-चार फुलझाडाच्या कुंड्या असतात अफगाणांना फुलाच नुसत प्रेम नाही आहे, तर त्याची काळजी पण ते घेतात रस्त्यांच्या बाजूवाजूने, इमारतींच्या प्रवेशाजवळ असलेल्या मोकळ्या जागेत फुल-झाडं लावलेली असतात पण अगदी कुणीही अफगाण फुलाना हात लावत नाहीत, पान तोडत नाहीत. आपल्याकडे लोक फुलं तर तोडून नेतातच पण जाता येता उगाच पानं पण तोडतात सहजची विध्वसक वृत्ती हा फरक तिथे फार जाणवतो.

तेव्हा अशा बाग प्रेमी अफगाणांच्या वस्त्यातून छोट्या-छोट्या बागा दिल्या तर ते उत्तमच होईल असे मला वाटले

हे व असे विचार मनात ठेवून मी नकाशे बनवत होतो, विकास योजना तयार करत होतो. ह्या सगळ्या कल्पना व हे विचार शौरवी आर्किटेक्ट्सच्या मनोवृत्तीच्या अगदी विरुद्ध होते मी काय करतो आहे हे पोक्रोस्कीला समजल्यावर तो अगदी चवताळून गेल्याचं कळल मी जे करत होतो ते त्याला पसत पडणारं नव्हत पण त्यात त्याचा दोष नव्हता त्याला तसच ठोकळेबाज शिक्षण मिळालं होतं त्याने रशियात अशाच आख्यापाट्या पद्धतीच्या रचना पाहिल्या होत्या त्यापेक्षा कुणी काही वेगळ करतो आहे हे त्याला सहन होण शक्यच नव्हतं. अर्थात त्याला सहन होत होत की नव्हतं ह्याची मला काळजी नव्हती वाटायच की त्याच काम त्यानं करावं आणि माझं मी करीन. पण जगात इतके भोळेपणाने वागून चालत नाही, हे माझ्या नंतर लक्षात आले

माझी स्केचेस करून झाली होती व माझे अफगाण सहकाऱ्यानी कमिटीपुढे ठेवण्याकरता लागणारे नकाशे बनवायला सुरुवात केली होती

आम्ही बसत असू तो एक मोठा हॉल होता. तिथे सहा सात ड्रॉईंगची टेबल होती. आम्ही सगळेच काही ना काही ड्रॉईंग काम करत असू बाकी लोकाच्या कामात व आम्हा आर्किटेक्ट्सच्या कामात एक मोठा फरक आहे. कोणाही आर्किटेक्टला आपल्या कामाबद्दल नुसते बोलून वा आपल्या कल्पना फक्त सागून चालत नाही, तर त्या कल्पनाप्रमाणे त्याला ड्रॉईंग तयार करावे लागते हे थोडे गायकासारखे आहे. गायकाला जशी गायनाची नुसती तत्त्वे सांगून चालत नाही, तर त्याला त्याप्रमाणे गाऊन दाखवावे लागते तसेच आम्हा आर्किटेक्ट्सचं आहे.

माझे ड्रॉईंगवर्क चांगले होते व अजूनही आहे ड्रॉइगची मला जात्याच आवड. त्यामुळे मी अफगाण सहकाऱ्यात चागला प्रसिद्धी पावलो, त्यांच्यात चागला रुळून गेलो शिवाय मी गोरेची आर्किटेक्टस्‌पेक्षा काहीतरी वेगळ करतो आहे हेही त्यांना जाणवू लागले होते

एकेका योजनेची ड्रॉइंग-वर्कस् पुष्कळ दिवस चालतात आमच काम बोलता बोलता, गप्पा मारता मारता हाताने चालू असे. त्यामुळे नाना विषयावर गप्पा व्हायच्या

अफगाणिस्तानात दोन पुरुषांच्या बाबतीत 'बाबा' हा आदरार्थी किताब वापरतात पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्याना हरवणारा व राष्ट्र म्हणून अफगाणिस्तानची निर्मिती करणाऱ्या अहमदशहा अब्दालीच्या बाबतीत व आपल्या महात्मा गांधींच्या बाबतीत ! गांधींचा उल्लेख आवर्जून 'गाधी-बाबा असा व्हायचा गाधीजींचे 'सत्याचे प्रयोग' व इतर सारी पुस्तके फारसीत भाषांतरित झाली आहेत ही बऱ्याच जणानी वाचली होती महात्माजींचा उल्लेख 'गांधीबाबा' म्हणून होतो हयाचा माझ्यासारख्या गाधीभक्ताला फार आनद व्हायचा व अभिमान पण वाटायचा

माझा एक छद म्हणजे फारसी शब्दांचे मूळ शोधायचे व मराठीत जे फारसी शब्द आले आहेत त्याचा सुगावा लावावयाचा. आमच्या टीममधल्या पायडा महमदच्या नावानेच सशोधनाला सुरुवात झाली आपल्याकडे 'पायडा' या शब्दाचा अर्थ 'पद्धत' असा आहे फारसीमध्ये त्याचा अर्थ कायमचा टिकणारा, चिरजीव असा होतो

मग लक्षात आले की असे कितीतरी शब्द, कधी त्याच अर्थाने, कधी थोडा-फार अर्थ बदलून फारसीतून मराठीत आले आहेत. खुर्ची, किल्ला, कुस्ती, पहेलवान असे कितीतरी.

आणि मजा म्हणजे फारसीत कितीतरी संस्कृत शब्द आहेत. अफगाणाचे सख्या मोजणे म्हणजे एक, दोन, तीन वगैरेच मुळी सस्कृतात आहे. आणखी कितीतरी शब्द. रास्त म्हणजे बरोबर किंवा उजवा व दस्ते रास्त म्हणजे उजवा हात त्याचप्रमाणे दस्ते चाप म्हणजे डावा हात. दस्ते चापचा अर्थ मी असा लावला की ज्या हातात धनुष्य म्हणजे चाप असतो तो हात आता हे सगळे किती शास्त्रीय आहे कुणास ठाऊक

येथे बुखारीत घालायची लाकड 'खर-वाह'वर मोजतात 'खर' म्हणजे गाढव व 'खरवाह' म्हणजे एक गाढव वाहून नेईल तेवढी लाकड ! आता किलोग्रॅम वगैरे मापं आली आहेत पण व्यवहार सगळा खरवाहमध्येच चालतो

फारसीत इतके सस्कृत शब्द आहेत पण ते काढून टाकून त्याला फारसी प्रतिशब्द योजावेत अशी चळवळ तेथे नाही किंवा त्याबद्दल कोणी कुरकुरतानाही भेटला नाही

ह्याबाबतची एक मजेशीर कथा सांगतो एकदा एका अमेरिकन प्रोफेसरशी ओळख झाली हा अमेरिकन प्रोफेसर काबूलला काय करत असेल असं वाटत ? तर तो अफगाण विद्यार्थ्यांना तिथल्या महाविद्यालयात चक्क सस्कृत शिकवत होता आणि त्याचे चागले दहा-बारा विद्यार्थी होते आता बोला !

एक दिवस मी कचेरीत असाच गोंधळ घातला येईल–जाईल त्याला ' अफगाण ' ह्या शब्दाचा अर्थ विचारू लागलो प्रत्येक जण मुळी ह्या प्रश्नानेच चमकून जायचा व म्हणायच की ' अफगाण ' हे आमचे नाव आहे, आमच्या देशातल्या लोकांना ' अफगाण ' असं म्हणतात, त्याला अर्थ तो काय असणार ?

" असं कसं ? ' हिंदु ' ह्या शब्दाला अर्थ आहे सिंधुनदीच्या काठी राहणाऱ्यांना ' हिंदु ' म्हणत असत तसाच ' अफगाण ' ह्या शब्दालाही काही अर्थ असला पाहिजे "

हे म्हणणे सगळ्यांना पटत असे पण अफगाण ह्या शब्दाचा काही अर्थ असेल हेही त्यांना भावत नव्हते. असे काही दिवस माझे चौकशीतंत्र चालले होते एक दिवस मला अफगाण ह्या शब्दाचा अर्थ सांगणारा भेटला.

माणसांच्या कोणत्याही समूहाला त्यांच्या शेजार-पाजारच्या समूहाची माणसं विशेषणं लावत असतात म्हणजे चक्क नावं ठेवत असतात. त्याप्रमाणे इराणी लोकांनी ह्या लोकांच्या समूहाला ' अफगाण ' हे विशेषण दिले. त्याचा अर्थ ' भाडखोर ', ' गोंधळ गडबड करणारे ' असा होता !

संशोधनाचा विषय कितीही साधा व सामान्य असला तरी त्याच फळ मिळाल की किती आनंद होतो नाही ?

मला दिलेल्या काबूल शहराच्या भागाचे विकास नकाशे माझ्या विचार-पद्धतीप्रमाणे तयार होत आले होते एक दिवस डॉ नूरजाद काही कामाकरता आमच्या ड्रॉइंग-हॉलमध्ये आला असता मी व दास त्याला आमचे नकाशे समजावून देऊ लागलो

छोट्या-छोट्या ग्रुप्समध्ये केलेली घरांची वाटणी, थोडे वळणदार रस्ते, लहान लहान व जागोजागी बागा, उच्च इमारतींकरता वेगळी जागा, कमीत कमी चौराहे म्हणजे चौक हे बघून डॉ नूरजाद अगदी चमकून गेला आत्तापर्यंत त्याने असे काही बघितलेच नव्हते. त्याने पाहिले होते ते म्हणजे शौरवी आर्किटेक्ट्सनी बनवलेल्या नकाशातले सरळच्या सरळ लांबेचवडे रस्ते, रस्त्याच्या दोन्ही बाजूला भिंतीसारख्या उंचच्या उंच इमारती, त्याचा मागच्या बदिस्त जागेत लहान दोन मजली इमारतींच्या रांगा आणि दर दोन इमारतींच्या ओळींनतर एक चौराहा ! डॉ नूर जादला सगळे काही वेगळेच वाटत होते तो काही प्रश्न विचारत होता व आम्ही आपली उत्तरे देत होतो

तेवढ्यात अचानकपणे पोकोस्कि आला व आमच्या नकाशांवर टीका करू लागला आमच्या नकाशातले रस्ते फार लहान आहेत त्यामुळे वाहतुकीला फार त्रास होईल, रस्ते वळणदार असल्यामुळे खूप जमीन वाया जाईल वगैरे तो सांगू लागला अशा तऱ्हेच्या हल्ल्याला आम्ही तयार नव्हतो, त्यामुळे प्रथम आम्ही थोडे बावचळून गेलो, तरी पण लगेच सावरलो " तुझ्या कल्पनेप्रमाणे रस्त्याकरता किती टक्के जागा सोडायला हवी ? " मी

पोक्रोस्कीला विचारले

"अठरा ते वीस टक्क्यांपेक्षा जास्त नको" त्याने उत्तर दिले व पुढे म्हणाला, "तुम्ही तर पचवीस टक्क्यांपेक्षा जास्त जागा दिलेली दिसते आहे."

आम्ही त्याबाबत खोलात जाऊन हिशोब केला नव्हता पण ज्या अर्थी आम्ही कमी रुंदीचे रस्ते दिले होते त्या अर्थी ते कितीही वळणदार असले तरी ते २५ टक्क्यापर्यंत जागा व्यापतील हे शक्यच नव्हते तेवढा मला अदाज होता तेव्हा मी ठोकून सागितल की आम्ही रस्त्याकरता इतकी जागा बिलकुल वापरलेली नाही. त्यावर पोकोस्कि माझ्याशी वाद घालवला लागला

आमचा वाद आणखी वाढला असता पण शहरवालने तो थांबवला व म्हणाला, "पुढच्या आठवड्यात बोर्डाची मीटिंग आहे त्यात तुमचा नकाशा चर्चेला घेऊ त्या वेळी तुम्हाला काय सांगायच असेल ते सांगा"

पोकोस्कीच्या उद्धटपणामुळे व आगाऊपणामुळे मी तर फार चिडून गेलो होतोच पण दास पण फार तडकून गेला होता

भारतात अनेक बाबतींत विविधता आहे, तशीच ती चीड येण्याबाबतही आहे थोडे काही मानापमानाचे झाले की बगाली व मराठी ताबडतोब चिडून उठतात मद्रासी चिडले तरी तसं ते दाखवत नाहीत. उत्तरप्रदेशवाले कधी चिडत नाहीत पंजाबी लोक चिडून फायदा होणार आहे की तोटा हे प्रथम पाहतात मग काय करायच ते ठरवतात

पाकोस्कीने इतका चोंबडेपणा केला असतानासुद्धा मलहोत्रा अगदी शांत राहिला होता कुलकर्ण्यांनी आम्हांला चागली साथ दिली पण खरे चिडलो होतो ते मी आणि दास त्यांतल्या त्यांत मी जास्त कारण तो नकाशा माझ्या कल्पनेप्रमाणे बनवला गेला होता एका तऱ्हेने त्याचे पितृत्व माझ्याकडे होते माझे विचार मी त्या नकाशाच्या द्वारे माडले होते त्यावर काही कारण नसता, पोकोस्कीने टीका केली होती त्यामुळे माझा राग अनावर झाला होता.

दास चिडला होता कारण माझ्या नकाशात रस्त्यांना किती जागा दिली आहे, पाणी-पुरवठ्याची काय सोय केली आहे, साडपाण्याची काय व्यवस्था केली आहे वगैरे तपशील तो तयार करणार होता ते तात्कालिक कारण होते व दुसरे पूर्वापारचे कारण म्हणजे त्याचा रशियन लोकावर फार जुना राग होता.

दास काही वर्षांपूर्वी एका शिष्यवृत्तीवर पूर्व जर्मनीत तीन वर्षं राहून आला होता पूर्व जर्मनी म्हणजे जणू काही रशियाची वसाहतच झाली होती त्यांचच राज्य तिथं. सगळ शिक्षण, काम करायची पद्धत वगैरे अगदी रशियन धर्तीची तस पाहिल तर जर्मन हे रशियनापेक्षा फार पुढारलेले, सास्कृतिक व इतर दृष्टीनेसुद्धा पण आता ते रशियन लोकाचे अकित असल्यामुळे जर्मनांना त्याचे ऐकावे लागे. विजेते असल्यामुळे रशियन्स जर्मनापेक्षा श्रेष्ठ ठरले होते म्हणजे रशियन्स तसे मानत. खरं म्हणजे पूर्व-जर्मनांच्या

मानाने रशियन्स फार मागासलेले होते व अजुनी आहेत

दास जर्मनीत गेला त्या वेळी तिथं असलेले रशियन्स पुष्कळ चांगले व सुधारलेले होते म्हणायचे. महायुद्ध जिंकल्यावर जर्मनीत आलेले रशियन्स इतके गावंढळ होते की त्यांनी कमोडचे संडास कधी पाहिले नव्हते. ते लोक चक्क त्या कमोडातून बटाटे वगैरे धूत असत

पण त्याच रशियनांकडून आता पूर्व जर्मनीतल्या पुढारलेल्या लोकांना शिक्षण दिले जात होते. ऑफिसमध्ये काम कसे करावे वगैरे सांगितले जात होते. अगदी तांत्रिक बाबतीतसुद्धा रशियन्स म्हणतील ते खरं अशी स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे जर्मन्स रशियनांचा फार तिरस्कार करीत त्यांच्या ज्ञानाची व त्यांच्या कार्यपद्धतीची फार टिंगल करत दासने हे सगळं काही त्याच्या तीन वर्षांच्या पूर्व-जर्मनीतल्या वास्तव्यात बघितलं होतं त्यामुळे तो पक्का रशियनद्वेष्टा झाला होता

डॉ नूरजादच्या सांगण्याप्रमाणे आम्ही आमच्या नकाशांचा तर कसून अभ्यास केलाच, पण शौरवी आर्किटेक्टसनी बनवलेले नकाशे परत एकदा बारकाईनं तपासले. त्यांच्यात काय काय चुका आहेत ह्याची यादी केली धक्का देणारी गोष्ट म्हणजे रस्त्याकरता त्यांनी चांगली सव्वीस टक्के जमीन दिली होती ! तसं स्पष्टपणे त्यांच्या नकाशावर लिहिलेलं होतं आणि हा शहाणा पोकोस्कि म्हणत होता की अठरा ते वीस टक्क्यांपेक्षा जास्त जमीन रस्त्याकरता दिली जाऊ नये म्हणून !

बोर्डाच्या मीटिंगचा दिवस उजाडला शहरवाल, शहरवालीतले इतर वरिष्ठ अधिकारी, हौसिंग बँकेचा आर्किटेक्ट चेअरमन, टाऊन प्लॅनिंग खात्याचे अधिकारी व व्यवसायी आर्किटेक्टस् वगैरे लोकांचे ते बोर्ड होते.

माझी व पोकोस्कीची चांगली जुंपणार आहे अशी वार्ता सगळीकडे पसरली होतीच, त्यामुळे आमचे अफगाण सहकारी व शौरवी टीममधले अफगाण मोठ्या संख्येने हजर होते. मीटिंग्जना कोणालाही हजर राहता येत असे हे मागे सांगितलेच आहे

प्रथम दुसरे काही नकाशे चर्चेकरता घेतले गेले. त्यानंतर माझा नकाशा चर्चेला घेण्यात आला

माझ्या सहकाऱ्यांनी माझा नकाशा भिंतीवर लावताच जसा आमचा शहरवाल माझा नकाशा पाहताच चमकून गेला होता तसे माझा नकाशा भिंतीवर लावताच बोर्डाचे सदस्य चमकून गेले. लहान रुंदीचे रस्ते, छोट्या-छोट्या बागा, घराच्या लहान-लहान वस्त्या-मोठ्या रस्त्यावर काही उंच इमारतींचा ग्रूप तर काही लहान बंगले ह्यामुळे टळणारा एक, सुरीपणा, चौराहे जवळ जवळ नाहीतच. हे सगळे त्यांना अनोखे होते

चर्चा सुरू होताच पोकोस्कि त्यांच्यावर तुटून पडला, हे वेगळे सांगणे नकोच

बाकदार रस्त्यांवरून जाणे-येणे धोक्याचे होणार नाही का? मोठ्या रस्त्यावर काही इमारती उंच तर काही कमी उंचीच्या, हे विचित्र दिसणार नाही का? वगैरे मुद्दे त्यात काढले पण त्याचा महत्त्वाचा मुद्दा अर्थातच रस्त्यांकरता फार जमीन वाया घालवली आहे हा होता वरवर पाहता अशा वळणदार रस्त्याना जास्त जमीन लागेल असे कोणालाही वाटले असते.

पोकोस्कीची ही सगळी टीका चालली होती तरी मी व दास शांतच होतो आम्ही आमच्या नकाशाचा तर बारकाईने अभ्यास केला होताच, पण शौरवी नकाशांचाही अभ्यास केला होता त्यामुळे आम्ही खंबीर बनलो होतो.

पोकोस्कीनंतर माझी बोलण्याची पाळी आली मी एकदम नकाशाबद्दल वा इतर तपशिलाबद्दल बोलायला सुरुवात केलीच नाही प्रथम मी आशियाई व पाश्चिमात्य लोकांच्या राहणीमानाची व पद्धतीची तुलना केली अफगाण एक-एकट्याने राहात नाहीत तर टोळ्या-टोळ्यांनी राहतात ह्याची त्याना जाणीव करून दिली

त्याचबरोबर अफगाणांची बागेची आवड, त्याचे फुलझाडावरचे प्रेम, घराजवळच्या लहान बागांचे फायदे, छोट्या-छोट्या वस्तीचा फायदा वगैरे गोष्टी जुन्या काबूलमधली काही उदाहरणे घेऊन त्यांना समजावून दिल्या.

वळणदार रस्ते कसे शोभिवंत दिसतील, त्यावरून जाण-येणं किती मजेचं होईल ते सांगितलं "माणूस घराबाहेर पडला आणि समोर मोठ्ठाच मोठ्ठा रस्ता दिसला तर त्याचं सगळं 'स्केच'च बदलून जाईल त्याला रस्त्याच्या पलीकडे राहणाऱ्यांबद्दल काही म्हणजे काही आत्मीयता वाटणार नाही म्हणून मी कमी रुंदीचे रस्ते म्हणजे आठ मीटरचे रस्ते दिले आहेत व त्यावर रहदारी अगदी कमी राहील हे बघितलं आहे नंतरचे रस्ते बारा, सोळा मीटरचे दिले आहेत सगळ्या रस्त्यांची रचना अशी केली आहे की, चौराहे अगदी कमीत कमी असतील कारण चौराहे म्हणजे अपघातांना निमंत्रण"

थोडक्यात म्हणजे आत्तापर्यंत मी जो विचार केला होता तो मी मोठ्या जोमदारपणे मांडला हळूहळू बोर्डाचे सदस्य माझ्या विचारात काही अर्थ आहे ह्या निर्णयाला येऊन पोहोचलेले दिसले. ते आता जास्त बारकाईनं प्रश्न विचारू लागले

रस्त्याकरता आम्ही किती टक्के जमीन वापरली आहे ते मी मुद्दामच सांगितले नाही तो प्रश्न मी मुद्दाम चुकवतो आहे असे पोकोस्कीला वाटावे व त्याने तो प्रश्न जोरदारपणे विचारावा अशी माझी इच्छा होती आणि पोकोस्कि बरोबर माझ्या जाळ्यात सापडला. त्याने मोठ्या हिरीरीने त्याबाबतचा प्रश्न विचारताच मी त्याचे नकाशे काढले व त्यांनी २६ टक्के जमीन रस्त्याकरता वापरली आहे व तसे त्यांनीच त्याच्या नकाशावर लिहिले आहे हे बोर्डाच्या नजरेस आणून दिले. त्याचबरोबर आम्ही फक्त १९ टक्के म्हणजे शौरवींपेक्षा सात टक्के कमी जमीन वापरली आहे हे मोठ्या अभिमानाने सांगितले

असे त्याचे दात त्याच्याच तोंडात घातल्यामुळे पोकोस्कि चागलाच गोंधळला त्यानीच त्याच्या नकाशावर ही सव्वीस टक्क्यांची माहिती दिली असल्याकारणाने त्याला पुढे काही बोलताही येईना. आम्ही त्यांचे नकाशे इतके बारकाईने पाहू असे त्याला कधी वाटलेच नसावे तो गोंधळला पडला आहे हे बघून त्याच्यावर मी प्रश्नाची सरबत्ती सुरू केली "तुम्ही इतके चौराहे दिले आहेत त्याचा वाहतुकीवर परिणाम होणार नाही का ? त्यामुळे जास्तच अपघात होणार नाहीत का ? आणि जर तीनशे फुटाचे रस्ते भरधाव गाड्याकरता असतील तर त्या रस्त्यांना जोडून तीस-तीस फुटाचे फुटपाथ कशाकरता ? रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या उंचच उंच इमारती एकसुरी वाटणार नाहीत का ? " आता पोकोस्कीला काहीच बोलता येईना.

तेव्हा शहरवालने त्याला संभाळून घेतले त्याने आपले नकाशे परत एकदा तपासून पाहावेत अशी शहरवालने सूचना केली

आता माझ्या नकाशांवर सविस्तर चर्चा सुरू झाली पण आता मला जास्त बोलण्याची पाळीच आली नाही बोर्डावर असलेले वयस्क अफगाण आर्किटेक्टसूच माझी बाजू जोरदारपणे माडत होते.

तरी पण अजूनही माझा नकाशा पास होत नव्हता. कारण आतापर्यंत शौरवी आर्किटेक्टस्ना डावलून कोणताही नकाशा पास झाला नव्हता, की कोणतीही योजना स्वीकारली गेली नव्हती इथे तर शौरवींनी माझ्या योजनेला कडाडून विरोध केला होता वर मी त्यांच्या योजनेतल्या चुका दाखवल्या होत्या ! हे मोठं अघटितच घडले होते शौरवींना विरोध करता येतो व योग्य वेळी व योग्य परिस्थितीत तसा तो केला पाहिजे हे अफगाण लोक अगदी जणू विसरूनच गेले होते शौरवी लोकाच्या कोणी चुका काढतोय हे त्यानी कधी पाहिलेच नव्हते, ते आज डोळे विस्फारून पाहात होते

त्यानी आत्तापर्यंत पाहिलेल्या शौरवी लोकांच्या नकाशाहून माझे नकाशे इतके आगळे व वेगळे होते की त्याचा लगोलग स्वीकार करणेही बोर्डाच्या सदस्याना जड जात होते

पण हळूहळू त्यांची वृत्ती पालटली पोकोस्कि तर काय आता अगदी चूप बसला होता वयस्क आर्किटेक्टस् माझ्या योजनेतले चांगले मुद्दे व गुण इतराना समजावून सागत होते. शेवटी चार-साडे चार तासाच्या चर्चेनतर माझी योजना मंजूर झाली माझे नकाशे पास झाले.

ह्याचा आम्हाला तर आनद झालाच पण आमच्यापेक्षा जास्त आमच्या अफगाण सहकाऱ्याना झाला. ती सगळीजण मीटिंगला थांबली होतीच सगळ्यानी माझे अभिनदन केले पायंडाने माझे दोन्ही हात हातात घेतले, अगदी प्रेमाने जोरात दाबले व म्हणाला, " आज तू शौरवी लोकांविरुद्ध झेंडा उभारला आहेस खरा "

ज्या दिवशी पायडाच्या म्हणण्याप्रमाणे शौरवी आर्किटेक्टस् विरुद्ध मी झेंडा उभारला तेव्हापासून अफगाण मित्रांना माझ्याबद्दल एक तऱ्हेचं कौतुक व आदर वाटू लागला.

शौरवी आर्किटेक्टस् बरोबर काम करणारे अफगाणसुद्धा माझ्याकडे काही वेगळ्या दृष्टीने पाहू लागले. मी अगदी हीरो जरी नाही तरी निदान हीरोसम तरी वाटू लागला होतो आणि त्याच वेळेपासून माझं आणि पोकोस्कीच वैर सुरू झाले

आधीच मला कम्युनिस्टाबद्दल एक तऱ्हेचा आकस आहे रशियात कसे गळचेपी राज्य चालले आहे ह्याबद्दल मी बरेच वाचले आहे. हंगेरीमध्ये ज्या तऱ्हेने रशियन फौजा घुसल्या होत्या त्याबद्दल मी काही पुस्तक व वर्तमानपत्रातून आलेलं वाचलं होत मी लंडनला असताना एक राष्ट्रीय वृत्तीचा हंगेरियन तरुण मला शिक्षक होता त्यानेही रशियनांच्या घुसखोरीबद्दल व उर्मट वागणुकीबद्दल मला बरच काही सांगितलं होतं

आर्किटेक्ट म्हणूनही रशियाबद्दल माझ्या मनात कडवटपणा होता मागे सांगितल्या प्रमाणे मॉस्कोमध्येला कर्बुझियरची इमारत तर होऊ शकली नाहीच, पण रशियन आर्कि-टेक्चरमध्येही काही क्रांती घडली नाही सगळ्या नव्या इमारती जुन्या पद्धतीच्या व ठोकळे-बाज त्यात काही कल्पकता, सौंदर्य, नवीन विचार, काही म्हणून काहीही नाही.

आता तेथली माणसं ठोकळेबजा झाली होती म्हणून त्याच्या इमारतीपण ठोकळेबजा झाल्या आहेत की काय कोणास ठाऊक, पण रशियन राज्यक्रांती होऊन चांगली साठ-सत्तर वर्षं झाली तरी रशियात नाव घेण्याजोगी एकही इमारत झाली नाही, की आंतरराष्ट्रीय कीर्तीचा कोणी आर्किटेक्ट झाला नाही

मानवी कलांना कम्युनिस्ट हिवाळा सोसत नाही की काय ते कळत नाही पण रशियास चांगले आर्किटेक्ट्स्, पेंटर्स, कवी, लेखक वगैरे निर्माण होऊ शकले नाहीत हे खरे जे काही चांगले लेखक व कवी होते त्यांना रशिया सोडायला लागला

ह्या सगळ्याला एकच अपवाद आहे तो म्हणजे रशियन मूर्तिकाराचा खरोखर मोठाल्या व्यक्तीचे पुतळे बनवावे तर ते रशियन पुतळेकारानीच लेनिनचे पुतळे पाहा! एक एक असा की त्याच्याकडे पाहूनच असे वाटते की, ह्या पाच–साडेपाच फूट उंचीच्या माणसाने खरंच साऱ्या जगाला हलवून सोडलं असणार! त्या पुतळ्यातला जोमदारपणा, कडवेपणा, त्वेष, मनाला अगदी खडबडवून टाकतो

आमची योजना पास झाल्यावर आम्ही त्याचे तपशीलवार नकाशे बनवायला सुरुवात केली आता खूप जोम पण आला होता.

ह्या कचेरीच्या कामाबरोबर वेळोवेळी आपल्या वकिलातीत जाणे हेही एक मोठे काम होऊन बसले होते आमच्या दररोजच्या कामात जरी वकिलातीचा संबध येत नसला तरी इथल्या जीवनातल्या पुष्कळ गोष्टींवर वकिलातीचे वर्चस्व होते व ते फार जाणवतही असे.

वकिलात आमच्या घरापासून आणि कचेरीपासूनही अगदी जवळ होती त्याचा आम्हाला फार फायदा व्हायचा वकिलात एका भाड्याच्या इमारतीत होती पूर्वी हा एका

श्रीमान अफगाणाचा बंगला होता त्यात सोयीप्रमाणे जास्तीच्या काही इमारती बांधून घेतल्या होत्या वकिलात शहराच्या मोठ्या प्रतिष्ठित भागात होती जवळच अमेरिकेच्या राजदूताचा बंगला होता व अफगाण सरकारच्या 'वजारत-ए-दाखला 'ची म्हणजे गृहमन्त्रालयाची भव्य अशी इमारत होती एका बाजूला इंडोनेशियन वकिलात होती तर दुसऱ्या बाजूला मधे एक रस्ता टाकून मुलींची मोठी शाळा होती.

वकिलातीच कंपाऊंड खूप मोठं होतं आणि त्यामध्ये तीन मुख्य इमारती होत्या पुढल्या बंगल्यावजा इमारतीच्या तळमजल्यावर हिशोब-ठिशोब ठेवणारे, पत्रव्यवहार करणारे बसत. तिथेच एका दुय्यम सचिवाची कचेरी पण होती.

पहिल्या मजल्यावर प्रथम सचिवाची व स्वतः राजदूतांची केबिन होती. त्याच मजल्यावर बिनतारी संदेश वाहकाची उपकरणे व त्याच्याकरताच्या खोल्या होत्या. तेथून दिल्लीशी दिवसातल्या काही विशिष्ट वेळी संपर्क साधता येत असे व माहितीचे आणि बातम्यांचे आदानप्रदान करता येत असे.

कंपाऊंडमधली दुसरी इमारत मुद्दाम बांधून घेतली गेलेली होती ती पण दोन मजली होती खालच्या मजल्यावर कमिसरी व इतर काही ऑफिसेस होती वरच्या मजल्यावर चांगले चार-पाचशे लोक बसतील असा एक हॉल होता. ह्या हॉलमध्ये दर शुक्रवारी हिंदी सिनेमा दाखवला जायचा तोसुद्धा अगदी फुकट ! इतर सांस्कृतिक कार्यक्रम व सभा वगैरे ह्याच हॉलमध्ये व्हायच्या.

पुढल्या बंगलावजा इमारतीच्या आणि ह्या इमारतीच्या मधे एक टेनिस-कोर्ट होतं. तिथं उन्हाळ्यात सभा, दिवाळीचा उत्सव वगैरे साजरा व्हायचा.

दर महिन्याच्या पहिल्या तारखेला पगाराचा चेक व वेळोवेळी जे भत्ते मिळत ते आणायला वकिलातीत जावे लागायचे

पहिला पगार घेतला आणि माझ्या निवडीच्या वेळी अर्थखात्याच्या अधिकाऱ्याने दिलेल्या सल्ल्याचा अर्थ मला कळला ! तो म्हणाला होता, "काबूलला मिळणाऱ्या भत्त्यांच्या आकड्यावर जाऊ नकोस तसे ते कमी वाटतात, पण तिथं गेल्यावर कळेल की वाटतात तितके ते कमी नाहीत "

त्याचं असं होतं आमच्या पगाराचा व भत्त्याचा हिशोब प्रथम रुपयात करत व एका रुपयाला अकरा अफगाणी ह्या हिशोबाने आम्हांला तेवढे अफगाणी देत. पण बाजारात आम्हाला पाच अफगाणींना एक रुपया मिळत असे म्हणजे एखाद्याचा पगार एक हजार रुपये असेल तर वकिलात त्याला अकरा हजार अफगाणी देई व तो मार्केटमध्ये जाऊन त्याच जवळ जवळ दुप्पट म्हणजे दोन हजार दोनशे रुपये मिळवी, किंवा त्या किंमतीचे अमेरिकन डॉलर्स मिळवी.

अर्थातच हातात नक्की किती डॉलर्स पडतील ह्याची खात्री नसे त्या दिवशी जो 'रेट ' असेल त्यावर ते अवलंबून असे 'रेट ' म्हणजे अमेरिकन डॉलरचा अफगाणीतला

भाव असं असल्यामुळ प्रत्येक भारतीयाची चागल्यात चागला 'रेट' मिळावा म्हणजे जास्तीत जास्त डॉलर्स मिळावेत अशी इच्छा असे व त्या अनुरूप धडपड !

बरेचसे लोक पगाराच्या दिवशीच जो काय 'रेट' असेल त्या रेटने डॉलर्स खरेदी करत व भारतात पाठवून देत काही जण 'रेट' चागला होण्याची वाट पाहात. पण कधी कधी 'रेट' पडे. मग ज्यानी ताबडतोब डॉलर्स घेतले असत ते आनंदित होत. उलट कधी कधी 'रेट' सुधारे मग थाबलेले आनंदी होत व घाईघाईने घेतलेले दु:खी !

ह्यामुळे कित्येकजणात उगाचच मत्सर, राग, लोभ निर्माण होत असत ह्या सगळ्यामुळे 'रेट' हा जीवनातला एक महत्त्वाचा घटक होऊन बसला, बोलण्या-चालण्यातला अगदी महत्त्वाचा विषय झाला. हे 'रेट' प्रकरण महिन्यातून एकदा उद्भवायच पण त्याचं दळणकांडण महिनाभर चालू असे

आणखी एका कारणावरता आठवडयातून दोनदा वकिलातीत जायला लागायच. ते म्हणजे भारतातुन येणारी पत्र आणण्याकरिता अशी पत्र दर मगळवारी व शुक्रवारी येत.

येथे पत्रांचा बटवडा करण्याची सोय नाही पोस्टमन नावाची सस्थाच नाही. अफगाणाचा पत्रव्यवहार असा नाही. ज्या व्यापारी सस्था, कचेऱ्या ह्यांची पत्रं यायची ती त्यांच्या-त्यांच्या पोस्ट बॉक्सवर येत ती त्यानी पोस्टातून घेऊन यायची ही पद्धत

आम्हा आयटेकवाल्यांची व वकिलातीत काम करणाऱ्यांची पत्र दिल्लीच्या परराष्ट्र खात्याकडून वकिलातीत येत त्यामुळे दर मंगळवारी व शुक्रवारी वकिलातीवर मोठी झुंबड उडत असे ज्यांची पत्रं येत त्यांना आनदाच्या उकळ्या फुटत व ज्यांची येत नसत ते फार खजील होऊन जात

तुरुंगात असलेल्यांच्या पत्राबाबत काय भावना असतील ह्याची थोडी कल्पना ह्यामुळे आली.

पण ही सुविधा हिंदुस्थानात पत्र पाठवण्याबाबत नव्हती हिंदुस्थानात पाठवावयाची पत्र अफगाण डाकेने पाठवायला लागत. त्याला फार पैसे पडत. तेव्हा एक युक्ती शोधून काढण्यात आली होती हिंदुस्थानातून बरीच पाकिटं-अतर्देशीय आणून ठेवायची व जो हिंदुस्थानात जात असेल त्याला तिथं गेल्यावर पोस्टात टाकण्याकरता म्हणून द्यावयाची हिंदुस्थानात येणाऱ्यांकडे अशी पुष्कळशी पत्र जमत मी एकदा सुट्टीवर आलो होतो त्या वेळी जवळ जवळ दीडशे पत्र माझ्याकडे जमली होती !

दर शुक्रवारी वकिलातीत हिंदी सिनेमा विनामूल्य दाखवत. काबूल शहरात चार-पाच चित्रपटगृहे होती. त्यातली दोन तर अगदी आमच्या घराजवळ होती पण तिथे जायचं म्हणजे तिकिटं काढायला लागायची, म्हणजे पैसा खर्च व्हायचा, त्यातून तिकिट बुक करायला लागायची म्हणजे त्याची दगदग व त्रास व्हायचा

त्या दृष्टीने वकिलातीत सिनेमा बघणं फार सोयीचं होत शिवाय त्या निमित्ताने सगळी हिंदी मित्रमडळी पण भेटत चांगले 'गेट-टु-गेदर' होत असे गप्पा-टप्पा मारायला व

निंदा-कुचाळकी करायला हे हिंदी सिनेमा फार उपयोगी पडत.

काबूलच्या हिंदी समाजात बरीच प्रेमप्रकरणं वेळोवेळी पिकत. त्याचाही ऊहापोह इथं होत असे प्रेम-प्रकरणातली पात्रं हॉलमध्ये साधारणपणे जवळ-जवळ बसत मग बाकी मंडळी त्यांच्याकडे डोळे विस्फारून पाहात राहात व हळूहळू आवाजात त्याच्याबद्दल कान-गोष्टी करत

ह्या हिंदी सिनेमा पाहण्याबाबतही एक खास हिंदी पद्धत असे. सगळे जण पहिल्या-पहिल्यादा आले की आपले सिनेमा अगदी भिकार असतात, ते पाहण्यात आपल्याला काही रस नाही, फक्त वेळ जावा म्हणून आपण आलो आहोत, असं ऐटीत सांगत, पण पुढं पाहावं तर सगळे सिनेमाला येऊ लागलेले दिसत हिंदी सिनेमापेक्षाही तिथ होणाऱ्या गप्पा-टप्पांची, ' गॉसिप 'ची चटक लागली की मग ती जाता जात नसे

पुढे कोणी नवीन माणूस आला व " खर म्हणजे मला हिंदी सिनेमात बिलकुल रस नाही .." वगैरे सांगू लागला की खूप हसू यायचं

आम्ही ज्या वेळी काबूलला गेलो त्या वेळी कोणी सिंग नावाचे आपले राजदूत होते. खर म्हणजे आम्ही काबूलला होतो त्या चार वर्षांच्या काळात आलेले तीनही राजदूत ' सिंग ' नावाचेच होते मराठी लेखकांत जसे ' जोशी ' तसे उत्तर हिंदुस्थानात ' सिंग ' । एकदा तर स्वत राजदूत, पहिले सचिव, दुय्यम सचिव, सगळे अधिकारी कोणी ना कोणी तरी ' सिंग होते तेव्हा मी " अब काबूलमें सिंगोंका राज है ! " असा विनोद करत असे. त्याला बरेच लोक मनापासून हसत त्यावरून त्यांना माझा विनोद आवडत असावा असा माझा अदाज

पहिल्या राजदूतांना आपण ए.सिंग म्हणू या, दुसऱ्यांना बी.सिंग व तिसऱ्याना सी सिंग

ए. सिंग उत्तर प्रदेशातल्या एका लहान सस्थानाचे राजकुमार होते. ते नावापुढे ' राज-कुमार ' अशी उपाधीसुद्धा लावत. उंच सडसडीत व अगदी कमीत कमी बोलणारा असा हा गृहस्थ होता जाहीर सभेत बोलणं त्याना जमत नसेच, पण साधं चार लोकात बोलणं, सभाषण करण पण ह्या गृहस्थाला जमत नसे हा गृहस्थ बाकी देशांच्या राजदूताबरोबर किंवा अफगाण राज्यकर्त्यांबरोबर कशी काय बोलणी-चालणी करत असेल असा मला नेहमी प्रश्न पडत असे

फक्त वरिष्ठ हिंदी अधिकाऱ्यानाच त्याना भेटायची परवानगी होती कनिष्ठ अधि-काऱ्याना ते कधीही भेटत नसत ह्या सगळ्यामागे लोकांना शक्यतो टाळण्याची त्याची वृत्ती होती ते स्वत कधी दारू पीत नसत, पण त्याची बायको ही त्यांची कसर अगदी पुरेपूर-पणाने पिऊन भरून काढते असं आम्ही ऐकल होतं

काबूलसारख्या परदेशातल्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांच्या जीवनात राजदूताला फार

महत्त्व असत राजदूताच्याच नव्हे तर वकिलातीतल्या इतर अधिकाऱ्याच्या सुद्धा जवळ जाण्याचा, त्याच्याशी ओळख वाढवण्याचा सगळे प्रयत्न करत असतात, अगदी वेगवेगळ्या तऱ्हेनं आयटेकचे वरिष्ठ अधिकारीसुद्धा वकिलातीतल्या वरिष्ठ अधिकाऱ्याचदेखील इतकं लांगूलचालन करत की ते बघून मी अगदी अस्वस्थ होऊन जात असे

अशी चमचेगिरी करण्याचं एक सबळ कारण होतं आयटेकचे अधिकारी काबूलला दोन वर्षांच्या बोलीने पाठवले जात. त्यानंतरच तिथलं राहणं किंवा न राहणं सर्वस्वी राजदूतांच्या मर्जीवर अवलंबून असे. इथं राहायचं म्हणजे आरामशीर आयुष्य व भरपूर पैसा त्यामुळे प्रत्येक आयटेकवाला जास्तीत जास्त वर्षं इथं राहण्याची खटपट करत असे. आणि तशी खटपट करायची म्हणजे राजदूताची व इतराची सलावण करायची हाच एक मार्ग होता. कारण आयटेकवाल्यांच्या कामाचं मूल्यमापन वगैरे कधी केलं जात नसे.

एखाद्याचा राजदूताशी या इतर अधिकाऱ्यांशी थोडा जरी मतभेद झाला वा कोणा आयटेक अधिकाऱ्यानं विचाराचा स्वतन्त्रपणा दाखवला की त्याला लगेच हिंदुस्थानात परत पाठवलं जात असे. ह्या सगळ्यामुळे बहुतेकाच्या मनात एक तऱ्हेच्या लाचारीची भावना असे

आयटेक लोकाच्या बाबतची काम प्रसाद नावाचा एक दुय्यम सचिव पाहात असे ह्या प्रसाद म्हणजे उत्तर प्रदेशाच्या संस्कृतीच एक प्रतीक होत उचीला कमी, जाडा, गिड्डा पण नेहमी हसतमुख. प्रसादचं व माझं चागलं जमलं

तसा हा प्रसाद अगदी 'बाबू' जातीचा होता त्यामुळे वकिलातीच्या कामात तो काही सुधारणा वगैरे घडवून आणेल हे शक्यच नव्हत पण त्यानंतर त्या जागी आलेल्या तरुण आय एफ एस सरदारजी अधिकाऱ्याला ती दृष्टी होती त्याच्याशी मी आयटेक लोकाच्या लागूलचालनाबद्दल बोलत असे असं लागूलचालन व चमचेगिरी कमी होईल अशा पद्धती वकिलातीत काढायला पाहिजेत वगैरे मी त्याला सागत असे. पण आपली सरकारी यंत्रणा व लोकांची लाचार मनोवृत्ती ह्या आपसांत इतक्या जमून गेल्या आहेत की ह्यात काही सुधारणा होणं जवळ जवळ अशक्य आहे.

आम्हाला आपल्या वकिलातीत 'कमिसरी' आणायला पण वेळोवेळी जायला लागायचं. कमिसरी म्हणजे एक तऱ्हेचे जनरल स्टोअर्स. सगळ्या वकिलातीतून अशा 'कमिसरी' असतात सगळ्या वकिलातींना कोणताही स्थानिक कर न देता परदेशातून वेगवेगळ्या वस्तू आणायची परवानगी असते त्यामुळे वेगवेगळ्या वस्तू खूप स्वस्तात मिळतात ह्यात तऱ्हे-तऱ्हेचे साबू, उटणे, सुगध, शीत-पेय तयार करण्याकरता लागणारी भुकटी अशा चिल्लर गोष्टी तर असतातच पण त्याचबरोबर फ्रिज, वॉशिंग मशीन, टाईपरायटर वगैरे मोठ्या वस्तूसुद्धा कमिसरीतर्फे मागवता येतात.

पण कमिसरीत मिळणारी सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे विलायती दारू! अगदी चागल्या-चागल्या ब्रँडच्या दारूच्या बाटल्या अतिशय स्वस्त किंमतीत मिळत. प्रत्येकी किती

बाटल्या द्यायच्या हे वकिलातीन ज्याच्या त्याच्या पगाराप्रमाणं ठरवून दिल होतं. ज्याचा पगार जास्त त्याला जास्त बाटल्या, असं ते गणित होतं वकिलातीतल्या लोकाना व आम्हा आयटेकच्या लोकांना पण

येथपर्यंत सगळं ठीक होतं गडबड पुढेच होती वकिलातीच्या लोकांना बाटल्या सीलबद मिळत तर आम्हा आयटेकच्या लोकाना सील फोडून मिळत ह्याचे कारण आयटेकचे लोक दारूच्या बाटल्या अफगाणाना विकून पैसा करतात असं सांगितल जायचं सील फोडलेल्या बाटल्या विकल्या जात नाहीत आयटेकवाल्यावरचा हा आरोप पुष्कळ टक्के खराही होता.

अफगाणिस्तान हा मुस्लिम देश त्या धर्मात दारू पिणं नुसतं निषिद्धच नाही तर तो मोठा गुन्हा मानला गेला आहे त्यामुळं दारूची राजरोस अशी दुकान नाहीत. तेव्हा दारू पिणाऱ्या अफगाणाची मोठी पंचाईत व्हायची बाहेर दारू मिळायची नाही चोरटी दारू फार महाग पडत असे. तेव्हा परदेशी लोकाकडून थोडे जास्त पैसे देऊन अफगाण लोक दारू विकत घेत

काही आयटेकवाले अशी अफगाणांना दारू विकत असले तरी सगळ्या आयटेकच्या लोकाना सील उघडून बाटल्या द्याव्यात असा सरास नियम करण योग्य नव्हतं आम्हा काहीजणाना ते फार अपमानास्पद वाटलं, आयटेकचे काही लोक चोरून दारू विकत, तसेच बरेचसे वकिलातीतले लोकही विकत असत.

मला विमानतळावर घ्यायला आलेल्या चावला नावाच्या माणसाला तर ह्याच कारणाकरता वकिलातीने कमिसरीतून दारू देण बंद केलं होत । मला हे कळायचं कारण म्हणजे एकदा हा माझ्याकडे दारूच्या बाटल्या मागायला आला व वकिलातीनं त्याला दारू देण्याच बंद केल आहे म्हणून मला सांगू लागला अर्थात तस बद करण्याचं खरं कारण मला सागितल नाही. पण ते मला वकिलातीकडून समजलं होतं

अशी वकिलातीच्या लोकांची उदाहरणं डोळ्यासमोर असता वकिलातीच्या लोकांच्या बाटल्या सीलबंद द्याव्यात व आम्हाला सील काढून द्याव्यात हे फार कमीपणाचं वाटे. आम्ही काहीजणानी त्याविरुद्ध खूप काहूर माजवल, पण राजदूत साहेबानी काही आमच ऐकलं नाही पुढे बी सिंग आले परत आम्ही हा प्रश्न त्यांच्यासमोर मांडला. त्यांना आमचं म्हणणं पटल. त्यानंतर आम्हालापण सीलबंद बाटल्या मिळू लागल्या, आणि दारूच्या बाटलीतले हे वादळ शांत झाल.

ह्या दारूच्या बाटल्याबद्दलचा एक अफगाण किस्साही फार चविष्ट आहे

आमच्या नायब-शहरवालचा म्हणजे डेप्युटी मेयरचा सासरा चांगला पासष्ट वर्षांचा म्हातारा होता पक्का दारूबाज. पहिल्या भेटीतच त्याने माझ्याकडे दारूच्या बाटलीचा विषय काढला. मी त्याला म्हटल, "तुम्ही इतके पीरनफर म्हणजे वयस्क गृहस्थ, त्यातून मुसलमान ! तुम्ही दारू पिता तरी कसे ? तुमच्यात तर हा गुन्हा मानला गेला आहे ना ?"

" रानडे साहाब, असे कायदे करून थोडच जग चालत ? " तो थोर गृहस्थ मला सागू लागला, " दारू पिणं ही अगदी नैसर्गिक गोष्ट आहे. उद्या कोठल्या धर्मात लग्न करण गुन्हा आहे ' अस सागितल तर ते चालेल का ? जितकं लग्न करणं आवश्यक आणि नैसर्गिक आहे, तेवढच दारू पिणसुद्धा आहे "

" शाब्बास पठ्ठे ! " मी मनाशी म्हटलं, पण काहीतरी खोटीनाटी कारण सागून त्याला बाटली देण्याच टाळलं कारण एकदा का त्याला अशी बाटली दिली असती तर तो सिंद-बादच्या म्हाताऱ्यासारखा माझ्या मानगुटीवर बसला असता वर नायब शहरवालचा सासरा ! म्हणजे त्याला मानगुटीवरून खाली उतरवणंही जड गेल असतं.

असे दिवस व अशी काम चालली असता एक दिवस बातमी आली की, पतप्रधान इंदिराजी काबूलला दोन दिवसांच्या भेटीकरता येताहेत—

कल्पनांच्या बाबतीत माझा मेंदू फार तल्लख आहे मला अगदी खोऱ्यानी कल्पना सुचतात पंतप्रधान येणार आहेत म्हटल्यावर माझ्या मनात झटकन दोन कल्पना आल्या. त्यांच्यावर थोडा विचार केला व लगेच राजदूतांच्या भेटीकरता वेळ पक्की केली

माझी अशी पद्धत आहे की, अशा काही कल्पना वगैरे सुचल्या की मी तडक सगळ्यात वरिष्ठ असेल त्यालाच जाऊन गाठतो. म्हणजे त्यान ' हो ' किंवा ' नाही ' सागितलं की लगेच त्याचा सोक्षमोक्ष लागतो खालचे अधिकारी आपल्याला जास्त काम पडेल ह्या भीतीने आधीच नाही म्हणतात किंवा ती कल्पना आपली आहे असं वरिष्ठाला सांगून त्याचं श्रेय उपटतात. म्हणजे कल्पना अमलात आणली जाते पण त्याचं श्रेय दुसराच उपटतो त्या वेळी गभीर प्रकृतीचे ए सिंग हे राजदूत होते " पतप्रधानांच्या भेटीचा योग राजदूतांच्या आयुष्यात एखाद्या वेळी येतो तेव्हा आपण त्या सधीचा फायदा घेतला पाहिजे," मी विषयाला सुरुवात करताना राजदूत साहेबांना म्हणालो, " पतप्रधानांच्या भेटी-बाबत माझ्या दोन कल्पना आहेत, आणि मी नुसत्या कल्पना देणार नाही आहे तर त्याच्याकरता वाटेल तेवढं काम करायची माझी तयारी आहे. "

ह्या आश्वासनाने राजदूत थोडे चमकूनच गेले व थोडे आनदलेही

पहिली कल्पना अशी की काबूलच्या सगळ्या नव्या-जुन्या व महत्त्वाच्या इमारतींचे फोटोग्राफ्स घ्यायचे त्यांची सगळी माहिती गोळा करायची व त्याचा पोर्ट-फोलियो पत-प्रधानांना भेट म्हणून द्यायचा थोडक्यात म्हणजे फोटोमार्फत काबूल शहराची त्याना ओळख करून द्यायची

दुसरी कल्पना ह्याच्यापेक्षा नामी आहे वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणारी आम्ही काही तरी शभरच्या वर माणसं आहोत. आमच काम दाखवणारं एक छोट प्रदर्शन भरवायचं व ते पतप्रधानाना दाखवायचं

ह्या कल्पना ऐकताच राजदूत साहेब अगदी हरखून गेले दोन्ही कल्पना त्याना अतिशय आवडल्या त्यांच्या चेहऱ्यावर कधी न दिसणार हास्य दिसू लागलं ह्या दोन्ही, विशेषत दुसरी कल्पना जर यशस्वी झाली असती तर त्याचे श्रेय राजदूत साहेबानाच मिळाल असत. ह्या प्रदर्शनामुळे भारत अफगाणिस्तानला कोणत्या कोणत्या क्षेत्रांत मदत करतो आहे हे सहजपणे दिसलं असतं

राजदूतांनी त्याना दोन्ही कल्पना आवडल्याच सागून मला काय काय मदत लागेल ह्याची विचारणा केली.

मी तयारी करूनच गेलो होतो.

"पहिल म्हणजे तीन-चार दिवसांकरता मला वकिलातीची गाडी लागेल शहरात फिरून वेगवेगळ्या इमारती पाहायला व त्यांचे फोटो घ्यायला!" मी म्हटलं

"बरोबर आहे" राजदूत म्हणाले व त्यांनी लगेच फोन उचलला व प्रसादला सांगितल, "मी आणि रानाडे काही महत्त्वाचे ठरवतो आहोत. त्याला काबूल शहरात फिरायला तीन-चार दिवसाकरता एक गाडी लागेल त्याची व्यवस्था कर." फोन करून झाल्यावर त्यानी मला विचारले, "आणखी काही?"

"प्रदर्शन भरवायचं म्हणजे चित्रकार वगैरे लोकांची मदत लागेल. आर्किऑलॉजिकल डिपार्टमेन्टचे काही लोक बामियानला जाण्याकरता म्हणून इथ आले आहेत. त्यांच्यात काही आर्टिस्ट मडळी आहेत त्यांना इथं थाबवून घ्यायला लागेल"

"ते काही अवघड नाही" राजदूत उत्तरले व त्यांनी प्रसादला परत फोन केला "माझ्या परवानगीशिवाय आर्किऑलॉजीच्या लोकानी काबूल सोडता कामा नये आणि रानाडे सागेल ते काम त्यानी करायचं आहे"

एकदरपणे रुक्ष दिसणाऱ्या व वाटणाऱ्या राजदूतांनी इतकी उत्साहवर्धक वागणूक दिल्यामुळे मला उत्साहाच मोठं भरत आल आणि त्या भरात मी चटाचटा कामाला लागलो

राजदूतांच्या उत्साहवर्धक वागणुकीचं कौतुक करायला हवं सगळी राजदूत मडळी अशी नसतात मस्कतला असताना तिथल्या राजदूत साहेबांना हिंदुस्थानच्या व ओमानच्या सहकार्याने होणाऱ्या वेगवेगळया क्षेत्रातल्या कामांची माहिती देणारी एखादी पुस्तिका प्रसिद्ध करावी अशी कल्पना मी दिली होती पण त्यांनी त्यात काहीच रस घेतला नाही

वकिलातीची गाडी मिळताच बायका-मुलांना घेऊन प्रथम मी बागे-बाबर म्हणजे बाबराची बाग पाहायला गेलो. मीच काय पण इथ येणारा प्रत्येक भारतीय बाबराची ती बाग पाहायला अगदी उतावळा झालेला असे केव्हा एकदा ती बाग पाहतो अस प्रत्येकाला होऊन गेलेल असे जणू काही बाबर म्हणजे आमचाच कोणी काका किंवा मामा काय त्या बागेबद्दल अभिमान व कौतुक

ग्रंथ शाखा



मी हे फार कडवटपणे लिहितो आहे कारण ह्याबाबत आमच्या पायंडा नावाच्या अफगाण सहकाऱ्यानं माझे पुढे एकदा चांगले डोळे उघडले. काहीतरी दोन अडीच वर्षांनी ह्याच बागेबाबूरच काम आमच्याकडे आलं. त्यात पायंडा मला मदत करणार होता त्या बाबतची योजना मी तयार केली व त्याने ती बाग पाहिली असणारच असं गृहीत धरून मी त्याच्याशी बोलू लागलो त्या वेळी त्याने दिलेले उत्तर लक्षात ठेवण्यासारखं आहे

" मी काय म्हणून ती बाग बघू ? बाबर काही अफगाण नव्हता बाहेरचा हमलावर होता तो, समरकंदचा आधी त्याने आम्हाला गुलाम केलं नंतर तुम्हाला मला नाही त्या बागेबद्दल कौतुक. "

पण हे सगळे नंतरचं त्या वेळी मी मोठ्या उत्साहात बागे-बाबूरमध्ये गेलो, तिथं वेगवेगळे फोटो घेतले, बागेचे, शहाजहानन बांधलेल्या मशिदीचे, बाबरच्या थडग्याचे व आमचे स्वतःचेही. आमच्याबरोबर वकिलीतीचा ड्रायव्हर होता. त्याने अगदी घाबरत घाबरत ' माझा पण एक फोटो घेता का ? ' म्हणून विचारलं.

" जरूर, का नाही " मी उत्तरलो. नतर आम्ही सगळे त्याच्या दोन्ही बाजूला उभे राहिलो व फोटो घेतले.

पुढे ज्या ज्या वेळी हा फोटो आम्ही भारतीयांना दाखवत असू त्या त्या वेळी त्यांचा प्रश्न असे,

" हे मध्ये उभे असलेले कोण गृहस्थ आहेत ? "

" ज्यांनी आम्हाला काबूल शहरभर फिरवलं तोच तर हा ड्रायव्हर ! " माझं उत्तर

आपण हा कोण मोठा साहेब आहे म्हणून विचारलं आणि तो साधा ड्रायव्हर निघाला हे बघून त्यांना फार अपराधी वाटे व त्याचा चेहरा पडे

मी प्रदर्शन भरवायची व फोटोंचा पोर्ट-फोलियो बनवण्याची जबाबदारी घेतली होती. पण नंतर लक्षात आलं की प्रदर्शनाचं काम फार वेळ घेणार आहे पण ते जास्त महत्त्वाचं पण आहे. तेव्हा पोर्ट-फोलियोचा नाद सोडला व फक्त प्रदर्शनाच्या मागे लागलो

प्रदर्शनात ' काय ' दाखवावयाचं ते राजदूत साहेब ठरवणार होते व ते ' कसं ' दाखवावयाचं ते मी ठरवणार होतो काबूलच्या प्रदर्शनात ' काय ' दाखवावयाचं ह्याला राजकीय महत्त्व होतं. पूर्वीच्या राजवटीतल्या म्हणजे जाहीरशहाच्या कारकीर्दीतल्या कोणाही माणसाचा फोटो वा साधा उल्लेखही अगदी चुकूनसुद्धा होणार नाही ह्याची फार काळजी घ्यायला लागणार होती. इथं नवी राजवट आली की जुन्या राजवटीतले सगळे लोक एकदम देशद्रोही ठरतात ! तशा देशद्रोह्याचा उल्लेख भारतीय वकिलातीनी आपल्या प्रदर्शनात करून कसं चाललं असतं ?

हे सगळ आपल्याला विचित्र व वेगळच वाटत आपण भारतीय तर अगदी इंग्रजी राजवटीतल्याही रस्त्याची नावं, पुतळे, छायचित्र काढून टाकायला तयार नसतो

आपण स्वतंत्र झालो ऑगस्ट सत्तेचाळीस साली ख्रुश्चेव्ह व बुल्गानिन काहीतरी

सत्तावन-अठ्ठावन साली म्हणजे जवळ जवळ दहा वर्षांनी भारतात आले तरीसुद्धा राष्ट्रपति-भवनात व्हाईसरॉयांची मोठ्ठाली तैलचित्र पूर्वी होती तशीच दिमाखात लावलेली होती ते बघून ख्रुश्चेव्हला खूप आश्चर्य वाटलं. तो पंडित नेहरूंना म्हणाला, "तुम्ही अजुनी ही तैलचित्रं ठेवली आहेत ? ही ताबडतोब काढायला हवी होतीत" त्यावर नेहरू उत्तरले, "नुसती तैलचित्र काढून टाकून का इतिहास पुसला जाणार आहे ?" नेहरूंचं उत्तर योग्य की अयोग्य कुणास ठाऊक. पण परकीय राज्यकर्त्यांच्या विरुद्ध आपल्या मनात फारसा राग नसतो हे खरं. काही दिवसांनी व्हाईसरॉयांची ती चित्रे राष्ट्रपति-भवनातून हालवली गेली.

प्रदर्शन लहानस असलं तरी ते मनोरंजक व्हावे म्हणून मी नाना युक्त्या योजल्या होत्या. इंदिराजी ज्या वेळी म्हणजे सकाळी दहा वाजता काबूलला पोहोचल्या होत्या, त्या वेळी त्याना विमानतळावर मान-वंदना दिली गेली होती त्याचा फोटो मी काबूल टाईम्सच्या कचेरीत जाऊन मोठ्या खटपटी-लटपटी करून मिळवला दुपारी इंदिराजी उद्घाटनाला आल्या तर सकाळचा विमानतळावरचा फोटो प्रवेशाशीच लावलेला ! त्यांनी ह्या चुटचुटीत-पणाची प्रशंसा केली

काबूल आयटेकमध्ये आलेले एक गायक होते त्यांचा तबला व तंबोरा ठेवला होता. एक हिंदी हॉकी कोच होता. त्याला बक्षीस मिळालेला पेला, त्याच्या हॉकी-स्टिक्स् व चेंडू वगैरे गोष्टी छानपणे मांडल्या होत्या मी तयार करत असलेल्या विकास योजनेचं मॉडेल बनवल होत, ते ठेवलं होतं ते तयार करण्यात मला अफगाण मित्रानी, कुलकर्णी व दासनी फार मदत केली होती बामियनच्या बुद्धाच्या उभ्या मूर्तींच्या डागडुजीचे काम भारतीयांनी केल होतं त्याचे चांगले मोठे-मोठे फोटो लावले होते

हे सगळ वाचून कोणाच्याही मनात येईल की ह्यात विशेष असं काय आहे ? हे तर बहुतेक प्रदर्शनातून असतंच, आणि तस मनात येणं साहजिकच आहे माझ प्रदर्शन काही आगळ नसेल पण तशा प्रदर्शनाची कल्पना येणं, ते यशस्वी करून दाखवण हेच मुळी आगळेपणाच होत. शिवाय त्याला स्थळ व काल-महात्म्य होतंच

इंदिराजींनाही ते प्रदर्शन फार आवडलं प्रथम त्या पाच सहा मिनिटंच देणार होत्या, पण त्यानी चांगली पधरा वीस मिनिट दिली. नतर झालेल्या पत्रकार परिषदेत 'भारत अफगाणिस्तानला काय तऱ्हेची व किती मदत करत आहे ?' असा प्रश्न त्याना विचारला असता, 'मला काय विचारता ? इथं वकिलातीने छोटसं प्रदर्शन भरवलं आहे, ते बघा, म्हणजे तुम्हाला सपूर्ण कल्पना येईल" म्हणून उत्तर दिल.

प्रथम ते प्रदर्शन फक्त इंदिराजींकरता एक दिवसाचं असं होतं पण मग ते अफगाण राज्यकर्त्यांना व अधिकाऱ्यांना पण दाखवावयाच ठरलं व सात दिवस ठेवल गेलं.

माझ्या पुष्कळ कल्पना चांगल्या असूनही शेवटाला जात नाहीत. काही ना काही तरी होतं आणि त्या कल्पना प्रत्यक्षात येण्याच राहून जातं. ह्या बाबतीत तसं काही झाल नाही. हाती घेतल ते तडीस गेलं, ह्याचा अर्थातच मला फार आनंद झाला असा आनंद मला

पुढे कधीही व्हायचा नव्हता

प्रदर्शन बघून झाल्यानंतर इंदिराजींनी वकिलातीच्या आवारात असलेल्या टेनिस कोर्टवर जमलेल्या हिंदी लोकांपुढे भाषण केलं भाषण चांगलं तास सव्वा तास चाललं होतं सगळा वेळ त्यांनी आपण आणीबाणी का आणली, विरोधी पक्षांनी दुसरा कोणताही मार्ग शिल्लक ठेवला नव्हता वगैरे सांगण्यात खर्ची घातला परदेशातल्या भारतीयांपुढे हे सगळं सांगायची खरं म्हणजे काही गरज नव्हती पण त्यावरून आणीबाणी आणल्याबद्दल त्यांना कुठेतरी अपराधी वाटत असावं, अशी आमची भावना झाली.

ह्या सगळ्या प्रकरणातही एक मजेशीर किस्सा आहे. इंदिराजींबरोबर जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री गुलाम सादिक पण आले होते. आता पंतप्रधानच आले असताना त्यांना कोण विचारणार ? ते बिचारे एकटेच इकडे तिकडे फिरत.

गुलाम सादिकांचा निजी-सचिव माझा जुना मित्रच निघाला. तुम्ही तरी आमच्या मन्त्रि-महोदयांबरोबर काही बोला अशी त्यानं आम्हाला गळ घातली. त्याप्रमाणं आम्ही त्यांच्याशी गप्पा मारल्या प्रतिभानं व मी त्यांच्याबरोबर फोटो काढून घेऊन त्यांना अगदी खूष करून टाकले

आम्हाला प्रदर्शनात मदत करायला म्हणून जे आर्किओलॉजीचे कलाकार यायचे होते, त्यांची आमची चांगली मैत्री जमली होती ते सगळेजण अगदी तरुण व उत्साही होते. त्यांचं ब्रामियानला जाण्याचं माझ्यामुळे लांबलं होतं म्हणून ते माझ्यावर नाराज झाले असतील असं मला वाटलं होतं पण झाले होतं उलटेच काबूलला राहण्यात ते फार खूष होते कारण इथं राहिलं की त्यांना दिवसाला पन्नास रुपये म्हणजे प्रत्यक्षात शंभर रुपये जादा भत्ता मिळायचा वर ब्रामियान म्हणजे तसं खेडंगाव, तिथं नाहीत करमणुकीची साधनं, नाही इतर काही. त्या मानाने काबूलचं आयुष्य चांगलं होतं सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांना इंदिराजींचे जवळून दर्शन व भाषण ऐकायला मिळालं होतं

प्रदर्शनाचं सगळं प्रकरण संपल्यावर त्यांना मी आमच्या घरी जेवायला बोलावलं ते काहीतरी सात-आठ जण होते. त्यातले कोणी गाणी म्हणणारे होते एक नेपाळी होता तो तो तर फार गमत्या होता आम्ही अफगाणिस्तानविषयी बोलत असता तो म्हणाला, " जो देश भारतासारख्या देशाकडून मदत घेतो, त्या देशाची काय लायकी आहे ते कळतच ! "

ऑफिसच्या जीवनात थोडासा फरक पडला होता कारण आता ह्या लोकांचे रोझे म्हणजे उपवास सुरू झाले होते सूर्योदयापूर्वी सगळं खायचं-प्यायचं उरकून घ्यायचं, कारण त्यानंतर सूर्यास्ताशिवाय काही खाणं, पिणं अगदी निषिद्ध होतं गावातील सगळी खाण्या-पिण्याची दुकानं अगदी बंद असत

त्या रोझ्यांच्या दिवसांत मी आणि पोकोस्कि कोठल्यातरी कामाकरता काबूलपासून काही

अतरावर गेलो होतो उष्मा भयंकर होता बाहेर उन मी म्हणत होत, घसे अगदी कोरडे पडले होते. तडक परत कचेरीत गेलो असतो तरी तिथ साधं पाणीसुद्धा पिण शक्य नव्हतं. कारण रोझे चालले असताना बिगर-मुस्लिमानीसुद्धा खाल्लं-प्यालेल त्याना चालत नाही तेव्हा मी पोक्रोस्कीला म्हटल की परत जाण्याच्या रस्त्यावरच माझ घर पडत आहे तर तिथं काही थंड पेय घेऊ या माझी सूचना ऐकताच तो अगदी भांबावून गेला त्याला 'हो' म्हणण अवघड होतं, कारण त्याच्या वकिलातीची परवानगी घेतल्याशिवाय कोणाच्याही घरी जाण्याची रशियन लोकाना परवानगी नव्हती कोणी पाहिलं असतं व वकिलातीला कळवल असतं तर त्याची काही धडगत नव्हती. त्याची अशी अडचण आहे हेही त्याला मोकळेपणी सागता येईना वर तहान तर इतकी लागली होती की जीव अगदी व्याकूळ झाला होता मी परत आग्रह केला, माझ घर हमरस्त्यावर नाही आहे, थोड बाजूला अस आहे, वगैरे सागितल्यावर तो यायला तयार झाला

मला कोण्या गोऱ्या साहेबाबरोबर असं अवेळी घरी आलेल पाहून प्रतिभा अगदी बावचळून गेली पण त्याहीपेक्षा तिची व पोक्रोस्कीची ओळख करून दिल्यावर त्याने तिचा हात हातात घेऊन त्याचं चुबन घेतलं त्या वेळी तर ती अगदी फेंट येऊन पडणार असं मला वाटल

मला ह्या रशियन पद्धतीच फार कौतुक वाटलं व बाकी त्यांच्या कोणत्याही पद्धती आपल्याकडं आल्या नाहीत तरी ही पद्धत मात्र आवर्जून आणायला हवी अस माझ्या मनात आलं.

ए. सिंगांचे परत जाण्याचे दिवस आता भरत आले होते साधारणपणे ही राजदूत मडळी एका जागी तीन वर्षांपेक्षा जास्त काळ राहात नाहीत त्या हिशोबाने त्यांची मुदत संपायला आली होती तेवढ्यात त्यांना दिल्लीला नेमल्याचा हुकूम पण आला

त्याबरोबर भारताच्या मित्र-राष्ट्रांच्या राजदूतानी त्यांना निरोपाचे खाने द्यायला सुरुवात केली असले निरोपाचे खाने देण्याची पद्धत आहे. कोणी राजदूत जाणार असेल किंवा कोणी नवीन आला असेल तर अशा खान्याची एकच झुंबड उडते असे नेहमीच कोणा ना कोणाचे राजदूताचे येणं जाण चालू असत त्यामुळं अशा खान्याना जायचं हे राजदूतांच एक महत्त्वाच काम होऊन बसत

ए सिंग हे अतिशय अबोल होते त्याना दम्याचा त्रास व्हायचा त्यामुळे त्यांना कसलाही धूर म्हणून सहन होत नसे ते दारूला अगदी हातसुद्धा लावत नसत अशा दारू न पिणाऱ्या, अबोल आणि धूर सहन न होणाऱ्या माणसाच राजदूत म्हणून निभावतं तरी कस ? कारण आजकालचं आंतरराष्ट्रीय राजकारण मुख्यत्वेकरून पार्ट्यांतूनच चालत आणि दारूशिवाय व धुराशिवाय—म्हणजे सिगारेटसच्या—पार्टीज कशा होणार ?

राजदूताची ही न पिण्याची कमतरता त्यांच्या धर्मपत्नी भरून काढत त्या पण एका लहान सस्थानच्या राजकन्या होत्या त्या इतक्या पीत असत की पार्टीच्या शेवटी त्यांना

अगदी धरून नेऊन गाडीत बसवावं लागत असे

हे एक राजदूत पीत नसत हे सोडून द्या, पण बहुतेक राजदूत पिणारे असतात, अगदी भक्कम पिणारे असतात अशा ह्या भक्कम पिणाऱ्याबद्दल ऐकलं वा वाचल म्हणजे मनात येत की ह्याचा भारताच्या प्रतिमेवर किती वाईट परिणाम होत असेल नाही? पण तस काही होत असेल अस वाटत नाही. कारण सगळ्याच राष्ट्रांचे राजदूत वर्षोन् वर्षं हेच करत असतात राजदूत मंडळी तर भक्कम पिणारी असतातच पण त्या त्या देशांचे मंत्रिगणसुद्धा ह्यात मागे नसतात असे पिऊन तर्र होणारे राजदूत व मत्री ही काही नवलाची गोष्ट राहिलेली नाही ह्या अशा तऱ्हेच्या वर्तुळात असंच चालायच असं सगळे धरून चालतात

अवधान फक्त एकच पाळायला लागत की कितीही प्यालांत तरी आपल्या राष्ट्राच्या महत्त्वाच्या गोष्टी तुम्ही बोलता कामा नयेत पण काही देशांचे राजदूत व मत्री मदिराक्षीबद्दल फार हळवे असतात. भारतीय राजदूत मदिराक्षींबद्दल हळवे नसले तरी मदिरेबाबत फार उच्छृंखल असतात कोणत्याही पार्टीच्या सुरुवाती-सुरुवातीला आपली राजदूत मंडळी अगदी गप्प-गप्प असतात पण दोन-चार पेग पोटात गेल्यावर मात्र ह्याना अशी काही वाचा फुटते की मग त्याना लगाम घालणं अवघड जातं हे सगळं मी म्हणतोय अस नाही तर अमेरिकेच्या एका श्रेष्ठ आणि ज्येष्ठ राजदूतानं आपल्या आठवणींच्या पुस्तकात अस नमूद केलं आहे

हिंदी राजदूताचा मदिरेबाबतचा हा कमकुवतपणा पाहून पडित नेहरूनी एक पत्र काढून राजदूतानी शिष्टाचार म्हणून फक्त एक पेग घ्यावा अस सुचवल होतं आता हा 'एकच पेगा'चा प्रयोग किती राजदूत करत होते तो दारूचा जो कोणी देव असेल तोच जाणे

तर असा तो अबोल व निर्व्यसनी राजदूत बदलून चालला होता त्याचा निरोप समारभ इंडिया असोसिएशननं काबूलच्या 'इटर-कॉन्टिनेंटल' ह्या पचतारांकित हॉटेलच्या हिरवळीवर साजरा केला कार्यक्रमाला सगळ्या भारतीयांची मोठी झुंबड उडाली आम्ही आयटेकची शंभर कुटुब होतो वकिलातीचे, इंडिया स्कूलचा शिक्षकवर्ग, गुजराथी व पजाबी भारतीय व्यापारी मंडळी सगळी आली होती

स्वागत समारंभ काय किंवा निरोप समारंभ काय, चमचेगिरी करायची ती एक मोठी पर्वणी ती भारतीय कशी घालवतील?

काहीतरी दोघ-तिघं बोलले एकानं तर छोटसं काव्यच करून आणण होत हा राजदूत द्राक्षकन्येच्या म्हणजे दारूच्या मागे नाही पण त्याला द्राक्षमात्र खूप आवडतात अशा अर्थाच ते काव्य होतं

राजदूताच्या नावात काहीतरी 'राम' होते तो धागा पकडून दुसऱ्या एकान त्याची प्रभू रामचंद्रांबरोबर तुलना सुरू केली आता राजदूत 'प्रभू रामचंद्र' ठरले तर त्यांच्या

पत्नी 'सीतामाई' ठरल्या तेव्हा त्याचे सीतामाई म्हणून कौतुक सुरू झाल ज्यांना ह्या सीतामाई पार्ट्यांतून दारू पिऊन ढेर होतात हे माहीत होतं त्याना हे सगळ ऐकून हसू येत होत, व वाईटही वाटत होत चमचेगिरीला सुद्धा काही मर्यादा असावी की नाही ? का ही सगळी आपल्या लाचार वृत्तीची लक्षणं ?

राजदूत मुखदुर्बळ त्यानी फक्त 'Thank' म्हणून उत्तर दिल.

राजदूत जाणार तर त्यांना निरोप द्यायला विमानतळावर ही गर्दी! वर सांगितलेली सगळी भारतीय मंडळी हजर होती पण मी काही गेलो नाही खर म्हणजे इंदिराजीकरता आयोजित केलेल्या प्रदर्शनांमुळे राजदूतांशी माझी चांगली ओळख झाली होती तरी पण मी विचार केला की विमानतळावर शेकडो लोक जमणार, त्यातून राजदूत विमान सुटण्याच्या फक्त पाच-दहा मिनिटं आधी येणार, त्याना आपल्याशी बोलायला सवड कुठली मिळायला ?

आणि झालही तसच राजदूत विमान सुटायच्या काहीतरी पाच एक मिनिट आधी आले अफगाण अधिकाऱ्याशी व मित्र राष्ट्रांच्या राजदूताशी हात मिळवणी केली व तडक विमानाकडे निघून गेले त्यांनी आयटेकच्या व इतराच्याकडे ढुंकूनही पाहिल नाही

तरीही जे लोक विमानतळावर गेले होते ते मला गभीरपणे 'तू विमानतळावर आला नाहीस हे काही चांगलं केलं नाहीस त्याचे फार वाईट परिणाम होतील.' वगैरे सागू लागले त्या सांगण्यातला गर्भित हेतू असा की वकिलातीचे लोक ह्या सगळ्या गोष्टीची नोंद ठेवतात व त्याचा तुमच्या दोन वर्षांपेक्षा जास्त राहण्यावर परिणाम होतो खरं म्हणजे तसं काही असत नाही पण उगाच दुसऱ्यांना घाबरवण्याचं काही लोकाचं तंत्र.

असेच दिवस चालले होते आयटेकमध्ये नवीन लोक येत होते ज्यांची मुदत सपली ते व जे वकिलातीच्या मर्जीतून उतरले होते ते परत जात होते. दु:ख व हळहळ मात्र सगळ्यांना सारख्याच तीव्रतेन वाटत होती इतका चागला पैसा व सुखाचे जीवन त्याना परत हिंदुस्थानात कुठे मिळणार होते ? ज्याना वकिलातीन मुदत सपण्याआधीच परत जायला लावले होते, ते लोक वकिलातीला खच्चून शिव्या देत होते आपण स्वाभिमानानं वागलो म्हणून वकिलात आपल्याला परत पाठवते आहे, असं ते ज्याला त्याला सागत, आणि पुष्कळांच्या बाबतीत ते खरंही होतं थोडीही स्वतत्र कृती दाखवणाऱ्याच्या पाठीत वकिलात ही परत पाठविण्याची काठी मारत असे

आयटेकमध्ये नवीनपणे आलेल्यांची एक ठराविक प्रतिक्रिया असे आपली इथ येण्याची बिलकुल इच्छा नव्हती, आपण अगदी अनिच्छेनं आलो आहोत असं प्रत्येकजण सांगत त्याचबरोबर हिंदुस्थानात आपण किती मोठ्या व उच्च दर्जाचे अधिकारी होतो, हेही सागून आपण वकिलातीच्या लोकांचं वर्चस्व बिलकुल सहन करणार नाही, हे पण ठामपणे सांगत

वकिलातीच्या लोकांशी खटक्याला सुरुवात राहण्याचा घरापासून होई वकिलातीनं ठरवलेलं घर नवीनपणे आलेल्या अधिकाऱ्याने पसंत करायचं असत. वकिलातीनं कोणतेही घर दाखवलं की जुने आयटेकवाले नव्याचे कान फुकत 'हे घर तुझ्या योग्यतेच नाही आहे तू ह्याच्यापेक्षा चांगल घर माग' वगैरे सांगत मग तो नवा वकिलातीच्या माणसांशी भांडायला जाई

वकिलातीचे लोक सुद्धा ह्याच बारस जेवलेले असत नवीन माणूस असा शिंग उगारून येणार हे त्यांना माहीत असे ते त्याची शिंग मोडून त्याच्याच हातात देत "हीच जागा मिळण्यासारखी आहे, ही घ्या, नाहीतर तुम्ही तुमची शोधून आम्हाला सांगा" असं म्हणून घर शोधण्याचं काम त्या माणसाच्या गळ्यात टाकत. आता तो नवा माणूस ह्या अनोळखी शहरात जागा शोधणार कसा ? शेवटी तो वकिलातीनं दिलेली जागाच घेत असे

पण परत कोणी नवीन माणूस आला की हाच आता जुना झालेला, त्या नव्याला उचकायला तयार असे ! ह्याची खूप मजा वाटायची. मीही ह्या सगळ्यांलाच एक होतो, अगदी सगळ्या गुणदोषांसहित पण लोकांची अशी गमत दुरून पाहण्याचं तंत्र मला जमलं होतं

आपण भारतीय जाती पाडण्यात फार उस्ताद आहोत. आम्हा आयटेकी लोकात बंगल्यात राहणारे व फ्लॅटमध्ये राहणारे, अशा दोन जाती पडल्या होत्या. वरिष्ठ अधिकाऱ्यांना बगले मिळत तेव्हा बगल्यात राहण हे उच्च जातीचं लक्षण झालं असल्यास नवल नाही हे 'उच्च' जातीचे लोक आपला 'उच्च'पणा बारीक-सारीक गोष्टीतही दाखवत

नवीनपणे आयटेकमध्ये आलेल्यांची एक गोष्ट मला आवडत नसे, अगदी त्या गोष्टीचा राग येत असे. ती म्हणजे आल्या-आल्या अफगाणांना नाव ठेवायला सुरुवात करणं ही. अफगाण आळशी आहेत, त्याना काम करायला नको, फार घाणेरडे असतात त्यांची शहरे अगदी गलिच्छ असतात वगैरे वगैरे ह्या मुद्द्यावरून माझं कित्येकांशी भांडणही झालं होत मी म्हणे, "अरे आपण ह्या लोकाकरता काम करायला आलो आहोत, त्याना असं कमी लेखून तुम्ही आपल्या कामाला सुरुवात करणार कशी ? आणि अफगाण आळशी आहेत, त्यांना काम करायला नको, अस भारत सरकारच्या अधिकाऱ्यान म्हणण ह्याच्यासारखा दुसरा विनोद नसेल आपलीही शहर गलिच्छ असतातच की ! तेव्हा आपण ह्या लोकांपेक्षा फार चांगले ही वृत्ती ठेवू नका"

अशा श्रेष्ठत्वाच्या भावनेनं वागल्यामुळे काही प्रसंग कडवट उद्भवले त्याच आश्चर्य वाटायला नको. एकदा एका भारतीय अधिकाऱ्याला आपल्या अफगाण सहकाऱ्यांबरोबर कचेरीच्या कामाकरता कुठल्यातरी बाहेर गावी जायचं होत त्याबद्दल बोलत असता त्या हिंदी अधिकाऱ्यान तिथ प्यायला चागल पाणी मिळत का ? अशी चौकशी केली. म्हणजे तिथं प्यायला चागल पाणी मिळणार नाही हे गृहित धरूनच हा प्रश्न होता तो प्रश्न

पुरुषानी पुरुषाची व स्त्रियानी स्त्रियांची चुंबन घेणं हे अगदी सगळ्या थरावर चाले अगदी गाडीच्या साध्या ड्रायव्हरपासून तो सदर-ए-रियासत म्हणजे राष्ट्र-प्रमुखापर्यंत !

बरेच भारतीय ह्या पद्धतीची टिंगल करत. त्यानी रात्री आपल्या बायकांचं चुंबन घेतलं नाही, ते दिवसा आपल्या मित्रांची चुंबन घेतात असं म्हणत. हे थोडं मजेचं असलं तरी ऐकल्यावर अफगाणाना फार राग येत असे आपल्या कोणत्याही पद्धतीची अशी टिंगल झालेली कुणाला आवडेल ? इथं येण्याआधी अफगाणाची अशी चुंबन घेण्याची पद्धत आहे व त्या पद्धतीची किंवा त्यांच्या इतर कोणत्याही पद्धतीची टिंगल करू नये असं सांगितलं असत तर कितीतरी अप्रिय प्रसंग टळले असते. खरं म्हणजे प्रत्येकाच्या स्वतःच स्वतःच्या लक्षात यायला हवं, पण तसं लक्षात येत नाही म्हटल्यावर त्यावर काही मार्ग काढायला नको का ?

असंच एकदा आमच्या टीममधल्या मलहोत्राचं व एका अफगाणाचं चांगलंच भांडण जुंपलं बोलता बोलता मलहोत्रा म्हणाला होता, " आम्ही पाकिस्तानला पाच मिनिटांत चिरडून टाकू. " असं म्हणताच तो अफगाण चिडून उठला मलहोत्राला असं काही होईल असं वाटलं नव्हतं. त्याची कल्पना अशी होती की, पाकिस्तानचं व अफगाणिस्तानचं वैर आहे तर आपल्या म्हणण्याचं कौतुक होईल त्यांचं वैर राजकीय पातळीवर असलं तरी दोन्ही देशातली जनता मुस्लिम आहे व त्याच्यात ममत्व आहे, हे मलहोत्रा विसरूनच गेला होता.

तुम्ही सरकारतर्फे परदेशात पाठवले गेले असता, तेव्हा राजकारणावरती बोलण्याचं तुम्ही टाळलं पाहिजे ह्या बाबतीतही भारत सरकारनं आम्हाला सूचना द्यायला हव्या होत्या

आमच्याबरोबर काम करणाऱ्याच नव्हे तर सगळ्याच अफगाणाचं ड्रॉइंग-वर्क चांगलं होतं कॅलिग्रॅफी म्हणजे हस्ताक्षर तर सगळ्यांचच उत्तम होतं मोठमोठाले कागदाचे ताव व कापडाचे फलक ही मंडळी पटापटा लिहून काढत असत.

ह्या अफगाणाची एक चांगली पद्धत म्हणजे कोणाला हाक मारायची झाली तर नावापुढं ' जान ' हा शब्द लावायचा, म्हणजे पायडाजान वा अरेफजान वगैरे तसंच जर कुणी हाक मारली तर ' जान ' म्हणून प्रतिसाद द्यायचा हे ' जान ' प्रकरण कानाला फार गोड लागायचं पुढे पुढे मी सुद्धा ' जान ' म्हणून प्रतिसाद द्यायला लागलो व बाकीच्याप्रमाणे दासला दासजान म्हणू लागलो

बरोबर काम करणारी सगळीजणं अफगाण असली तरी, त्यांच्यातही वेगवेगळ्या जाती होत्या पठाण, उजबेगी, ताजीक, हाजरा वगैरे तशा ह्या काही जाती नाहीत, त्या वेगवेगळ्या टोळ्या त्याच्यात रोटी-व्यवहार अगदी सर्रास होतो. बेटी-व्यवहार फारसा होत नाही अर्थातच सगळे मुसलमान असल्यामुळे बेटी-व्यवहाराला धार्मिक बंदी नव्हती तरी ते आपसात डावे उजवे समजत तसे सगळेच गोरे, उंचेपुरे, चांगल्या भरल्या अंगाचे

व लांब टोकदार नाकाचे. ह्याला अपवाद फक्त हाजरा लोकांचे. ते मात्र बुटके व चपट्या नाकाचे.

आमची टिंगल करण्याचा ह्या अफगाणाचा आवडीचा विषय म्हणजे इंग्रजांनी आपल्यावर इतकी वर्षं राज्य केले हा असे

"पण तुमच्यावर इंग्रजांनी दोनशे वर्षं राज्य केल तरी कसं?" पायंडा मुद्दामच टोचण्याच्या हेतूनं विचारायचा अशी टिंगल-टवाळी चालली असता व ते म्हणत होते ते खरं असता गंभीरपणं घेऊन वा चिडून चालत नाही "दोनशे वर्षं नाही, एकशे नव्वद वर्षं' पायंडा तू इतिहास नीटपणे वाचून ये आधी" मी गंभीरपणाचा आव आणून सांगत असे.

पण ज्या वेळी गंभीरपणे चर्चा होत असे त्या वेळी मात्र मी हिंदुस्थान हा किती मोठा देश आहे, तिथं किती जातिजमातींचे व धर्मांचे लोक राहतात, किती भाषा आहेत, त्यामुळे राष्ट्रीयत्वाची भावना किती कमी आहे, ते समजावून सांगत असे तरीही त्यांना माझं म्हणणं पटत नसे. ते मोठ्या अभिमानानं म्हणत की "अफगाणिस्तान कधीही गुलाम नव्हता व कधीही गुलामगिरी सहन करणार नाही."

त्या बिचाऱ्यांना काय माहिती की अगदी वर्षा दोन वर्षांतच त्यांना गुलामगिरी म्हणजे काय, ते कळणार आहे म्हणून? पुढे जे काय झाले त्याची आम्ही टिंगल-टवाळी केली नाही किंवा गुलामगिरी म्हणजे काय असत ते आता कळलं ना, म्हणून हिणवलंही नाही. कारण एक तर त्याच दुःख ते आमचं दुःख झालं होत आणि अफगाणाचा प्रतिकार सतत चालू होता, ते गुलाम झाले होते पण गुलामगिरी सहन करत नव्हते

आम्हा हिंदी लोकांच्या टवाळीचा आणखी एक विषय म्हणजे गझनीच्या महमुदानं हिंदुस्थानवर केलेल्या स्वाऱ्या

गझनीच्या महमुदानं हिंदुस्थानवर मोजून बारा वेळा स्वाऱ्या केल्या. उन्हाळ्यात हिल-स्टेशनवर जावं तसा तो दर हिवाळ्यात अफगाणिस्तानात बर्फ पडायला लागलं की वायव्य हिंदुस्थानात स्वारी करत असे व मंदिरं नष्ट करून, मूर्ती फोडून तोडून देवळातलं जे काय जडजवाहिर, दाग-दागिने व इतर गडगंज संपत्ती तो लुटून नेत असे.

"इतक्या नियमितपणे गझनीचा महंमूद तुमच्यावर स्वारी करत असे" पायंडा विचारायचा, "एकदा नाही, दोनदा नाही, मोजून बारा वेळा त्यान स्वाऱ्या केल्या, पण तुम्ही त्याला एकदाही हरवू शकला नाहीत? काय म्हणाव तुम्हाला?"

खरंच, आम्हाला काय म्हणावं हा प्रश्न मलाही पडला होता व वेळोवेळी पडत असे. तरी पण मी पायंडाला म्हणत असे, "तो सगळा जुना इतिहास झाला, तो सोडून दे ते देवालय आता आम्ही परत बांधलंय आता गझनीच्या महंमुदाचीच काय पण कोणाही महंमदाची भारतावर स्वारी करायची हिंमत आहे? आता जमीनदोस्त करेल आमचं एकही मंदिर? फोडेल आमच्या मूर्ती?" पाकिस्तानला दोनही युद्धात आपण हरवलं

असल्या कारणानं माझा जोर होता. त्यावर पायंडाचं काही उत्तर नव्हतं.

"बरं ते जाऊ दे" मी परत शांतपणे म्हणे, "तुम्ही आणि तुमच्या गझनीच्या महमुदानं इतकी गडगंज संपत्ती मिळवली व इथं आणली, पण त्या संपत्तीचं पुढं काय झालं? तुमचा देश हिंदुस्थानकडून मदत घेतो आहेच की!"

ह्यावर ते सगळेच ना उत्तर होत.

ह्या व अशा तऱ्हेच्या गप्पा होत असल्या तरी ह्या अफगाण तरुणाचे राजकीय विचार आम्हाला कधी कळलेच नाहीत. दोन वर्षांनं साम्यवादी राजवट आली त्या अर्थी साम्य-वादी विचाराचे बरेच तरुण असणार हे स्पष्टच होत. पण त्यांची कामे गुप्तपणेच चालत असल्यामुळे आम्हाला ते कळण्याचा काही संभव नव्हता. त्यांनी उघडपणे कामं केली असती तर दाऊदखाननं त्यांना फासावरच लटकावलं असतं.

ह्या तरुणांत पायंडा वगैरेसारखी बरीच दाऊदखानविरोधी मंडळी होती पण त्याला काही राजकीय विचाराचं अधिष्ठान नव्हतं. मी शौरवी आर्किटेक्टस्शी लढत घेतली, त्याचं ह्या लोकांनी कौतुक केलं, ह्याचा अर्थ त्यांचा विरोध रशियन आर्किटेक्टस्च्या हडेल-हप्पीपणाला व त्यांच्या वर्चस्व गाजवण्याच्या वृत्तीपुरताच असेल. साम्यवादाला वा साम्यवादी मंडळींना त्यांचा विरोध असेलच असं खात्रीनं सांगता आलं नसतं.

आज आम्हा हिंदी व शौरवी टीमला शहरवाल डॉ. नूरजादनं दुपारचं जेवण पगमान ह्या काबूलपासून काही वीस-बावीस किलोमीटर्स दूर असलेल्या निसर्गरम्य डोंगर गावी आयोजित केलं होतं.

एखाद्या सुंदर बाईच्या मांडीवर गोंड बाळ असावं तसं हे पगमान हिरव्यागार झाडा-झुडपांनी बहरलेल्या डोंगराच्या पायथ्याशी वसलं आहे. लहान-लहान छपरी घरं, आपल्या सोयीप्रमाणं वळणं घेत जाणारे छोटे-छोटे रस्ते, गुणगुणत जाणारी काबूल नदी, हे सगळं बघून काश्मिरचाच एखादा भाग इथं चुकून आला नाही आहे ना? असा प्रश्न पडतो. पगमान पूर्वी एक लहानसं खेडं होतं. त्याची अमीर अमानुल्लानं खूप सुधारणा केली. हा अमीर १९१९ ते १९२९ ही दहा वर्षं गादीवर होता. त्यांनी १९१९ मध्ये इंग्रजांशी युद्ध केलं ते 'तिसरे' अफगाण युद्ध म्हणून प्रसिद्ध आहे. अफगाणांचा युद्धात जय झाला तो दिवस अजूनी 'जसन'चा म्हणजे उत्सवाचा मानला जातो व साजरा केला जातो.

अमानुल्लानं पगमानला आपला राजवाडा बांधला. एक मोठं स्टेडियम बांधलं, एक मोठी मशीद आणि चांगले पाच-सहाशे लोक बसून गायना-वादनांचा कार्यक्रम ऐकू शकतील असा हॉल बांधला. अमीरानं राजवाडा बांधल्यावर इतर श्रीमान व पैसेवाल्यांनी आप-आपले बंगले पगमानला बांधले आणि तेव्हापासून पगमानची भरभराट सुरू झाली.

सुरुवातीसुरुवातीला हा अमीर फार लोकप्रिय होता. कारण त्याने इंग्रजांना युद्धात

हरवल होत पण त्याच्या धार्मिक सुधारणांमुळे तो लोकात अप्रिय होऊ लागला बायकानी बुरखा घेऊ नये, त्यांना शिक्षण द्यावं, असले विचार असलेल्या अमीराच्या विरुद्ध मुल्ला-मौलवींनी आग भडकवली व इंग्रजानी त्यात तेल ओतलं मग भडका उडायला वेळ तो काय लागणार ? अमानुल्लाला अफगाणिस्तान सोडून जायला लागले अमानुल्लान बांधलेला तो हॉल चिडून गेलेल्या जमावानं जाळून टाकला.

शहरवालन आम्हाला ज्या बंगल्यात जेवण दिलं त्या बगल्यालाही ताजा इतिहास होता. दाऊदखानन त्या वेळच्या अमीर जाहीरशहाला दूर करूनच सत्तेवर आला होता त्या-बद्दलचा कट ह्या बंगल्यातच शिजला होता. ही सगळी माहिती डॉ. नूरजादनच आम्हाला दिली तो स्वत' त्या कटात सामील होता

जेवणानंतर शहरवालने छोटेसे भाषण केले त्यानतर पोकोस्कि बोलला, त्यानंतर मी पण भाषण ठोकल.

मी बनवलेल्या योजनेचे तपशीलवार नकाशे आता आम्ही बनवायला घेतले होते मी आणि पायंडा एक रस्ता आखत होतो, तर रस्त्याचा मध्ये एक छोटीशी नवीनच बांधलेली मशीद येत होती आता मशिदीवरून रस्ता न्यायचा कसा ? ह्या विचाराने मी जरा थाबलो, तर पायडा विचारता झाला की मी काय म्हणून थाबलोय ? मी त्याला माझी अडचण सागितली तर तो म्हणाला, "त्यात अडचण कसली ? मशीद तोडायची व रस्ता काढायचा "

"अरे, काय बोलतो आहेस तू ?" मी मोठ्या आश्चर्यानं विचारले, "आमच्याकडे मशीद तोडण तर राहूच दे पण तस नुसतं कुणी म्हटलं तरी दंगे होतात आणि शेकडो हिंदू व मुसलमान माणस जीवानिशी मारली जातात "

"पण का ?"

पायडाला मी काय म्हणतोय ते कळेना तो पुढे म्हणाला,

"रस्ता काढताना मध्ये जर मशीद आली तर ती पाडायलाच हवी "

"पण ..पण तुमच्या धर्मग्रथात तर वेगळच सागितलं आहे ना ? आमच्या देशात तर ह्या गोष्टीचा फार बाऊ केला जातो मुबईत भर रस्त्यामध्ये एक मशीद आहे तिचा वाहतुकीला फार त्रास होतो पण मुसलमानाच्या भावना दुखावतील म्हणून ती पाडता येत नाही "

"हा खुळेपणाच आहे" पायंडा म्हणाला, "उलट रस्त्याच्या मधे जर एखादी मशीद येत असेल तर ती पाडायला हरकत नाही, कारण लोकाची सोय ही जास्त महत्त्वाची आहे, असं आमच्या कुराणात म्हटलंय तेव्हा आपण हा रस्ता इथूनच काढू या."

माझं आश्चर्य वाटण्याचं सपण्याआधीच तो हळू आवाजात पुढे म्हणाला, "नाही तरी ती शिया लोकांची तर मशीद आहे पाडायला काही हरकत नाही."

आता माझं मलाच कळेना की मशिदीच्या पाडण्याबद्दल पायंडा म्हणून होता तसं कुराणात म्हटल आहे की ही शिया लोकांची मशीद आहे म्हणून पायंडा कुराणाचा आधार घेतो आहे ? ही जर सुन्नी लोकाची मशीद असती तर स्वतः ताजीक म्हणते सुन्नी असणाऱ्या पायंडाने ती पाडायची तयारी दाखवली असती ?

अफगाणिस्तानात इतर मुस्लिम देशांतून आहे तशी शिया आणि सुन्नीत तेढ आहे. इथं त्यांच्यात अगदी दंगे जरी झाले नाहीत तरी त्याच्यात कुरबुरी चालू असतात. कोणतीही राजवट असो, सत्ता नेहमी सुन्नी लोकाच्या हाती राहिली आहे, आणि राहणार आहे. त्याच अगदी साध कारण म्हणजे सुन्नी लोक बहुसंख्य आहेत

शिया लोकात अगदी दोन टोकाची माणसं आहेत एक आहेत इराणी पूर्वज असलेली, श्रीमंत, गोरी, उंच, धारदार नाक असलेली. दुसरे आहेत हाजरा ते मूळचे मंगोलियन वंशाचे, बसक्या नाकाचे, पिचपिच्या डोळ्याचे व अगदी गरीब इथले सगळे घरगडी, हमाल, चांभार, लोहार वगैरे कामकरी मंडळी हाजरा असतात पूर्वीच्या राजवटीप्रमाणे आत्ताच्या राजवटीतही ह्या हाजरा लोकांकडे फार संशयानं पाहिलं जातं कम्युनिस्ट राजवट आल्यावर ह्या हाजरा लोकांचे फार मोठ्या प्रमाणात शिरकाण झाल कारण इथले कम्युनिस्ट सुन्नी पंथीय आहेत आपल्याच धर्माच्या पण वेगळ्या पंथाच्या लोकांना मुसलमान कसे वागवतात हे बघितलं म्हणजे आश्चर्य वाटतं

'आपलेपणा' कोणाबद्दल व कसा वाटायला लागेल ते काही सांगता यायचं नाही. आमच्या रस्त्यावर एक हाजरा चांभार बसायचा. त्याच्याकडे जाऊन जाऊन त्याची चांगली ओळख झाली होती एक दिवस त्याने आम्ही पाकिस्तानी की हिंदी नफर म्हणून चौकशी केली आत्तापर्यंत मला शिया-सुन्नी, पठाण, ताजीक, हाजरा वगैरेंबद्दल चांगली माहिती झाली होती म्हटलं ह्याची थोडी गंमत करावी, आणि ते सोपं होतं, कारण मी काय किंवा प्रतिभा काय नाकेली नफर नाहीच आहोत

"नाही, आम्ही पाकिस्तानी नाही किंवा हिंदुस्थानीही नाही आहोत. आम्ही आहोत नेपाळी, नेपाळ देशाचे !" मी उत्तर दिले

"नेपाळी ?" त्याच्या चेहऱ्यावर आश्चर्य "हे तर कधी ऐकलं नव्हतं कुठं आहे नेपाळ ?"

"पार काश्मीरच्या पलीकडे– पण हिमालयातच."

"पण हिंदू की मुसलमान ?"

"कोणीही नाही, आम्ही आहोत नेपाळी काही हाजरा जसे अफगाणिस्तानात आले तसे काही नेपाळमधेही गेले. तेच आम्ही नेपाळी"

हातातल्या चपला शिवता-शिवता त्याने आमच्याकडे चमकून पाहिलं. हे आपल्या-

सारखे हजराच आहेत ह्या विचारान त्याच्या चेहऱ्यावर थोडं हास्य चमकल व त्या बारक्या डोळ्यांत थोडी आपुलकी आली, आणि त्याच आपुलकीच्या नजरेनं तो माझ्याकडे पुढील सगळे दिवस पाहात राहिला

आणखी एका बाबतीत मी मजा करत असे हिंदी म्हणजे हिंदू व पाकिस्तानी म्हणजे मुसलमान हे समीकरण इथ आणि मध्य-आशियात अगदी पक्कं झालं आहे माझ्या व प्रतिभेच्या स्वरूपाबद्दल मागे सांगितल आहेच दुकानातून वगैरे गेलं की आम्ही पाकिस्तानी की हिंदी ? हा प्रश्न बऱ्याच वेळा विचारला जाई मी पाकिस्तानी व प्रतिभा हिंदी आहे म्हटल्यावर विचारणाऱ्याचा चेहरा आनदानं फुलायचा तेच मी हिंदी आहे व प्रतिभा पाकिस्तानी आहे असं सांगितलं की त्याचा चेहरा चांगलाच पडायचा !

आमचं असं पाकिस्तानी वा भारतीय मुसलमान दिसल्याचा आणि दिल्लीला बरीच वर्षं राहिल्यामुळे उर्दूमिश्रित हिंदी बोलण्याचा आम्हाला एकदा चांगलाच फायदा झाला पाकिस्तानी वकिलातीत एकदा गालिच्याचा मोठा सेल लागला. आम्ही तिथं जाईपर्यंत आम्हाला परवडणाऱ्या किंमतीचे सगळे गालिचे विकले गेले होते आम्ही परत जायला निघालो, तेवढ्यात एका पाकिस्तानी अधिकाऱ्यानं मला जरा बाजूला घेऊन सांगितल, "आपल्या लोकाकरता काही गालिचे मुद्दाम बाजूला काढून ठेवले आहेत. तुम्ही थोडा वेळ थांबा. मी नतर तुम्हाला हवे तसले गालिचे काढून देतो "

त्याप्रमाणं आम्ही थाबलो व दोन चागले गालिचे घेऊन आलो

आता गरमाई जाऊन थंडीची चाहूल लागू लागली होती ऑक्टोबर सुरू झाला होता ना ? घरं गरम करणाऱ्या बुखाऱ्या लागल्या नव्हत्या तरी विजेचे हिटर्स व ब्लोअर्स वगैरे वापरायला सुरुवात झाली होती

आज आम्हाला पोकोस्कीन रात्रीच जेवायला बोलावल तो काबूल शहराच्या दक्षिण भागात असलेल्या 'मॅक्रियॉन' ह्या मोठ्या हौसिंग कॉलनीत राहात होता. ही कॉलनी रशियनानी अफगाणिस्तानला 'मदत' म्हणून बांधून दिली होती. बहुतेक रशियन्स ह्या मॅक्रियॉन भागातच राहात असत.

कलावताचा वाटावा असा पाकोस्कीन आपला फ्लॅट सजवला होता त्याच्या दोन कल्पना मला फार आवडल्या एक लहान फुलाफुलाचं कापड असलेली छत्री छताला उलटी टागून तिचा दिव्याच्या शेडसारखा उपयोग करून घेतला होता आणि दुसरी कल्पना म्हणजे फ्लॅटच्या एका भिंतीवर जे जे कोणी आतापर्यंत त्याच्याकडे येऊन गेले होते त्यांच्या फेल्ट पेननं स्वाक्षऱ्या घेतल्या होत्या प्रत्येकानं आपल्या हाताला येईल त्या फेल्ट पेननं सही केलेली असल्यामुळे रंगी बेरंगी व तऱ्हेतऱ्हेच्या स्वाक्षऱ्याच एक छानपैकी भित्ती-चित्रच तयार झालं होतं. ह्या सगळ्या स्वाक्षऱ्या रशियनानी रशियन व अफगाण

आणि हिंदी पाहुण्यानी इंग्रजीतून केल्या होत्या ते पाहून माझा स्वाभिमान उफाळून आला मी चक्क देवनागरी लिपीत ' पढरीनाथ रानडे ' अशी सही ठोकली

एका रशियन माणसान पार्टी दिली होती तेव्हा तिथ व्होडका अगदी पाण्यासारखी दिली जात होती हे वेगळं सांगायला नकोच एकएकटा रशियन बैठकीला कमीत कमी एक तरी अख्खीच्या अख्खी व्होडकाची बाटली संपवतो अस म्हटलं जातं, आणि ते खरही असेल. उगाच नाही दारूबाज लोक ही रशियाची सर्वात मोठी डोकेदुखी होऊन बसली आहे ते

ह्या पार्टीला काही दिवसानतर आमच्या प्रेसिडेंटन आम्हा हिंदी आणि शौरवी लोकाना पार्टी दिली हा प्रेसिडेन्ट काही दिवसातच पुढल्या शिक्षणाकरता इग्लंडला जाणार होता त्यानिमित्त ही पार्टी होती

अफगाणाची पार्टी म्हणजे खाणं आणि गाण ह्याची चगळ असते बरेच अफगाण दारू पितात पण सर्रासपणे नाही हल्ली मात्र बियर ही दारू नाही अस समजण्याची व म्हणून पार्थ्यांतूनही पिण्याची वृत्ती वाढते आहे

नतर खूप प्रसिद्धीला आलेल्या पण त्या वेळी अगदी कोवळ्या वयात असलेल्या ' हगामा ' नावाच्या गायिकेला बोलावलं होतं तिचा आवाज तर फार गोड होताच पण ती माना वेळावून वेळावून गाणं म्हणायची, ते फार मोहक वाटायच आयटेक प्रोग्रामखाली इथ आलेल्या एका मराठी गायकांनी छान छान गझला म्हटल्या असा हा गायनाचा कार्यक्रम काही तरी दीड-दोन तास चालला त्यानतर खाण्याचा कार्यक्रम सुरू झाला. बुफे पद्धतीची पार्टी होती एका मोठ्या टेबलावर पुलाव–पुलावाच्या मोठाल्या डिशेस भरून ठेवल्या होत्या त्या भाताच्या ढिगाऱ्याखाली मटणाचे तुकडे होते जो शाकाहारी असेल त्याने फक्त वरवरचा भात घ्यायचा ही पद्धत बाकी आमिष व सामिष पदार्थांच्या पण बऱ्याच डिशेस होत्या. पुलावाच्या त्या भव्य व भरगच्च डिशेस पाहून असं वाटल की, "अरे बापरे ! किती बनवल आहे हे ह्या लोकांनी ? हे सगळ सपणार तरी कस ? " पण सांगायला आनंद वाटतो की अगदी पाच-दहा मिनिटात त्या सगळ्या खाण्याच्या गोष्टींचा अगदी फडशा उडाला

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यातच पहिला बर्फ पडला असा पडणारा बर्फ पहिल्यादा पाहण्याच कौतुक सगळ्याच ' पहिल्या ' गोष्टींप्रमाण काही वेगळंच असत तसा मी विलायतेत असताना हिमपात पाहिला होता पण घरच्यानी तो पाहिला नव्हता तेव्हा आम्ही लबालला बर्फस्नान करण्याच्या हेतूनं घराबाहेर पडलो बर्फ पडतो आहे बघून रस्त्यावरचे लोक भराभर जाऊन वळचणीला थांबत होते म्हटल, काय वेडे आहेत हे लोक, चागलं बर्फात हिंडायचं सोडून आडोश्याला पळताहेत !

बर्फ स्वर्गातून तडक पृथ्वीवर पडत अशी माझी नेहमी भावना व्हायची इतकी नाजूक

व पांढरी शुभ्र गोष्ट पृथ्वीतलावरची असेलच कशी ? स्वर्गात मोती खूप झाले म्हणून तर देवानी त्याना असं पिंजून खाली सोडून दिलं नसेल ना ?

मागले राजदूत गेल्यानंतर चार-सहा महिने त्यांच्या जागी कुणी नेमलंच गेलं नव्हतं मधून मधून अमका येणार, तमका येणार अशा वावड्या फक्त उठायच्या पण आता मात्र पक्की बातमी आली की नवे राजदूत अमुक अमुक तारखेला येणार आहेत.

त्यांच्या येण्याच्या दिवशी परत एकदा विमानतळावर हिंदी बांधवांची ही भाऊ गर्दी झाली मी विचार केला हा नवीन माणूस, कोणालाच ओळखत नसणार. आपण गेलो काय व न गेलो काय, काहीच फरक पडणार नाही, तर उगाच जाण्याची दगदग का म्हणून करा ? पूर्वीचे राजदूत जाण्याच्या वेळचा अनुभव कुलकर्णीच्या गाठी होता, तेव्हा तो पण गेला नाही

"आपने बडी गलती की । आपने आना चाहिये था ।" मलहोत्रा मला दुसरे दिवशी मोठ्या गंभीरपणे म्हणाला. जसं काही विमानतळावर न जाणं म्हणजे मोठा गुन्हाच होता. त्याच्याशी वाद घालण्यात काही अर्थ नव्हता, पण काहीतरी उत्तर तर देणं भाग होतं. तेव्हा मी म्हटलं, "मी काय म्हणून जाऊ ? त्याना गरज असेल तर ते मला बोलावतील." मी हे सगळं अगदी सहज वेळ मारून नेण्याच्या दृष्टीनं म्हटलं होतं. आता राजदूत मला कशाला बोलवायला बसले आहेत ? पण चारच दिवसानी वकिलातीकडून निरोप आला की, राजदूतानी मला व कुलकर्णीला दुसऱ्या दिवशी संध्याकाळी राजदूतवाड्यावर बोलावलं आहे. सोबत जोड निरोप होता की त्याना आपल्या बंगल्यात काही सुधारणा करायच्या आहेत नाहीतर आम्ही थोडे चटपटलोच होतो. ह्या निमित्तानं मलहोत्राला चांगलं छेडून घेतलं मी म्हटल्याप्रमाणे राजदूतांनी मला खरंच बोलावून घेतलं होतं, तेव्हा तो काय उत्तर देतो बिचारा ?

नवे राजदूत म्हणजे बी. सिंग चव्वेचाळीस–पंचेचाळीस वर्षांचे, पण सगळे केस पांढरे शुभ्र झालेले, उंचीला कमी, गोल मटोल पण फार चुटचुटीत माणूस मोठा प्रसन्न, हजरजबाबी, चांगलं वाचन असलेला. थोडक्यात म्हणजे शरीरानं, वृत्तीनं, मनानं हा पूर्वीच्या राजदूताच्या अगदी विरुद्ध होता एवढं वय झालं तरी त्याचं नुकतंच लग्न झालं होतं. करून सवरून भागले व देवपूजेला लागले ह्या म्हणीप्रमाणे ते संसाराला लागले होते

बी सिंगसुद्धा उत्तर प्रदेशातल्या कुठल्या तरी लहानशा संस्थानाचे राजकुमार होते. पण ते नावापुढे राजकुमार ही उपाधी लावत नसत. नव्या राजदूतीण बाई दिल्लीतल्या एका मोठ्या श्रीमंत माणसाच्या कन्या होत्या. दिल्लीच्या उच्च वर्तुळात त्यांना 'फटाका' म्हटलं जाई. ह्यावरून त्या कशा होत्या त्याची कल्पना यावी.

दोघही स्वभावानं चांगली उमदी, रसिक व हौशी होती आपलं घर चांगलं असावं,

तसं नसल्यास त्यात बदल करून घ्यावेत अशा सरकारी अधिकाऱ्यात क्वचितच आढळ-णाऱ्या वृत्तीची होती. नाहीतर बहुतेक अधिकारी व अगदी मंत्री वगैरेसुद्धा आहे त्याच घरात वर्षानुवर्षे आहे तसेच राहात असतात. ह्यांनी मात्र तसं केलं नाही, आल्या आल्या आपला बंगला चांगला करण्याच्या मागे लागले. आम्ही त्यांच्या घरावर पुष्कळ काम केलं व त्यानिमित्तानं त्यांच्याकडे पुष्कळ वेळा गेलो.

राजदूत म्हणून पाठवायचा माणूस कसा असावा? ह्या प्रश्नाला तो व्ही. सिंगासारखा असावा असं मी ठामपणे सांगेन. हे मत त्यांच्या बरोबरच्या तीन वर्षांच्या सहवासानं आणखी पक्के झाले. त्यांचे माझे पुढे मतभेद झाले व मी त्यांच्याकडे जाणं अगदी कमी केलं तरीही ह्या माझ्या मतात फरक पडला नाही.

दाऊदखानचं राज्य चालू होतं म्हणजे शांततेच, मजेचं राज्य चाललं होतं. राजकीय धडामोडी अशा काही होत नव्हत्या. कचेरीतही चांगला जम बसला होता. घर चांगलं लावून झालं होतं. मुलांची शाळा व्यवस्थित चालू होती.

आता आम्ही दर दोन-चार दिवसांनी राजदूतांच्या बंगल्यावर जात असू. मलाही गप्पांचा नाद, थोडं वाचन, थोडी चौकस बुद्धी व थोडा हजरजबाबीपणा त्यामुळे आमच्या गप्पा खूप रंगत. आर्किटेक्चर ह्या विषयात बहुतेकांना रस असतो, त्याबद्दल त्यांनी वाचलेलं असतं. भारतातल्या व परदेशातल्या नामांकित इमारती त्यांनी पाहिलेल्या असतात. घरच्या बाईलाही आमच्या कामात रस असतो. आपली मतं मांडायची हौस असते. त्यामुळे आम्ही आर्किटेक्ट्स मंडळी बाकी सरकारी नोकरांपेक्षा वेगळे पडतो. आम्हाला कलाकार समजलं जातं, त्यामुळे त्यांच्या वागणुकीत फरक पडतो. पूर्वी आमचे राजदूतांच्या घरी फक्त चहा-पान होत असे. आता आम्ही व्हिस्की, बियरवर आलो होतो. इतके आमचे संबंध वाढले होते.

व्ही. सिंग मोठे वस्ताद गृहस्थ होते. एकदा आम्ही त्यांच्या घरात करण्याच्या फेर-बदलाविषयी बोलत होतो. त्या वेळी राजदूतांनी घरात पुस्तकं ठेवायला चांगली सोय नाही ह्याची खंत व्यक्त केली व त्याकरता चांगली जागा सुचवायला सांगितली.

ह्या घरात गेली वीस-पंचवीस वर्षं एकामागून एक असे आठ-दहा तरी राजदूत राहून गेले होते. त्यांतल्या एकालाही लायब्ररीची गरज पडली नव्हती, हे सगळं लक्षात घेऊन मी खोचकपणे विचारलं,

"पण साहेब, राजदूतांना लायब्ररीची खरंच काही गरज असते का?"

माझ्या बोलण्यातली खोच लक्षात न येण्याइतके काही व्ही. सिंग 'हे' नव्हते. पण नाराज न होता ते शांतपणे म्हणाले, "रानडे साहाब, खरं विचारशील तर ॲम्बॅसॅडर अनपढ असेल तर उत्तम. पण अन्‌फॉर्च्युनेटली मला थोडी लिहिण्या-वाचनाची हौस आहे,

शौक आहे, आता त्याला मी काय करू ? ”

“ मी लायब्ररीची व्यवस्था करतो ” मी मोठ्या तातडीन म्हणालो.

बी सिंगाची आणखी एक बरीच पुढली आठवण इथच सांगून टाकतो. ह्या माणसाची स्मरणशक्ती जबरदस्त होती एके दिवशी मी दुपारचा असा त्याच्याकडे गेलो होतो त्यानंतर मला एका पार्टीला जायचे होते बी. सिंग पण त्याच पार्टीला जाणार होते मी कामगाराना ज्या काही सूचना करायच्या होत्या त्या केल्या व नंतर बी सिंगाकडे गेलो ते आपले रेडियोला कान लावून बसलेले !

तो दिवस मोठा ऐतिहासिक महत्त्वाचा होता. त्या दिवशी भुत्तोला काढून झिया-उल्-हक पाकिस्तानचा सर्व सत्ताधीश झाला होता तो त्या संध्याकाळी रेडियो पाकिस्तानवरून आपलं पहिलं भाषण करणार होता ते भाषण अर्थातच फार महत्त्वाच होत. “ आपण हे हे भाषण ऐकू या व मग निघू या, ” अस राजदूतानी सुचवले मी लगेच ‘ हो ’ म्हटल. त्या वेळी मेमसाहेब माजघरात आपल्या कामात होत्या

आम्ही झियाच भाषण ऐकल व निघालो जिन्यापर्यंत जाण्याआधीच बाईसाहेब बाहेर आल्या व झियासाहेब काय म्हणत होते ? म्हणून त्यांनी विचारल झालं ! राजदूतानी ते सगळेच्या सगळे पधरा मिनिटाचे भाषण एका शब्दाचाही फेरफार न करता उद्धृत केलं. माझी स्मरणशक्ती म्हणजे केळाच्या सालीसारखी, तेव्हा मी तर थक्कच झालो !

काही दिवसानी मी त्याना म्हटलं की एकदा बाकी देशाच्या राजदूतानी व अफगाण अधिकाऱ्यांनी त्याना स्वागत भोजन द्यायला सुरुवात केली की मग त्यांना माझ्याकडे यायला वेळ होणार नाही तेव्हा त्यानी लवकरात लवकर माझ्याकडे याव ते त्यांनी ताबडतोब मान्य केलं व तारीख पण पक्की केली. काबूलला आल्यानंतर त्यांच हे पहिलच बाहेरच जेवण होतं.

ही पार्टी फार छान झाली पुण्याचे यु एन. डी पी मधले मदाने, मुळचे पजाबी सरदार पण आता मोना झालेले व कॅनडात स्थाईक झालेले डॉ अढवाल, भारताच्या पोस्ट ॲण्ड टेलिग्राफ डिपार्टमेन्टचे पूर्वीचे डायरेक्टर जनरल व आता यु एन डी. पी मध्ये आलेले नरुला, माझा सहकारी दास सगळे आपआपल्या बायकांसह आले होते

डॉ अढवालला सैगलविषयी फार प्रेम व त्याचा आवाजही सैगलशी मिळताजुळता. मग काय विचारता ? गाणीच गाणी झाली प्रतिभाने ‘ बाबूल मोरा ’ म्हणून खूप वाहवा मिळवली त्या वेळी प्रतिभान आपली बहादूरशाहा जफरवरची कादंबरी लिहून हातावेगळी केली होती हे राजदूताना सांगितल्यावर ते म्हणाले, “ ही राष्ट्रीय एकात्मतेची खूण आहे. एका मराठी लेखिकेला दिल्लीच्या मुसलमान बादशहाबद्दल लिहावस वाटतं ह्याचा अर्थ त्याच्याबद्दल हिच्या मनात काही हळुवार भावना आहेत. ”

त्या वेळी त्याचे हे विचार आम्हाला पटले नाहीत. पण पार्टी चांगली झाली ह्याच आनदात आम्ही होतो

तसं नसल्यास त्यात बदल करून घ्यावेत अशा सरकारी अधिकाऱ्यात क्वचितच आढळणाऱ्या वृत्तीची होती नाहीतर बहुतेक अधिकारी व अगदी मत्री वगैरेसुद्धा आहे त्याच घरात वर्षानुवर्षे आहे तसेच राहात असतात. ह्यानी मात्र तसं केल नाही, आल्या आल्या आपला बंगला चागला करण्याच्या मागे लागले आम्ही त्याच्या घरावर पुष्कळ काम केल व त्यानिमित्तान त्यांच्याकडे पुष्कळ वेळा गेलो

राजदूत म्हणून पाठवायचा माणूस कसा असावा ? ह्या प्रश्नाला तो व्ही सिंगासारखा असावा अस मी ठामपणे सागेन हे मत त्यांच्या बरोबरच्या तीन वर्षांच्या सहवासान आणखी पक्के झाले त्याचे माझे पुढे मतभेद झाले व मी त्यांच्याकडे जाणं अगदी कमी केल तरीही ह्या माझ्या मतात फरक पडला नाही

दाऊदखानच राज्य चालू होतं म्हणजे शांततेच, मजेचं राज्य चाललं होतं राजकीय घडामोडी अशा काही होत नव्हत्या कचेरीतही चांगला जम बसला होता घर चागल लावून झालं होत मुलाची शाळा व्यवस्थित चालू होती

आता आम्ही दर दोन-चार दिवसानी राजदूताच्या बगल्यावर जात असू मलाही गप्पांचा नाद, थोडं वाचन, थोडी चौकस बुद्धी व थोडा हजरजबाबीपणा त्यामुळे आमच्या गप्पा खूप रंगत आर्किटेक्चर ह्या विषयात बहुतेकाना रस असतो, त्याबद्दल त्यानी वाचलेल असत. भारतातल्या व परदेशातल्या नामांकित इमारती त्यांनी पाहिलेल्या असतात घरच्या बाईलाही आमच्या कामात रस असतो आपली मत मांडायची हौस असते त्यामुळे आम्ही आर्किटेक्ट्स मडळी बाकी सरकारी नोकरापेक्षा वेगळे पडतो. आम्हाला कलाकार समजल जातं, त्यामुळे त्याच्या वागणुकीत फरक पडतो पूर्वी आमचे राजदूताच्या घरी फक्त चहा-पान होत असे आता आम्ही व्हिस्की, बियरवर आलो होतो इतके आमचे संबध वाढले होते.

बी सिंग मोठे वस्ताद गृहस्थ होते एकदा आम्ही त्यांच्या घरात करण्याच्या फेरबदलाविषयी बोलत होतो त्या वेळी राजदूतांनी घरात पुस्तकं ठेवायला चांगली सोय नाही ह्याची खंत व्यक्त केली व त्याकरता चागली जागा सुचवायला सागितली

ह्या घरात गेली वीस-पचवीस वर्षं एकामागून एक असे आठ-दहा तरी राजदूत राहून गेले होते त्यांतल्या एकालाही लायब्ररीची गरज पडली नव्हती, हे सगळ लक्षात घेऊन मी खोचकपणे विचारल,

"पण साहेब, राजदूतांना लायब्ररीची खरंच काही गरज असते का ?"

माझ्या बोलण्यातली खोच लक्षात न येण्याइतके काही बी सिंग 'हे' नव्हते पण नाराज न होता ते शातपणे म्हणाले, "रानडे साहाब, खर विचारशील तर ॲम्बॅसेडर अनपढ असेल तर उत्तम. पण अन्फॉर्च्युनेटली मला थोडी लिहिण्या-वाचनाची हौस आहे,

शौक आहे, आता त्याला मी काय करू ? ”

“ मी लायब्ररीची व्यवस्था करतो ” मी मोठ्या तातडीनं म्हणालो.

बी सिंगांची आणखी एक बरीच पुढली आठवण इथंच सांगून टाकतो त्या माणसाची स्मरणशक्ती जबरदस्त होती एके दिवशी मी दुपारचा असा त्यांच्याकडे गेलो होतो त्यानंतर मला एका पार्टीला जायचे होते. बी सिंग पण त्याच पार्टीला जाणार होते मी कामगारांना ज्या काही सूचना करायच्या होत्या त्या केल्या व नंतर बी सिंगांकडे गेलो. ते आपले रेडियोला कान लावून बसलेले !

तो दिवस मोठा ऐतिहासिक महत्त्वाचा होता त्या दिवशी भुत्तोला काढून झिया-उल्-हक पाकिस्तानचा सर्व सत्ताधीश झाला होता तो त्या संध्याकाळी रेडियो पाकिस्तानवरून आपलं पहिलं भाषण करणार होता ते भाषण अर्थातच फार महत्त्वाचं होतं “ आपण हे हे भाषण ऐकू या व मग निघू या, ” असं राजदूतांनी सुचवले मी लगेच ‘ हो ’ म्हटलं. त्या वेळी मेमसाहेब माजघरात आपल्या कामात होत्या

आम्ही झियाचं भाषण ऐकलं व निघालो जिन्यापर्यंत जाण्याआधीच बाईसाहेब बाहेर आल्या व झियासाहेब काय म्हणत होते ? म्हणून त्यांनी विचारलं. झालं ! राजदूतांनी ते सगळेच्या सगळे पधरा मिनिटांचे भाषण एका शब्दाचाही फेरफार न करता उद्धृत केलं. माझी स्मरणशक्ती म्हणजे केळाच्या सालीसारखी, तेव्हा मी तर थक्कच झालो !

काही दिवसांनी मी त्यांना म्हटलं की एकदा बाकी देशांच्या राजदूतांनी व अफगाण अधिकाऱ्यांनी त्यांना स्वागत भोजन द्यायला सुरुवात केली की मग त्यांना माझ्याकडे यायला वेळ होणार नाही तेव्हा त्यांनी लवकरात लवकर माझ्याकडे यावं. ते त्यांनी तावडतोब मान्य केलं व तारीख पण पक्की केली. काबूलला आल्यानंतर त्यांचं हे पहिलंच बाहेरचं जेवण होतं

ही पार्टी फार छान झाली पुण्याचे यु. एन डी पी मधले मदाने, मुळचे पंजाबी सरदार पण आता मोना झालेले व कॅनडात स्थाईक झालेले डॉ अढवाल, भारताच्या पोस्ट ॲण्ड टेलिग्राफ डिपार्टमेन्टचे पूर्वीचे डायरेक्टर जनरल व आता यु एन डी पी. मध्ये आलेले नरुला, माझा सहकारी दास सगळे आपआपल्या बायकांसह आले होते

डॉ. अढवालला सैगलविषयी फार प्रेम व त्याचा आवाजही सैगलशी मिळताजुळता मग काय विचारता ? गाणीच गाणी झाली प्रतिभाने ‘ बाबूल मोरा ’ म्हणून खूप वाहवा मिळवली. त्या वेळी प्रतिभानं आपली बहादूरशहा जफरवरची कादंबरी लिहून हातावेगळी केली होती हे राजदूतांना सांगितल्यावर ते म्हणाले, “ ही राष्ट्रीय एकात्मतेची खूण आहे एका मराठी लेखिकेला दिल्लीच्या मुसलमान बादशहाबद्दल लिहावसं वाटतं ह्याचा अर्थ त्याच्याबद्दल हिच्या मनात काही हळुवार भावना आहेत ”

त्या वेळी त्यांचे हे विचार आम्हाला पटले नाहीत पण पार्टी चांगली झाली ह्याच आनंदात आम्ही होतो

तसं नसल्यास त्यात बदल करुन घ्यावेत अशा सरकारी अधिकाऱ्यात क्वचितच आढळणाऱ्या वृत्तीची होती नाहीतर बहुतेक अधिकारी व अगदी मंत्री वगैरेसुद्धा आहे त्याच घरात वर्षानुवर्षे आहे तसेच राहात असतात ह्यांनी मात्र तसं केल नाही, आल्या आल्या आपला बंगला चागला करण्याच्या मागे लागले आम्ही त्यांच्या घरावर पुष्कळ काम केल व त्यानिमित्तान त्याच्याकडे पुष्कळ वेळा गेलो

राजदूत म्हणून पाठवायचा माणूस कसा असावा ? ह्या प्रश्नाला तो व्ही. सिंगासारखा असावा असं मी ठामपणे सागेन हे मत त्यांच्या बरोबरच्या तीन वर्षांच्या सहवासान आणखी पक्के झाले त्याचे माझे पुढे मतभेद झाले व मी त्यांच्याकडे जाणं अगदी कमी केल तरीही ह्या माझ्या मतात फरक पडला नाही.

दाऊदखानचं राज्य चालू होतं म्हणजे शांततेचं, मजेचं राज्य चालल होतं राजकीय घडामोडी अशा काही होत नव्हत्या. कचेरीतही चांगला जम बसला होता घर चागल लावून झालं होतं मुलाची शाळा व्यवस्थित चालू होती

आता आम्ही दर दोन-चार दिवसानी राजदूताच्या बगल्यावर जात असू. मलाही गप्पाचा नाद, थोड वाचन, थोडी चौकस बुद्धी व थोडा हजरजबाबीपणा त्यामुळे आमच्या गप्पा खूप रंगत आर्किटेक्चर ह्या विषयात बहुतेकाना रस असतो, त्याबद्दल त्यानी वाचलेल असत भारतातल्या व परदेशातल्या नामांकित इमारती त्यांनी पाहिलेल्या असतात घरच्या बाईलाही आमच्या कामात रस असतो आपली मतं मांडायची हौस असते. त्यामुळे आम्ही आर्किटेक्ट्स मंडळी बाकी सरकारी नोकरापेक्षा वेगळे पडतो. आम्हाला कलाकार समजल जातं, त्यामुळे त्यांच्या वागणुकीत फरक पडतो पूर्वी आमचे राजदूताच्या घरी फक्त चहा-पान होत असे आता आम्ही व्हिस्की, बियरवर आलो होतो. इतके आमचे संबंध वाढले होते.

बी सिंग मोठे वस्ताद गृहस्थ होते एकदा आम्ही त्याच्या घरात करण्याच्या फेरबदलाविषयी बोलत होतो त्या वेळी राजदूतानी घरात पुस्तक ठेवायला चागली सोय नाही ह्याची खत व्यक्त केली व त्याकरता चांगली जागा सुचवायला सागितली

ह्या घरात गेली वीस-पचवीस वर्षं एकामागून एक असे आठ-दहा तरी राजदूत राहून गेले होते त्यातल्या एकालाही लायब्ररीची गरज पडली नव्हती, हे सगळ लक्षात घेऊन मी खोचकपणे विचारल,

“ पण साहेब, राजदूतांना लायब्ररीची खरंच काही गरज असते का ? ”

माझ्या बोलण्यातली खोच लक्षात न येण्याइतके काही बी. सिंग ‘ हे ’ नव्हते पण नाराज न होता ते शांतपणे म्हणाले, “ रानडे साहाब, खर विचारशील तर ॲम्बॅसॅडर अनपढ असेल तर उत्तम पण अन्फॉर्च्युनेटली मला थोडी लिहिण्या-वाचनाची हौस आहे,

शौक आहे, आता त्याला मी काय करू? ”

“ मी लायब्ररीची व्यवस्था करतो ” मी मोठ्या तातडीनं म्हणालो.

बी सिंगांची आणखी एक बरीच पुढली आठवण इथंच सांगून टाकतो त्या माणसाची स्मरणशक्ती जबरदस्त होती एके दिवशी मी दुपारचा असा त्यांच्याकडे गेलो होतो त्या-नतर मला एका पार्टीला जायचे होते. बी सिंग पण त्याच पार्टीला जाणार होते मी कामगारांना ज्या काही सूचना करायच्या होत्या त्या केल्या व नतर बी सिंगांकडे गेलो. ते आपले रेडियोला कान लावून बसलेले!

तो दिवस मोठा ऐतिहासिक महत्त्वाचा होता त्या दिवशी भुत्तोला काढून झिया-उल्-हक पाकिस्तानचा सर्व सत्ताधीश झाला होता. तो त्या सध्याकाळी रेडियो पाकिस्तानवरून आपल पहिलं भाषण करणार होता ते भाषण अर्थातच फार महत्त्वाचं होतं “ आपण हे हे भाषण ऐकू या व मग निघू या, ” असं राजदूतांनी सुचवले मी लगेच ‘ हो ’ म्हटलं. त्या वेळी मेमसाहेब माजघरात आपल्या कामात होत्या

आम्ही झियाच भाषण ऐकल व निघालो जिन्यापर्यंत जाण्याआधीच बाईसाहेब बाहेर आल्या व झियासाहेब काय म्हणत होते? म्हणून त्यानी विचारल. झाल! राजदूतांनी ते सगळेच्या सगळे पधरा मिनिटांचे भाषण एका शब्दाचाही फेरफार न करता उद्धृत केल. माझी स्मरणशक्ती म्हणजे केळाच्या सालीसारखी, तेव्हा मी तर थक्कच झालो!

काही दिवसांनी मी त्याना म्हटलं की एकदा बाकी देशांच्या राजदूतानी व अफगाण अधिकाऱ्यांनी त्यांना स्वागत भोजन द्यायला सुरुवात केली की मग त्यांना माझ्याकडे यायला वेळ होणार नाही तेव्हा त्यानी लवकरात लवकर माझ्याकडे याव. ते त्यानी तावडतोब मान्य केल व तारीख पण पक्की केली. काबूलला आल्यानंतर त्यांच हे पहिलच बाहेरचं जेवण होतं

ही पार्टी फार छान झाली पुण्याचे यु. एन डी पी मधले मदाने, मुळचे पजाबी सरदार पण आता मोना झालेले व कॅनडात स्थाईक झालेले डॉ अढवाल, भारताच्या पोस्ट ॲण्ड टेलिग्राफ डिपार्टमेन्टचे पूर्वीचे डायरेक्टर जनरल व आता यु एन डी. पी मध्ये आलेले नरुला, माझा सहकारी दास सगळे आपआपल्या बायकांसह आले होते

डॉ. अढवालला सैगलविषयी फार प्रेम व त्याचा आवाजही सैगलशी मिळताजुळता मग काय विचारता? गाणीच गाणी झाली प्रतिभाने ‘ बाबूल मोरा ’ म्हणून खूप वाहवा मिळवली त्या वेळी प्रतिभान आपली बहादूरशहा जफरवरची कादबरी लिहून हातावेगळी केली होती हे राजदूतांना सांगितल्यावर ते म्हणाले, “ ही राष्ट्रीय एकात्मतेची खूण आहे एका मराठी लेखिकेला दिल्लीच्या मुसलमान बादशहाबद्दल लिहावस वाटत याचा अर्थ त्याच्याबद्दल हिच्या मनात काही हळुवार भावना आहेत ”

त्या वेळी त्यांचे हे विचार आम्हाला पटले नाहीत. पण पार्टी चागली झाली याच आनंदात आम्ही होतो

आम्ही भारतापासून दूर, परदेशात होतो. आमचे दिवस मजेत चालले होते. तिथल्या आणीबाणीची आम्हाला काहीही तोशिस नव्हती भारतातल्या सगळ्या घटना आम्ही अगदी त्रयस्थाच्या दृष्टीतून पाहात होतो. इथं फक्त 'टाईम्स ऑफ इंडिया'ची प्रकाशनं वाचायला मिळायची कारण अफगाण सरकारची बाकी प्रकाशनांना बंदी होती हिंदुस्थानात सेन्सॉर असल्याने बातम्या कशा यायच्या ते सगळ्यांना माहीत आहेच

इथंच 'इलस्ट्रेटेड वीकली'बद्दलचा किस्सा सांगतो. वीकलीच्या एका अंकात भारतीय कम्युनिस्टांबद्दल काहीतरी टीकात्मक छापून आले होते मुखपृष्ठावर लालबावटा व हातोडा-कोयत्याचे चित्र पण दिले होते नेहमीप्रमाणे तो अंक आमच्याकडे दिला गेला पण लगेच दुसऱ्या दिवशी तो परत मागण्याकरता त्याचा माणूस आला व सांगू लागला की, रशियन वकिलातीनं अफगाण सरकारकडे तक्रार केली आहे, तेव्हा ते सगळे अंक गोळा करून अफगाण सरकारकडे सुपूर्त करायचे आहेत. पण आम्ही कसले वस्ताद. तो अंक आम्ही मित्रांना वाचायला दिला आहे, तेव्हा दोनचार दिवसानी ये, असं सांगून त्याला वाटेला लावलं

खरं म्हणजे त्या अंकात विशेष असं काही नव्हतं कम्युनिस्ट कातडी वाटतात तेवढी जाड नसतात पण हा ह्या प्रकरणाचा निष्कर्ष काढायचा की रशियन सरकार अफगाणांना मनाला येईल तसं वाकवू पाहात होतं

हिंदुस्थानात जे बदल होत होते ते अगदी झपाट्यानं टाकणारे होते आणीबाणी संपली होती. सार्वत्रिक निवडणुकोंची घोषणा इंदिराजींनी केली होती विरोधी पक्षाचे पुढारी बंदि-वासातून सोडून देण्यात येत होते

आता बी बी सी ऐकण्यात मोठा रस निर्माण झाला होता, त्यामुळे बी बी. सी खूप मन लावून ऐकू लागलो होतो हिंदुस्थानात असताना कधी चुकून-माकून लावला तर बी बी सी ऐकत असू आता ते दररोजच होऊन बसलं होतं

अफगाणाची त्याबाबतची गोष्ट वेगळी आहे इथं लिहिता-वाचता येणाऱ्याचं प्रमाण कमी आहे, म्हणून असेल किंवा वर्तमानपत्रं सरकारी दबावाखाली असतात व वेळेवर मिळत नाहीत म्हणून असेल, पण इथं श्रीमंतापासून गरिबांपर्यंत सगळेजण रेडियो नियमित-पणे ऐकतात आणि फक्त अफगाण रेडियोच, नाहीतर बी बी सी., व्हाईस–ऑफ–अमेरिका, रेडियो मॉस्को, ऑल इंडिया रेडियो, रेडियो पाकिस्तान अगदी झाडून सगळ्या देशाचे रेडियो ऐकले जातात अर्थात ह्या सगळ्यांत बी बी सी फार लोकप्रिय व विश्वासार्ह मानला जायचा

जगजीवन राम ज्या दिवशी काँग्रेस सोडून गेले, तेव्हा साऱ्या भारतभर आनंदाचा जल्लोष उडाल्याचं बी बी सी नं सांगितलं होतं दुसऱ्या दिवशी आम्ही कचेरीत गेलो

प्रथम आम्ही तिथं हॉलमध्ये शिरलो व दास काही वेळानंतर आला तर एक अफगाण तरुण ओरडला, "अरे जगजीवनराम आला!" त्यावर सगळेच मोठ्यानं हसले व त्या तरुणाला साद दिली भारतीय राजकारणात अफगाण इतका रस घेत असतील असं आम्हाला पूर्वी कधी वाटलं नव्हतं

निवडणुकाच्या निकालाची रात्र म्हणजे अगदी कत्तलची रात्र होती. रात्री जवळ जवळ दोन वाजता इंदिराजी हरल्याची एवढंच नव्हे तर अगदी धसघसीत हरल्याची बातमी ऐकल्यावर प्रथम चांगलाच धक्का बसला. नंतर त्या धक्क्याचं रूपांतर आनंदात झालं

दुसऱ्या दिवशी आमचा ड्रायव्हर गुल–अमीर घरी आला तोच मुळी मोठ्या चिंतेत त्यानेही इंदिराजी हरल्याची बातमी रेडियोवर ऐकली होती

"आता 'इंद्रा' गांधीला फाशी देतील?" हा त्याचा पहिला प्रश्न. कारण आत्तापर्यंत अफगाणिस्तानात त्याने हेच पाहिलं होतं एक तर पूर्वीच्या सत्ताधीशाला जीवानिशी मारून तरी नवा गादीवर येतो किंवा नवा गादीवर आला तो प्रथम जुन्याला जीवानिशी मारून टाकतो त्यामुळे गुल–अमीर चिंतेत असणं साहजिकच होतं.

"आमच्याकडे असं कधी होत नाही" मी त्याचं सांत्वन करत म्हणालो, "इंदिराजी पंतप्रधान म्हणून जरी राहिल्या नाहीत, तरी सामान्य नागरिक म्हणून राहतीलच की! त्यांना काही जीवानिशी मारणार नाहीत"

"मग आता तिच्या 'नान्'चं काय?" गुल-अमीरचा दुसरा प्रश्न. "तिला तुरुंगात तरी टाकतील नाही?"

"त्यांना तुरुंगात वगैरे काही टाकणार नाहीत, आणि ती घरची खूप श्रीमंत आहे, तिला 'नान्' मिळण्याचा काही प्रश्न पडणार नाही"

हे सगळं सांगितलं तेव्हा कुठे गुल–अमीरचा जीव शांत झाला

आपलं म्हणजे भारतीयांचं इंदिरा गांधींबद्दल जे मत असेल ते असो एक मात्र मान्य केलं पाहिजे की, ह्या सगळ्या मुस्लिम देशांतून त्यांच्याबद्दल फार आदर होता इंदिराजी ज्या वेळी सौदी अरेबियात गेल्या होत्या त्या वेळी त्यांचं राजकीय स्वागत व आदरातिथ्य झालंच, पण सुलतानाच्या बेगमांनी कधी नव्हतं ते इंदिराजींना जनानखान्यात मोठी पार्टी दिली त्या पार्टीचे अर्थातच फोटो–बिटो आले नव्हते, पण त्याबद्दल रकानेच्या रकाने भरून वर्णन आली होती त्या पडद्याआडच्या बेगमांना आपल्यासारखी एक बाई हिंदुस्थान-सारख्या मोठ्या देशाची सुलतान आहे ह्याचं मोठं कौतुक वाटलं होतं

गुल-अमीरसारख्या साध्या ड्रायव्हरची इंदिरा गांधींबद्दलचा आदर व प्रेम दाखवण्याची पद्धत वेगळी होती. त्यानं त्या वेळी झालेल्या आपल्या मुलीचं नाव मुळीच 'इंद्रा गांधी' ठेवलं होतं

इंदिरा गांधी हरल्या त्या आठवड्यातच इथल्या इंडियन एयर लाईन्सनं नव्या राजदूता-करता म्हणजे बी सिंगांकरता एक स्वागत समारंभ योजला होता. आम्ही काहीतरी शंभर एक भारतीय होतो असंच पेयपान चालल असता राजदूतांनी आम्हा काही लोकाना जवळ बोलावून घेतल प्रथम त्यांनी इंदिराजी का हरल्या ह्याची मीमांसा केली व पुढे सागितलं की, त्याचा पराजय फ्रान्सच्या डी गॉलसारखा आहे तोही प्रथम हरला होता तरी नतर परत राष्ट्राध्यक्ष झाला. त्याचप्रमाण इंदिरा गांधी पण दोन-तीन वर्षांत नक्कीच सत्तेवर येतील

हे मी राजदूतांचं कौतुक म्हणून सागत नाही आहे मला काही वेगळंच सांगायचं आहे

इंदिराजीच्या राज्यात सरकारी नोकर, त्यातल्या त्यात वरिष्ठ सरकारी अधिकारी फार सुखात होते. अर्थात काहीजणांना आणीबाणीत जाच झाला, नाही अस नाही पण सर्व-सामान्यपणे सरकारी यंत्रणा चालवणारे इंदिराजींवर खूष होते. त्या नोकरशाहीन जनता राजवटीला मनापासून कधी सहाय्य केलच नाही इंदिराजी दोन तीन वर्षांत परत सत्तेवर येतील असं बी. सिंगांसारख सगळ्या वरिष्ठ अधिकाऱ्याना वाटत होतं. नुसत वाटत नव्हत तर तशी त्याची इच्छा पण होती त्यामुळे त्यांनी जनता सरकारला म्हणावा तसा सहयोग दिला नाही

जनता पक्ष सत्तेवर जास्त दिवस राहू शकला नाही, त्याला बरीच कारण होती हे खरंच आहे, पण नोकरशाहीचा असहकार हे पण एक महत्त्वाच कारण होत पण त्याबाबत कोठ लिहिल गेलेल माझ्यातरी वाचनात आलं नाही

राजा बदलला की प्रजा कशी बदलते बघा. आतापर्यंत विरोधी पक्षाच्या पुढाऱ्याचं चुकूनसुद्धा नाव न घेणाऱ्या आमच्या राजदूतीणबाई, " सि सिंग इज इन् गुड बुक्स ऑफ वाजपाईजी " म्हणून मोठ्या अभिमानानं येईल जाईल त्याला सागत होत्या

आम्हाला इथ येऊन आता जवळ जवळ दीड वर्ष होत आलं होतं बहुतेक सगळ्या भारतीयांच्या ओळखी झाल्या होत्या हिंदी बांधवाबद्दल मी काही लिहिणार नाही आहे, असं मी मागे म्हटलं होत पण काहीजण असे होते की ज्यांच्याशिवाय काबूलच्या आठवणी पूर्ण होणारच नाहीत

रिझवान हुसेन हा त्यातला एक हा शिक्षक पेशाचा म्हणजे इथल्या युनिव्हर्सिटीत इंग्रजीचा प्राध्यापक इथ येण्याआधी हा अलीगडच्या मुस्लिम युनिव्हर्सिटीत होता विचारानं कम्युनिस्ट पण कम्युनिस्टाचा वा अलीगडच्या लोकाचा कडवटपणा त्याच्यात नव्हता उंचीला कमी पण नाकी-डोळी नीटस, गोडपैकी हसणारा, साधारणपणे मुसल-मानाचे केस लांब असतात तसे ठेवणारा, लखनवी संस्कृतीचा त्याच्या वागण्यात अदब व बोलण्यात मिठास होती अगदी प्रगत विचाराचा व आचाराचा होता हा रिझवान हुसेन. ह्या सगळ्या गुणांमुळे त्याची आमची मैत्री जमली नसती तरच नवल.

आमची मैत्री जमल्यानतर काही एक-दोन महिन्यानंतरची गोष्ट इथल्या 'इंडिया-स्कूल'च्या मासिकात त्याची मुलाखत छापून आली नतर एकदा असंच शराब पीत असता मी त्याला म्हटल, "अरे मियॉ, त्या मासिकाच्या मुलाखतीत तू हे काय म्हटल आहेस? धर्मावर विश्वास आहे का, अस तुला विचारल होन तर त्याला चक्क तू 'हो, धर्मावर विश्वास आहे' म्हणून उत्तर दिलंस?"

"अरे भाई और क्या करे? त्या बेवकुब लोकानी ह्या इस्लामी देशात माझ्यासारख्या भारतातल्या मुसलमानाला 'तुमचा धर्मावर विश्वास आहे का?' असं विचारल्यावर दुसर काय उत्तर देऊ शकत होतो मी?"

त्यावर आम्ही सगळे खळाळून हसलो व ग्लासात शिल्लक असलेल पेय एका घोटात संपवलं

प्रतिभा त्या वेळी शेवटचा मोगल बादशहा बहादूरशहा जफरच्या जीवनावर कादंबरी लिहीत होती बहादूरशहा हा स्वत उत्तम कवी होता. त्याचं सगळं काव्य व शेरो-शायरी उर्दूमध्ये तेव्हा रिझवान तिला त्या काव्यातले बारकावे, शब्दाचे अर्थ, त्या शब्दांमागच्या गर्भित भावना समजावून सागत असे त्यामुळे त्याच्याकडे जाणं-येणं जास्त वाढलं तोही माझ्यासारखा भक्कम दारू पिणारा दारूच्या कैफात जर कोणी शेरो-शायरी समजावून सांगू लागला तर काव्य चागले समजतेच पण दारूही जास्त चविष्ट लागते!

थिएटरवर लागणाऱ्या हिंदी व पाकिस्तानी सिनेमाना आम्ही बऱ्याच वेळा बरोबर जात असू त्याच्याबरोबर मी पाकिस्तानी 'उमराव जान अदा' तर तीन वेळा पाहिला रिझवानन आम्हाला उमराव जान ही उत्तर प्रदेशातली पूर्वी होऊन गेलेली शायरा आहे, तिची गोष्ट खरीखुरी आहे वगैरे तर सागितलच पण त्या वेळच्या उत्तर प्रदेशीय मुस्लिम सस्कृतीबद्दलही पुष्कळ सागितल.

ब्राह्मणाबद्दल आम्ही बोलत असता तो म्हणाला, "पर्सनल हायजीन म्हणजे वैयक्तिक आरोग्य व स्वच्छतेच ब्राह्मणवर्ग म्हणजे उत्तम प्रतीक आहे, सगळ्यांनी अनुसरावा असा आदर्श" आम्ही ब्राह्मण असल्यामुळे आम्हाला त्याच्या उत्तरान आनद झाला. पण वैयक्तिक स्वच्छता पाळण्याशिवाय बाकी काहीही ब्राह्मण करत नव्हते, हे त्याला माहीत नसाव

अलीगढ मुस्लिम युनिव्हर्सिटीत इतर धर्मांचेही शिक्षक व विद्यार्थी आहेत. तरीही ती मुख्यत्वे मुसलमानाची समजली जाते. त्या समाजाचा तो एक मानबिंदू आहे पण रिझवान म्हणायचा की त्या एका युनिव्हर्सिटीला मुस्लिमानी कवटाळून बसण्यात काय अर्थ आहे! हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यात राहणाऱ्या मुस्लिमांना ह्या युनिव्हर्सिटीचा काय लाभ आहे?

रिझवानच्या घरीच आमची उस्ताद सरहंग ह्या प्रसिद्ध अफगाण गायकाची भेट झाली दिसायला कोणा पठाणासारखा धिप्पाड पण आवाज अतिशय मृदू व गोड त्या रात्री त्या पठ्याने व्हिस्कीची एक आख्खी बाटली सपवली व रात्रभर गात राहिला

" अरे, इतकी सुंदर मैफिल जमली आहे, ती मेणबत्ती कुणी विझवत का नाही ? "

" असल्या मैफलीत जळणाऱ्याच काय काम ? ' "

किंवा

" शराब पिण्यातली मजा, विरहान काव्यासारख सुकून जाण, हे पाकबाज म्हणजे सदाचरणी लोकांना कस कळाव ? "

उस्ताद सरहग पतियाळा घराण्याचा सरहग म्हणजे सेनापती हा किताब अमीर जाहीरशहान त्याला बहाल केला होता तो नुसता हाडाचाच नाही तर धर्मनिष्ठी गायक होता. रागांची नाव हिंदी किंवा संस्कृत आहेत ती फारसी किंवा उर्दू करावीत अशी पाकिस्तानात टूम निघाली होती त्यावर उस्ताद सरहंग चिडून म्हणायचा, " अरे मियाँ, उद्या शकरा रागाला महमदी राग म्हणून कसं चालेल ? त्याला शकराच म्हणायला हव " राधा-कृष्णाची प्रेमभक्ती गीत तर तो इतक्या तन्मयतेने म्हणायचा की विचारू नका

कम्युनिस्ट राजवट आल्यानतर आपल्या वकिलातीत झालेल्या एका पार्टीत सरहग मियाँनी मोठी धमाल उडवून दिली आधीच त्याला बहुसख्य अफगाणाप्रमाण नव्या राजवटीबद्दल राग होता त्यातून तो त्या दिवशी जाम प्यालेला, आणि त्याच्यासमोर नव्या राजवटीतला एक अधिकारी आला, मग काय विचारता ? स्टोव्ह भडकावा तसा तो भडकला. सरहगन नव्या राजवटीचे वाभाडे काढायला सुरुवात केली, अगदी अद्वातद्वा बोलू लागला. त्यामुळे आपल्या वकिलातीच्या लोकाची फार पचाईत झाली मग त्यांनी रिझवान वगैरे लोकाकडून सरहंगची बोळवण केली

सरहगच्या जागी दुसरा कोणी असता तर त्याची धडगत नव्हती तो अगदी जिवानिशीच मारला गेला असता पण उस्ताद सरहग जनतेत फार प्रिय होता त्याला काही केल असत तर जनतेत फार कोलाहल माजला असता.

रिझवानची पाच वर्षे पूर्ण होत आली होती त्याला आता हिंदुस्थानात परत जाण भागच होत हिंदुस्थानात परत जायच म्हटल की तो अगदी खिन्न व कावराबावरा व्हायचा त्या खिन्नपणामाग नुसत अफगाणिस्तानातल सुखाच आयुष्य सोडायला लागणार हेच एक कारण होतं असं नाही तो म्हणायचा,

" ह्या स्वच्छदी आणि मोकळ्या वातावरणातून अलीगढच्या त्या कोंदट व जातीय वातावरणात जायच म्हणजे काय, ह्याची तुम्हांला कल्पना येणार नाही तिथ सगळ्या गोष्टी धर्माच्या संकुचित दृष्टिकोणातूनच पाहिल्या जातात त्यामुळे तिथ जीव अगदी गुदमरून जातो " हे सागताना त्याच्या डोळ्याला फक्त पाणी यायचच शिल्लक राहायच.

रिझवान व त्याच्यासारखी काही मुस्लिम माणसं भेटली म्हणजे आपल्याला मुस्लिम समाजाबद्दल किती कमी माहिती आहे, उलट गैरसमजच जास्त आहेत हे लक्षात येत.

एकदा आम्ही आमच्या मुलीच्या लग्नाबद्दल बोलत होतो बोलता-बोलता मी प्रतिभाला म्हटल, " का ग, मुलीन कोणा मुसलमानाशी लग्न ठरवल तर ? "

" ते मला कधीही मान्य होणार नाही." प्रतिभा तावातावानं म्हणाली
" आणि समजा तिनं रिझवान हुसेनच्या मुलाशी लग्न ठरवलं तर ? "
ह्या माझ्या प्रश्नानं प्रतिभाचा ताव एकदम कमी झाला व अगदी खालच्या आवाजात ती म्हणाली, " रिझवानची गोष्ट वेगळी व इतर मुसलमानांची गोष्ट वेगळी "

रिझवानची गोष्ट वेगळी म्हणजे त्याची आमची दिलजमाई झाली होती आता आम्ही नुसते हिंदू वा मुसलमान राहिलो नव्हतो तर मित्र झालो होतो हिंदु-मुसलमान आपसात मित्र झाल्याशिवाय सध्याचे प्रश्न सुटणार नाहीत, हे नक्की.

गणपति-उत्सवाचे दिवस जवळ येत चालले होते. दुर्गापूजा जवळ आली की बंगाली माणसाचं रक्त कसं सळसळू लागतं ? तसच गणपतीचे दिवस आले की मराठी माणसाच होत अशा सळसळणाऱ्या रक्ताचे आम्ही सहा सातजणं होतो बोलता-बोलता काबूलला गणपति-उत्सव साजरा करायचा असं आम्ही ठरवलं कल्पनाच इतकी रोमांचकारी होती की आम्ही सगळे उत्साहानं कामाला लागलो

आपला गणपति–उत्सव काहीतरी वेगळा असायला हवा असं सारखं माझ्या मनात येत होतं तो नुसता धार्मिक विधी राहिला नाही आहे तर सामाजिक उत्सव झाला आहे तेव्हा त्या दृष्टीनं काहीतरी व्हायला हवं. पण काहीतरी म्हणजे काय ? हा प्रश्न काही केल्या सुटेना

आणि एकदम एक कल्पना तळपली गणपती ह्या दैवताविषयी सगळ्या हिंदूंना माहिती असतेच, तेव्हा त्याना बोलवण्याऐवजी मुसलमान, शिख, ख्रिश्चन वगैरे लोकाना का नाही बोलावू ? ह्या कल्पनेवर मी तर हरखूनगेलोच, पण बाकीच्या मराठी मित्राना पण ती कल्पना आवडली राजदूत पति-पत्नी सोडून बाकी सगळे इतर धर्मांचे लोक बोलवायचे ठरले.

गणपति-उत्सव साजरा करायचा ठरवलं खरं पण पहिला प्रश्न उभा राहिला तो मूर्ती मिळवण्याचा हिंदुस्थानातून मागवायची तर ती कशी ? पण इच्छा आहे तिथ मार्ग आहे. इंडियन एयर लाईन्सच्या सलीम अलीनं दिल्लीहून मूर्ती आणून द्यायचं कबूल केल मूर्तीचा प्रश्न चुटकीसुद्धा न वाजवता सुटल्यामुळे आमच्या उत्साहात आणखी भर पडली

आता गणपति-उत्सवाची माहिती देण्याआधी आपण मराठी माणसं किती गणपति-वेडी असतो त्याची एक कथा सांगतो

गणेश-चतुर्थीला काहीतरी चार-पाच दिवस राहिले होते वकिलातीत दुय्यम सचिवाकडे मी काही कामाकरता म्हणून गेलो तर तिथं दोन अनोळखी माणसं बसली होती दुय्यम-सचिवानं ' ही बघ तुझ्या मुंबईची पाहुणे मंडळी आली आहेत, ' असं म्हणून त्याची ओळख करून दिली. दोघही जण फिल्म डिव्हिजनचे होते. प्रोड्यूसर कुणी काश्मिरी होता व कॅमेरामन आपले मराठी होते ते मराठी आहेत कळताच मी त्यांना गणपति-पूजेच

आमंत्रण दिलं. आमंत्रण देताक्षणीच त्या एवढ्या पन्नास-बावन्न वर्षांच्या माणसाच्या डोळ्याला चक्क पाणी की हो आलं! माझा हात हातात घेऊन ते म्हणाले, "रानडे, देवाच्या मनात असलं म्हणजे कसं होतं बघा. फक्त तुमची श्रद्धा मात्र पाहिजे."

मला हे सगळं नवीनच होतं. मी काही कसल्या श्रद्धेच्या पोटी ही पूजा करायचं ठरवलं नव्हतं. आम्ही कधी घरात देवपूजा करत नव्हतो की गणपती बसवत नव्हतो. एक चांगला कार्यक्रम होईल, वेगवेगळ्या धर्मांच्या लोकांना आपल्या ह्या उत्सवाची माहिती होईल, एवढाच माझा हेतू होता. तेव्हा मी थोड्या आश्चर्यानंच विचारलं की ह्यात श्रद्धेचा प्रश्न येतो कुठं?

"ते तुम्हाला नाही कळायचं." ते गृहस्थ म्हणाले, "माझ्या श्रद्धेमुळेच गणरायानं तुम्हाला गणेश-उत्सव करायची बुद्धी दिली."

मी जास्तच बुचकळ्यात पडलो. ते पुढे म्हणाले, "गेली पधरा वर्षं चतुर्थीला गणरायाची पूजा केल्याशिवाय मी तोंडात घास घेतला नाही आहे. इथं यायचं ठरल्यापासून आपला पधरा वर्षांचा तो नियम ह्या वर्षी मोडणार असं सारखं माझ्या मनात येत होतं. काबूलला कुठला आलाय गणपती आणखी कुठली गणेश-पूजा? मनाला इतकं वाईट वाटत होतं, पण बघा, तुम्हाला नेमकी ह्याच वेळी गणेश-पूजा करायचं कसं सुचलं? गणरायानंच तुम्हांला ही बुद्धी दिली असणार ह्यात संशय नाही."

"तसं असलं तर मला आनंदच आहे. पण मी ह्या पूजेला मुसलमान, ख्रिश्चन वगैरे मित्रांना बोलावणार आहे. तुम्हाला चालेल ते?" मी विचारले.

"न चालायला काय झालं?" ते संतोषानं म्हणाले, "मला फक्त त्या दिवशी गणेशाचं दर्शन घ्यायचं आहे."

गणरायानंच मला बुद्धी दिली असल्याकारणानं पूजेचा कार्यक्रम फार उमदा व मनोहारी झाला. नेमका त्या दिवशी शुक्रवार होता. त्यामुळे आम्ही सकाळी नऊ वाजता कार्यक्रमाला सुरुवात केली. पंडित देशपांडेनी सुरुवातीला सरस्वती-स्तवन म्हटलं. दयाशंकरांनी शहनाई वाजवली. दयाशंकर आयटेक कार्यक्रमाखालीच आले होते. त्या वेळी ते फार प्रसिद्ध पावले नव्हते. आता ते दूरदर्शन व आकाशवाणीवर नॅशनल प्रोग्राम देतात. दयाशंकरांच्या शहनाईनंतर आरती झाली. त्यानंतर गरम वा थंड पेय व अल्पोपाहार होऊन कार्यक्रम संपला.

रिझवान हुसेन, इतर मुसलमान मित्र व भारत सरकारच्या सेवेत असलेल्या ख्रिश्चन मित्रांनी तर प्रश्न विचारलेच पण वकिलातीत असलेल्या एका शिख आय एफ एस अधिकाऱ्यानेही बरेच प्रश्न विचारले. गणपती ह्या दैवताची अर्थातच त्याला माहिती होती. पण लोकमान्य टिळकांनी त्या पूजेला दिलेलं सार्वजनिक उत्सवाच्या स्वरूपाबद्दल त्याला काही माहिती नव्हती, हे बघून आश्चर्य वाटलं. पण त्यात आश्चर्य करण्यासारखं काय होतं? आपल्याला तरी इतर धर्मीयांच्या सण-उत्सवाबद्दल कुठं माहिती असते? एकमेकाबद्दल

काही माहिती नसणं हेच आपलं वैशिष्ट्य झालं आहे

ऑक्टोबर महिना सुरू झाला होता आणि थंडीची नुसती चाहूलच नाही तर थंडी दार ठोठवायला लागली होती महिन्या–दोन महिन्यांत बर्फ पडायला लागणार होतं अफगाण थंडीचं एक बरं असतं कितीही बर्फ पडलं व कितीही थंडी पडली तरी हवा कोरडी असते त्यामुळे थंडीचा त्रास म्हणजे सर्दी, पडसं, खोकला वगैरे काही होत नाही. हवा कोरडी असल्यामुळं एक मजेशीर दृश्य नेहमी पाहायला मिळायचं खूप बर्फ पडून गेलेला असतो. झाडा-झाडांवर, रस्त्यावर, जमिनीवर, घराच्या छपरांवर सगळीकडे पांढरा शुभ्र बर्फच बर्फ असतो तेवढ्यात ऊन पडलं की लोक धुतलेले कपडे बाहेर तारावर वाळत टाकतात. आजूबाजूला बर्फच बर्फ पण त्यातच कपडे वाळत टाकले आहेत हे बघून मजा वाटते व हसू पण येते

ह्या कोरड्या हवेमुळेच अफगाणांना मनुका बनवता येतात त्याकरता छोटी-छोटी गोडाऊन्स बांधतात त्या गोडाऊन्सच्या भिंती विटांच्या असतात व छप्पर पत्र्याचे असते हवा खेळती राहावी म्हणून भिंतींमध्ये मुखऱ्या ठेवलेल्या असतात. द्राक्षे झाडावर पिकली की ती ह्या गोडाऊन्सच्या छतांना टांगून ठेवतात. हवा कोरडी असल्यामुळे ही द्राक्षं हळू-हळू वाळत जाऊन त्याच्या मनुका बनतात

मनुक्कॉ हा मूळ अरबी शब्द ह्याचा अर्थ स्वच्छ, निर्मळ असा आहे इथल्या मनुका असतातच मुळी गोड, स्वच्छ व निर्मळ

आपल्याकडे पैश्याचं, वाहनाचं, संततीचं, कुटुंबाचं अशी बरीच सुखं सांगितली आहेत. तसं फळांचं सुख अशी सांगण्याची पद्धत असती तर काबूलची ती चार वर्षं ' फलसुखा 'त गेली असं म्हणावं लागेल, इतकी फळफळावळ आम्ही त्या काळात खाल्ली द्राक्षं तर आम्ही पेटारेच्या पेटारे आणत असू त्याच्या जोडीला सफरचंद व डाळिंब डाळिंब इथं कोणी दाणा-दाणा काढून खात नाही तर प्रथम ते आंब्यासारखं मऊ करतात व नंतर एका बाजूला भोक पाडून त्याचा रस पितात ! ह्या रसाळ फळाबरोबर बदाम, चिलगोजे, जरदाळू अशी कोरडी फळं पण असत.

काबूलला आपल्यासारखंच मक्याचं भाजलेलं कणीस अगदी लिंबू मसाला लावून मिळतं. सीझन असेल त्या वेळी घराबाहेर पडलं की भुट्टा खाण्याचा नेहमीचा कार्यक्रम होऊन बसला

गाजरांची तीच गोष्ट. इथली गाजर नाजूक व रसदार. बाजारात ठिकठिकाणी विजेच्या चरकात त्याचा रस काढून देण्याची सोय त्यामुळे अगदी चिक्कार बर्फ पडले असताना देखील आम्ही सगळे घराबाहेर पडायला अगदी उत्सुक असू

ऑफिसमध्ये वेगवेगळ्या तऱ्हेची कामं यायची बोलून चालून म्युनिसिपॅलिटीच ती. पण आज जे काम आलं, ते फार गुंतागुंतीचं होतं

नुसा शहराच्या भरमध्य वस्तीत एका मोठ्या शॉपिंग सेंटरचं काम चाललं होतं मालक मोठा पैसेवाला माणूस होता इमारत दोन मजले बांधून झाली होती वर आणखी एक मजला यायचा होता त्यात काही अडचण नव्हती प्रश्न त्या शॉपिंग सेंटरच्या पुढ्यातच एक लहान छोटी अशी मशीद होती तिचा होता त्या मशिदीमुळे सेंटरचा पुढचा भाग झाकाळला जात होता खरं तर त्यांच्या आर्किटेक्टच्या हे लक्षात यायला हवं होतं. आता त्या मालकाची व आर्किटेक्टची चुळबूळ सुरू झाली होती

मशीद अगदी लहान, दुमजली, सुबक व छान अशी होती काही खास असं कारण नसताही एखादी इमारत दुमदार व मोहक दिसते, तशी ही मशीद होती त्याच्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे ती जवळजवळ चार-पाचशे वर्षांपूर्वीची जुनी होती ती पाडायची म्हणजे शहरवालची परवानगी लागणार होती. ते लोक शहरवालकडे गेले होते, व त्यानं त्यांना माझ्याकडे पाठवलं होतं

ती सुबक, छोटीशी, साधी आणि ऐतिहासिक मशीद पाहून मी अगदी हरखून गेलो. माझ्यातला आर्किटेक्ट जागा झाला आणि काही झालं तरी ही मशीद पाडू देता कामा नये असं मी ठरवलं मालक व आर्किटेक्ट त्या मशिदीमुळं शॉपिंग सेंटरचा पुढला भाग कसा झाकला जातो वगैरे सांगून त्यांनी त्या नव्या इमारतीच्या बाजूला नवी मशीद बांधून द्यायची तयारी दाखवली पण कोणताही आर्किटेक्ट अशी ऐतिहासिक वास्तू पाडायला परवानगी देणं शक्यच नव्हतं, निदान मी तरी नाही.

मी त्यांना त्या कदीम म्हणजे पुराण्या वस्तूचं महत्त्व पटवून देत होतो जुन्या मशिदीची सर नव्याला येणार नाही वगैरे सांगून मी काही ती मशीद पाडायला परवानगी देणार नाही, हे स्पष्टपणे सांगितलं त्यांच्यातल्या आपसातल्या बोलण्यावरून ते काहीतरी 'मार्ग' काढतील अशी मला भीती वाटली म्हणून मी परत येताना शहरवाल व नायब-शहरवालला भेटलो व काही झालं तरी ही 'कदीम' मशीद पाडली जाता कामा नये हे त्यांच्या मनावर बिंबवलं.

शहरवालकडून परत येताना मनात विचार आला की, आपण धर्मानं हिंदू, तेव्हा एखादी मशीद पाडली जात असेल तर आपल्याला त्याचं सोयरसुतक वाटायचं काही कारण नाही मजा पाहा की ती मशीद पाडू इच्छिणारे सगळे मुसलमान होते व ती पाडली जाऊ नये म्हणून मी, एक हिंदू शहरवालला भेट, नायब-शहरवालला भेट अशी धावपळ करत होतो का?

ह्या 'का'चं उत्तर अगदी साधं होतं. आता मी नुसता हिंदू राहिलो नव्हतो तर माझा आर्किटेक्ट हा 'धर्म' झाला होता. त्या उस्ताद सरहंगचा धर्म कसा गाणाऱ्याचा झाला होता? माझ्या दृष्टीनं ती मशीद म्हणजे मुस्लिमांचं प्रार्थनास्थळ नव्हतं, तर ती इमारत

म्हणजे अफगाण आर्किटेक्चरचा सुंदर, साधा-भोळा नमुना होता ती पाडली जाऊ नये ह्यासाठी खटपट करण हाच माझा धर्म झाला होता व मी त्या धर्माला जागत होतो

इथ बहुतेकांच्या मनात असं येईल की, मी धर्मानं हिंदू होतो म्हणून मशीद वाचवण्याचा विचार माझ्या मनात येत असावा कारण आपली जडण-घडणच तशी असते ह्याच जर माझ्या जागी कुणी मुसलमान असता आणि कुठल तरी देऊळ पाडण्याचा प्रसंग उभा राहिला असता तर त्यान एवढी फिकीर केली नसती मुसलमानाची वृत्तीच तशी असते—वगैरे वगैरे.

पण तसच काही नाही

आमची एका तरुण अफगाण अँथ्रोपोलॉजिस्टशी ओळखच झाली. तो तिथल्या म्युझियममध्ये काम करत होता एकदा आम्ही म्युझियम पाहायला गेलो तेव्हा त्यान अफगाणिस्तानमधल्याच ' काफिरीस्तान ' ह्या प्रांताचा विभाग दाखवायला नेल

एकोणिसाव्या शतकाच्या मध्याची गोष्ट अबदूर रहमान हा त्या वेळी अफगाणिस्तानचा अमीर होता इराण, अफगाणिस्तान व उत्तर भारताचा बराचसा भाग इस्लामी झाला असला तरी हा काफिरीस्तानचा इलाखा मात्र तसाच बिगर इस्लामी राहिला होता म्हणूनच त्याला काफिरीस्तान म्हणत तिथल्या बहुतेकांचा धर्म ' पॅगन ' म्हणता येईल असा. जगज्जेता शिकंदरच्या वेळी आलेले बरेचसे ग्रीक सैनिक मायदेशी परत न जाता ह्या काफिरीस्तानात स्थायिक होऊन गेले होते त्यांची राहणी, खाण-पिण, देवी-देवता सगळं ग्रीक पद्धतीचं होत त्याची वेगळी संस्कृती होती व कित्येक शतक तशीच राहिली होती.

अबदूर रहमान हा मोठा ठणठणीत प्रवृत्तीचा होता इंग्रजानी सगळा भारत पादाक्रांत केला होता व आता त्याची दृष्टी अफगाणिस्तानकडे वळली होती. त्यानी खूप प्रयत्न केला पण काही झाल तरी अबदूर रहमान त्याना बधत नव्हता, तो त्यांना तोडीस तोड भेटला होता.

तेव्हा इंग्रजानी आपली ' फोडा व झोडा ' ही नीती अमलात आणायला सुरुवात केली. त्यांनी काफिरीस्तानींच्या मनात अमीर अबदूर रहमानविरोधी भावना पेरायला सुरुवात केली " तुम्ही काही मुसलमान नाही, तुम्ही वेगळ राज्य मागा, आम्ही तुम्हांला मदत करू " वगैरे सांगून काफिरीस्तानच्या लोकांना उचकवायला सुरुवात केली अगदी जस इंग्रजानी पाकिस्तानबाबत केल तसच काफिरीस्तानी बहकले व दगा-धोपा करू लागले. अबदूर रहमानन पाहिल-पाहिल आणि एक दिवस सगळ्या काफिरीस्तानी लोकांना जबरदस्तीन मुसलमान केल, काफिरीस्तानच नाव नूरीस्तान ठेवल व तो प्रदेश इस्लामी करून सोडला

हे सगळ सांगून तो तरुण अफगाण अँथ्रोपोलॉजिस्ट म्हणाला,

" ह्याचा परिणाम असा झाला की त्या प्रदेशाची आपली म्हणून जी संस्कृती होती, जे काय वेगळेपण होत, ते सगळ नष्ट होऊन गेल.

" अबदूर रहमानन इंग्रजाना शह देण्याकरता हे सगळ केलं हे जरी खर असल तरी त्यानी काफिरीस्तानच्या लोकाना मुसलमान करायला नको होत फार मोठी चूक केली

त्यान एका वेगळया संस्कृतीचा नाश झाला ”

एक मुसलमान कोणा अमीरान काही लोकाना मुसलमान केल हे चुकीचं होत अस म्हणत होता कारण तो अँथ्रोपोलॉजिस्ट झाला होता त्याला वेगळ ज्ञान, वेगळी दृष्टी प्राप्त झाली होती ज्ञानाचा प्रसार हाच सगळया धार्मिक व जातीय प्रश्नावर उपाय आहे हेच खरं

त्या कदीम मशिदीच पुढ काय झाल ह्याबद्दल वाचकाना उत्सुकता लागली असणार

काही दिवसांनी मी त्या जागी परत गेलो तर ती मशीद अगदी जमीनदोस्त केली गेली होती ! शहरवाल, नायब-शहरवाल वगैरेंना आपण एवढं सागूनसुद्धा शेवटी हे अस व्हाव ह्याचा मला राग आला व मी खिन्न पण झालो त्या मालकान शहरवालला काही कळवलच नव्हतं वा परवानगी पण विचारली नव्हती त्यानं तिथल्या मुल्लाला नव्या संगमरवरी मशिदीच आमिष दाखवल होतं, भरपूर पैसे दिले होते आजूबाजूच्या दुकानदाराना व रहिवाश्यांना पण पैसा चारला होता आता मुल्लाची व तिथं प्रार्थनेला येणाऱ्याची जर मशीद पाडायला हरकत नव्हती तर शहरवालकडे जायच कारणच उरलं नव्हतं.

पैसा काय करत नाही ? अगदी सगळं काही करतो हाच ह्या गोष्टीचा धडा !

पण मशिदीची गोष्ट इथंच संपली नाही. त्या नव्या मशिदीच डिझाइन पण मलाच करायला लागल त्या डिझाइनप्रमाण नवी मशीद तीन-चार महिन्यांत उभीपण राहिली

एक मशीद आज माझ्या नावावर काबूल शहरात उभी आहे ह्याचा आनद मानाचा की एका चांगल्या आणि ऐतिहासिक वास्तूच आपण रक्षण करू शकलो नाही ह्याच दुःख करून घ्यावं, हेच मला कळत नाही आहे

ह्याचबरोबर मशिदींबाबतचा दुसरा एक किस्सा सांगतो एक दिवस एका सौदी अरबाला घेऊन शहरवाल माझ्याकडे आला कपड्यावरून तो अरब चागला पैसेवाला दिसत होता. त्याला काबूल शहरात काही मशिदी ‘ भेट ’ म्हणून बांधून द्यायच्या होत्या. त्या मशिदीं-करता जागा नक्की करायचं काम माझ्याकडे आलं त्या अरबाला घेऊन मी काबूल शहराच्या वेगवेगळ्या भागात दोन-तीन दिवस फिरलो व काही जागा पक्क्या केल्या

पण नतर काही त्या मशिदींबद्दल ऐकू आल नाही चौकशी केल्यावर कळल की अफगाण सरकारला त्या अरबाचा फक्त पैसा हवा होता त्या अरबाची इच्छा अशी होती की, त्या मशिदीकरता लागणारे कॉंट्रॅक्टर्स, इंजिनियर्स, आर्किटेक्ट्स सौदी अरेबियातून आणायल परवानगी द्यावी; आणि ते अफगाणांना नको होत एकदा हे ‘ अरब ’ एलिमेन्ट आपल्या देशात आले की त्याचे काहीही परिणाम होऊ शकतील ह्याची सरकारला कल्पना होती पाकिस्ताननी पण ह्या अरबांना मशिदी बांधायला ह्याच कारणाकरता परवानगी नाकारली होती ही सगळी मुसलमान राष्ट्र असली तरी आपल्याला वाटतं तेवढं त्याच्यात सख्य नाही

आमचा पगार व भत्ते आम्हांला भारत सरकारकडून मिळत. दर महिन्याच्या एक तारखेला वकिलात सगळ्या आयटेकवाल्यांना पगाराचे चेक देत असे तसे चेक मिळाले की, आम्ही सगळे 'बँकेमिल्ली'त म्हणजे जनता-बँकेत जात असू तो दिवस म्हणजे आम्हा आयटेकवाल्याच्या छोट्याशा संमेलनाचा असे पगार मिळणार असल्याकारणानं सगळ्यांच्या वृत्ती उत्साहित व उत्तेजित असत

भारतात असताना आम्हा राजपत्रित अधिकाऱ्याना पगाराचा क्रॉस-चेक मिळे त्याचे पैसे मिळायला निदान चार-पाच तरी दिवस लागत त्यामुळे किशोरकुमारच्या सिलोन रेडिओवर दर एक तारखेला लागणाऱ्या 'आज पहली तारीख है !' ह्या गाण्याची मजा आम्ही गेली कित्येक वर्षे गमावून बसलो होतो काबूलमध्ये आल्यावर एक तारखेची ती मौज परत अनुभवायला मिळाली. कारण बँकेत चेक दिला की लगेच पैसे मिळत आणखी एक वेगळी गोष्ट म्हणजे इथं शंभर अफगाणीच्या पण नोटा नाहीत, जास्तीत जास्त वीस अफगाणींच्या नोटा बाकी सगळ्या एक, पाच व दहाच्या नोटा माझा पगारही भक्कम होता, त्यामुळे कोट-पँटचे सगळे खिसे भरभरून मी नोटा आणत असे खिशातून नोटांची बंडलच्या बंडल कॉटवर टाकत मी प्रतिभाला 'पैसा ! पैसा ! पैसा ! घ्या, हवा तेवढा पैसा !' असं म्हणत असे

प्रतिभा माझ्यासारखी पोरकट नसल्यामुळे ती बिलकुल उत्तेजित न होता शांतपणे त्या नोटा गोळा करून कपाटात ठेवून देत असे. काही बायका पैशालाही भुलत नाहीत ह्याचं प्रतिभा हे ठळक उदाहरण म्हणून द्यायला हरकत नाही !

पगार मिळाला रे मिळाला की लगेच 'रेट'ची चौकशी व्हायची. काही वाकबगार व उत्साही लोक बँकेतून सरळ 'मनी-मार्केट'ला जायचे आपल्याकडे परदेशी चलन मिळवायच म्हणजे रिझर्व्ह बँकेची परवानगी वगैरे नाना भानगडी पण काबूलला अगदी भाजी-मार्केटसारखं उघडपणे व मोकळेपणी चालणारं मनी-मार्केट आहे. तिथं जपानी येन, अमेरिकन डॉलर्स, ब्रिटिश पौंड, भारतीय रुपये, अगदी रशियन रुबल्सदेखील मिळतात. आता रशियन रुबल्सचा चेक मिळतो की नाही ते कळलं नाही, पण बाकी चलनाचे चेक किंवा रोख पैसे मिळतात

पैसे कर्जाऊ देण व व्याज घेणं हे इस्लाम धर्मात निषिद्ध मानल आहे. त्यामुळे मुसलमान सावकारीच काम करत नाहीत ते फक्त हिंदू व शीख करतात पण साध पैसे बदलण्याच वगैरे कामसुद्धा मुसलमान करत नाहीत, ह्याच एक मोठ मजेशीर कारण आहे मुसलमानाना हिशेब-ठिशेबाच काम जमत नाही, आकडेमोडीत ते फार मद बुद्धीचे असतात असा इथ सर्वांचा समज व विश्वास

हे पैसे बदलणारे हिंदू व्यापारी आम्ही 'साहेब' लोक होतो म्हणूनच आमची कामं करत त्याचे बाकीचे व्यवहार इतके मोठे होते की, त्या मानाने आमची काम काहीच किंमतीची नव्हती एकदा मी हिंदुस्थानात दोन हजार डॉलर्सचा चेक पाठवला

महिना–दीड महिना झाला तरी माझ्या बँकेकडून मला त्याबाबत काही कळल नाही, तसा माझा ब्राह्मणी जीव खालीवर होऊ लागला त्या व्यापाऱ्यानं तर काही गडबड केली नाही ना ? असं माझ्या मनात आलं म्हणून त्या व्यापाऱ्याकडे गेलो

"या, या, साहेब, बरं झाल तुम्ही आलात ते." मला बघून तो मोठ्या आनंदान म्हणाला, "माझ एक काम करा " मला माझ्या दोन हजार डॉलर्सचा विषय काढायलाही त्यानं फुरसत दिली नाही मनात चुळबूळ पण तोंडावर आनंद दाखवत मी म्हटल, "जरूर, काय काम आहे ते सांगा."

"ह्या जर्मन फर्मला मी दोन महिन्यापूर्वी काही पैसे पाठवले होते, पण त्याची पोच अजूनही आली नाही आहे त्याना टेलेक्स करायचा आहे " त्याला इंग्रजी येत नव्हत

"कधी पैसे पाठवले होते ?" मी विचारलं त्यान दोन महिन्यापूर्वीची काही तारीख सागितली "किती रक्कम पाठविली होती ?" मी विचारलं. कारण टेलेक्स पाठवायचा म्हणजे सगळी माहिती असण आवश्यक होत त्यानं त्याच्याजवळचे कागदपत्र पाहिले व म्हणाला, "तीन लाख अमेरिकन डॉलर्स" ते ऐकताच मी आपला थक्क !

इतके लाख डॉलर्स ह्याने पाठवले, चांगले दोन महिन्यांपूर्वी व आता हा शातपणे टलेक्स पाठवतो आहे. ह्याला गेले दोन महिने झोप तरी कशी लागली ? हाच प्रश्न मला पडला. माझ दोन हजाराच काम सांगायचीही मला लाज वाटली हा एवढा लाखाचा धंदा करणारा मला काही हजाराना फसवणार नाही ह्याची मला खात्री वाटली. मी रेटची जुजबी चौकशी केली व चहा घेऊन परत आलो

ज्या अफगाणाचा परदेशांशी कातडी, गालिचे, सुकी फळे वगैरेंचा व्यापार आहे, किंवा कुणाला युरोपला जायच आहे, वा कुणी हज-यात्रेला निघाला आहे ते इथ परकीय चलन मिळवण्याकरता येतात

कम्युनिस्ट सरकार आल त्या वेळी मनी-मार्केटमधला व्यवहार थोडे दिवस थड पडला होता पण काही दिवसानी तो परत गरम झाला हे मनी मार्केट म्हणजे अफगाणिस्तानच हृदय आहे ते बद पडल तर इथ कोणतीही राजवट टिकणार नाही

आपण भारतीय अगदी हाडा-मासाचे हिंदू म्हणजे जिथ जाऊ तिथ आपले लगेच चार वर्ण पडतात, उच्च-नीचतेची भावना निर्माण होते

इथंही तसे चार वर्ण पडले इथला ब्राह्मण वर्ग म्हणजे वकिलातीतले लोक. जसं ब्राह्मण कितीही अडाणी व अशिक्षित असला तरी थेट स्वर्गाला पोहोचवतो म्हणून तो श्रेष्ठ त्याच-प्रमाण वकिलातीतला माणूस कितीही खालच्या हुद्द्यावरचा असला तरी तो इथ दोन वर्षापेक्षा जास्त राहायला मदत करतो म्हणून तो श्रेष्ठ ठरतो

इथली भारतीय व्यापारी मडळी गडगज पैसा करून होती तरीही त्याना पासपोर्टकरता

वगैरे वकिलातीवर अवलंबून राहायला लागायचं. ते वैश्य वर्णाचे ठरत.

इथं बरेच भारतीय युनायटेड नेशन्सच्या डेव्हलपमेंट प्रोग्रामखाली आले होते. त्याना चांगला पगार मिळे काहीजणाना तर राजदूतांच्या दुप्पट पैसा मिळे. तरी पण राजदूत तो राजदूत त्याची सत्ता सगळ्या भारतीयावर चालते यु एन. डी पी वाले क्षत्रिय ठरत क्षत्रिय राजा असला तरी त्याच्या राज्याभिषेकाला ब्राह्मणच लागतो

राहता राहिलो ते आम्ही आयटेकवाले म्हणजे शूद्र ! वकिलातीच्या लोकांसारखी आमच्या हाती सत्ता नाही, की व्यापाऱ्यासारखा पैसा नाही. नाही आम्हाला यु एन डी पी. च्या लोकांसारखा मान काबूलमध्ये राहण न राहणं सर्वस्वी वकिलातीच्या लोकांच्या मर्जीवर अवलंबून अगदी योग्य अशा मुद्द्यावरसुद्धा वकिलातीच्या लोकाबरोबर कोणी वाद घातला, की त्याची लवकरात लवकर उचलबांगडी होत असे

उत्तर प्रदेशातला गुप्ता नावाचा एक सेशन जज्ज इथं आयटेक प्रोग्रॅमखाली आला होता सेशन जज्ज म्हणजे काही कनिष्ठ अधिकारी नाही पण जितका अधिकारी उच्च तेवढी जास्त अपमानास्पद वागणूक त्याला वकिलातीचे लोक देत. तशीच वागणूक गुप्ताला पण मिळाली त्यामुळे तो चवताळून गेला व ज्याला त्याला सांगू लागला, " मैं जब सेशन जज्ज था, तो सब लोग मेरे आँखोंमें भगवान को देखते थे। और अब यहाँ मुझे ऐसी ट्रीटमेन्ट मिल रही है। "

हे त्या वेळी वकिलातीच्या एका अधिकाऱ्याच्या कानावर गेल, त्या वेळी तो म्हणाला, " गुप्ता साहाब को बताना कि हिंदुस्थानमें उनके आँखोंमें लोग भगवानको देखते थे वैसेही काबूलमें गुप्तासाहाब अँबॅसिडरकी आँखोंमें भगवानको देखे। "

गुप्ताला एका वर्षाच्या आत भारतात परत पाठवलं गेलं असं वातावरण असल्यामुळं इथ राहायचं तर वकिलातीच्या लोकांची चमचेगिरी करत राहणं हा एकच मार्ग लोकांच्या पुढे असे. आयटेकचे वरिष्ठ अधिकारीसुद्धा वकिलातीतल्या अगदी खालच्या दर्जाच्या कारकुनाच्या घरीसुद्धा जाऊन त्याची चमचेगिरी करत वकिलातीतल्या वरच्या अधिकाऱ्याची मगुरी तर काय विचारायलाच नको

आपण लाचार संस्कृतीची माणस आहोत हेच खरं अधिकार असलेल्या लोकाना लाचार लोक जास्त आवडतात व खालच्याना तशी लाचारी करण्यात आनद वाटतो

मागे सांगितलेल्या त्या तरुण शिख आय एफ एस अधिकाऱ्याबरोबर ह्या एक्स्टेन्शन् म्हणजे इथ राहण्याच्या वर्षात वाढ करण्याबाबत मी पुष्कळ वेळा बोललो तो सरदारजी मोठा नि:स्पृह व गुणी होता "तुम्ही नुसतं स्वत: नि:स्पृह असून चालत नाही." मी त्याला सागत असे " तुम्ही अशी काही पद्धत म्हणजे सिस्टिम आणली पाहिजे की, त्यामुळे इतर लोकानाही नि:स्पृह व्हायला उत्तेजन मिळाल पाहिजे "

तो सरदारजी व मी इतर पुष्कळ विषयावर बोलत असू मी त्याला एकदा विचारलं की, अमेरिकन व ब्रिटिश राजदूत त्याच्या त्याच्या अनुभवावर इतकी भारंभार पुस्तकं लिहितात,

हिंदी राजदूत तशी पुस्तकं लिहिताना का दिसत नाहीत ? अगदी हाताच्या बोटावर मोजण्या इतकेही आपल्याकडे लेखक-राजदूत का नसावेत ? ''

" रानडे, त्याच असं आहे, " तो उत्तरला, " आम्ही नोकरीत असताना आम्हांला काही लिहून प्रसिद्ध करायला बंदी असते. निवृत्त झाल्यावर त्या घडामोडींविषयी लिहाव तर त्या जुन्या व शिळ्या झाल्या असतात म्हणून आपले राजदूत जास्त करून लिहीत नाहीत ''

त्याचं म्हणणं मला पटल नाही मग नोकरीत असताना न लिहिण्याचा नियम अमेरिकन व ब्रिटिश राजदूतांना पण लागू आहेच की ! जुन्या व शिळ्या म्हटल्या जाणाऱ्या घडामोडीं-वर ते लोक चांगलं लिहितात की ! आणि एखादी गोष्ट जुनी व शिळी झाली असली तरी त्यापासूनचे धडे तर ताजेच असतात ना ! त्या हिशेबान बघायला गेले तर सगळा इति-हासच मुळी जुन्या व शिळया घडामोडींवर आधारलेला असतो पण म्हणून तो त्याज्य थोडाच ठरतो !

मला वाटतं की आपल्या बहुतेक राजदूताना लेखकाची म्हणून गोष्टी टिपण्याची दृष्टी लागते ती नसावी पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे अमेरिकन, ब्रिटिश, रशियन राज-दूताना जे महत्त्व असतं ते प्रबळ देशाचे राजदूत असतात म्हणून आलेल असतं भारत काही बलाढ्य देश समजला जात नाही, त्यामुळे भारताच्या राजदूताला तेवढ महत्त्वही नसत आता ज्याला स्वतःलाच महत्त्व नाही तो काय अनुभव लिहिणार कपाळ ? आणि लिहिल तरी त्याला महत्त्व ते काय मिळणार ?

भारताने मैत्रीच्या करारान्वये काबूलमध्ये स्त्रिया व मुलांकरता एक मोठं हॉस्पिटल बांधून दिल होतच, पण ते चालवण्याची जबाबदारीपण भारत सरकारन घेतली होती. भारतातून काही डॉक्टर्स इथ पाठवले जात त्यांचा पगार, भत्ते वगैरे भारत सरकारच देत असे आपले बहुतेक डॉक्टर्सही चांगले हुषार व कामात तरबेज असत त्यामुळे ह्या इस्पि-तळाचं नाव फार चागल होत. कित्येक श्रीमंत व गरीब अफगाणाचे दुवे आपल्या डॉक्टरांनी घेतले होते.

गोष्ट साधी असते पण त्याचा परिणाम किती चांगला होतो पाहा मागला प्रेसिडेन्ट विलायतेला गेल्यानंतर त्याच्या जागी आलेला प्रेसिडेन्ट चांगला बुद्धिमान व आपल्या कामात प्रवीण होता त्यालाही चागल इंग्लिश येत होतं

एकदा त्याचा मुलगा आजारी पडला तेव्हा त्यान मला आपल्या हिंदी डॉक्टराची अपॉईंटमेन्ट घ्यायला व डॉक्टराना त्या केसकडे जरा जास्त लक्ष द्या अशी विनती करायला सांगितल त्याप्रमाणे मी डॉक्टरला फोन केला त्या डॉक्टरनं आमच्या प्रेसिडेन्टची चांगली खातीर केली मुलाला मोठ मन लावून तपासलं, योग्य ती औषधं दिली त्यामुळे प्रेसिडेन्ट साहेब मोठे खूष होऊन गेले त्यांच्याजवळचा माझा वटही वाढला

काही दिवसांनी एका पार्टीत तो डॉक्टर मला भेटताच आमच्या प्रेसिडेन्टला चांगली

वागणूक दिल्याबद्दल मी त्याचे आभार मानले

" त्यात आभार कसले मानतोस ? " डॉक्टर म्हणाला, " आम्ही सगळ्यानाच चांगली वागणूक देतो, आमच कामच आहे ते. "

" नाही, तुम्ही सगळ्यांना चागली वागणूक देत असालच पण ज्या वेळी मी सागितलं म्हणून त्याच काम चांगल्या प्रकारे झाल, अस प्रेसिडेन्टला वाटत आहे त्या वेळी माझीच नाही तर शहरवालीतल्या सगळ्याच हिंदी लोकांची पत वाढते, सगळ्याच हिंदी लोकांबद्दल त्याचं चागलं मत होतं. "

असंच पत वाढण्याच दुसरंही उदाहरण आहे डॉक्टर नूरजाद, आमचा शहरवाल हिंदुस्थानात काही वैद्यकीय उपचारांकरता जायचा होता. त्याची ही खासगी भेट होती ह्या भेटीत त्याला दिल्लीतल्या जास्तीत जास्त इमारती पाहायच्या होत्या आपल्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाला कळवल असत तर उगाच लांबण लागायचा संभव होता तेव्हा त्यानी मला काही खासगीरीत्या व्यवस्था करता आली तर बघ म्हणून सागितल

माझा कनूभाई जानी नावाचा चांगला मित्र दिल्लीलाच नॅशनल बिल्डिंग ऑर्गेनायझेशनमध्ये डेप्युटी डायरेक्टर होता तो चांगला विचारी व प्रसगाच महत्त्व जाणणारा होता. त्याला मी मेयरसाहेबाच्या भेटीविषयी लिहिल. कनूभाई जरी भरवशाचा माणूस होता तरीही तो मेयरसाहेबाच योग्य ते स्वागत करेल की नाही, ह्याबद्दल माझ्या मनात थोडी धागधूग होती

पण शहरवाल दिल्लीहून परत आला तो मोठा खूश होऊन. जानीनं त्याला बऱ्याच इमारती वगैरे तर दाखवल्याच, पण त्यांच्या संस्थेच्या उच्च अधिकाऱ्याबरोबर मेयरसाहेबाचा छोटासा चहापानाचा कार्यक्रम पण आखला, त्यामुळे माझा भाव वधारला हे सांगायला नकोच.

हिंदुस्थानातल्या भेटीत आपल्याकडे इतकी बाया-माणस बाधकामात आहेत हे पाहून मेयर फार प्रभावित झाला होता " रानडे, सात-सात, आठ-आठ मजली इमारतींवर विटा, सिमेंट वगैरे वाहण्याच काम तुमच्याकडल्या स्त्रिया करत असलेल्या पाहून मी तर थक्कच झालो आमच्याकडे इतक्या स्त्रिया आहेत पण आम्ही त्याचा बांधकामात काही उपयोग करून घेऊ शकत नाही, आमची कितीतरी शक्ती वाया जाते आहे. " हे दु खही त्यानं बोलून दाखवलं

इमारतींवर काम करणाऱ्या अशा स्त्रिया आपण नेहमी पाहतो त्यामुळे त्याचं महत्त्व आपल्याला वाटत नाही, पण परक्याला त्याचं फार कौतुक वाटत. अफगाणिस्तानातच का पण अगदी पुढारलेल्या देशातूनसुद्धा बाधकामात स्त्रिया दिसत नाहीत.

आमच्या प्रेसिडेन्टच्या मुलाच्या आजारीपणाच्या गोष्टीच शेपूट-पर्व सागतो शेपूट-पर्व

म्हणजे ‘ टेल-पीस ’.

त्याचा मुलगा चांगला बरा झाल्यावर प्रेसिडेन्ट आपल्या बायकोमुलांना घेऊन आम्हांला भेटायला व आमचे आभार मानायला म्हणून आमच्या घरी आला. ते सगळं पठाणी कुटुंब, तेव्हा ती सगळी मंडळी गोरी, सुंदर, उंचीत भरपूर व नाकी-डोळी नीटस अशी होती आम्ही त्यांची योग्य ती महेमानदारी केली.

दुसऱ्या दिवशी तो मला भेटला तेव्हा हसत हसत विचारू लागला, “ माझी बायको तुझ्या बायकोबद्दल काय म्हणत होती माहीत आहे ? ” मी विचार केला की खाण-पिणं चांगलं झालं असंच ती काहीतरी म्हणाली असणार तेव्हा मी त्याला ‘ जरूर सांग ’ म्हणून म्हटलं.

“ ती म्हणत होती ” तो परत थोडं वेगळंच हसून सांगू लागला, “ की ती जर पुरुष असती तर तिला मिसेस रानडेसारख्या बाईशी लग्न करायला आवडलं असतं ”

ह्यावर आम्ही दोघं अगदी मनापासून हसलो

योग्य वेळी मी हे सगळं प्रतिभाला सांगितलं व त्याचं मला यथायोग्य बक्षीस पण मिळालं

वर सांगितलेल्या डॉक्टराच्या आयुष्यात असा एक प्रसंग घडला की जो कोणाही डॉक्टराच्या आयुष्यात घडणार नाही, निदान घडू तरी नये

२७ एप्रिल १९७८ ला अफगाणिस्तानात क्रांती झाली म्हणा किंवा कम्युनिस्ट राजवट आली म्हणा—त्या दिवशीची गोष्ट

हा डॉक्टर सदर–ए–रियासत दाऊदखानच्या राजवाड्यावर त्याला व त्याच्या घरच्या लोकांना वैद्यकीय सल्ला द्यायला, आजाऱ्यांना पाहायला म्हणून जात असे दाऊदखानची नऊ-दहा वर्षांची नात त्या वेळी फार गंभीरपणे आजारी होती. गेले काही दिवस त्या नातीला तो औषधोपचार करत होता त्याच्या प्रयत्नाला यशही पण येत चालले होते. त्या २७ एप्रिलला नेहमीप्रमाणे सकाळी तो राजवाड्यावर जाऊन तिला इंजेक्शन देऊन आला होता आपण केलेली औषधयोजना यशस्वी होते आहे ह्याचा त्याला आनंद होणं साहजिकच होतं

पण त्याचा तो आनंद काही ताससुद्धा टिकायचा नव्हता त्याच दिवशी दुपारी बारा–एकच्या सुमाराला रणगाड्यांनी राजवाड्याला गराडा घातला दीड-दोन तासांनी राजवाड्याचं रक्षण करणाऱ्या सैनिकांशी मुकाबला करून बंडखोर सैनिक राजवाड्यात घुसले. काही वेळातच त्यांनी दाऊदखान व त्याच्या कुटुंबातल्या तीस ते पस्तीस जणांना गोळ्या घालून ठार मारलं आणि त्या ठार मारलेल्यात ती नऊ-दहा वर्षांची कोवळी नात पण होती !

हे सगळं ऐकल्यावर त्या डॉक्टरला भ्रम झाल्यासारखाच झाला ज्या मुलीचे प्राण

वाचावे म्हणून तो इतके दिवस खटपट करत होता, ज्या मुलीला त्यानं अगदी त्या दिवशी औषध दिलं होतं, तिला काही तासांनतर गोळ्या घालून ठार मारण्यात आलं, हे कळल्यावर आणखी वेगळं काय होणार होतं ?

खरंच, राज्यक्रान्त्या होतात त्या वेळी असे कितीतरी निरपराध जीव मारले जात असतील नाही ? क्रांतीची होळी पेटवण्याकरता अशा कितीतरी चिमण्या पणत्या विझवल्या जात असतील नाही ?

हे सगळं आठवलं म्हणजे अजूनही मन खिन्न होतं.

आता मला एका मोठ्या इंडस्ट्रियल इस्टेटचा ले-आऊट करण्याचं काम मिळालं होतं इंडस्ट्रियल इस्टेट असल्यामुळे तिथं मोठ्या प्रमाणात मोठ्या वाहनांची वाहतूक राहणार आहे हे लक्षात ठेवून मी मोठे रुंद व सरळच्या सरळ रस्त्यांची योजना केली. पूर्वीप्रमाणे चौराहे इथही टाळले होते मध्यम प्रतीच्या उद्योजकांना घेता यावेत म्हणून लहान लहान प्लॉट्स पाडले होते अर्थात ह्यात काही नावीन्य नव्हतं, असं सगळेच करतात.

माझ्या नकाशातलं नावीन्य असं होतं की, नकाशात बागांकरता मी मोकळ्या जागा ठेवल्या होत्या. ह्या मोकळ्या जागेत हिरवळ असावी, झाडं झुडपं असावीत अशी कल्पना. हे बऱ्याच जणांना खटकलं मुख्यत्वे करून शौरवी आर्किटेक्टस्ना. इन्डस्ट्रियल इस्टेटमध्ये बागा ? आणि त्याच्याकरता काही जागा 'वाया' घालवायची ? ही कल्पनाच त्यांना सहन होईना उलट माझं म्हणणं असं होतं की, अशा इस्टेटीमधूनच हिरव्यागार गवताची व झाडा-झुडपांची गरज आहे. उन्हाळ्यात जेवणाच्या सुट्टीत कामगारांना त्या बगिच्यात येऊन विश्रांती घेता येईल त्याचबरोबर ह्या झाडा-झुडपांमुळे वातावरण शुद्ध राहील

पर्यावरण शुद्ध ठेवण्याचा असा मी आठ-दहा वर्षांपूर्वी लहानसा प्रयत्न केला होता.

मी ह्या इस्टेटीचे नकाशे बनवत असण्याच्या सुमारास चिनीसरकार अफगाणिस्तानात-फार रस घेऊ लागलं होतं. गेल्या एक-दीड वर्षांपासून चिन्याचा इथला व्यापार—उदीम पण वाढला होता मोठ्या व्यापाराबद्दल काही कल्पना नव्हती, पण चिनी कागद, पेन्सिल्स, पेन्स वगैरे स्टेशनरी बाजारात मोठ्या प्रमाणात दिसू लागली होती आणि ती बरीच स्वस्तही होती

चिनी सरकार कागद बनवण्याचा एक कारखाना अफगाणिस्तानला भेट म्हणून बांधून देणार आहे. त्यासंबंधी जागा पक्की करण्याकरता चिनी आर्किटेक्टस्—इंजिनियर्सची एक टीम काबूलला आली आहे. सरकारी उच्च स्तरावर सगळं काही बोलणं झालं आहे. ती चिनी टीम माझ्याकडे येईल, त्याच्याबरोबर चर्चा करून व वेगवेगळ्या जागा बघून नव्या

कागदाच्या कारखान्याची जागा मी पक्की करायची आहे, असा शहरवालचा निरोप आला

त्याचबरोबर शहरवालची एक 'खासगी' सूचना होती ती अशी की, चिन्यांना शक्यतो गावाबाहेरची दूरची अशी जागा दाखवायची. खरं तर सरकारला तो चिनी-[redacted] काबूल शहर सोडून दुसऱ्या कुठल्या तरी गावात टाकायचा होता पण चिन्यांना तो काबूल-मध्येच हवा होता. म्हणून हा तडजोडीचा मार्ग शहरवालनं काढला होता.

आता शौरवी काय किंवा चिनी काय, दोघही कम्युनिस्टच, पण का कुणास ठाऊक मला चिन्यांबद्दल परकेपणा वाटला नाही, उलट आपुलकीच वाटली लंडनला असताना माझ्या वर्गात एक चिनी मुलगी होती ती सोडून दिली तर आतापर्यंत चिनी लोकांशी माझा संबंध आला नव्हता, तो ह्या निमित्तानं आला ह्याचा मला अर्थातच फार आनंद झाला

त्या कारखान्याकरता योग्य जागा निवडण्याच्या हेतून आम्ही बऱ्याच वेळा भेटलो व फिरलो ती सात जणांची टीम होती त्यात आर्किटेक्ट, इंजिनियर, पेपर-टेक्नॉलॉजिस्ट वगैरे होते सगळी तरुण तीस-पस्तीस वयाची आर्किटेक्टला चांगलं इंग्रजी येत होत. पहिल्या दिवशी ते माझ्याकडे आले होते. त्याच्यानंतर मीच त्यांच्याकडे हॉटेलवर जात असे. तिथून पुढे आम्ही जागा पाहायला जात असू प्रत्येक वेळी त्यांच्याकडे चहा-पाणी होत असे एकदा फार उशीर झाला, तेव्हा मी त्यांच्याकडे जेवलो पण होतो.

तेव्हा ह्या चिनी मित्रांची मेहमानदारी करावी असं माझ्या मनात आलं. पण परदेशात असताना सरकारी अधिकाऱ्याला असं मनात आलं की बिगर भारतीयाला घरी बोलावता येत नाही

म्हणून मी राजदूताना एक टिपण-वजा पत्र लिहिलं. आजुनी बी सिंगच राजदूत होते. त्या टिपणात ह्या कागद कारखान्याच्या योजनेबद्दल संपूर्ण माहिती दिली तसच कारखान्याला जमीन देण्याबाबत अफगाण सरकारच काय धोरण आहे व त्यातून शहरवालन काय मार्ग काढला आहे तेही लिहिलं हेतू हा की राजदूतांना चिनी सरकारच्या ह्याबाबतच्या हालचालींची सपूर्ण कल्पना द्यावी

पत्राच्या शेवटी ह्या चिनी टीमला घरी जेवायला बोलावण्याची इच्छा आहे तर तशी परवानगी द्यावी अशी विनंती केली होती.

पत्र पाठवून तास-दीड तासही झाला नाही तोच बी सिंगानी मला भेटायला बोलावलं. तसा मी लगोलग त्यांना भेटायला गेलो, तर त्यांनी माझा चागला पंचेचाळीस मिनिटांचा क्लास घेतला !

त्या कारखान्याबद्दलची इत्थंभूत माहिती त्यांना कळवल्याबद्दल प्रथम त्यानी माझं कौतुक केलं व पुढे म्हणाले,

"रानाडे साहाब, ये अफगाणोंका और चिनियोंका प्यार बहुत दिन नहीं चलनेवाला है। ऑफिस कामके लिये तुमको उनके साथ घुमना—फिरना होगा, उसको तो मैं मना नहीं कर

सकता। मगर उनको घरपे खानेको बुलाना ठीक नहीं होगा। तुम्हारी और चिनी लोगों की फ्रेंडशिप अफगाणोंको अच्छी नहीं लगेगी।"

असलेल्या दिसल्या तेव्हा त्यांनी अर्थातच चांगला रिपोर्ट दिला हे सगळं बघून हसावं की रडावं हेच कळेना. इतका पैसा व वेळ खर्च करून ॲमेस्टीचे लोक देशा-देशांतून फिरतात बहुतेक देशातून इथं केलं गेलं तसंच करत असणार मग हा ॲमेस्टीचा एवढा व्याप कशासाठी ?

अफगाण तुरुंगासारखी संस्था जगात दुसरीकडे कुठे असेल की नाही ह्याची शंकाच आहे कम्युनिस्ट सरकार आल्यापासूनच नाही तर अगदी अबदूर रहमानच्या काळापासून शेकडो लोक विना-चौकशी वर्षोन् वर्षं तुरुंगात खितपत पडलेले असत त्यांना कुणीही वाली नसे पूर्वीच्या बंदिवासाबद्दल व शिक्षाबद्दल वाचल म्हणजे आत्ताची परिस्थिती खूप चागली म्हणायची वेळ येते

पूर्वी कुणी काही गुन्हा केला किंवा कुणी अमीराच्या मर्जीतून उतरला की त्याला गावाच्या वेशीवर खास तयार केलेल्या लोखंडी पिंजऱ्यात कोंडून ठेवत नाही त्याला काही खायला, नाही त्याला काही प्यायला बिचारा भुकेन तडफडून तडफडून मरून जायचा ! हे सगळं जाणाऱ्या येणाऱ्याच्या देखत घडे. त्यामुळे अमीराचा दरारा वाढे दगडानी ठेचून मारणं, हात-पाय तोडणं वा फक्त बोटंच कापण, बायकांना बदफैलीपणाबद्दल पोत्यात घालून तलवारीन भोसकून मारणं, डोळ्यांत चुना घालून आंधळ करणं असले अघोरी प्रकार गेल्या शतकापर्यंत चालले होते. खरंच, हे अफगाण लोक फार क्रूर !

क्रांतीनतर तुरुंगातली कैद्याची संख्या खूप वाढली. नेहमी असं नसे. त्या वेळी कैद्यांना बागेत काम करायला वा खडी फोडायला लावत प्रत्येक कैद्यामागं एक शिपाई असे जर कुणी कैदी पळून गेला तर आपल्याकडल्यासारखी चौकशी करत बसत नसत. तर ज्या शिपायाचा कैदी पळून गेला असेल त्यालाच त्या कैद्याच्या जागी डाबत ! किती सोपा मार्ग ! पण त्यामुळे सगळे शिपाई आपआपल्या कैद्यावर अगदी डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवत.

आमचा मित्र ज्या तुरुगात होता, त्याला पुलेचरखी म्हणत कारण त्या नावाचं तुरुंगा-जवळच एक खेडं होत हा तुरुग दाऊदखाननं दोन-तीन वर्षांपूर्वी आपल्या विरोधी असणाऱ्या राजकीय कैद्याकरता म्हणून मुद्दाम बांधून घेतला होता त्यात इथ असलेल्या हिंदी आर्किटेक्ट-इजिनियर्सच खूप साहाय्य झालं होतं ह्या सगळ्या गोष्टींचा पाकिस्ताननं खूप गवगवा केला होता व हिंदुस्थानवर टीकेची झोड उठवली होती

ज्या दाऊदखाननं आपल्या प्रतिस्पर्ध्यांकरता हा तुरुग बाधला, त्यातच कम्युनिस्ट-सत्ता आल्यानंतर दाऊदचेच मन्त्री, अधिकारी लोक डांबले गेले ! गोतास काळ म्हणतात ना ? तो असा !

जुना शहरवाल तर गेला होताच पण त्याच्या आजारी मुलाला मी मदत केली होती तो प्रेसिडेन्ट पण बदलला गेला त्याच्या जागी सैन्यातला एक मेजर नेमला गेला हा

पठाण होता व पठाणासारखा उंच-निंच, दिसायला उमदा, प्रसिद्ध इटालियन नट मॅस्ट्रोनिनी-सारखा, तो मेजर रुजू झाल्यावर मी बनवलेल्या इंडस्ट्रियल इस्टेटीच्या नकाशाचा विषय निघाला नव्या सरकारला ह्या योजनेला प्राधान्य द्यायचं होतं माझे नकाशे त्याच्या मनाविरुद्ध बोर्डानं पास केले होते ह्याचा पोक्रोस्कीच्या पोटात राग होताच आता तर काय? त्याच्या चुलतभावाचं म्हणजे अफगाण कम्युनिस्टांचं राज्य आलं होतं त्यामुळे शौरवी लोकांचा जोर वाढला होता. त्यांच्या वागण्या-बोलण्यातही फार फरक पडला होता. सत्ताधारी लोक वागतात तसे ते उर्मटपणे वागत

मीटिंगला आम्ही तिघंच होतो प्रेसिडेन्ट, पोकोस्कि आणि मी. पोक्रोस्कीनं माझ्या नकाशांवर कडाडून टीका केली मुद्दे पूर्वीचेच होते. त्याचं सांगून झाल्यावर पोकोस्कि तिथं एक मिनिटही थांबला नाही. जणू काही निर्णय त्यानं घ्यायचा होता, तो त्यानं घेतला होता आता त्याची फक्त अमलबजावणी मी आणि प्रेसिडेन्टनं करायची होती

पोक्रोस्कि गेल्यावर मी माझी योजना प्रेसिडेन्टला समजावून सांगितली रस्ते चौराही का ठेवले नाही आहेत, मधे मधे ठेवलेल्या बगिच्यांचा फायदा काय— वगैरे वगैरे खोलात जाऊन सांगितलं. माझं म्हणणं त्याला पटलेलं दिसलं पण शौरवी आर्किटेक्टसूच्या मनाविरुद्ध जायचं कसं? असा प्रश्न त्याला पडला असावा. कारण थोड्या वेळ तो काही बोललाच नाही. नंतर तो म्हणाला, "तुझ्या नकाशांप्रमाणच काम होऊ दे."

आणि पुढल्या आठवड्यातच तो 'हार्ट-ॲटॅक'नं वारल्याचं कळलं!

ह्या नव्या कम्युनिस्ट राज्यात 'हार्ट-ॲटॅक'चा अगदी साधा सरळ अर्थ झाला होता तो म्हणजे गोळी घालून ठार मारलं जाणं. अर्थात माझ्या योजनेला संमती दिली होती, म्हणून त्याला 'हार्ट-ॲटॅक' आला होता असं म्हणता यायचं नाही दुसऱ्याही काही बाबतीत त्यानं 'पोक्रोस्कि'चा सल्ला ऐकला नसेल, कदाचित् जास्तची स्वतंत्र वृत्ती दाखवली असेल

आमच्या ऑफिसमध्ये सगळ्यात जास्त जर करुणास्पद स्थिती कुणाची असेल तर ती सिराज ह्या एकेकाळच्या अमीरपुत्राची.

हा सिराज म्हणजे अमीर हबिबुल्लाचा मुलगा व अमानुल्ला ह्या १९१९ ते १९२९ ह्या काळातल्या अमीराचा पुतण्या अमानुल्ला हा फार प्रगत विचाराचा होता प्रगत विचाराच्या राजांचं जे होतं तेच अमानुल्लाचं झालं. मुल्ला-मौलवींनी त्याच्या विरुद्ध सामान्य जनतेला भडकावलं व त्याला गादी सोडायला लागली.

तर त्या अमानुल्लाच्या पुतण्याची ही कथा हा आर्किटेक्ट होता एका अमेरिकन युनिव्हर्सिटीचा गोल्ड मेडॅलिस्ट होता त्याचा एक भाऊ भारतात व एक इराणमध्ये राजदूत होता घरी बायकोमुलं व पचाऐंशी वर्षांची म्हातारी आई. खरं म्हणजे हा राजघराण्यातला असल्यामुळं मारला जायचा पण कोण्या एके काळी लेनिननं अमानुल्लाचं कौतुक केलं होतं आता लेनिननं कौतुक केलेला अमीराच्या पुतण्याला मारणार कसं? नवी

राजवट आल्यावर त्याचे राजदूत भाऊ परस्पर बेपत्ता झाले होते

नव्या सरकारनं सिराजला जीवानिशी मारलं जरी नाही तरी त्याला मानाचं जिणं काही जगू दिलं नाही. क्रांती होण्याच्या आधी सिराज सरकारी हौसिंग फायनान्स बँकेचा अध्यक्ष होता त्या वेळी मी त्याला त्याच्या ऑफिसात बऱ्याच वेळा भेटलो होतो काय त्याचा त्या वेळी रुबाब! भारीपैकी गालिचे घातलेली मोठी खोली त्यात अत्याधुनिक फर्निचर. त्याच्या खुर्चीच्या मागे दाऊदखानच एक भलं मोठं तैलचित्र लावलं होत. काही महिन्यांपूर्वी आशियन बँकेचे काही परदेशी अधिकारी आले असता, त्याना व सिराजला मी घरी जेवायला बोलावलं होत.

ह्या हौसिंग फायनान्स बँकेच्या एके काळच्या अध्यक्षाला नवीन सरकारनं साधा ड्राफ्टस्‌मन बनवून टाकलं होतं व आमच्या ऑफिसात पाठवून दिलं होत फक्त थोडी मेहेरबानी म्हणून त्याला अगदी हॉलमध्ये बसवलं नव्हत तर एक छोटीशी खोली दिली होती

त्या खोलीत बसून सिराज दिवसभर नकाशे, पर्स्पेक्टिव्हज् वगैरे काढत बसलेला असे. त्याच ड्रॉइंग वर्क चागलं होत, तसच आर्किटेक्चरच ज्ञानही चागलं होतं हे सगळ असलं तरी आला तो वाळीत टाकल्यासारखा होता. नव्या सरकारचा रोष होईल ह्या भीतीनं अफगाण त्याच्या बाजूलाही फिरकत नसत शौरवींचा तर प्रश्नच नव्हता. बाकी हिन्दी सहकाऱ्याना सिराजमध्ये वा त्याच्या कामामध्ये रस नव्हता. मी मात्र त्याच्याकडे बऱ्याच वेळा जात असे

राजकारण, नवं राज्य ह्या विषयावर आम्हाला बोलण शक्यच नव्हतं. तरी पण बोलायला पुष्कळ विषय असायचे राजघराण्यातला असल्यामुळ सिराजला शिकारीचा फार नाद होता शिकारीच्या कितीतरी गोष्टी तो मला सांगत असे. अफगाण पक्के निशाणबाज असतात ह्याचा त्याला फार अभिमान होता. तो म्हणायचा,

" एका गोळीत एक सावज टिपायचं, एक माणूस मारायचा, ह्यात काय कौशल्य आहे? आम्ही अफगाण एकेका गोळीत दोन-दोन, तीन-तीन माणस मारतो "

सिराज एकदा त्याच्या अमेरिकेतल्या शिक्षणाचे अनुभव सांगत होता त्या वेळी तो 'अफगाणी' हे आडनाव लावत असे, त्यामुळे तोंडी परीक्षेच्या वेळी त्याला पहिल बोलावलं गेलं परीक्षकांनी त्याला C + मार्क दिले पण आणखी काही विद्यार्थ्यांचं काम बघून त्याचे B + केले आणि सगळ्यांच काम बघितल्यावर त्याला A + दिलेच, पण त्या वर्षीच गोल्ड मेडल पण दिलं. हे सगळं तो रंगवून रंगवून सागत होता.

त्याला अमेरिकेत मिळालेले हे यश व आत्ताची ही अपमानास्पद स्थिती माझ्या मनात डाचत होतीच तेव्हा माझ्या तोंडून 'मग तुम्ही अमेरिकेतच का नाही सेटल झालात?' हा प्रश्न निघून गेला

हा प्रश्न ऐकताच त्या पन्नाशीला आलेल्या धिप्पाड पठाणाच्या डोळ्यात अगदी अश्रू

उभे राहिले पण त्यानं स्वतःला लगेच सावरलं व म्हणाला,

"रानडे, मला वाटलं होतं की आपण परत आपल्या देशात जाऊन अफगाणांचं भलं करावं. आपल्या शिक्षणाचा आपल्या देशाला फायदा झाला नाही तर त्याचा काय उपयोग? म्हणून परत आलो. भविष्यात असं काही वाढून ठेवलं असेल ह्याची मला काय कल्पना?"

सिराज अनपेक्षितपणे गंभीर झालेला पाहून मला काय करावं हे सुचेना. ह्या विषयावर जास्त बोलणं शक्यच नव्हतं, तसंच तिथून लगेच उठून जाणंही अवघड होतं. आम्ही काही न बोलता एकमेकांच्या नजरा चुकवत बसून राहिलो.

अफगाणाचं मत सिराजबद्दल तेवढसं चांगलं नव्हतं. त्याची अपेक्षा अशी की सिराजनं नव्या राजवटीविरुद्ध काहीतरी करावं. जनतेचा नव्या कम्युनिस्ट राजवटीविरुद्ध लढा उभारण्यात पुढाकार घ्यावा. पण तसं काही करण्याची सिराजची वृत्ती नव्हती, तो त्याचा पिंड नव्हता.

आमच्या कचेरीत तीन-चार पोट विभाग होते. प्रत्येक विभागाच्या मुख्याला मूदीर म्हणत. नव्या राजवटीबरोबर एक नवी आणि चांगली गोष्ट झाली. अमीना नावाची एक तरुण मुलगी एका विभागाची मूदीर म्हणून नेमली गेली. ती सिव्हिल इंजिनियर होती. उंच, सडसडीत, काळीसावळी पण खूप स्मार्ट. आपल्याकडल्या इसाई मुलींसारखी त्यांच्या-सारखेच फ्रॉक व स्कर्ट घालायची.

उंच टाचेचे बूट घालून ही टॉक-टॉक करत जाऊ येऊ लागली की, आमच्या ऑफिसचा पच्याहत्तरीला आलेला मुख्य चपरासी बाबा वहिद 'आता काही ह्या देशाचं खरं नाही' ह्या अर्थी मान हलवत असे.

बाबा वहिद हा खेड्यातल्या अफगाणाचा जणू काही प्रतिनिधीच होता. हा सत्तर पंचाहत्तरीचा माणूस उंचापुरा व दणकट शरीराचा होता. खरं म्हणजे कोणाही अफगाणा-बद्दल बोलताना उंचापुरा, दणगट वगैरे म्हणायची गरजच नाही, ह्याला अपवाद म्हणजे हाजरा लोकांचा.

बाबा वहिदनं आत्तापर्यंत खूप जग पाहिलं होतं. त्यात राज्यकर्ते मारले जाऊन त्यांच्या जागी नवे येणं, मोठ्या प्रमाणात खून-खराबा होणं वगैरे गोष्टी होत्या. पण असं कुणी मुलीनं मूदीर होणं त्यानं पूर्वी कधी पाहिलं नव्हतं. प्रेसिडेन्टच्या खोलीबाहेरच्या स्टुलावर बसून जगातल्या घडामोडींकडे किलकिल्या नजरेनं तो स्थितप्रज्ञासारखा पाहात राहात असायचा. हे सगळं असलं तरी तो फार कडवा होता.

डॉ. नूरजाद शहरवाल असतानाची गोष्ट. नूरजाद आमच्या खोलीत आमच्याबरोबर काही कामाचं बोलत होता. प्रेसिडेन्ट पण तिथं होता. तेवढ्यात बाबा वहिद काहीतरी निरोप घेऊन आला. त्या वेळी बाबा वहिद व शहरवालमध्ये काय बोलणं झालं ते कळलं

नाही, पण बघता-बघता शहरवाल तडकला व त्यान बाबा वहिदच्या चार पाच थोबाडीत लगावल्या पण बाबा वहिदच्या तोंडातून हुं की चु निघालं नाही परत शहरवालनं चार-दोन थपडा लगावल्या, त्यावर बाबा वहिद काहीतरी पुटपुटला

झालं, ते ऐकल्यावर शहरवाल चवताळलाच. तो थपडा, लाथा, बुक्क्या जस मारता येईल तस मारू लागला बाबा वहिदच्या तोंडातून रक्त यायला लागल. तरी तो पुटपुटायचं थांबला नाही व शहरवाल मारायच. आम्हाला काय कराव ते कळेना ऑफिसमध्ये अशी मारझोड झालेली आम्ही कधी पाहिली नव्हती. बरं मध्ये पडून काही बोलाव आणि शहरवालन आमचाच अपमान केला तर ?

शहरवालच मारणं चालू होत व बाबा वहिदच पुटपुटत उभं राहणं शेवटी प्रेसिडेन्टन मनाचा हिय्या केला व शहरवालच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, "जाऊ द्या, शहरवालसाहेब, ह्या खेडवळाच्या काय नादी लागता ?" शहरवालही मारून मारून दमला होताच, तेव्हा त्यानं प्रेसिडेन्टचा सल्ला मानला

शहरवाल, प्रेसिडेन्ट व बाबा वहिद निघून गेल्यावर आम्ही अफगाण सहकाऱ्यांना एवढ झालं तरी काय, म्हणून विचारले त्यांनाही नक्की काय झालं ते सांगता येईना. पण त्याचा अंदाज असा की बाबा वहिद शहरवालच्या वडिलाबद्दल काहीतरी बोलला असणार बाबा वहिद आणि शहरवाल दोघही पगमान ह्या खेड्यातले, तेव्हा बाबाला शहरवालच्या कुटुंबाबद्दल सगळी माहिती असणार

असा तो बाबा वहिद आता नव्या राज्यकर्त्यांबरोबर व स्त्री मूदीराबरोबर जमवून घेत होता

अमीना तराकीच्या म्हणजे खल्क पक्षाची. पहिल्या दिवशी दाऊदची चित्रं काढून टाकणं, त्या जागी तराकीच लावण, नतर क्रांतीची मोठाली पोस्टर्स लावणं, पक्षाच्या ध्येय-धोरणाबद्दलच्या पत्रिका नोटिस बोर्डावर लावण ह्यात फार धडाडीन अमीनान भाग घेतला होता एखाद्या विजयी कमांडरसारखी ती कचेरीत फिरत असे.

एका मोठ्या शॉपिंग सेंटरच डिझाईन करण्याच्या निमित्तानं तिची माझी ओळख झाली व पुढे जवळीक निर्माण झाली ती स्वत: चांगली इंजिनियर होती व मीही काही कमीतला नव्हतो त्यामुळे नंतर आमची मैत्री झाली एकदा मी तिला म्हटलं, "अमीना, तुझी यादगार म्हणून मला तुझा एखादा फोटो देना "

"एक का चागले दहा देईन" अमीना थोडं गंभीरपणे म्हणाली, "पण तुझ्या बायकोनं माझा फोटो तुझ्याकडे पाहिला तर ? - 'टोटा टोटा मेशा' " म्हणजे ती तुझे तुकडे तुकडे करेल त्याच काय ?" व मोठ्यानं हसली

"तेही खरच !" मी तेवढ्याच गंभीरपणे म्हणालो व तिच्यापेक्षा मोठ्यान हसलो

पुढे अमीनाचे दिवस बदलले तराकी मारला गेल्याचं कळल्यावर ती दिवसभर रडली असावी, असं तिच्या सुजलेल्या डोळ्यांवरून वाटत होतं तराकी गेला अन् अमीन आला

ज्या अमीनानं तराकीचे फोटो इतक्या उत्साहानं लावले होते, त्या अमीनालाच ते फोटो काढायला लागले व त्या जागी अमीनचे फोटो लावायला लागले असा प्रसंग वैऱ्यावरही येऊ नये, नाही ?

राज्य कुणाचही असो वा कोणतीही परिस्थिती असो, मला नव्या कल्पनांचा कधी तुटवडा पडला नाही नव्या राजवटीत एक स्त्री मंत्री होती बेगम तराकी व बेगम अमीन बऱ्याच कार्यक्रमाना हजर राहात असत व त्याला खूप प्रसिद्धीही दिली जात असे. हे बघून डोक्यात आले की प्रतिभानं बेगम तराकीची मुलाखत का घेऊ नये ? तसा तडक मी बी. सिंगाकडे गेलो त्यानाही कल्पना आवडली व मुलाखतीची वेळ ठरवण्याचं व दुभाषा देण्याचं मान्य केलं, पण शेवटपर्यंत मुलाखत मिळाली नाही ती नाहीच.

प्रतिभाचं अफगाणिस्तानातल्या राजकीय घडामोडींबद्दल लिखाण 'महाराष्ट्र टाईम्स' व 'माणूस'मध्ये प्रसिद्ध झाल होत. तिच्या लिखाणाचा एकंदर सूर नव्या रजवटीच्या विरुद्धचा असे काही वेळा तिची भाषा फार कडक होत असे आपण सरकारी नोकर, सरकारनं आपल्याला इथ पाठवलेलं भारत सरकारची काहीही परवानगी वगैरे न घेता केलेल्या ह्या लिखाणाची पुढे मागे काही डोकेदुखी तर होणार नाही ना ? हा विचार मनात येताच तडक वकिलातीत गेलो व त्या स्मार्ट सरदार दुय्यम सचिवाला भेटलो

' हे बघ, तू सरकारी नोकर आहेस, त्यामुळे तुझ्यावर काही बंधनं आहेत " दुय्यम सचिव सागू लागला, " पण मिसेस रानाडे भारताची स्वतंत्र नागरिक आहे तिला योग्य ते ती लिहू शकते. "

" पण ती नव्या कम्युनिस्ट सरकारविरुद्ध लिहिते, इथ काबूलमध्ये राहून " परत माझं म्हणण मी मांडल.

" म्हणून काय झालं ? ते इथं लिहिलं गेल असलं तरी छापल तर हिंदुस्थानात जातं ना ? मग झालं तर ! "

" पण ह्या सरकारला ते आवडलं नाही तर ? " परत मी.

" तर ह्या सरकारन त्या लिखाणाला अफगाणिस्तानात यायला बंदी घालावी तिच्या लिखाणाला अफगाण सरकारच काय, पण वकिलात वा भारत सरकारही बंदी घालू शकत नाही. "

हे सगळ ऐकून माझ्या चेहऱ्यावर उमटलेलं आश्चर्य पाहून तो पुढे म्हणाला,

" रानाडे ह्यात आश्चर्य वाटण्यासारख काही नाही भारताच्या प्रत्येक नागरिकाला विचार व भाषणस्वातंत्र्य आहे पण म्हणजे नक्की काय आहे हे आपल्याला भारतात असेपर्यंत कधी कळत नाही पण असे काही प्रसंग आले म्हणजे ते कळत व त्या स्वातंत्र्याचं महत्त्वही लक्षात येत "

नवी राजवट आल्यापासून बहुतेक परदेशी नागरिक काबूल सोडून जाऊ लागले होते. त्याचप्रमाणे परदेशी सरकारांच्या संस्थाही बंद करण्यात आल्या होत्या ब्रिटिश कॉन्सिलची लायब्ररी बंद झाली तशी अमेरिकन सेंटर पण बंद झालं तिथले सगळे अमेरिकी आपल्या मायदेशी परत गेले असं होता होता सगळे अमेरिकी, ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन, कॅनेडियन लोक अफगाणिस्तान सोडून निघून गेले चिनी पूर्वीच गेले होते पाकिस्तानी इथं कधी नव्हतेच म्हणजे परदेशी असे राहिले ते फक्त हिंदी व शौरवी.

"तुम्ही आमचे मित्र आहात त्याच्यापेक्षा शौरवींचे मित्र आहात, म्हणूनच तुम्ही इथं टिकून आहात." एक अफगाण तरुण रागाच्या भरात आम्ही असंच काही बोलत असता चिडूनच म्हणाला.

त्याचं म्हणणं खरं असल्यामुळं मला उलट रागावताही येईना आम्ही नॉन् अलाईड आहोत म्हणून कितीही बोम्ब ठोकत असलो तरी सगळं जग आम्हाला नुसते रशियाच्या बाजूचेच नव्हे तर त्याच्या ताटाखालचे मांजर समजतात नाहीपेक्षा अमेरिकेच्या घूसखोरीविरुद्ध आवाज उठवणारे आमचे पंतप्रधान रशियाच्या घूसखोरीविरुद्ध चूप बसतेना

आधीच अफगाणांच भारतीयाबद्दलच 'ताटाखालच मांजर' हे मत व राग त्यात डॉ. रमेशचंद्र नावाच्या माणसान तेल ओतल हा डॉक्टर भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कुठल्यातरी गटाचा होता त्याच नाव आम्ही पूर्वीही कधी ऐकल नव्हतं व नंतरही कधी ऐकलं नाही त्याची इथल्या टीव्हीवर मुलाखत झाली त्यात त्यानं नव्या सरकारची भरमसाट स्तुती केली, तोंड भरून कौतुक केल

दुसऱ्या दिवशी कचेरीत गेलो तो सगळी माणसं आमच्यावर जाम चिडलेली. "ह्या माणसाला भारतात काही महत्त्व नाही, खर म्हणजे कम्युनिस्ट पक्षालाच मुळी भारतात महत्त्व नाही, तिथं त्याच्या एका कार्यकर्त्याला काय असणार?" असा आम्ही त्यांना उलट प्रश्न करून त्याचं सात्वन केल

ऑफिसात काही काम करत होतो तर प्रतिभाचा फोन आला, "पुण्याचे ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते हरिभाऊ जोशी व मुंबई 'सकाळ'चे संपादक माधव गडकरी इथं आले आहेत वकिलातीत थांबले आहेत तर त्यांना आपल्या घरी घेऊन ये." तसाच वकिलातीत गेलो व त्याना घरी चलण्याचा आग्रह केला त्या दोघाचीही आमची पूर्वीची ओळख नव्हती त्यामुळ त्यांना संकोच वाटणं साहजिकच होत त्यांच म्हणण असं की, "आम्हाला कोठल तरी चागल हॉटेल सुचवा, आम्ही तिथं राहू"

माधव गडकऱ्यांना हॉटेलात राहण शक्य होत पण हरिभाऊसारख्या पंच्याहत्तर-ऐंशी वर्षांच्या गांधीवादी वयस्क माणसाला ते कसं शक्य होतं? ते पक्के शाकाहारी असणरा

ज्या अमीनानं तराकीचे फोटो इतक्या उत्साहानं लावले होते, त्या अमीनालाच ते फोटो काढायला लागले व त्या जागी अमीनचे फोटो लावायला लागले असा प्रसंग वैऱ्यावरही येऊ नये, नाही ?

राज्य कुणाचही असो वा कोणतीही परिस्थिती असो, मला नव्या कल्पनांचा कधी तुटवडा पडला नाही नव्या राजवटीत एक स्त्री मंत्री होती. बेगम तराकी व बेगम अमीन बऱ्याच कार्यक्रमाना हजर राहात असत व त्याला खूप प्रसिद्धीही दिली जात असे. हे बघून डोक्यात आले की प्रतिभानं बेगम तराकीची मुलाखत का घेऊ नये ? तसा तडक मी बी. सिंगांकडे गेलो त्यांनाही कल्पना आवडली व मुलाखतीची वेळ ठरवण्याचं व दुभाषा देण्याचं मान्य केलं, पण शेवटपर्यंत मुलाखत मिळाली नाही ती नाहीच.

प्रतिभाचं अफगाणिस्तानातल्या राजकीय घडामोडींबद्दल लिखाण ' महाराष्ट्र टाईम्स ' व ' माणूस 'मध्ये प्रसिद्ध झालं होत. तिच्या लिखाणाचा एकंदर सूर नव्या रजवटीच्या विरुद्धचा असे. काही वेळा तिची भाषा फार कडक होत असे आपण सरकारी नोकर, सरकारनं आपल्याला इथ पाठवलेल भारत सरकारची काहीही परवानगी वगैरे न घेता केलेल्या ह्या लिखाणाची पुढे मागे काही डोकेदुखी तर होणार नाही ना ? हा विचार मनात येताच तडक वकिलातीत गेलो व त्या स्मार्ट सरदार दुय्यम सचिवाला भेटलो

" हे बघ, तू सरकारी नोकर आहेस, त्यामुळे तुझ्यावर काही बंधन आहेत " दुय्यम सचिव सांगू लागला, " पण मिसेस रानाडे भारताची स्वतन्त्र नागरिक आहे तिला योग्य ते ती लिहू शकते. "

" पण ती नव्या कम्युनिस्ट सरकारविरुद्ध लिहिते, इथ काबूलमध्ये राहून " परत माझं म्हणणं मी मांडलं.

" म्हणून काय झालं ? ते इथ लिहिलं गेल असल तरी छापल तर हिंदुस्थानात जात ना ? मग झाल तर ! "

" पण ह्या सरकारला ते आवडलं नाही तर ? " परत मी

" तर ह्या सरकारनं त्या लिखाणाला अफगाणिस्तानात यायला बंदी घालावी. तिच्या लिखाणाला अफगाण सरकारच काय, पण वकिलात वा भारत सरकारही बंदी घालू शकत नाही. "

हे सगळं ऐकून माझ्या चेहऱ्यावर उमटलेलं आश्चर्य पाहून तो पुढे म्हणाला,

" रानाडे ह्यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही भारताच्या प्रत्येक नागरिकाला विचार व भाषणस्वातन्त्र्य आहे. पण म्हणजे नक्की काय आहे हे आपल्याला भारतात असेपर्यंत कधी कळत नाही. पण असे काही प्रसग आले म्हणजे ते कळत व त्या स्वातन्त्र्याचं महत्त्वही लक्षात येतं. "

नवी राजवट आल्यापासून बहुतेक परदेशी नागरिक काबूल सोडून जाऊ लागले होते त्याचप्रमाणे परदेशी सरकारांच्या संस्थाही बंद करण्यात आल्या होत्या ब्रिटिश कॉन्सिलची लायब्ररी बंद झाली तशी अमेरिकन सेंटर पण बंद झाल तिथले सगळे अमेरिकी आपल्या मायदेशी परत गेले असं होता होता सगळे अमेरिकी, ब्रिटिश, फ्रेंच, जर्मन, कॅनेडियन लोक अफगाणिस्तान सोडून निघून गेले चिनी पूर्वीच गेले होते पाकिस्तानी इथं कधी नव्हतेच म्हणजे परदेशी असे राहिले ते फक्त हिंदी व शौरवी.

" तुम्ही आमचे मित्र आहात ह्याच्यापेक्षा शौरवींचे मित्र आहात, म्हणूनच तुम्ही इथं टिकून आहात " एक अफगाण तरुण रागाच्या भरात आम्ही असच काही बोलत असता चिडूनच म्हणाला.

त्याचं म्हणणं खरं असल्यामुळ मला उलट रागावताही येईना. आम्ही नॉन् अलाइड आहोत म्हणून कितीही बोम्ब ठोकत असलो तरी सगळं जग आम्हांला नुसते रशियाच्या बाजूचेच नव्हे तर त्यांच्या ताटाखालचे मांजर समजतात नाहीपेक्षा अमेरिकेच्या घूसखोरीविरुद्ध आवाज उठवणारे आमचे पतप्रधान रशियाच्या घूसखोरीविरुद्ध चूप बसतेना

आधीच अफगाणाच भारतीयाबद्दलच ' ताटाखालच मांजर ' हे मत व राग त्यात डॉ रमेशचद्र नावाच्या माणसान तेल ओतल हा डॉक्टर भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या कुठल्यातरी गटाचा होता त्याचं नाव आम्ही पूर्वीही कधी ऐकलं नव्हतं व नंतरही कधी ऐकलं नाही त्याची इथल्या टीव्हीवर मुलाखत झाली. त्यात त्यान नव्या सरकारची भरमसाट स्तुती केली, तोंड भरून कौतुक केलं.

दुसऱ्या दिवशी कचेरीत गेलो तो सगळी माणसं आमच्यावर जाम चिडलेली " ह्या माणसाला भारतात काही महत्त्व नाही, खर म्हणजे कम्युनिस्ट पक्षालाच मुळी भारतात महत्त्व नाही, तिथं त्यांच्या एका कार्यकर्त्याला काय असणार ? " असा आम्ही त्याना उलट प्रश्न करून त्यांचं सात्वन केलं

ऑफिसात काही काम करत होतो तर प्रतिभाचा फोन आला, " पुण्याचे ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्ते हरिभाऊ जोशी व मुबई ' सकाळ 'चे संपादक माधव गडकरी इथ आले आहेत वकिलातीत थांबले आहेत तर त्यांना आपल्या घरी घेऊन ये. " तसाच वकिलातीत गेलो व त्यांना घरी चलण्याचा आग्रह केला त्या दोघाचीही आमची पूर्वीची ओळख नव्हती त्यामुळं त्यांना संकोच वाटणं साहजिकच होत त्याच म्हणण असं की, " आम्हांला कोठल तरी चागलं हॉटेल सुचवा, आम्ही तिथ राहू. "

माधव गडकऱ्यांना हॉटेलात राहणं शक्य होत पण हरिभाऊसारख्या पच्याहत्तर-ऐंशी वर्षांच्या गांधीवादी वयस्क माणसाला ते कसं शक्य होतं ? ते पक्के शाकाहारी असणरा

आणि इथं तर भाजीसुद्धा जनावरांच्या चरबीत बनवतात. तेव्हा मी त्याना म्हटलं, "आमचा इथं मोठा बंगला आहे, तो असताना तुम्ही हॉटेलात काय म्हणून राहणार ?" व त्या दोघांना घरी घेऊन आलो.

हरिभाऊ खास गांधीवादी इतकं वय झालं होतं तरी आवाज खणखणीत होता व बुद्धीचा तीव्रपणा थोडाही कमी झाला नव्हता. खान अबदुल गफ्फारखानना भेटायला म्हणून हरिभाऊ आले होते गफ्फारखान जलालाबादला होते त्या वेळी जनता राज्य होत व मोरारजी पंतप्रधान होते.

दुसऱ्या दिवशी बी. सिंगाची व हरिभाऊची गाठभेट झाली. भारत सरकारची निदान बी. सिंगाची इच्छा हरिभाऊंनी गफ्फारखानांना भेटू नये अशी होती त्याचं एक कारण असं असावं की नव्या राजवटीला गफ्फारखानानी पाठिंबा दिला असल्यामुळे ते अफगाणात फार अप्रिय झाले होते तेव्हा हरिभाऊनी गफ्फारखानाची भेट न घेणं बरं असं राजदूतानी थोडं हुषारीनं सुचवलं. त्यावर हरिभाऊ खणखणीत आवाजात म्हणाले, "तुम्ही अगदी स्पष्टपणे जरी नाही म्हणालात, तरी मी जाणार म्हणजे जाणार मग तुम्हाला काय करायचं असेल ते करा "

आता बिचारा राजदूत तरी काय करणार ? दुसऱ्या दिवशी हरिभाऊ व गडकरी स्पेशल टॅक्सी करून जलालाबादला गेले. माझी आणि प्रतिभाची त्यांच्या बरोबर जाऊन गफ्फारखानाना भेटण्याची फार इच्छा होती. पण सरकारी नोकराला परदेशात असताना असं मनात आलं की कुठही थोडच जाता येत ? तेसुद्धा गफ्फारखानाना भेटण्याकरता ? पुढले दोन दिवस प्रतिभा मनाशी खूप तळमळली. आयुष्यात कधी न येणारी संधी हुकली ह्याचं तिला खूप वाईट वाटलं.

पण तिची व गफ्फारखानाची भेट व्हायची होती हेच खरं. दोन दिवसांनी हरिभाऊ व गडकरी परत आले ते गफ्फारखानांच्या गाडीतून व त्यांच्या बरोबरच. गडकऱ्यांना व हरिभाऊना आमच्या घराशी सोडून गाडी पुढे जाणार होती गाडी आमच्या दाराशी येताच खाली उतरून गडकरी लगबगीन घरात आले व बाहेर गफ्फारखान गाडीत बसले आहेत, लवकर चला, म्हणून सांगू लागले. प्रतिभा पण तितक्याच लगबगीन बाहेर आली. "ही माझी इयली मुलगी " हरिभाऊंनी प्रतिभाची ओळख करून दिली. प्रतिभान खूप आग्रह केल्यावर गफ्फारखान घरात आले ते बाहेर काही खात नसत, तेव्हा प्रतिभाने त्यांच्या हातावर चिमूटभर साखर ठेवली ती मात्र त्यानी खाल्ली थोडा वेळ थांबले, प्रतिभाशी बोलले व निघून गेले.

हे सगळं मी ऑफिसात असताना घडलं. घरी आलो तर प्रतिभाचा चेहरा अत्यंत प्रफुल्लित व काही महत्त्वाचं घडलं आहे असा. आधीच प्रतिभाला कोणतीही गोष्ट अगदी रंगवून रंगवून सांगण्याची मोठी हौस, त्यात खान अबदुल गफ्फारखानासारखा थोर माणूस प्रत्यक्ष घरी येऊन गेलेला, मग रंगवण्याबद्दल काय विचारता ?

"अरे मुकुंदा, इतका गोरापान व लालबुन्द माणूस मी कधी पाहिलाच नव्हता जवळ जवळ सहा साडेसहा फूट उंच, भव्य माणूस पण त्याच्या चेहऱ्यावर इतका मृदू भाव. त्यांच्याशी शेक-हँड केला एवढा नव्वद एक वर्षांचा पण काय त्याचे बळकट पंजे आणि एक एक पंजा तरी कसला, वाघासारखा." वगैरे वगैरे

आम्ही भारताच्या अगदी पूर्वेला होतो, म्हणजे मणिपूरला होतो. त्या वेळी सरसंघचालक श्री. गोळवलकर गुरुजी आमच्याकडे चहाला आले होते. आता पश्चिमेला असताना गफ्फारखान येऊन गेले. त्या योगायोगाच आमच आम्हालाच कौतुक वाटलं.

हरिभाऊ व गडकरी काबूलला असतानाच पख्तुनिस्तान दिवस साजरा झाला हा दिवस पख्तुनिस्तानला पाठिंबा देण्याचा दिवस म्हणून पाळतात. पख्तून म्हणजे पठाण. वायव्य सरहद्द प्रांतात व अफगाणिस्तानात बरेच पठाण आहेत. त्या सगळ्यांच एक राष्ट्र बनवाव अशी गफ्फारखानाची मागणी होती अफगाणिस्तानच्या आतापर्यंतच्या सरकारांनी व आत्ताच्या कम्युनिस्ट सरकारनी पण ह्या मागणीला पाठिंबा दिला होता त्यामुळे तो दिवस मोठ्या उत्साहान साजरा झाला पख्तुनिस्तान चौकात मोठी सभा झाली, भाषण झाली आम्ही सगळे त्या समारंभाला गेलो होतो

हरिभाऊ व गडकरी होते ते चार-पाच दिवस फार मजेत गेले गडकरी माझ्याच वयाचे व मोठे आनंदी वृत्तीचे. त्याचा अनुभवही मोठा दांडगा. त्यामुळ गप्पा-गोष्टी खूप रंगत हरिभाऊना चांगल ऐकू येत नसे, त्यामुळे बरीच गंमत उडायची ह्या गांधीवाद्याना चुकवून बीअर वगैरे घ्यायची म्हणजे आमची चांगलीच पंचाईत व्हायची

नव राज्य आल तसं नव्या राज्यकर्त्यांपैकी कोणाच्यातरी डोक्यात आल की आता 'लाल' राजवट आली आहे तर सगळीकडलं वातावरण अगदी लाले-लाल व्हायला हवं. झाल, लगेच फर्मान निघालं की सगळ्या दुकानाना लाल रंग दिला पाहिजे अन् आतापर्यंत सगळ्या टॅक्सी पिवळ्या-काळ्या होत्या त्यांनाही लाल रंगात रंगवल पाहिजे. नाहीतर ? तुरुंगवास वा 'हार्ट-ॲटॅक' हे पक्क होत

बिचाऱ्या दुकानदारांनी व टॅक्सीवाल्यानी हुकुमाप्रमाण लाल रंग द्यायला सुरुवात केली. काही टॅक्सीज तशा लाल रंगविल्याही गेल्या त्या इतक्या भयाण दिसत होत्या की विचारू नका. पण त्याचा विचार करत कोण ?

देवाच्या दयेन काबूल शहरातला लाल रंगच संपला ! सगळ्या दुकानाना व टॅक्सीजला देण्याइतका लाल रंग गावात असण कस शक्य होईल ? मग ते लोक सरकारकडे गेले, तेव्हा कुठे तो हुकूम फिरवला गेला ज्या टॅक्सीवाल्यानी आपल्या टॅक्सींना लाल रंग दिला होता, त्याना परत काळा-पिवळा रंग द्यायला लागला

हे टॅक्सीजना व दुकानांना लाल रंग देण्याच चालल होत तसंच राष्ट्रध्वज बदलण्याच

पण चालल होत आतापर्यंत अफगाणिस्तानचा राष्ट्रध्वज लाल, काळा व हिरव्या रंगाचा होता अमीर जाहीरशहाच्या वेळी त्यावर गरुडाचं चित्र होत दाऊदखानच्या वेळी ते राजचिन्ह गेलं व त्या जागी तारा व कणसाची पाती आली, बाकी झेंडा तसाच राहिला होता

नव्या सरकारनं आपला झेंडा संपूर्ण लाल रंगाचा व त्यावर एक तारा व खल्क लिहिलेला असं करायच ठरवल २२ ऑक्टोबर हा ' रोज-ए-बैराग ' म्हणजे ध्वजदिन म्हणून पाळला जाईल असं फक्त दोन दिवस आधी जाहीर केल. लगेच त्या दोन दिवसांत उत्सवाची तयारी पूर्ण केली गेली. त्या दिवशी ठिकठिकाणाहून नवीन ध्वज हातात घेऊन मिरवणुका निघणार होत्या कचेरीतल्या सगळ्याना त्यात भाग घेण जरुरीच केलं गेल होत

त्याच दिवशी आमची मुलगी पुण्याहून दिल्लीमार्गे काबूलला येणार होती एक बर होत, ते म्हणजे तिच विमान दुपारी साडेतीन चारच्या सुमाराला येणार होत रोज ए-बैरागच्या मिरवणुका सकाळी निघणार होत्या, तेव्हा संध्याकाळपर्यंत सगळ वातावरण शात होऊन रस्ते मोकळे व्हायला हरकत नव्हती पण समजा सकाळी काही गडबड झाली तर ? मग आम्ही विमानतळावर जाणार कसे ? व मुलीला आणणार कसे ? ही चिंता आम्हाला पडली होती

पण तस वेडवाकड काही झाल नाही चागल्या भरघोस मिरवणुका निघाल्या तुकड्या-तुकड्यांनी लोक जात होते आमच्या ऑफिसची पण तुकडी होती. आमचा मेजर प्रेसिडेंट ' हार्ट-फेल 'न गेल्यानंतर पार्टीचा एक पक्का कार्यकर्ता प्रेसिडेन्ट झाला होता तो रशियात इंजिनिअरिंगच शिक्षण घेऊन आला होता तो मोठा कडवा वाटायचा. त्याची बायको रशियन होती

हा नवा प्रेसिडेंट आमच्या ऑफिसच्या टोळीचं नेतृत्व करत होता ऑफिसमध्ये रुबाबात फिरणारा हा गृहस्थ हातात झेंडा घेऊन नारे लगावत असल्याच पाहून आम्हाला खूप आश्चर्य व वेगळ वाटत होतं हिंदुस्थानात कोणी सरकारी अधिकाऱ्यानं असं मिरवणुकीत भाग घेतल्याचं आम्ही कधी बघितल नव्हत आपल्याकडे पक्ष वेगळा व सरकार वेगळ असत कम्युनिस्ट राज्यात पक्ष आणि सरकार एकसध असतो.

आम्ही मिरवणुका बघायला गेलो होतो आमच्या ऑफिसची तुकडी आली त्या वेळी मी पुढे हो न प्रेसिडेंटशी हातमिळवणी केली मिरवणुकीचे पुष्कळ फोटो घेतले जात होते. आमच्या ऑफिसच्या तुकडीचे फोटो मी प्रेसिडेंटला मला द्यायला सागितले दोन-तीन दिवसानी त्याने मोठ्या उत्साहात मला फोटो आणून दिले त्या बिचाऱ्याला काय कल्पना की हेच फोटो छापून प्रतिभा त्यांच्याच पार्टीच्या विरुद्ध लिहिणार आहे म्हणून ?

दुपारी मी व मुलं विमानतळावर गेलो मुलगी घरी येणार, मग ती सासरहून येवो वा होस्टेलमधून येवो, मन कसं आनंदान भरून येतं योग्य वेळी विमान आल. विमानतळा-वरचे सोपस्कार आटोपून आम्ही टॅक्सीतून घरी यायला निघालो सकाळच वातावरण

आता नसल तरी ठिकठिकाणी लावलेल्या पताका, ठिकठिकाणी लावलेले नवे लालभडक बैराग अजूनी तसेच होते

मी ड्रायव्हरजवळ बसलो होतो व मुल मागे "सकाळच्या मिरवणुकीला तू गेला होता की नाही ?" ड्रायव्हरला बोलता करण्याच्या दृष्टीन मी त्याला विचारल तो प्रश्न विचरताच दिवाळीतला भुसनळा आग लावताच जसा उसासून पेटून उठतो, तसा तो अफगाण ड्रायव्हर तडकून उठला

"ही काय पद्धत झाली ? जगात काय राज्य बदलत नाहीत ? तुमच्याकडले इंद्रा गांधीच सरकार गेलं, दुसरं आल पण त्यानी काय आपला बैराग बदलला ?" तो मोठा उद्दीपत होऊन बोलत होता. शेवटी त्याला टॅक्सी चालवणं अगदी अशक्य झाल, तेव्हा त्यान टॅक्सी रस्त्याच्या एका बाजूला नेऊन थाबवली व म्हणाला, "आम्ही अफगाण म्हणजे गांधीलमाश्यासारखे आहोत एक एक जण असं चावून चावून त्यांचा 'मुर्दा मेशा' म्हणजे त्यांना मारून टाकू"

त्या टॅक्सीवाल्यानं म्हटल होत तसच झाल अफगाण गांधीलमाश्यासारखे सरकारला कायम चावत राहिले. ह्या ध्वजबदल अफगाणांनी मनाला फार लावून घेतला होता. ध्वजा-बरोबर त्याचा अभिमान जोडला गेला होता, आणि ज्या गोष्टीबरोबर अभिमान जोडला आहे, त्याकरता माणूस काय वाटेल ते करायला तयार होतो

दाऊदखान, त्याचे सहकारी मंत्री, त्याचे नातेवाईक इत्यादी लोकाच्या घरातले कपडे-लत्ते, इलेक्ट्रिकची उपकरणे, शिकारीची साधन, काचेच्या मौल्यवान वस्तू वगैरेंच प्रदर्शन भरवाव असं नव्या राज्यकर्त्यांच्या डोक्यात आलं. हेतू हा की पूर्वीची राज्यकर्ती मंडळी किती ऐश्वर्यात व छानछोकीत राहात होती ते जनतेला कळावं जुन्या सत्ताधारी लोकाची व नातेवाइकाची घर घेऊन तिथ सरकारी कचेऱ्या उघडल्या होत्या. आता त्या घरातल्या सामानाच प्रदर्शन करून व नतर विकून त्या सामानाची विल्हेवाट लावली जाणार होती. कदाचित असं प्रदर्शन रशियन राज्यक्रांतीनतर भरवल गेल असेल, व त्याचा हवा होता तो परिणामही झाला असेल. कारण रशियाचा झार ही फार मोठी बलाढ्य सत्ता होती. त्याचे प्रासाद, राहणी-साहणी खरंच मोठ्या ऐश्वर्याची होती विलासी जीवन म्हणजे काय ? त्याचं झार उत्तम उदाहरण होत

पण अफगाणिस्तानातले राज्यकर्ते त्या वर्गातले नव्हते आम्ही ते प्रदर्शन पाहायला गेलो होतो आपल्याकडल्या मोठ्या जमीनदारांच्या घरातून ज्या तऱ्हेच्या गोष्टी आढळतात तसल्या गोष्टी दाऊदखान व त्याच्या नातेवाइकांच्या घरातून होत्या. ते प्रदर्शन पाहून पूर्वीचे राज्यकर्ते फार ऐश्वर्यात राहात होते असा कुणाचाही समज झाला नसता. त्या प्रदर्शनाचा उलटाच परिणाम झाला. अफगाणाना हे नीच मनोवृत्तीच प्रदर्शन वाटल.

चागले व मध्यम वर्गीय अफगाण त्या प्रदर्शनाकडे फिरकलेसुद्धा नाहीत गरीब अफगाणांनी माञ भारी कपडे व इतर वस्तू कमी किंमतीत मिळत होत्या त्याचा फायदा घेतला

ह्याच सुमाराला अटलबिहारी वाजपेईंच काबूलला आगमन झाल वाजपेई जनता सरकारात परराष्ट्र व्यवहार मत्री होते इथ कम्युनिस्ट राजवट आल्यानंतर भारताच्या वरिष्ठ मंत्र्याची ही प्रथमच भेट होत होती. इथल्या हिंदी समाजाकडून त्यांना 'हॉटेल काबूल'च्या हिरवळीवर खाना दिला जाणार होता त्या आधी त्यांचं तिथंच भाषण पण होणार होत

हा सगळा कार्यक्रम बेशिस्तीचा चागला खरं म्हणजे वाईट नमुना होता वाजपेई 'हॉटेल काबूल'ला आले तेच मुळी चांगले पाऊण तास उशिरा आणि वर त्याची भाषणबाजी

परदेशात गेलं व तिथ भारतीयाना पाहिल की आपल्या नेत्याना काय चेव येतो कळत नाही आपल्याला आधीच पाऊण तास उशीर झाला आहे तर वाजपेईंनी आपलं भाषण आवरत घ्याव की नाही ? पण तस कुठल व्हायला ? त्यांनी चांगल तासभर भाषण केलं. मागे इदिराजी आल्या होत्या, त्याचंही असच तासच्या तास भाषण झाल होत.

वाजपेई अस्तान्या सावरून बोलायला लागले ते आवरेचनात ! "लोक मला विचारतात की मी कधी पूर्वी मंत्री होता का म्हणून मी सागतो की मी मंत्री काय पण सत्री सुद्धा नव्हतो" हे व असे वर विनोद ! व लोकांचा हशा !

आता मंत्री पाऊण तास बोलल्यानंतर आपण निदान अर्धा तास तरी बोललं पाहिजे अशी राजदूतांची कल्पना असावी खरं म्हणजे त्यांनी मत्री महोदयाचे आभार मानायचे व मोकळ व्हायच पण ते सोडून बी सिंग मंत्र्यांच्या भाषणाला उत्तर द्यायला लागले.

झालं काय होत की वाजपेई विमानतळावर आले त्या वेळी काही हिंदी लोकांनी निदर्शने केली होती त्यांचं म्हणणं अस की बी सिंग त्याना भेटत नाहीत टाळाटाळ करतात आपल्या भाषणात वाजपेईंनी आपण राजदूताना सगळ्यांना भेटत चला म्हणून सूचना दिल्याच सांगितल. राजदूत बी सिंग सगळ्यांना आवर्जून भेटत असत, त्यामुळे ते वाजपेईंच्या भाषणान तडकले व 'आत्तापर्यंत मी माझा ७५ टक्के वेळ लोकांना भेटण्यात घालवत होतो, आता १०० टक्के घालवेन व बाकीची काम सहाय्यकावर सोडेन' अस त्यांनी उत्तरात सागितल

राजदूताना सूचना दिल्याचं वाजपेईंनी जाहीर सभेत सांगितलं हे त्यांचं चुकलंच पण शेवटी ते एक मत्री होते आणि राजदूत सनदी नोकर आपल्या मत्र्याला त्यांचाच राजदूत जाहीर सभेत उत्तर देतो आहे, असं कधी न दिसणारं दृश्य त्या दिवशी दिसल. वर ह्यात वाजपेईंना काही गैर वाटल नाही त्यांच्या जागी सरदार पटेल वा गोविंद वल्लभ पंत असते

तर त्यांनी बी सिंगाची तिथल्या तिथंच बोळवण केली असती जनता पक्षाचे सरकार सगळ्या दृष्टीनं कच्चं आहे, असं त्या वेळी माझं मत झालं.

वाजपेईंचे व राजदूताचे असे वाग्युद्ध चाचलं होतं तर आमच्या सलिम अलीचा व ' हॉटेल काबूल 'च्या मॅनेजरचा जीव वेगळ्या कारणाकरता खालीवर होत होता सलिम अल्लीकडे जेवणाची व्यवस्था दिली होती त्याला ७–३० वाजता जेवण तयार ठेवायला सांगितलं होतं. आता ८–३० वाजत आले होते तरी त्यांची भाषणं संपत नव्हती.

" बाकीच्या देशाचे मंत्री व राजदूत अगदी ठरलेल्या वेळेवर येतात, वेळेवर भाषणं संपवतात व ठरल्या वेळी जेवणाला सुरुवात करतात," हॉटेलचा मॅनेजर सलिम अलीला म्हणाला "आता जेवण थंड झालं म्हणजे मला बोलणी बसतील, तेव्हा मी जातो." असं म्हणून तो निघून गेला तो गेला तरी सलिम अली इंडियन एयर लाईन्सचा माणूस असल्यामुळे जाऊ शकत नव्हता तो माझ्याजवळ वाजपेईंना व राजदूतांना शिव्या मोजत राहिला

भाषण संपताच सगळे हिंदी बांधव जेवणावर असे काही तुटून पडले की जेवण थंड होतं की गरम होतं हे त्यांच्या लक्षातही आलं नाही कोणत्याही पार्टीतून आपण लोक जेवणावर कसे तुटून पडतो ते अगदी पाहण्यासारखं असतं जसं काही कित्येक वर्षांत ही मंडळी जेवली आहेत की नाहीत असा बघणाऱ्याला प्रश्न पडावा

वाजपेईंबरोबर एक मोठी मनोरंजक व्यक्ती आली होती ती म्हणजे दिल्लीच्या नव-भारत टाईम्सचा उपसंपादक हे पूर्वीचे जनसंघाचे कार्यकर्ते, त्यामुळे वाजपेईंच्या जवळचे असाच काळा-सावळा, पाच सव्वापाच फूट उंचीचा, तल्लख व मोठा मिश्कील हिंदी बोलणारा लगेच आम्ही त्यांना जेवायला बोलावलं आधीच त्यांना मराठी स्वैपाक आवडायचा, त्यातून प्रतिभानं मराठी पद्धतीची कढी केली होती त्यांना ती इतकी आवडली की त्यांनी न लाजता कढीचे भांडे मागून घेतलं व तेवढंच न लाजता ते चाटून पुसून खाल्लं

प्रतिभाची कढी जशी चविष्ट होती तसंच त्यांच्या गप्पा पण चविष्ट व रुचकर होत्या. वाजपेई व ते एके काळी खाकी अर्ध्या चड्ड्या घालून इंदूरमध्ये असताना शाखेवर गेलेले त्यांनी वाजपेईंच्या पुष्कळ गोष्टी सांगितल्या

" मी वाजपेईंना नेहमी सांगतो," ते आम्हाला सांगू लागले, " की प्रकाश वीर शास्त्री वारले ते बरंच झालं, नाही तर तुमचं दुकान कधीच उठलं असतं "

कम्युनिस्ट राजवटीचे नवे नवे अनुभव येत होते एक साईट बघायला जायचं होतं म्हणून मी नव्या शहरवालकडे गेलो त्या वेळी तो काही कागदपत्र पाहात होता, सह्या करत होता.

" मी एवढं काम संपवतो, तोपर्यंत तू चहा घे " त्याचं सह्या करणं व माझं चहा

पिणं संपलं. तो उठला तसा मी पण उठलो. त्याने आपल्या टेबलाचा ड्रॉवर उघडला. मला वाटलं की पेन नाहीतर उन्हाचा चष्मा घेत असणार. पण कुठलं पेन आणि कुठला चष्मा. त्यानं ड्रॉवरमधून चक्क एक पिस्तुल काढलं व कोटाच्या आतल्या खिशात ठेवून दिलं

मला एकदम धक्काच बसला एक तर आपण असं पिस्तुल वगैरे कधी बघितलेलं नसतं आणि दुसरं असं मनात आलं की ह्यानं पिस्तुल घेऊन स्वतःच्या रक्षणाची सोय केली पण माझं काय? ह्याच्याबरोबर आहे म्हणुन मी नाहक मारला जायचा

कचेरीतून कुणी गायब होणं, कोणालाही वजारते दाखल्यात बोलावून नेणं, त्या माणसाचं परत न येणं हे नित्याचं होऊन बसलं कोणी असा गायब झाला तर त्याची साधी चौकशीसुद्धा कुणी करत नसत कारण चौकशी करणाराच उचलला जाण्याचा संभव होता संभवच का, अगदी खात्री होती

दोनच वर्षांपूर्वी ह्या अफगाण लोकांत भीतीचं नामोनिशाणही नाही आहे, असं मी त्याचं कौतुक केलं होतं आता तिथंच भीतीचं साम्राज्य पसरलं होतं. कुणीही कुणाशीही मोकळेपणानं बोलत नसे किंवा मनातले विचार सांगत नसे कम्युनिस्ट राजवट अशी असते तर? पूर्वी असंच रशियात झालेलं व चाललेलं कथा-कादंबऱ्यातून व पुस्तकातून वाचलं होतं पण वाचण्यात व स्वतः बघण्यात जमीनअस्मानाचा फरक असतो.

ऑफिसमध्ये काही भोळी तरुण मुलं होती कम्युनिस्ट राज्य आले आहे म्हणजे काय झालं आहे ह्याची त्यांना काहीच कल्पना नव्हती त्यातला एक जण मला म्हणाला, “ आम्ही इंग्रजांना खडे चारले आहेत, तर ह्या शौरवी लोकाचं काय चालू देणार आहोत? वर्षा दोन वर्षांत आम्ही त्यांना बाहेर काढू ”

“ हे बघ इंग्रजांच्या वेळची परिस्थिती वेगळी होती ” मी त्याला समजावून सांगत म्हणालो, “ इंग्रजाविरुद्ध तुम्ही सगळे अफगाण एकत्र झाला होतात आता तुमच्यातलेच कम्युनिस्ट पर्चीय त्याना मदत करताहेत तर तुमचा निभाव लागणार तरी कसा?

“ दुसरं, अफगाणिस्तान जिंकण्याचा इंग्रजांनी अगदी मनापासून असा कधी प्रयत्न केलाच नाही त्यांच्यातच त्याबाबत दुमत होतं. पण आता रशिया आपली सगळी शक्ती पणाला लावून सत्ता गाजवू पाहात आहे आणि रशिया फार बलवान आहे ”

“ मग हे आता असंच राहणार ? ” तो उद्विग्नपणे म्हणाला

“ असच राहणार नाही, त्याच्याही पुढं जाईल उजबेगीस्तानसारखं अफगाणिस्तान एक सोव्हिएट रिपब्लिक म्हणून रशियात सामावून घेतील ”

त्याचा चेहरा साफ उतरला पण मी तरी ह्यापेक्षा वेगळं काय सांगणार? रशियानं गिळंकृत केलेला अफगाणिस्तान हा काही पहिला देश नव्हता

मागे मी केलेल हौसिंग प्रोजेक्ट आता मागे पडलं, त्याप्रमाणे त्या मोठ्या पार्कचं काम पण मागे पडलं नव्या सरकारकडे तेवढा पैसाच नव्हता पण त्यानी इंडस्ट्रियल इस्टेटचा प्रकल्प राबवण्याचं ठरवलं

त्या मेजर प्रेसिडेन्टच्या जागी पार्टीचा एक खास कार्यकर्ता प्रेसिडेन्ट म्हणून आला. हा उंचीला कमी पण चांगला मजबूत बांध्याचा होता. त्याच्या भुवया जाड्याभरड्या तसंच त्याच्या मिश्यासुद्धा. एकदरच तो जाडाभरडा होता रशियात शिकून आलेला व तेथून रशियन बायको घेऊन आलेला तो अमीनचा माणूस होता

एक दिवस इंडस्ट्रियल इस्टेटच्या नकाशाबद्दल चर्चा करायला बसलो तो आणि मी पोक्रोस्कि वगैरे कुणी नव्हतं मी नकाशामागची कल्पना समजावून सांगू लागलो तर मला लगेच थांबवून तो म्हणाला, " मला हे सगळ समजावून सांगण्याची गरज नाही शौरवी लोकांनी सांगितल्याप्रमाणं नकाशे बनवायला हवेत. " हे सगळं तो फार कडकपणे बोलत होता

" मग त्याच्याकरता माझी काय गरज आहे ? " मी थोडं रागावूनच विचारलं

तेव्हा थोडं नरमून तो म्हणाला, " नाही, नाही, तुझ्या मार्गदर्शनाची गरज आहे तर वरच्या स्तरावर सगळे इंडस्ट्रियल इस्टेटचे नकाशे शौरवींच्या पॅटर्नप्रमाणे करायचं ठरलं आहे. त्यात तू थोडी आपली कल्पना लढव साधारण किती वेळ लागेल ? "

" त्यात वेळ काय लागायचा ? " मी उठत म्हटलं, " उभ्या अन् आडव्या रेषा तर मारायच्या आहेत दोन तीन तास लागतील "

माझ्या बोलण्यातली खोच त्याच्या लक्षात आली की नाही, का लक्षात येऊनसुद्धा त्यानं तसं काही दाखवलं नाही, ते कळलं नाही

माझी योजना हे लोक मानत नाहीत हे बघून मला खूप राग आला व त्या रागातच मी बी. सिंगांकडे गेलो " तुम्ही मंत्री महोदयांकडे जा, सदर-ए-रियासतकडे जा व माझी योजना स्वीकारली गेली पाहिजे असा आग्रह धरा " अशी त्याना गळ घालू लागलो.

" रानडे साहाब, ऐसे कैसे हो सकता है ? " सिंगानी मलाच उलट प्रश्न केला

" क्यु नहीं हो सकता है ? " मी माझ्याच रागात होतो

" आम्हाला सल्लागार म्हणून घेतात, आम्ही चांगल्या योजना बनवतो, तर त्या सगळ्या ह्या शौरवी लोकांच्या सल्ल्यानुसार कचऱ्याच्या टोपलीत टाकून देतात ह्याचा अर्थ काय ? तुम्ही ह्याबाबत काहीतरी करायला पाहिजे "

" अरे, मी त्याच्याकडे जाऊन आमच्या आर्किटेक्टचा सल्ला तुम्ही मानलाच पाहिजे असं कसं सांगू ? तू योग्य तो सल्ला दिला आहेस ना ? मग तुझं काम संपलं तुझा सल्ला घेणं न घेणं हे त्याच्या मनावर आहे. मी ह्याबाबत कुणाला काही सांगू शकणार नाही "

बी सिंगांच म्हणणं बरोबर होतं सल्लागार फक्त सल्ला देऊ शकतो. तो घेतलाच पाहिजे असं सरकारवर बंधन नसतं खरं म्हणजे हे सगळं मला माहीत होतं पण रागाच्या

भरात मी माझी सल्लागाराची भूमिका विसरूनच गेलो होतो माझा राग आता निवळला होता मी निघालो तेव्हा श्री सिंग म्हणाले,

"अरे, जिथ आता सगळं राज्यच मुळी शौरवी लोकांच्या सल्ल्यानुसार चाललं आहे, तिथ तुझ्या इंडस्ट्रिअल इस्टेटच्या नकाशांची कोण पर्वा करणार आहे ?"

"खर आहे ते" हे म्हणायचसुद्धा मला भान राहिल नाही मी त्यांच्या खोलीतून मोठ्या उदासपणे बाहेर पडलो.

शहरवालनं आम्हाला सगळ्या हिंदी सहकाऱ्यांना सहकुटुंब रात्रीच जेवायला बोलावलं होत जेवण बाबूरशहा बागेतल्या भव्य दिवाणखान्यात होत

बाबूरशहा बाग ही नुसतीच बाबराच्या नावाची नाही आहे तर ती बाबरनं स्वत बसवलेली आहे, काबूल शहराजवळच्या एका टेकडीच्या पायथ्याशी ही काहीतरी सोळाव्या शतकातली गोष्ट.

चारही बाजूला मातीच्या उचच उच भिंती, आत टप्प्याटप्प्यानी बसवलेल्या बागा पायवाटांचे चौक व चौका-चौकात पाण्याची कारंजी गर्द छाया देणारी झाड, गुलाबांचे ताटवे, उचच उच सुरूची झाड, वाहत्या पाण्याचा गुंजारव, ह्यामुळं इथं आल्यावर बाहेरचं जग विसरायला होतं

बाबरान काबूल सोडलं व हिंदुस्थानात जाऊन तिथं साम्राज्य स्थापन केल तरी त्याच मन ह्या बागेतच गुंतून पडल होत बायकाच मन कसं माहेरात गुतून पडलेलं असतं तस बाबर आग्र्याला वारला व त्याचं तिथच दफन करण्यात आल. आपल दफन काबूलच्या ह्या बागेत करावं अशी इच्छा बाबरान आपल्या मरणाच्या वेळी व्यक्त केली होती त्याच्या इच्छेप्रमाण त्याचे कलेवर आग्र्याहून इथे आणून त्याच परत दफन करण्यात आल होत

बाबरान आपल्या थडग्यावर मजार वगैरे काही बाधू नये अस स्पष्ट बजावल होत. त्याला उघड्यावरचं मोकळ आयुष्य आवडत असे व मेल्यावरसुद्धा आपण तसच उघड्यावर पडून राहावं अशी त्याची इच्छा होती पण नंतर कोणीतरी तिथ चार खांब उभारून त्यावर छत टाकलच.

बाबराइतकाच हुमायून व शहाजहानला पण ह्या बागेत रस होता दोघेही बागेला भेट देऊन गेले होते व बऱ्याच सुधारणा करवून घेतल्या होत्या शहाजहानन तर एक लहानशी संगमरवरी मशीद पण बाधली नतरची कित्येक वर्षे अफगाणिस्तानात राजकीय स्थैर्य नव्हतं त्यामुळ ह्या बागेकड खूप दुर्लक्ष झाल जेव्हा अबदुर रहमान एकोणवीस शतकाच्या मध्याला अमीर झाला, त्या वेळी त्यान बागेत लक्ष घातलं व बागेच्या मध्यभागी एक मोठा पॅव्हेलियन म्हणजे एक मोठा व्हरांडा असलेला हॉल बांधला

त्या पॅव्हेलियनमध्येच आज आमचे जेवण होते रशियन ऑक्टोबर क्रांतीचा वाढदिवस

साजरा होणार होता हिंदी, शौरवी व अफगाण मिळून आम्ही काहीतरी ३०–३५ माणसं होतो बियर ही दारू समजली जात नसल्यानं तिचा मोठ्या प्रमाणावर खप होत होता प्रथम शहरचाल बोलला त्याच्या भाषणात नूर अहंमद तराकीच नाव आलं की सगळे अफगाण जोरजोरात टाळ्या वाजवत व 'हूरा ! हूरा !' असे नारे लगावत. रशियन क्रांतीच्या वेळी पण असेच नारे लगावले गेले होते म्हणून इथं पण तसाच नारा. असे जेवणाच्या टेबलावर बसून नारे लगावल्याचं आम्ही पूर्वी कधी पाहिल नव्हत. त्यामुळे आम्ही त्याच्याकडे मोठ्या अचंबित नजरेन पाहात राहिलो होतो.

नतर जेवण आल तोच अफगाण पुलाव व चुलाव. तीच अप्रतिम चव कम्युनिस्ट राज्य आलं तरी अफगाण स्वैपाकाची चव बदलली नव्हती हे नशीबच समजायला हव

अफगाणिस्तानात बनवलेली जहुदा पहिलीच फीचर फिलम आम्ही पाहायला गेलो. डायरेक्टर व प्रोडयूसर पुण्याच्या फिल्म इन्स्टिटयूटचा माजी विद्यार्थी होता फिल्म तयार करायला दाऊदखानच्या वेळेपासून सुरुवात झाली होती क्रांतीमुळ रुकावट आली होती व काम थाबलं होतं थोडं स्थिरस्थावर झाल्यावर ती फिल्म पुरी करण्यात आली होती

सत्यजित रेचा परिणाम भारतातल्या पुष्कळ दिग्दर्शकावर पडलेला आहे, तसा तो ह्या दिग्दर्शकावर पण पडलेला दिसला ह्या सिनेमाची गोष्ट कोणा जमीनदाराची होती त्याच्या विरुद्ध काही तरुण उठाव करतात व शेवटी त्याला ठार मारतात गोष्ट अशी असल्यामुळ दाऊद सरकारनंही त्याला विरोध केला नव्हता व आताच्या कम्युनिस्ट सरकारनही केला नाही

तो डायरेक्टर शिक्षणाकरता पुण्याला चार वर्षं राहिला असल्याकारणान त्याला थोड मराठी कळू लागलं होत त्यामुळे त्याच्याशी आमची खूप जवळीक निर्माण झाली सिनेमा पाहिल्या दिवसानंतर त्याची आमची तीन-चार वेळा भेट झाली पुण्यात असताना त्याच कुणा जोशी नावाच्या मुलीवर प्रेम बसलं होतं. अगदी लग्न करण्यापर्यंत त्या मुलीची तयारी होती पण त्याचं काही लग्न होऊ शकल नाही प्रेमाला हा सफल न होण्याचा शाप आहे की काय कळत नाही

पण नंतर वाटल की झालं ते बरंच झाल हा अफगाण तरुण कितीही चागला व सुस्वभावी असला तरी ह्या अफगाणांचा नुसता धर्मच वेगळा अस नाही, तर त्याची संस्कृती वेगळी, समाज वेगळा पुण्याच्या त्या ब्राह्मण मुलीचा इथ कसा निभाव लागला असता ? सगळ आयुष्य तिनं इथं कस काढल असत ?

त्या तरुणानं काढलेला सिनेमा फार काही चालला नाही कसा चालावा ? जिथ हेमा-मालिनी–धर्मेन्द्र व राजेश खन्ना–शर्मिला टागोरचे सिनेमा लोकाना पाहायला मिळत होते, तिथं सत्यजित रे पद्धतीचा जमीनदाराच्या जुलमावरचा चित्रपट कसा चालावा ?

हिंदी सिनेमाचं वेड मध्य व पूर्व आशियात फार आहे. त्या सिनेमांना आपण कितीही

नाव ठेवली तरी, हिंदी प्रचाराच फार मोठ काम आपले सिनेमा करतात हे विसरून चालायचं नाही हिंदी सिनेमाबद्दल बोलाव तेवढ थोड आहे

एकदा आम्ही राजेश खन्नाच्या सिनेमाला गेलो होतो प्रतिभाच्या शेजारी एक वयस्क अफगाण बाई बसली होती मध्यंतरात प्रतिभाचं व तिच बोलणं सुरू झाल. " तुम्हाला राजेश खन्ना कसा वाटतो ? " प्रतिभानं तिला सहज विचारल

" चांगला आहे " ती वयस्क म्हणाली व पुढ जोडल, " पण त्याला काही देव आनंदची सर नाही. "

प्रतिभा आपली चाट !

प्रसिद्ध पार्श्वगायक मुकेश वारला त्या दिवशी चहा व सिगरेट न पिणारा एक तरुण अफगाण आम्हाला भेटला.

मध्ये केव्हातरी नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनचे काही अधिकारी अफगाणिस्तानात कोणत्या फिल्म्स पाठवाव्यात ह्याची अफगाण अधिकाऱ्याबरोबर दुय्यम सचिवाच्या खोलीत चर्चा करीत होते तेवढ्यात मी तिथ जाऊन पोहोचलो अफगाण अधिकाऱ्यांनी काहीतरी दहा-बारा फिल्म्स निवडल्या पण त्याचा हेका ' शोले 'करता चालला होता पण ती फिल्म अजूनी कॉर्पोरेशनकडे आली नव्हती. त्यामुळे ते काही ती फिल्म देऊ शकत नव्हते. " शोले मिळत नसेल तर मग ह्या सगळ्या व्यवहाराचा फायदा काय ? " एक अफगाण अधिकारी मोठं खजील होऊन म्हणाला

हिन्दी सिनेमा घराघरातून किती शिरला आहे, ह्याची बरीच उदाहरण देता येतील

आमच्या शेजारी एक नवीन अफगाण जोडप राहायला आलं नवरा चागला वयस्क व पहिल्या बायकोपासूनची चार मुल असलेला ही बायको चांगली तरुण व चांगली मर्दानी आणि भारदस्त, म्हणजे एका दृष्टीत मावणार नाही अशी हिन्दी सिनेमे बघून बघून ती चांगल हिन्दी बोलू लागली होती

" आपके पति कौनसे दफ्तरमें काम करते हैं ? " एक दिवस तिने प्रतिभाला विचारलं. प्रतिभा आपली बुचकळ्यात कारण नवऱ्याला पती पण म्हणतात हे ती साफ विसरून गेली होती पती शब्दाचा अर्थ लक्षात आल्यावर प्रतिभेने, " मेरे पति शहरवालीमें काम करते हैं " म्हणून उत्तर दिल

इतक्या खोल हिंदी सिनेमांच्या पाण्यात डुबलेल्या बाईच शेवटी काय होणार ते ठरलेलच होतं. एक दिवस ती आपल्या प्रियकराबरोबर पळून गेली व तिचा म्हातारा नवरा तिला शिव्या घालत राहिला.

हिंदी सिनेमामुळ बायका इतक्या जरी धीट झाल्या तरी पुष्कळ झाल. नाहीपेक्षा ही बाई आयुष्यभर त्या म्हाताऱ्याचा ससार व त्या चार मुलांची देखभाल करत राहिली असती

नव्या कम्युनिस्ट सरकारने आता बुनियादी गोष्टींकडे लक्ष द्यायला सुरुवात केली होती त्यांना माहीत होत की आपल्या कल्पनेप्रमाणे राष्ट्र घडवायचं असेल तर प्रथम शिक्षणपद्धती आपल्या विचारांप्रमाणे आखली पाहिजे तेव्हा पहिलं पाऊल म्हणजे बाकी देशाचे शिक्षण-तज्ज्ञ काढून टाकून तिथं शौरवी तज्ज्ञ आणायचे. अर्थात भारतीय तज्ज्ञ राहणार होतेच इंग्रजी शिक्षण चालू राहणार होत पण ते रशियन लोकांच्या सल्ल्यानुसार व त्यांच्या पद्धतीने त्याप्रमाणे शौरवी शिक्षणतज्ज्ञ आले व कामाला सुरुवात झाली पहिली पायरी म्हणजे सगळ्या विषयावरची पुस्तकं नव्याने लिहून घ्यायची अगदी बाराखडीच्या पुस्तकापासून सुरुवात झाली

शौरवी, अफगाण व हिंदी तज्ज्ञ नवं बाराखडीचं पुस्तक तयार करायला बसले A, B, C वगैरे अक्षराबद्दल काही घोळ झाला नाही. प्रश्न पडला तो Q अक्षर आलं तेव्हा. Q ला साधारणपणे क्विन म्हणजे राणी हा शब्द वापरतात पण आता कम्युनिस्ट राज्यात ‘राणी’ हा शब्द कसा वाचणार ? ‘राणी’ हा शब्द सुचवणार कोण ? आणि सुचवल्यावर शौरवी नाराज झाले म्हणजे ?

अफगाण तज्ज्ञांना काय करावं सुचेना. हिंदी तज्ज्ञ चूप बसलेले शौरवी तज्ज्ञात एक महिला होती ती म्हणाली, “ तुम्हाला इतका प्रश्न का पडला आहे ? Q करता QUEEN हा शब्द वापरा की, आहे काय त्यात एवढं ? ”

तिचं ते बोलणं ऐकताच सगळ्यांनी अगदी सुटकेचा निःश्वास टाकला

एके दिवशी दुपारी मोठी अघटित घटना घडली आम्ही असेच काम करत होतो तर एक अफगाण सहकारी अगदी धावत धावत आला व ‘हॉटेल काबूल’मध्ये अमेरिकन राजदूत मिस्टर डब्जला गोळ्या घालून ठार मारल्याचे सांगू लागला.

हा डब्ज म्हणजे मोठा उस्ताद व वस्ताद माणूस त्यानेच चिली देशातली कम्युनिस्ट राजवट उलथून पाडण्यात फार मोठा हातभार लावला होता.

त्याची नुकतीच काबूलला बदली झाली होती. म्हणजे येथली कम्युनिस्ट राजवट उलथून टाकण्याकरताच त्याची बदली झाली होती म्हणतांना येथले सरकार व शौरवीही हे चांगले जाणून होते.

डब्जने काबूलला येताच आपल्या कारवायांना सुरुवात केली क्रांतिविरोधी पुढाऱ्यांना भेटणं वगैरे सुरु केलं त्या दिवशी दुपारी डब्ज ‘हॉटेल काबूल’मध्ये कोणा बडखोर पुढाऱ्याला भेटायला आला होता.

अफगाण सरकारच्या लोकांना व रशियन्सना ते कळलं लगोलग ते ‘हॉटेल काबूल’-जवळ पोहोचले पण सरळ मुख्य दारातून व जिन्याने वर जाणे शक्यच नव्हतं. एक तर तिथे अमेरिकन शस्त्रधारी लोक असण्याचा संभव होता व डब्जला त्याचा सुगावा लागला

असता तर तो तिथून निसटून जाण्याची शक्यता होती

'हॉटेल काबूल'च्या समोरच बँके मिलीची इमारत होती डब्ज् हॉटेलच्या डाव्या बाजूच्या दुसऱ्या मजल्यावरच्या एका खोलीत वाटाघाटी करत बसला होता. रशियन् सैनिक बँकेच्या दुसऱ्या मजल्यावर गेले व तिथल्या खिडकीतून गोळ्यांचा वर्षाव करून डब्ज्, त्याचे सहकारी व अफगाण विरोधी नेत्यांना ठार मारून टाकल

मी कचेरीतून घरी आलो प्रतिभेला ही बातमी कळली होतीच चहा वगैरे पिऊन झाल्यावर आम्ही 'हॉटेल काबूल'च्या भागाकडे गेलो रस्त्यावर सुनसुनाट होता. 'हॉटेल काबूल'वरून आम्ही दोन-चार चकरा मारल्या पण तिथं काही तासापूर्वी इतका मोठा उत्पात झाला आहे ह्याच्या काहीही खुणा नव्हत्या एकदा वाटल की हॉटेलात जाऊन त्या खोल्या वगैरे पाहाव्यात पण धर्म कळता कर्म उभ राहायच म्हणून तो विचार सोडला व सरळ घरी आलो

ह्या प्रकरणाबाबत अफगाण सरकारकडून बरीच उलटसुलट पत्रक निघाली पण अमेरिकन सरकारकडून मात्र अगदी एकही पत्रक निघाल नाही अगदी त्यांचा एवढा राजदूत मारला जाऊनसुद्धा! राजदूताने करू नये त्या गोष्टी त्याचा राजदूत करत होता. तेव्हा त्यावर अमेरिकन सरकार पत्रक तरी काय काढणार? व अफगाण सरकारचा निषेध तरी कसा करणार?

अगदी पहिल्यापासूनच अमेरिकचं अफगाणिस्तानबद्दलच धोरण फार धरसोडीच व गोंधळाचं राहिलं आहे कदाचित अफगाणिस्तानला भौगोलिक परिस्थितीमुळे आलेलं महत्त्व अमेरिकेच्या लक्षात आल नसाव.

किसिंजर अमेरिकेचा सेक्रेटरी ऑफ स्टेट असताना तो एक दिवसाकरता काबूलला आला होता पण तो सगळा दिवस त्यानी बुदकशी नावाचा एक अफगाण खेळ असतो तो पाहण्यात घालवला होता त्या वेळेपासूनच जर अमेरिकेचं काही पक्कं धोरण असत तर पुढले बरेच प्रसग टळले असते. (कदाचित जास्त प्रसंगही उभे राहिले असते )

म्हणजे ज्या वेळी काही करता येण्यासारख होत त्या वेळी अमेरिकेन काही केल नाही आणि सगळ झाल्यावर आपल्या राजदूताकरवी राज्यसत्ता उलथण्याचा उगाचच प्रयत्न केला. ह्या सगळ्यात अमेरिकेचा काही फायदा तर झाला नाहीच, मात्र डब्ज् आपल्या जिवाला नाहक मुकला.

ह्या प्रसंगानतर बी. सिंगानी वकिलातीत आमच्या काही दहा बारा वरिष्ठ आयटेक अधिकाऱ्यांची एक बैठक घेतली. सगळ्या घडामोडीची पार्श्वभूमी सांगितली व "तुम्ही सगळ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी फार काळजीपूर्वक राहायला हव" असा सल्ला पण दिला

"आपण अफगाणाचे मित्र राष्ट्र आहोत बडखोर अफगाण कम्युनिस्ट सरकारला

पेचात आणण्याकरता तुमच्यापैकी कोणालाही पळवून नेण्याचा संभव आहे " बी सिंग पुढे सांगत होते " कारण त्यामुळे त्याना आपले तुरुगातले सहकारी सोडवून घेण्याकरता अफगाण सरकारवर दबाव टाकता येईल

" त्यातल्या त्यात तुमच्यातले जे आय् ए. एस् अधिकारी आहेत म्हणजे ह्या माथूर वा चंद्रासारखे, त्यांनी ह्या रानाडेपेक्षा जास्त काळजी घ्यायला हवी कारण उद्या एखाद्या आय् ए एस् अधिकाऱ्याला पळवल तर त्याला फार मोठी न्यूज-व्हॅल्यू येईल. त्या मानाने एखाद्या आर्किटेक्टला पळवलं तर तशी येणार नाही "

खरंच किती शहाणपणाचा सल्ला होता बी सिंगांशी जितका जास्त जास्त संबंध येऊ लागला तेवढा तेवढा त्यांच्याबद्दलचा आदर जास्तच वाढू लागला

बी सिंगाची परत जाण्याची वेळ अजुनी पुरी होत आली नव्हती तरी ते लवकरच परत जाणार आहेत, कारण ते रशियाविरोधी व अमेरिकाप्रेमी आहेत अशी अफगाण सरकारची खात्री झाली आहे व त्यानी परत जाव अशी मागणी अफगाण सरकार करत आहे, अशी वदंता होती अर्थात त्यावर आमचा विश्वास बसला नाही कारण त्याचे विचार आम्हाला चागले माहीत होते भारत सरकारच्या मंत्रिगणात व अधिकाऱ्यात एक रशियाप्रेमी व एक अमेरिकाप्रेमी अशा दोन जाती आहेत. बी. सिंग पहिल्या जातीत मोडले जायचे तेव्हा अफगाण सरकार याना परत पाठवण्याची मागणी करत असेल ह्यावर आमचा कसा विश्वास बसावा ?

' जिथे धूर तिथे अग्नी ' अशी एक इग्रजी म्हण आहे त्याचप्रमाण प्रत्येक अफवेच्या धुरामागे सत्याचा थोडा तरी अग्नी असतो हेही खरे अर्थात असा सत्याचा अग्नी कळायला काही वेळा कित्येक वर्षं जायला लागतात

बी सिंगांच्या बाबतीतही अशी तीन-चार वर्षं लागली.

१९७९ साली इराणमध्ये मोठी उलथा पालथ झाली. खोमेनी सर्व सत्ताधारी झाला. त्यानतर इराण्यानी चाळीस एक अमेरिकनांना त्याच्याच वकिलातीत बदीवान करून ठेवले. त्यांच्या वकिलातीची मोठ्या प्रमाणात नासधूस केली, तिथली कित्येक कागदपत्रं इराण्यानी आपल्या ताब्यात घेतली वगैरे गोष्टी वर्तमानपत्रातून अगदी सविस्तरपणे आल्या होत्या.

त्या ताब्यात घेतलेल्या कागदपत्रात बी. सिंगानी अमेरिकन सरकारशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती पण होत्या अर्थातच इराणी सरकारनं त्याला मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी दिली तेव्हा कुठे जगाला बी सिंग अमेरिकाप्रेमी आहेत हे कळल !

अफगाण सरकारच्या खटपटीला यश आल की भारत सरकारने आपला आपणच निर्णय घेतला हे कळल नाही, पण थोड्याच दिवसात त्याची काबूलहून बदली झाली

काबूलच्या भारतीयामध्ये बी सिंग फार प्रिय झाले होते ते कोणाकडेही चहाला वा जेवायला अगदी सहजपणे जात त्याना आपल्या राजदूतपणाचा थोडादेखील अहभाव नव्हता माणूस बुद्धिमान व कर्तृत्ववान असला म्हणजे त्याला स्वत बद्दल खोट्या कल्पना

नसतात तो मोकळेपणाने वागतो

ह्या सगळ्यामुळे सिंग बदलून जाणार हे कळल्यावर सगळ्यानी त्यांना जेवायला बोलवायचा सपाटा लावला. एवढ्या सगळ्यांकडे राहिलेल्या थोड्या दिवसात जेवायला जाणं त्यांना शक्यच नव्हतं. काही मोजक्या लोकांकडे जाव तर बाकीचे नाराज झाले असते. तेव्हा त्याना कोणीही जेवायला बोलावल की 'आमच्यावर जर तुमच प्रेम असेल तर आम्हाला जेवायला वा चहाला बोलावू नका' असं सागायला त्यानी सुरुवात केली. त्यामुळे जेवायला बोलावणारे अगदी निरुत्तर होऊन जात.

सिंग अशा तऱ्हेचं उत्तर देतात हे मला कळल्यावर मी वेगळया मार्गाचा अवलंब करायचं ठरवलं.

एका भोजनप्रसंगी सिंग व बाईसाहेबांशी माझी गाठ पडली. मी बाईंना म्हटलं की, "काबूलमधलं तुमचं पहिलं बाहेरच जेवण माझ्या घरी झाल होतं. तेव्हा शेवटच जेवण पण माझ्याकडेच व्हायला हवं." माझ्याकडला जेवणाचा कार्यक्रम फार छान झाला होता. ते त्याच्या लक्षात होते. त्यानतर त्याचे आमचे संबंध थोडे बिघडले होते तरी मी त्यांच्यावर चागली छाप पाडली होती

एकदा मी असाच सकाळचा त्याच्याकडे गेलो होतो. त्या वेळी ते ब्रेकफास्ट करत होते. मला त्यानी चहा घेणार का ? म्हणून विचारल्यावर "तुमची भेटच मुळी चहाच्या कपाइतकी उत्तेजित करणारी असते (To meet you is a cup of tea), आणखी चहाची काय गरज आहे ?" असा उलट प्रश्न करून त्यांना खूष करून टाकले होते असे बरेच प्रसंग आमच्या भेटीत पूर्वी झाले होते तेव्हा मला 'नाही' म्हणण बाईसाहेबांच्या अगदी जीवावर आले. त्या म्हणाल्या, "माझी तयारी आहे, तू राजदूत साहेबांना विचार"

राजदूत साहेब दुसऱ्या मडळीशी बोलत होते. मी त्यांच्याकडे गेलो जे बाईंना सांगितल ते बुवाना सांगून चालणार नव्हत हे माझ्या लक्षात आल होत तेव्हा जास्त काही तरी हुशारी दाखवली पाहिजे असं माझ्या मनान घेतलं.

'सर, तुम्ही माझ्याकडे जेवायला यायला पाहिजे" मी त्याना तडकपणे म्हणालो

"जर आमच्यावर तुमच प्रेम असेल.." सिंगांनी आपले टेप केलेले उत्तर मला ऐकवायला सुरुवात केली, "तर तू आम्हाला जेवायला बोलावणार नाहीस."

मी थोडा विचार केल्यासारख दाखवल व म्हटलं, "मी थोडं स्पष्टपणे बोलू का ?" अर्थातच त्यांनी त्या विनंतीला उत्तेजन दिल, "खरं म्हणजे मला मिसेस सिंगांबद्दल फारसं प्रेम वाटत नाही. हे कळल्यावर तुम्हाला खचितच आनंद होईल. तेव्हा मी फक्त बाईंना जेवायला बोलावणार आहे, चालेल ?"

"तो तिचा प्रश्न आहे, तिला विचार." सिंग म्हणाले

"मी त्यांच्याशी बोललो, त्या यायला तयार आहेत."

"ती 'हो' म्हणाली असेल तर मग माझा प्रश्न येतोच कुठे ?" सिंगना वाटलं

आपण चांगलं ह्याला अडचणीत टाकलंय पण मला तोच प्रश्न हवा होता.

"प्रश्न येतो तर!" मी मोठ्या आनंदाने म्हणालो, "त्या एकट्या कशा येतील? त्याच्या बरोबर सोबत म्हणून तरी तुम्हाला यायला लागेल."

"तुम भी रानाडे ऐसे हो." असं म्हणून शेवटी त्यांनी जेवायला यायचे कबूल केले पण प्रतिभाला त्याच वेळी तातडीने भारतात जायला लागल्या कारणाने आमच्याकडल्या जेवणाचं काही जमलं नाही.

सिंग साहेब गेले तरी त्याच्या जागी अजूनी कोणाचीही नेमणूक झाली नव्हती. काबूलला इतक्या महत्त्वाच्या घडामोडी घडत होत्या तेव्हा इथे कोणीतरी जाणता व जबाबदार राजदूत ताबडतोब पाठवणं आवश्यक होतं पण सरकारी खाक्याप्रमाणे पुढले चार-सहा महिने कुणी पाठवलेच गेले नाहीत. हे काबूलच्याच बाबतीत असं होतं असं नाही तर अगदी इंग्लंड, अमेरिका, रशिया येथल्या नेमणुकांबाबतही असंच होतं.

राजदूत नसेल त्या वेळी तिथं असलेला सगळ्यात वरिष्ठ अधिकारी चार्ज-डी-अफेयर्स म्हणून काम पाहतो. तो आपल्या गाडीला राष्ट्रध्वज लावून फिरू शकतो, दुसऱ्या राजदूताच्या व स्थानिक मंत्र्याच्या गाठी-भेटी घेऊ शकतो. पण तो पक्का राजदूत नसल्यामुळे त्याला राजदूताचे महत्त्व येत नाही. थोडक्यात म्हणजे ती काम-चलाऊ व्यवस्था असते.

बी. सिंग गेल्यावर इथं कॉन्स्युलर म्हणून असलेला गंभीर सिंग चार्ज-डी-अॅफेयर्स झाला. हाही सिंगच!

गंभीर सिंग हा पंजाबी जाट. चांगला तगडा, सहा फूट उंचीचा. खरं म्हणजे तो बापासारखा सैन्यातच जायचा पण चुकून परराष्ट्र-सेवेत आला आहे असं वाटायचं. हा स्पष्टपणे बोलणारा व रोखठोक स्वभावाचा होता.

त्याचे वडील भारतीय सैन्यात मेजर जनरल होते. ते त्यांच्याच हुद्द्याच्या इतर उच्च सेना-अधिकाऱ्यांबरोबर श्रीनगरला हेलिकॉप्टरने जात होते. मार्गावर असलेल्या टेलिफोनच्या तारा वैमानिकाला दिसल्या नाहीत. त्यांचे हेलिकॉप्टर तारेत अडकले व खाली पडले. त्या एका अपघातात पाच वरिष्ठ सेना-अधिकारी ठार झाले, त्यात गंभीर सिंगचे वडील होते. तेव्हापासून एका विमानाने एका वेळी फक्त एकाच उच्च अधिकाऱ्याने जावं असा सरकारने नियम केला.

गंभीर सिंगाने आपल्या कचेरीतल्या खोलीत आपल्या वडिलांचा मोठा फ्रेम केलेला फोटो बाजूच्या टेबलावर ठेवला होता. त्याला दररोज तो फुलांचा हार किंवा नुसती फुलं वाहायचा. वडिलांवरचं प्रेम गृहीत धरूनसुद्धा तो जरा जास्तच करतो आहे असं वाटायचं. तरी पण हे मान्य केले पाहिजे की गंभीर सिंगनं वकिलातीत शिस्त आणली. कुणीही उठावे व वकिलातीतल्या कुणाही कारकुनाला भेटावे ही पद्धत बंद पाडली, डाकेने आमची

पत्र येत त्याची वाटप पद्धत सुधारली.

काबूलला येऊन आता मला जवळ जवळ तीन वर्षं होत आली होती. चवथं वर्ष मला इथे राहायला मिळणार नाही ह्याची खात्री होती कारण बी सिंगानी माझ्या फाईलवर 'रानडेला परत पाठवावे' असं लिहिलं असल्याचं मला खात्रीलायक माणसाकडून कळलं होतं आमचे संबंध बिघडल्यावर राजदूत दुसरं काही लिहिणं कसं शक्य होतं?

मन हिंदुस्थानात जायला उत्सुक होत. आमची मुलगी पुण्याला तर धाकटा मुलगा मुंबईला हॉस्टेलमध्ये राहात होते त्याचा खर्च तर होत होताच पण त्यांच्याबद्दल चिंता-काळजी पण वाटत असे त्यामुळे भारतात परत जाव असं वेळोवेळी मनात येत असे

पण येथे राहण्यातही मन गुंतल होत. बऱ्यापैकी पैसे मिळत होते हे महत्त्वाचं कारण असल तरी तेच एक कारण होतं असं नाही आपल्याला पुढल वर्षं राहायला मिळणार नाही आहे ह्याचा सल मनाला टोचत होता थोड अपमानास्पद वाटत होत. त्यामुळे माझा इथे राहण्याचा हट्ट वाढत चालला होता

त्यातून अफगाणिस्तानातली परिस्थिती नेहमीची असती तर परत जाताना इतकं वाईट वाटलं नसत पण आता आमचे अफगाण सहकारी व मित्रमंडळी जीवन-मरणाच्या लढाईत गुंतली होती त्यांच्याशी आमचे हितसंबंध फार निगडित झाले होते ह्याचा अर्थ इथ राहून आम्ही त्यांच्याकरता काही करू शकणार होतो असा नाही पण आम्ही त्यांची दु ख बोलून दाखवण्याची, मन मोकळ करण्याची, ठिकाणं झालो होतो ह्या नव्या राजकीय परिस्थितीत त्यांना आपसात सुद्धा मोकळेपणी बोलता येत नव्हतं. त्यांची मन ते फक्त आमच्याजवळ मोकळ करू शकत होते.

ह्या सगळ्यांमुळे इथ आणखी एक-दोन वर्षं तरी राहायला मिळाव अस वाटत असे पण तस बोलणार तरी कुणाकडे? मला आणखी एक दोन वर्षं इथ राहायच आहे अस सांगणार तरी कसं?

वकिलातीतला तो सरदारजी दुय्यम सचिव माझ्या चागल्या ओळखीचा झाला होता माझ्याविषयी त्याचं मत चागल झाल होत फक्त वैयक्तिक कारणाकरता बी सिंगांनी मी परत जावे असं फाईलवर लिहिल आहे हे त्याला माहीत होतं गभीर सिंगाचा व माझा काहीच सबध आला नव्हता, त्यामुळ त्याचे माझ्याविषयी चागले किंवा वाईट असं काहीच मत नव्हत बहुदा त्या दुय्यम सचिवानं माझी भलावण केली असेल पण बी सिंग जाताच गभीर सिंगाने त्याचा निर्णय बदलला व मी चवथे वर्ष इथं राहावं अशी भारत सरकारला शिफारस केली

ओळखी असण्याचे फायदे होतात तसे तोटेही होतात. एका सिंगाच्या ओळखीने मी तोट्यात येणार होतो तो दुसऱ्या सिंगाच्या ओळखीने नफ्यात राहिलो काट्याने काटा काढण्याचा हा वेगळा प्रकार झाला.

असे माझे अफगाणिस्तानमध्ये राहण्या-जाण्याबाबत चालले होते तर काबूलमध्ये खूप मोठ्या व महत्त्वाच्या घटना घडत होत्या तराकीचं व अमीनचं बिनसायला लागलं होतं. खर म्हणजे दोघेही एकाच पक्षाचे म्हणजे खल्क पक्षाचे. मराठीत खल्क म्हणजे जनता आता ज्या पक्षाचे नाव जनता आहे, त्याच्या पुढाऱ्यांचं आपसात पटणं शक्य नव्हतं हे वेगळं सांगायला नकोच सुदैवसुद्धा हा ' जनता 'चा स्थायिभाव इथही होता

तराकी मास्कोचा आपला दौरा आटपून परत आला. विमानतळावर पक्षाच्या पुढाऱ्यांकडून व कार्यकर्त्यांकडून त्याचं मोठं भव्य स्वागत झालं स्वागत करणाऱ्यात अर्थातच पुढाकार अमीनचा होता. त्यांनी एकमेकांना प्रेमानं मिठ्या मारल्या व अफगाण पद्धतीप्रमाणे गालांची चुंबने घेतली त्यानंतर तराकीची विमानतळापासून गावापर्यंत शोभा-यात्रा काढली गेली. ती यात्रा खाना-ए खल्कपर्यंत जायची होती

अमीन व तराकींनी एकमेकांना मिठ्या मारल्या असल्या व प्रेमानं चुंबनं घेतली असली तरी त्या दोघांतलं वैर अगदी पराकोटीला पोहोचलं होतं.

तराकीच्या लोकांचा असा डाव होता की बाकी पुढाऱ्याबरोबर अमीनलाही खाना-ए-खल्कमध्ये न्यायचे व तिथंच त्याला गोळ्या घालून ठार करायचं पण अमीन काही कच्च्या गुरूचा शागिर्द नव्हता तो मुळी विमानतळावरून परस्पर दुसरीकडेच गेला, खाना-ए-खल्कवर गेलाच नाही. त्यामुळे तराकीच्या लोकांचा डाव फसला

सध्याकाळी अमीनला खाना-ए-खल्कवरून बोलावणं आलं आता अमीनला ' नाही ' म्हणणे शक्यच नव्हतं. पण त्या वेळी त्याने ' भेटी 'ची तयारी केली होती खाना-ए-खल्कमध्ये त्याची माणसं पेरून ठेवलेली होतीच, शिवाय त्यानं कर्नल तरुन नावाच्या आपल्या शरीरसंरक्षकाला पण बरोबर घेतलं होतं अमीन व तरुन दोघे जिना चढू लागले जिन्याच्या वरच्या टोकाला स्वतः तराकी त्यांच्या स्वागताकरिता उभा होता अमीन व कर्नल तरुन जिन्याच्या काही पायऱ्या चढून गेले तेवढ्यात इमारतीतले लाईट गेले-म्हणजे घालवले गेले व त्यांच्यावर गोळ्यांचा वर्षाव झाला अमीन व त्याचा शरीरसंरक्षक असं काहीतरी होणार हे जाणूनच होते. अमीनला वाचवण्याकरता तरुन मध्ये पडला व मारला गेला. पण मरता मरता त्याने आपली स्टेन-गन तराकीवर चालवली होती त्या गोळ्यामुळे तराकी घायाळ होऊन पडला प्रासादातले बरेच सैनिक अमीनच्या बाजूचे होते त्यांना इशारा मिळताच त्यांनी तराकीच्या लोकांना मारायला सुरुवात केली व काही वेळातच खाना-ए-खल्क अमीनच्या ताब्यात आला खाना-ए-खल्क व सगळा अफगाणिस्तान सुद्धा !

' कसेल त्याची जमीन ' अशी आपल्याकडे म्हण आहे अफगाणांनी त्या म्हणीला पुस्ती जोडून ' कसेल त्याची जमीन ' व ' खाना-ए-खल्कमध्ये राहील त्याचा अफगाणिस्तान ' अशी नवी म्हण तयार केली

ज्या तऱ्हेने अमीनला बोलावलं गेलं, अंधार केला गेला, त्यांच्यावर गोळ्या झाडल्या गेल्या, प्रतिगोळीबारात तराकीच जखमी झाला वगैरे वाचलं म्हणजे आपण कोणता तरी

हिंदी सिनेमा पाहात आहोत वा कोठली तरी काल्पनिक कादंबरी वाचतो आहोत असच वाटेल. पण हे काल्पनिक नसून सगळं अगदी खरोखरीच घडल होत

दुसऱ्या दिवशी रेडिओ व टी व्ही वर तराकी फार आजारी आहे व सगळी सत्ता अमीननं आपल्या हाती घेतल्याचं सागण्यात आल नतरचे चार-पाच दिवस तराकी फार गभीरपणे 'आजारी' होता पुढल्या आठवड्यात तो वारल्याची बातमी देण्यात आली त्याच्या बायकोला व मुलीला 'देशद्रोही' ठरवून तुरुगात टाकण्यात आलं. त्याच्या काही सहकाऱ्याना तुरुंगात टाकण्यात आल तर काहींना जीवानिशी मारण्यात आल त्यात आताचा गृहमंत्री व आमच्या ऑफिसमधला पूर्वीचा कारकून पण होता.

अमीन सत्तेवर आला आणि नवी विटी—नवे राज्य सुरू झालं कोणतीही व्यक्ती सत्तेवर आली की लोकप्रिय होण्याचा प्रयत्न करते. अमीनने पण तेच केले देवावर व धर्मावर विश्वास नसणाऱ्या ह्या कम्युनिस्ट राज्यकर्त्यांने पूर्वी जे अफगाणिस्तान नुसतंच REPUBLIC होत त्याच ISLAMIC REPUBLIC केलं मशिदींच्या सुधारणासाठी जास्तीचे पैसे मजूर केले, बंडखोराशी वाटाघाटी करायचा प्रयत्न केला

पण सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे क्रांतीनतर जे हजारो लोक तुरुंगात टाकले गेले होते त्यातल्या बऱ्याच जणांना अमीनन सोडल ज्या शेकडो लोकांना जीवानिशी ठार मारलं होत, त्यांच्या नावाच्या याद्या प्रसिद्ध करून त्या वजारते दाखलाच्या गेटवर लावल्या

ज्या दिवशी तुरुंगातून कैद्यांना सोडल त्याचा 'आंखों देखा हाल' टी व्ही वर दाखवण्यात आला ते सगळं दृश्य मोठं करुणामय होत बावचळलेले शेकडो कैदी तुरुंगातून सुटत होते व तेवढेच बावचळलेले लोक त्यांना घ्यायला आलेले होते एकतर ते लोक अनपेक्षितपणे सुटले होते व सोडताना काही शिस्त वा पद्धत अशी नव्हती सोडून दिलेले लोक सैरावैरा फिरत होते एवढ्या मोठ्या जमावात नेमका आपला माणूस ते कसा शोधून काढणार होते ! त्या दिवशी बराच बर्फ पडला होता त्यामुळे गोंधळात आणखीनच भर पडली होती

पण ह्या सगळ्या गडबडीत व भाऊगर्दीत कोणाला तरी आपला माणूस भेटे मग त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव, ते प्रेमानं मिठ्या मारून चुबन घेण व शेवटी डोळ्याना घळाघळा पाणी येण, हे सगळ बघायला फार त्रासदायक पण त्याच वेळी फार आनददायक पण वाटत होत.

तुरुगातून सुटणाऱ्यांत तरुण होते, म्हातारे होते, बायका होत्या, तरुण आणि म्हाताऱ्या. त्यांच्याबरोबर त्यांची लहान मुल पण होती कोणत्याही देशात अशा तऱ्हेने कुटुबंच्या कुटुब तुरुंगात टाकत नसतील, नाही ?

तुरुंगातून सुटणाऱ्यांची ही तऱ्हा तर जीवानिशी मारल्या गेलेल्याच्या याद्यांबाबत दुसरीच तऱ्हा. शेकडो बायका व म्हातारी माणसं आपल्या कोणा नातेवाइकाची नावं त्या याद्यांतून आहेत का, हे पाहायला येत आणि तसं यादीत नाव दिसल की दु:खावेगान

सगळीजण रडू लागत त्याच बरोबर अमीन, तराकी व नव्या राज्यकर्त्यांना शिव्याची लाखोली वाहून त्यांचा उद्धार करीत. बायका ऊर बडवून घेत व राज्यकर्त्यांना शिव्याशाप देत.

हे सगळं बजारते दाखलाच्या फाटकावरच चालत असे. तेथे पहाऱ्याकरता असलेले सैनिक व पोलिस हे सगळ पाहात पण शिव्याशाप देणारे सगळे म्हातारे वा बायकामाणसं असल्यामुळे त्याना काही करता पण येत नसे.

तुरुगातून लोकाना सोडण्यात व मेलेल्याची यादी जाहीर करण्यात अमीनचा असा हेतू होता की, ही सगळी कृष्ण कृत्यं तराकी आणि त्याच्या लोकांनी केली आहेत अस लोकाना वाटावं व तराकीबद्दल लोकाच मत वाईट व्हावं व मन नासून जाव.

पण झाल उलटच कारण तराकी सदर-इ-रियासत म्हणजे राज्य-प्रमुख असला तरी हजारो लोकांना तुरुंगात टाकण्यात व शेकडो लोकांना जीवानिशी मारण्यात अमीनचा नुसता हातच नाही तर त्याचा त्यात पुढाकार होता, हे लोकाना माहीत होत त्यामुळे अमीनबद्दलचं लोकाच मत आणखी वाईट झालं हा असा उलटा परिणाम झालेला पाहून अमीनन लोकांना तुरुगातून सोडण्याच व मेलेल्याच्या याद्या प्रसिद्ध करण्याच बंद केलं

जगात काहीही चालले असो माणसाचं शेती करण आणि प्रियाराधन काही थाबत नाही अस म्हणतात तेच खरं. ह्या गडबडीच्या वातावरणात पायंडाने आपल लग्न ठरवलं. काही दिवसानी त्याची होणारी बायको ऑफिसात आली. तिच्याशी ओळख करून देण्याकरता म्हणून पायंडा मला घेऊन बाहेर पडला.

नजमा नाव तिचं. अशीच बावीस-तेवीस वर्षांची, पायंडाला शोभेल अशी उंच, सडसडीत पण काळीसावळी तिनं इथं सर्रास वापरतात तसा स्कर्ट व ब्लॉऊज घातला होता. दिसायला शात व सोज्वळ. ती कोणा शाळेत शिक्षिका होती पायडाला चागली बायको मिळाली ह्याचा मला फार आनंद झाला.

काही दिवसांनी त्यांचं लग्न झाल आमन्त्रितात फक्त मी आणि प्रतिभाच भारतीय होतो आत्तापर्यंत आम्ही कोणाही मुसलमानाच्या लग्नाला गेलो नव्हतो. त्यामुळे तीही उत्सुकता होतीच

लग्न एका मध्यम प्रतीच्या हॉटेलात होत हॉलभर टेबल-खुर्च्या मांडल्या होत्या त्यावर पुरुष मडळी खाण्याच्या गोष्टींवर ताव मारत होती. मुसलमानाच्या म्हणजे निदान अफगाण मुसलमानांच्या लग्नात आल्या-आल्या जेवून-खाऊन घ्यायच असतं त्याप्रमाणं आम्ही पण जेवायला बसलो आग्रह करायला पायंडा व त्याचे मित्र होतेच

टेबला टेबलातून मोकळ्या असलेल्या जागेत काही मुली नाचत होत्या वाद्यांच्या टेप्स लावल्या होत्या, ह्या तालासुरावर ह्या पैसे देऊन आणलेल्या मुली अफगाण पद्धतीचा

पोषाक घालून आपली नृत्यकला दाखवत होत्या त्या काही कारणानं नाचायच्या थांबल्या की पायंडाचा बलदंड बाप त्यांच्यावर खेकसून ओरडत असे मग त्या बिचाऱ्या परत नाचायला लागत पायंडाला हे सगळं आवडत नसावं असं त्याच्या चेहऱ्यावरून वाटत होतं

पायंडाची बायको व इतर स्त्रिया बाजूच्या हॉलमध्ये होत्या तिथं त्यांचं खाण-पिणं चाललं होतं

आमचं आणि इतरांच खाण-पिणं आटोपल तशी पायंडा व त्याची मित्र-मंडळी हॉलच्या एका बाजूला थोडं उंच असलेल्या स्टेजवर गेली पायंडा भारी सुटाबुटात होता थोड्या वेळाने नजमा व तिच्या मैत्रिणी आतून बाहेरच्या हॉलमध्ये आल्या.

ह्या लोकांच्या लग्नसमारंभावर ख्रिश्चन लोकांच्या लग्नपद्धतीचा फार परिणाम झालेला दिसतो नजमाने ख्रिश्चन मुली घालतात तसा पांढरा शुभ्र लांब झगा घातला होता व डोक्यावर पांढरा झिरझिरीत दुपट्टा घेतला होता.

ह्यांच्यात मुहूर्त वगैरे भानगडी असतात की नाही कुणास ठाऊक. पण बहुधा नसाव्यात. कारण कुणीही घड्याळाकडे पाहून, 'मुली'ला आणण्याची घाई केली नाही किंवा 'वाजवा हो वाजवा' असं कुणी ओरडल पण नाही नजमा आली तिच्या बरोबरीच्या एका मैत्रिणीने नजमाच्या डोक्यावर कुराण धरले होते. त्या सगळ्याजणी स्टेजवर आल्या

पायंडा आधीच स्टेजवरच्या सोफ्यावर येऊन बसला होता. नजमा त्याच्याजवळ जाऊन बसली डोक्यावर कुराण धरलेलं होतंच पायंडाने तिच्या बोटात अंगठी घातली त्या वेळी सगळ्या लोकांनी आनंदाने टाळ्या वाजवल्या, तशा आम्ही पण वाजवल्या झाला लग्न-समारंभ ! सुटसुटीत व साधा !

मुसलमान लोकांत चार चार लग्नं करायची परवानगी व पद्धत असल्यामुळे तर त्यांचे लग्नसमारंभ असे सुटसुटीत व साधे नसतील ना ? असा 'स्व' वादी विचार माझ्या मनात येऊन गेला

आता हॉलमधल्या टेबल खुर्च्या हलवण्यात आल्या. त्या नाचणाऱ्या मुली निघून गेल्या होत्या खुर्च्या भिंतीशी मांडून ठेवण्यात आल्या व आम्ही सगळी पाहुणे-मंडळी त्या खुर्च्यांवर जाऊन बसलो

मधोमध पायंडाचे मित्र गोलाकार उभे राहिले त्यांच्या हातात मोठाले रुमाल होते तेवढ्यात ढोलक वाजायला सुरुवात झाली त्या बरोबर ही मंडळी गोलाकार नाचू लागली. ह्या प्रकाराला 'अत्तान' म्हणतात जसा ढोलक वाजवण्याचा वेग वाढत गेला, तसा ह्यांचा नाचण्याचा वेग पण वाढत गेला मधून मधून ते 'है, है' अशा जोरात आरोळ्याही ठोकत होते शेवटी टिपेला पोहोचल्यावर ते लोक नाचायचे थांबले

ती टोळी थांबली व बाजूला झाली तशी दुसऱ्या टोळीनं त्यांची जागा घेतली आता त्यांनी मलाही बोलावलं उत्साहाच्या भरात मी त्यांच्यात जाऊन उभा राहिलो व ढोलकं वाजायला लागताच नाचायचा प्रयत्न करू लागलो. पण आपल्याला ते थोडंच जमतं ?

आपल्यात समूहाने नाचण हा प्रकार नाही आपण फक्त एखादी बाई व पुरुष कसा नाचतो ते पाहायच असत, त्यात भाग घ्यायचा नसतो कारण आम्हाला मोकळेपणी नाचायची लाज वाटते ! आता ज्या गोष्टीची आपल्याला लाज वाटते ती गोष्ट आपण चांगल्या रीतीने कशी करू शकणार ? पण अशी लाज वाटत नाही ते अफगाण किंवा आपल्याकडील आदिवासी मडळी अगदी मोकळेपणी नाचतात

हा अत्तान नावाचा प्रकार पठाण, बलुच, अफगाण, सर्व लोकात आहे हिंदी सिनेमात ह्या नृत्य-प्रकाराचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग करून घेतला आहे.

इथल्या वकिलातीत दिवाळी नेहमी मोठ्या उत्साहाने साजरी करतात. घरोघर हिंदूही दिवाळी साजरी करतात इथ दिव्याची आरास करायची परवानगी आहे पण फटाकडे वगैरे उडवायला बदी आहे ही बंदी अगदी पूर्वीपासून होती व त्यात नवीन सरकारने काही फरक केला नव्हता

आत्तापर्यंतो नवे राजदूत काबुलला येऊन रुजू झाले होते हेही सिंगच होते, पण खरे सिंग म्हणजे सरदारजी होते त्यांनी दाढी काढून टाकली होती व मोना झाले होते. त्याना आपण सी सिंग म्हणू या त्यानी शेतकी विषयात डॉक्टरेट मिळवली होती मोठ साधा व सभ्य माणूस

काबूलला येण्याआधी ते मॉस्कोला प्रथम सचिवाच्या हुद्द्यावर होते. ते पजाबी असले तरी त्याची बायको कारवारी, गोव्याकडली होती राजदूत सडसडीत व उच तर बाई बुटक्या व थोड्या गुबगुबीत. त्यातून त्या 'आटलेल्या' कापडांची पोलकी घालत, त्यामुळे त्याचा गुबगुबीतपणा चटकन डोळ्यांत भरत असे!

सी सिंग वागायला चागले असले तरी वृत्तीने बी सिंगाच्या अगदी विरुद्ध. बी. सिंग अगदी मोकळे चाकळे तर हे अगदी गंभीर त्याच्यात सरकारीपणा फार होता, जो बी. सिंगात बिलकुल नव्हता.

हे राजदूत वृत्तीने वेगळे असले तरी त्यांचे आमचे चागले जमले. मुख्यतः प्रतिभेचे व नव्या राजदूतीण बाईंचे

काबूलला आल्या आल्या म्हणजे जवळ जवळ तीन-साडेतीन वर्षांपूर्वी प्रतिभाने काबूल शहरावर एक लेख म टा. करता लिहिला होता. नव्या जागी व नव्या गावी गेल्यावर साधारणपणे लेखिका लिहितात त्या धर्तीचा तो लेख होता

पुढे एक एक अशा ऐतिहासिक घटना घडतील अशी त्या वेळी सुतराम कल्पना नव्हती पुढे ती ह्या घटनावर ' महाराष्ट्र टाईम्स् ' व ' माणूस ' वगैरे साप्ताहिकांतून नियमितपणे लिहायला लागली काबूलमध्ये राहून अफगाण घडामोडींवर लिहिणारी व नुसत्या मराठीतच नव्हे तर कोणत्याही भाषेतली एक मात्र लेखिका होती तिच्या लेखाचं महाराष्ट्रात चागले स्वागत व कौतुक झाले.

पण बाहेर कितीही कौतुक झालं तरी घरच्यांचा तो थोडा टिंगलीचा विषय होतो. कोणतीही घटना घडली की त्यावर लिहिण्याची प्रतिभाला अगदी सुरसुरी येत असे ते सगळं बघून आम्ही म्हणजे प्रतिभा धरून सगळ्यांनी एक नाटिका रचली.

एक होती ' टू ' ।<br>
तिचा गावात झाला ' कू ' ।<br>
' कू ' होता मोठा भांडगा ।<br>
टू ला आनद झाला दांडगा ॥<br>
टू चे हात लागले शिव-शिवू !<br>
हे लिहू की ते लिहू ? ॥<br>
लिहू कशी ? पटा-पटा ।<br>
छापू कुठे ? म. टा.–म टा ॥

आम्ही हे सगळे मजेने घेत होतो तरी मराठी वाचकात प्रतिभेचे लिखाण मोठ्या गभीरतेने घेतले जात होते प्रतिभाचा रोख साधारणपणे नवीन कार्यकर्त्यांच्या व कम्युनिस्टांच्या विरोधी असा असे. काही वेळा तर जबर टीका असे.

प्रतिभेचे वडील कोल्हापुरी असत त्यांच्या एका कम्युनिस्ट मित्रान मित्रत्वाचा सल्ला म्हणून त्याना सांगितल, " तुमची प्रतिभा नव्या कम्युनिस्ट राज्यकर्त्यांवर फार प्रखर टीका करते अफगाण सरकारन जर हे गभीरपण घेतल तर भारत सरकारला तिच्या विरुद्ध काहीतरी उपाय करायला लागेल तेव्हा मुलीला सबूरीचा सल्ला द्या "

प्रतिभेच्या वडिलांनी तातडीन त्या अर्थाच पत्र आम्हाला लिहिले

" आता रे काय करायच मुकुंदा ? " प्रतिभाने काळजीच्या स्वरात विचारले, " तुला काही त्रास होईल ? आपल्याला परत पाठवतील, शिक्षा म्हणून ? "

प्रतिभेचे सारे लिखाण मराठीत होते अफगाण सरकारला ते कळणार व ते भारत सरकारला कळवणार, मग भारत सरकार त्यावर काही कृती करणार हे जवळ जवळ अशक्य होत पण झाल अस होत की अमेरिकन सरकार अफगाणिस्तानातल्या घडामोडींवर जगात जिथ जिथ जे जे काही लिहून येत होत त्याची यादी प्रसिद्ध करत होत. त्या वेळी प्रसिद्ध झालेल्या यादीत प्रतिभेच्या लेखाचा तिच्या नावानिशी उल्लेख केला गेला होता त्यामुळे अफगाण सरकारला प्रतिभेच्या लिखाणाबद्दल कळण्याचा सभव होता

" तू बिलकुल घाबरू नकोस " मी प्रतिभेच्या प्रश्नाला उत्तर व तिला धीर देत म्हटल. कारण प्रतिभेचे भारतीय नागरिक म्हणून काय अधिकार आहेत ते मला चांगले माहीत झाले होते " ह्या कारणाकरता म्हणून भारत सरकारला मला परत पाठवू तर दे, त्याचा असा काही गवगवा करतो, वर्तमानपत्रांत धूम मचवतो, लोकसभेत प्रश्न विचारायला लावतो, सोडणार नाही. "

पण तस काहीही करायची वेळ आली नाही. प्रतिभा रानडे नावाची कोणा हिंदी अधिकाऱ्याची बायको अफगाण प्रश्नाबाबत काही लिहते आहे हे भारत सरकारच्या कानीही गेल नाही आपल्या परराष्ट्रखात्यात अमेरिकेतल्यासारखी माहिती गोळा करण्याची यन्त्रणा आहे की नाही ह्याबद्दलच मला संदेह आहे.

राज्य जुन असो की नवं असो, गादीवर तराकी असो की अमीन असो, अफवाचा सुकाळ काही कमी झाला नाही सरकार कमकुवत असल्याची ही पक्की खूण होती. अस सगळीकडेच होतं आपल्याकडेही बघा, आणीबाणीच्या काळात व इंदिराजींच्या काळात जितक्या अफवा पसरल्या जात, तेवढ्या पंडित नेहरूंच्या काळात पसरत नसत.

तराकी आणि अमीन ह्याची खाना-ए-खल्कमध्ये झालेल्या चकमकीनंतर कित्येक दिवस तराकी जिवंत आहे की मारला गेला आहे ह्याबद्दल वावड्या उठत होत्या.

आता अमीन मारला गेल्याची वदता उठली व अगदी दाट पसरली ( खर म्हणजे अमीनचा पुतण्या मारला गेला होता. ) त्यामुळे गावात फार खळबळ माजली त्याला उत्तर म्हणून अमीन स्वत टीव्हीवर आला व त्याने चांगले तास-दीड तासाचे भाषण केले ह्या अफगाणाना बोलायचा कटाळा कसा येत नाही ? असा मला प्रश्न पडे कोणीही अफगाण बोलायला उठला की तो पाऊण तास, तास अगदी लीलया बोलायचा. मग त्यांच्या पुढाऱ्याच काय विचारता ? तराकीही तसला व अमीनही त्यातलाच

पण फक्त तराकी व अमीनला का बोल लावा ? आपल्याकडले पुढारी काय कमी बोलतात ? पंडित नेहरू काय किंवा इंदिरा गांधी काय, अगदी तासच्या तास बोलत. पौर्वात्य देशाच हे वैशिष्ट्य आहे, की ही राजकीय अपरिपक्वतेची खूण आहे ? ते सांगणे अवघड आहे

अमीनच टी व्ही.वर दर्शन घडल्यावर तराकी व अमीन याच्याबद्दलच्या अफवावर पाणी पडल लोकांना खर काय झाल आहे ते कळल

आजकालच्या इतक्या सुधारणेच्या काळात जर हे अस होत तर मोगलाच्या काळात काय होत असेल ? तेथे तर राजघराण्यातले लोक गादीकरता बापाला, भावाला, काकाला मारायला टपलेले असत

दिल्लीच्या लाल-किल्ल्यात गेला तर यमुनेच्या बाजूची एक बाल्कनी वाटाडे लोक

दाखवतात बादशहा दिल्लीत असेल तेव्हा तो तिथे येऊन जनतेला दर्शन देत असे. त्यामुळ बादशहा जिवंत आहे व सत्तेवर आहे हे लोकाना समजत असे नाहीपेक्षा बादशहा मेला आहे ह्या अफवेनेच बडाळी माजायची अन् बादशहा खरंच जायचा '

अफगाणिस्तानातले पूर्वीचे 'राज्य गेले त्याबरोबर पूर्वीची माणस गेली, तशा पूर्वीच्या घोषणाही गेल्या तराकी सरकारनं 'कपडा, रोटी, मकान' ही घोषणा दिली होती, तर अमीनच्या सरकारने 'न्याय, सुरक्षितता व कायद्याच राज्य' अशी नवी घोषणा दिली. तसे जागोजागी बोर्ड पण लावले गेले एका बोर्डाच्या खाली कोणा चावट माणसाने 'अमर, अकबर और अँथनी' असं लिहून ठेवल विनोदातूनसुद्धा जनता आपला राग कसा व्यक्त करू शकते, याचं हे खास उदाहरण.

ह्या झाल्या चार-चौघात सागण्यासारख्या गोष्टी आमच्या ऑफिसातले तरुण अफगाण आपसात बोलताना तराकी, बेगम तराकी, अमीन, त्याची बायको वगैरेंबद्दल घाणेरड्या-घाणेरड्या अशा गोष्टी सागत. हा सुद्धा राज्यकर्त्यांवर राग काढण्याचाच एक प्रकार

आमच्या टीमबरोबर गेले तीन वर्षं असलेला गुलअमीर म्हणजे फुलाचा राजा' हा ड्रायव्हर बदलला गेला येथे गाडीवानाची काम करण्याची पद्धतही अगदी वेगळी आहे. गाडीवानाला एकदा एखादी गाडी दिली गेली की ती चांगल्या स्थितीत ठेवण्याची जबाबदारी त्या ड्रायव्हरची! लहान सहान दुरुस्त्याही त्याने आपल्या खर्चाने करायच्या असतात त्यामुळे गाडीवान आपल्या गाडीला फार जपतात

गुल-अमीरच्या जागी मेहराब नावाचा ड्रायव्हर आला गुल अमीर मोठा गप्पाळू व गोड होता, तर मेहराब नेहमी दुर्मुखलेला असायचा व अगदी कमी बोलायचा त्याला मूल-बाळ नव्हते, म्हणूनही तो तसा दुर्मुखलेला असेल गुल-अमीर गेल्यामुळे सर्व-सामान्य अफगाण लोकाच्या भावना, त्यांचे विचार आम्हाला कळायचे बद झाले ह्याच आम्हाला फार वाईट वाटलं.

आता शौरवी लोकांनी आपली लढाई प्रचाराच्या आघाडीवर लढायला सुरुवात केली. कधीही न बोलणारा मेहराब त्या दिवशी सागत आला की रशियाहून काही तरुण मुली अफगाणाना कम्युनिझम् शिकवायला म्हणून काबूलमध्ये आणलेल्या आहेत तो जाम चिडला होता त्या चिडीतच तो म्हणाला, "आम्ही ह्या साल्याचा किती द्वेष करतो ते त्यांना माहीत नाही? आम्ही ह्या रशियन मुलींकडून काही शिकू? उलट त्यांनचा

आम्ही ..''

शौरवी लोकानी उघडलेली दुसरी आघाडी म्हणजे मनोरंजनातून आपल्या विचार-सरणीचा प्रचार करायचा टीव्ही व रेडिओवरच्या कार्यक्रमाचे संचलन करण्याकरता काही शौरवी तज्ज्ञ काबूलला आल्याच आम्ही ऐकल होत पण त्यांचा प्रभाव अजूनी तरी जाणवला नव्हता

दुसरी एक गोष्ट त्यांनी सुरू केली ती म्हणजे दर गुरुवारी कचेरीत रशियन सिनेमा दाखवण्याची गुरुवारी आमचे ऑफिस दुपारी एक वाजेपर्यंत असे शौरवी वकिलातीचे लोक त्या वेळी ३५ एम एम चे दोन प्रोजेक्टर्स घेऊन येत व सिनेमा दाखवत सगळ्या फिल्म्स् अर्थातच रशियन लोकांनी दुसऱ्या महायुद्धात जी काही मर्दुमकी दाखवली त्या-बद्दलच्या असत कंटाळवाण्या व नीरस शौरवी लोकाना हजर राहणे भागच होते एक फतवा काढून अफगाणांनी पण ह्या सिनेमांना हजर राहिलेच पाहिजे असे सांगितले गेले. चांगली अर्ध्या दिवसाची सुट्टी हे बेकार सिनेमा पाहण्यात त्याना घालवायला लागत असल्यामुळे ते अगदी गंजून जात आम्ही मात्र ह्या सगळ्यातून सुटलो होतो. उत्सुकते-पोटी व अफगाण मित्र आग्रह करत म्हणून आम्ही कित्येक चित्रपट पाहिले क्वचितच Crowns are Flying सारखे चांगले सिनेमा पाहायला मिळत.

नवीन धर्तीची पुस्तके लिहिण्याकरता शौरवी तज्ज्ञ आणल्याचे मागे सांगितले आहेच. टीव्ही-रेडियोचा ताबा शौरवींनी घेतला होताच कचेऱ्यातून शौरवी चित्रपट दाखवणं सुरू झाल होतं अशा तऱ्हेने कम्युनिस्ट तत्त्वाचा प्रचार व प्रसार सर्व तऱ्हेच्या मार्गांने होणार होता.

आफ्रिकेत एक विशिष्ट झाड आहे त्याच्याखाली कोणी माणूस वा जनावर गेलं तर त्या झाडाच्या फांद्या त्याला आवळून घेतात व त्याच सगळ रक्त शोषून घेतलं गेल्यावरच सोडतात रशियन सत्ता त्या झाडासारखी आहे पूर्वी त्या सत्तेनं कित्येक देशाना शोषून घेतल होतं व आता आमच्या डोळ्यादेखत अफगाणिस्तान शोषून घेतला जात होता.

असा घडत असतो इतिहास ? असा एखाद्या राष्ट्राचा मृत्यू होत असतो ?

ऑक्टोबर महिना सुरू झाला आणि कडक थंडीची चाहूल लागायला लागली कारण साधी थंडी तर इथ नेहमीच असते कडक थंडीत कधी कधी उष्णतामान म्हणजे थंडीमान उणे २९° फॅ डिग्रीपर्यंत खाली जाते कडक थंडी पडायला लागली होती

पण त्या कडक थंडीतही बंडखोर अफगाणांची गर्मी कमी होत नव्हती. काबूलच्या उत्तरेला असलेल्या 'दारुलामान' ह्या भागातल्या मिलिटरी कॅम्पमधल्या सैनिकानी उठाव केल्याचे कळले त्यामुळे गावातले वातावरण खूप गरम झाले

ह्या 'दारुलामान'ची एक करुण कहाणीच आहे. मुळचा हा शब्द अरबी व दार-उल्-

अमान असा आहे. त्याचा अर्थ शातता व सुरक्षि । असलेले स्थान दुसरा अर्थ अमानउल्ला अमीराची राजधानी असाही होतो

मागे सांगितलेल्या समाजसुधारक व धर्मसुधारक अमानुल्लाच्या वेळची गोष्ट. अमानुल्ला बाकीच्या बाबतीतही फार पुढारलेल्या विचारांचा होता. आपल्या देशाची सर्वांगीण प्रगती व्हावी ह्याचा त्याला सतत ध्यास असे स्त्रियानी पडदा घेण्याच्या तर तो विरोधी होताच पण पुरुषांनी पायघोळ सदरे, चुण्याचुण्याच्या पैरणी घालण्याच्या पण तो विरुद्ध होता त्यान ह्या पारंपरिक अफगाण कपड्याना बंदी घातली व पाश्चिमात्य तऱ्हेच्या सुटा-बुटाचा पोषाक करायला अफगाणाना भाग पाडल.

त्या वेळच्या काबूल शहरातल्या सगळ्या इमारती मातीच्या असत. त्यांना ना रग, ना रूप. रस्ते असे नव्हतेच सगळे नुसते अरुंद बोळ आणि गल्ल्या!

बहुतेक सत्ताधीशाच्या मनात आपण आपली अशी नवी राजधानी स्थापन करावी असं येत असत. इतिहासात अशी पुष्कळ उदाहरण आहेत अमीर अमानुल्लाच्या पण मनात तसच आलं. त्याने लगेच एका फ्रेंच नगरतज्ज्ञाची नेमणूक केली व नव्या शहराचे आराखडे तयार करवले त्या आराखड्याप्रमाणे मुख्य-मुख्य रस्ते तयार झाले न्यायालयाची, राजवाड्याची, म्युझियमची वगैरे नव्या इमारती पण तयार झाल्या.

अमानुल्ला तेवढ्यावरच थांबला नाही त्याला माहीत होत की एखाद्या देशाची भरभराट व्हायची असेल तर त्या देशात आगगाडी असणं आवश्यक आहे. भारताचं उदाहरण त्याच्या डोळ्यांसमोर होत इंग्रजांनी आपल्या सोयीकरता रेल्वेच जाळं पसरवलं असलं तरी त्यामुळ भारतीयाचा फार मोठा फायदा झाला आहे हे त्याला दिसत होत

अमीराचा उत्साह दांडगा होता स्टेशनं उभारण्या आधी, व रेल्वे रुळ टाकण्याआधीच त्याने परदेशातून काही इजिनं व डबे आणवले. तेवढ्यात अमानुल्लाला गादी सोडायला लागली व त्याच नव्या राजधानीचं आणि आगगाडीच स्वप्न तसंच अपुरं राहिलं

आता रेल्वेबद्दल बोलतो आहोत तर त्याबाबतची माझी व पोक्रोस्कीची झालेली चकमक इथच सागून टाकतो.

युरोपात पॅरिस-मास्को-चीन अशी ट्रान्स-सैबेरियन रेल्वे आहे त्याच धर्तीवर युरोपातून एक रेल्वेमार्ग काढून तो तुर्कस्तान, इराक, इराण, अफगाणिस्तान, पाकिस्तान ह्या देशातून काढून थेट दिल्लीला पोहचवायचा अशी एक योजना होती पूर्वीही ही योजना राबवण्याचे बऱ्याच वेळा प्रयत्न झाले पण काही ना काही कारणांनी ते बारगळले गेले होते ह्या वेळी फ्रेंच सरकारने पुढाकार घेतला होता त्यांच्या तज्ज्ञाची व तंत्रज्ञाची एक टीम काबूलला येणार होती काबूल शहरापर्यंत व त्याचा पुढचा मार्ग त्यानी आखला होता फक्त काबूल शहरातल्या स्टेशनचं काम शहरवालीकडे दिल होतं

एक पर्याय पोक्रोस्कीन व एक पर्याय मी तयार करायचा असं ठरवल. त्याप्रमाणे आम्ही आमच्या कल्पना लढवून पर्याय तयार केले त्याचे नकाशे बनवले व ते फ्रेंच लोक

येण्याआधी तयार ठेवले

पोकोस्कीन जुन्या काबूलमधली भरवस्तीतली मध्यवर्ती अशी जागा सुचवली त्या करता त्याने मोठाले रंगीत नकाशे बनवले खेळातली विजेवर चालणारी आगगाडी पण आणली

त्याचे माझे काय ग्रह होते, कळत नाही पण त्याच्या कल्पनेच्या नेमके विरुद्ध मला वाटत असे. विरुद्ध म्हणजे अगदी विरुद्ध ! त्याला जुन्या काबूलमध्ये स्टेशन हव होत तर मला जुन्या गावात ते बिलकूल नको होतं ह्या नव्या स्टेशनाकरता पोकोस्कि बऱ्याच जुन्या इमारती पाडणार होता, पुष्कळ लोकाना बेघर करणार होता मी एकही इमारत पाडली जाऊ नये ह्या विचाराचा होतो.

नव्या व जुन्या शहराबाहेर पण दोघाना सारखी जवळ पडेल अशी एक मोकळी जागा मी स्टेशनाकरता निवडली माझ्याकडे ना चांगले कागद, ना चांगले रंग, नाही पोकोस्की-सारखी खेळातली आगगाडी आपण जे काही करतो आहोत ते बरोबर आहे हा विश्वास फक्त माझ्याकडे होता.

फ्रेंच टीम ठरल्या दिवशी आली त्याच्यावरोबर मीटिंग ठरली. शहरवाल कमिटीचे मेंबर्स, मी, आमचा इजिनियर दास व पोकोस्कि एवढे जण होतो. रशियन आपले मोठे बंधू त्यामुळे आपली कल्पना सागण्याची संधी प्रथम पोकोस्कीला देण्यात आली मलाही ते फायद्याच होतं. त्यामुळे पोकोस्कीच्या योजनेतल्या चुका लोकाच्या चटकन लक्षात आणून देता आल्या असत्या. पोकोस्कीन प्रथम जुन्या काबूल शहराचं महत्त्व समजावून सागितलं त्याचबरोबर जगातल्या सगळ्या राजधान्याची स्टेशनं गावाच्या मध्यवर्ती आहेत असं सांगून लंडन, पॅरिस, मॉस्को वगैरे शहराची उदाहरणे दिली

त्याच बोलण सपल्यावर मी बोलायला उठलो “ मी पॅरिस, लडन वगैरे शहरं बघितली असली तरी असख्य अफगाणांनी ती काही पाहिलेली नाहीत, तेव्हा त्यांच्या उदाहरणाचा इथं काही उपयोग नाही त्यातून ती कित्येक वर्षांपूर्वी उभारली गेली आहेत हे विसरता कामा नये.

“ ह्या स्टेशनाकरता काही जुन्या व महत्त्व नसलेल्या इमारती पाडायला लागणार आहेत, त्याला माझा विरोध नाही काही नवीन उभारायच असलं म्हणजे जुन पाडायला लागत हे मलाही मान्य आहे पण मला वेगळाच मुद्दा माडायचा आहे

“ स्टेशन म्हटल की तेथे शेकडो माणसं येणार, त्याच्या आपल्या मोटारी येणार, टॅक्सी येणार, सामानांचे ट्रक्स येणार नव व जुन काबूल जोडणारे सध्या फक्त दोन पूल आहेत त्यावर किती गर्दी असते ते तुम्ही जाणताच नवी वस्ती नव्या काबूलच्या दिशेनं होत आहे म्हणजे स्टेशनवर येणारी माणसं नव्या काबूलमधून ह्या पुलावरूनच येणार म्हणजे आहे त्या गर्दीत आणखी गर्दी ?

“ तेव्हा मी नव्या व जुन्या गावातल्या लोकाना परस्पर स्टेशनवर जाता येईल अशी जागा सुचवली आहे ह्याकरता एक मोठा पूल बाधायला लागेल पण एकही इमारत

पाडायला लागणार नाही ”

फ्रेंच तज्ज्ञांनी माझा नकाशा पास केला हे वेगळ सांगायला नकोच

हे सगळं अमानुल्लाच्या आगगाडीवरून व त्याने उभारलेल्या नव्या राजधानीवरून निघालं

त्या दारुलामान भागात सैनिकांची एक छावणी होती. तेथल्या सैनिकांनी उठाव केला होता त्यांनी तिथला राज-प्रासाद आपल्या ताब्यात घेतला तेथे दोन दिवस घनघोर युद्ध चालल होत त्यात शेकडो सैनिक मारले गेले होते पण ते सगळ काबूलपासून दहा-बारा किलोमीटर्स दूर घडल असल्याकारणानं त्या उठावाचा व लढाईचा आम्हाला काही त्रास झाला नाही तिथल्या फक्त बातम्या यायच्या

काही दिवसांनी कचेरीच्या कामानिमित्त मला हा सैनिकी तळ पाहायला मिळाला सकाळची वेळ होती. सैनिकांची परेड चालली होती सैनिक कसले ते चवदा-पधरा वर्षांची कोवळी मुल होती ती ! अफगाणिस्तानात सैनिकी शिक्षण सक्तीचे आहे शिकलेल्याना एक वर्षांचे व अशिक्षिताना दोन वर्षांचे

आधीच गोरीपान असलेली ही अफगाण मुल उन्हात परेड करून लालेलाल झाली होती सैनिकी शिक्षणात सगळ्यात जर काही नीरस व कंटाळवाण असेल तर ही परेडबाजी व ती तासन्तास चालते

ही बिचारी कोवळी मुल त्याना माहितही नसलेल्या कोणाकरता तरी लढणार होती व त्याच्याकरता जीवपण गमावून बसणार होती त्यांना पाहिल्यावर मला All Quiet on the Western Front ह्या सिनेमातल्या फ्रेंच बालक सैनिकाची आठवण झाली आणि ह्या निष्पाप अफगाण मुलाकरता माझे मान चुकचुकले

सगळीकडे असतो तसा इथेही घरच्या ‘ फ्रन्ट ’वर गड्याचा प्रश्न होताच त्या वेळी आमच्याकडे हाजरा जातीचा गडी होता. ताज-महमद नाव त्याच ह्याच्या आधीसुद्धा एक हाजरा म्हातारी होती साठीला आलेली अन् सगळे दात पडलेली ती मोठी गोड हसायची थडीच्या दिवसात भल्या पहाटेची कुडकुडत यायची व फार थडी आहे म्हणून कुरकूर करू लागली की मी तिला म्हणायचो, “ ची रकम अफगाण अस्त ? ” म्हणजे कोणत्या तऱ्हेची अफगाण आहेस ? तुला थंडी वाजते तरी कशी ?

“ मग अफगाण काय माणसं नाहीत ? सगळ्याना वाजते तशी आम्हाला पण थडी वाजते ! ” ती तेवढ्याच ठसक्यात उत्तर द्यायची.

ह्या म्हातारीची एक सोळा सतरा वर्षांची नात होती गोरीपान, नाकीडोळी नीटस, आणि चवळीच्या शेंगेसारखी आजी बुरखा घेत असली तरी ही नात बुरखा घेत नसे ती इराणी पद्धतीची ‘ चद्दर ’ घ्यायची. म्हणजे फुलाफुलाची नक्षी असलेल्या चादरीनं सगळ

अंग झाकून घेऊन फक्त तोंड उघडं ठेवायची.

ती आमच्या गल्लीतून जाऊ लागली की, रस्त्यावरची तरुण मुलं, दुकानातून काम करणारी बाप्ये मंडळी हिंदी सिनेमातल्या गाण्यांचे तुकडे टाकायची. पण ती कसली वस्ताद, अक्षरश: त्या तरुणांची हृदय तुडवत लीलेने पुढे निघून जायची.

खरं म्हणजे त्या छकड्या मुलीचं हां हां म्हणता लग्न झालं असतं. पण तिची आजी फार हुंडा मागत होती. त्यामुळे तिचं लग्न लांबणीवर पडत चाललं होतं. मुसलमानांत मुलाने हुंडा द्यावा लागतो. भारतीय मुसलमान मात्र ह्या बाबतीत हिंदूंच्या वळणावर गेले आहेत. त्यांच्यात पण मुलीने हुंडा द्यायला लागतो.

इस्लाम धर्मांप्रमाणे मुलीने २५ रुपयांपेक्षा जास्त हुंडा घ्यायचा नसतो. पण अशा नुकसानीच्या आज्ञा कोण पाळतो? मुलगी चांगली, सुस्वरूप असली तर तिचे पालक चांगला भक्कम हुंडा घेतात. त्यामुळे गरीब व होतकरू मुलांची लग्न होता होत नाहीत. म्हणजे आपल्याकडे होतं त्या अगदी उलट!

कम्युनिस्ट सत्ता आल्यावर तराकीने काही चांगल्या गोष्टी केल्या. त्यातली एक म्हणजे २५ रुपयांपेक्षा जास्त हुंडा घ्यायला बंदी केली. अशी हुंड्याला बंदी घातली असली तरी लग्नात होणाऱ्या बाकी खर्चावर सरकार काही नियंत्रण घालू शकत नाही. मुलींचे पालक दुसऱ्या कारणाकरता म्हणून जास्तीचे पैसे घेऊ लागले. म्हणजे आपल्याकडे होतं अगदी तसंच!

त्या म्हातारीच्या मोलकरणीची पण एक कथाच झाली. एक दिवस आमच्याकडला एक छोटासा टेपरेकॉर्डर चोरीला गेला. ह्या म्हातारीशिवाय आमच्या घरात कुणी कामाला येत नव्हतं, तेव्हा तो तिनेच चोरला असणार ह्याबद्दल आमची खात्री होती. अर्थातच ती कबूल करेना. तेव्हा केस पोलिसात द्यायचं ठरवलं. पण वकिलातीला कळवल्याशिवाय पोलिसात जाणार कसं?

तेव्हा वकिलातीच्या दुय्यम सचिवाला भेटलो. तो म्हणाला, "शहाणे असाल तर पोलिसात जाऊ नका. पोलिस काय करतील की त्या बाईला तुरुंगात टाकतील व तिच्याकडून पैसे उकळायचा प्रयत्न करतील. बाईवरची केस काढून घ्या म्हणून तिचे नातेवाईक तुमच्या मागे लागतील, धमक्या देतील, मारतीलसुद्धा. एवढं करून टेप-रेकॉर्डर मिळायचा नाही, तो नाहीच."

आम्ही शहाणे होतो, त्यामुळे पोलिसात गेलो नाही. फक्त त्या म्हातारीला कामावरून काढून टाकली.

म्हटलं परदेशात हाही अनुभव यायचा होता तर.

अमीनने तुरुंगातून जे कैदी सोडले होते, त्यांत लग्न न झालेल्या बऱ्याच तरुण मुली

होत्या बाकी तुरुंगातून होत ते ह्या मुलींच्या बाबतीतही झाल होतं. म्हणजे त्यातल्या कित्येक गरोदर राहिल्या होत्या त्याना लवकरात लवकर लग्न करण आवश्यक होतं त्या अडचणीत असल्यामुळे त्याच्या पालकाची हुंड्याची अशी अपेक्षा नव्हतीच त्यामुळे कित्येक गरीब अफगाण मुल त्याच्याशी लग्न करायला तयार झाली

असं लग्न करण्यामागे त्याच देशप्रेम नव्हतं की त्या मुलींबद्दल काही अनुकंपा नव्हती अगदी सरळ व साधा हिशेब होता. गरोदर का होईना, पैसे न खर्च करता बायको मिळते आहे ना ? झाल तर मग

गरोदर मुलीशी आपण लग्न करतो आहोत ह्याच त्यांना वैषम्य वाटत नसेल असं थोडंच आहे ? पण चांगली मुलगी मिळवायला चागला पैसा खर्च करायला हवा तो नाही तर मग तडजोड करायलाच हवी.

हे सगळं मोठं विचित्र तरीही फार कारुण्यमय वाटत होत घरात येणारी नव-वधूच मुळी गरोदर ! आयुष्यात माणसाला किती तऱ्हेच्या तडजोडी करायला लागतात नाही ?

आम्ही आठ एम्. एम् चा एक चलच्चित्रपट घेणारा कॅमेरा विकत घेतला. आता सिनेकॅमेरा घेतला म्हणजे सिनेमा काढण आलच.

आम्ही बोलून-चालून मराठी. महाराष्ट्राच्या बाहेर कितीही वर्षं राहिलो होतो तरी मराठी वृत्ती व मराठी मन काही बदलल नव्हतं तेव्हा फिल्म करायची तर ती प्रथम गणेशपूजेची करावी अस आमच्या मनात येणं साहजिकच होतं

गेल्या वर्षी पूजा केलेली गणेशमूर्ती आमच्याकडे होतीच शुक्रवारचा दिवस निवडला. सकाळची प्रसन्न वेळ. सगळे आघोळ वगैरे करून तयार झालो. मी पूजा करणार होतो. मुल साथीला होतीच प्रतिभा फिल्म घेणार होती चित्रपट मूकपट होणार होता त्यामुळे आम्ही आरत्या अगदी मोकळेपणी म्हणून घेतल्या

ह्या कॅमेऱ्याचा आम्ही फार चांगला उपयोग करून घेतला बर्फमय काबूल, नव्या राजवटीने साजरा केलेला स्वातन्त्र्य-दिन म्हणजे जसन, कुत्र्यांची झुंज, घोड्यावरून खेळण्याचा बुद्कशी नावाचा खास अफगाण खेळ, अफगाण चेहरे, अशा बऱ्याच फिल्म आम्ही घेतल्या.

बाकी फिल्म घेतल्या त्या वेळी विशेष असा काही त्रास झाला नाही खरा त्रास झाला तो कुत्र्याची झुंज घेताना.

अफगाण हौंडस नावाची अफगाण कुत्री जगभर प्रसिद्ध आहेत कुत्री कसली चांगली उंच व लांबडी गाईची वासरंच ती ! दोन-दोन माणसांनी त्याना कातडी पट्ट्यानी धरलं असत तरी त्याना आवरण अवघड व्हावं अशी थोराड !

आपल्याकडे कशा कोंबड्यांच्या झुंजी लावतात ? तशाच हे अफगाण लोक कुत्र्यान्च्या झुजी लावतात. पण ह्या झुंजी अगदी राक्षसी. एकदा का कुत्री एकमेकांना भिडली की

एकमेकांचे नाक, कान, मान चावून चावून अगदी रक्तबंबाळ करून सोडतात ह्या झुंजी फक्त बर्फाच्या दिवसांतच होतात.

मी ह्या झुजीची फिल्म घेतली त्या वेळी असाच दोन अडीच फूट बर्फ पडलेला होता काबूल शहराबाहेर जरा दूर अशी ह्या झुजींची मैदानं ठरलेली आहेत साधारणपणे सकाळी ९ ९–३० पासून ११ ११–३० वाजेपावेतो ह्या झुंजी चालतात. अनोळखी जागी जायच होतं. तिथ बायका येतात की नाही हे माहीत नसल्यामुळे प्रतिभा व मुलांना बरोबर नेल नव्हत मी एकटाच अगदी चागले उनी कपडे, हातात चामड्याचे मोजे वगैरे घालून झुजीच्या जागी गेलो अर्थात फिल्म कॅमेरा बरोबर नेला होताच

काही तरी हजार-बाराशे लोक मोठा गोलाकार करून उभे होते. ते सगळे ‘ तमाशा ’ बघायला म्हणून आले होते. हातात कॅमेरा असल्यामुळे मला त्याचा बाध फोडून पुढे जायला मिळाल मधल्या मोकळ्या जागेत सत्तर-ऐंशी राक्षसी कुत्री एकमेकांकडे खाऊ की गिळू, ह्या नजरेने पाहात होती ! त्याना दोन दोन माणसानी पट्ट्यांनी धरून ठेवले होते म्हणून बरं. तोंडून ‘ अरे बापरे ’ असा उद्‌गार निघावा असेच ते दृश्य होते. आणि त्याप्रमाणे माझ्या तोंडून तो उद्‌गार निघालासुद्धा !

कुत्र्याच्या मालकलोकांत झुजी ठरवण्याचा कार्यक्रम चालला होता त्याची महाजन मंडळी हरणाऱ्यांनी किती अफगाणी जिंकणाऱ्याला द्यायचे ते ठरवत होती एकदा ते ठरल की मालक आपल्या कुत्र्यांना मोकळ सोडत असं मोकळ सोडलं रे सोडल की तो कुत्र्याची जोडी एकमेकावर धसवसून तुटून पडे. दोन्ही कुत्रे एकमेकाच्या छातीचा चावा घेऊन दुसऱ्याला पाडायचा प्रयत्न करत. एकमेकांचे कान दातानी फाडून काढायचा प्रयत्न करत. काही मिनिटांत दोन्ही कुत्री रक्तान अगदी रंगून निघत मग त्याना बाजूला ओढून नेण्यात येई. ह्यातला जिंकला कोण, व कसा, ते मला कळल नाही.

त्या कुत्र्याची रक्तात रंगलेली व जखमानी चिरफाड झालेली शरीरं पाहून ती कुत्री आता ह्या जखमानी नक्की मरणार असे माझ्या मनात आले कारण ह्याना औषधोपचार तरी कोण व कसा करणार होतं ? माझ्या मनात आलेल्या प्रश्नाना उत्तर देण्याकरता म्हणून की काय एका मालकान तिथंच पडलेल्या बर्फाचा लगदा उचलला व तो आपल्या कुत्र्याच्या जखमावर चोळला मी शेजारच्या माणसाला हे काय प्रकरण आहे म्हणून विचारल. “ हेच जखमांवर औषध आहे बर्फ चाळला की जखम पिकत नाही आणि कुत्र्याला ठणकाही लागत नाही. ”

“ वा ! निसर्गाची पण कमाल आहे ! ” मी अगदी न राहवून मोठ्यादा म्हटल

आतापर्यंत मी झुजीची लांबून लांबून फिल्म घेत होतो माझ्याकडे टेलि लेन्स नव्हती. त्यामुळे जवळ जाऊनच फिल्म घेण भाग होतं पाय बर्फात फूट-फूट खोल रुतत होते. हातमोजे घालून फिल्म घेण शक्य नव्हत, कारण मोजांमुळे कॅमेरा चालवायला त्रास व्हायचा कडाक्याच्या थंडीनं उघडे हात अगदी बर्फाळून गेले होते. पण आता मागे

हटण्याचा प्रश्नच नव्हता.

तेव्हा एका जोडीची झुंज चालली होती, त्याच्याजवळ गेलो आणि त्यातल्या एका कुत्र्याने माझ्या कॅमेऱ्याकडे व माझ्याकडे पाहिलं यमाचे डोळे असेच असतील! असा भाव तर माझ्या मनात आलाच, पण त्या शून्य डिग्रीच्या काही अंगुल खाली असलेल्या तापमानातही मला दरदरून घाम की हो फुटला!

कुत्रासुद्धा वाघ-सिंहासारखा दिसू शकतो हे त्या वेळी मला प्रथम कळलं दोन-दोन तगडे अफगाणसुद्धा ह्यांना आवरू शकत नाहीत हे मी काही वेळापूर्वीच पाहिल होत येथे तर हा कुत्रा मोकळा होता. माझा कॅमेरा बघून जर त्याचा काही गैरसमज झाला असता तर मात्र माझी धडगत नव्हती मन थरथरलं तरी हात थरथरून चालणार नव्हत कारण ह्या हातांनीच फिल्म घ्यायची होती इथून पळ काढावा तर पाय फूट फूट खोलात रुतलेले! वर मी पळणार फक्त दोन पायांनी तर तो राक्षसी कुत्रा माझ्यामागे लागणार तो चार पायानी!

सुदैवाने त्या कुत्र्याने कॅमेऱ्याकडे व माझ्याकडे सपूर्ण दुर्लक्ष केल व आपल्या प्रतिस्पर्धी कुत्र्याच्या मानगुटीला पकडून त्याचे लचके तोडायला लागला ही सुवर्णसधी मी थोडाच सोडतो? तसंच जवळ उभं राहून मी फिल्म घेतली. एवढच नाही तर पाच मिनिटाच रीळ संपल्यावर आणखी पाच मिनिटाची पण घेतली

पण ह्या सगळ्या गोष्टीचा थोडा दु:खान्तच झाला. ही सिने-फिल्म धुण्याची काबूलमध्ये सोय नव्हती. तेव्हा तशा फिल्मस् जर्मनीला पाठवायला लागत पूर्वीच्या फिल्मस्सुद्धा जर्मनीला पाठवल्या होत्या तेथून धुऊन यायला कधी महिना कधी दीड महिना लागे.

मी ह्या कुत्र्याच्या झुंजीच्या दोन्ही फिलमस् जर्मनीला पाठवल्या तेवढ्यात रशियन सरकारला अफगाणिस्तानात आपल सैन्य पाठवण्याची अवदसा आठवली त्यामुळे सारच गडबडलं त्यात माझं पाच मिनिटाचं एक रीळ कुठंतरी गहाळ झाल पुष्कळ तपास केला पण त्या धुमश्चक्रीत माझ्या फिल्मचा काही तपास लागला नाही. आता जिथे सारा अफगाणिस्तानच गहाळ झाला होता तिथे माझ्या फिल्मच्या गहाळीची पर्वा कुणाला?

हौशीपायी कधी कधी जीव गमावण्याची पाळी येते. ह्या फिल्मच्या हौशीमुळे माझं एकदा तसंच होणार होत

रशियन सैन्य अफगाणिस्तानात घुसलं त्याच्या दुसऱ्या दिवसाची गोष्ट. आदल्या दिवशी सगळं शहरभर फिरून आम्ही काय परिस्थिती आहे ते स्वत बघितल होतं कोपऱ्या कोपऱ्यावर टँक्स आणि उच, धिप्पाड, क्रूर दिसणारे रशियन सैनिक

दुसऱ्या दिवसाच्या अगदी पहाटेची गोष्ट. आम्ही सगळे दमून झोपी गेलो होतो, तर आले की आठ-दहा रशियन टँक्स गडगडत गडगडत आमच्या गल्लीत! गल्ली म्हटल तरी

तो खरा वीस-बावीस फुटाचा रस्ता दोन्ही बाजूला छोटे छोटे फूटपाथ व त्यावर उंचच उंच झाड. आमची गल्ली नेहमी शांत व निर्मनुष्य असे. सकाळी सात-आठ वाजेपर्यंत तर अगदी शुकशुकाट असे

टँक्सचे गडगडणे ऐकून आम्ही सगळे धडधडत्या अंतःकरणाने खिडक्यांशी आलो व पडद्याआडून बाहेरच बघू लागलो

आमचा मालक सैन्यातला रिटायर्ड जनरल होता. तो व्यवस्थित सूट, बूट, टाय वगैरे लावल्याशिवाय कधीही घराबाहेर म्हणजे अगदी कँपाऊंडमध्ये सुद्धा पाय टाकत नसे. पण टॅंक्सच्या त्या आवाजाने त्यालाही आपली शिस्त मोडायला लागली तो साध्या नाईट-गाऊनमध्येच लगबगीन बाहेर आला.

आमच्या बंगल्यासमोरचे दोन-तीन बंगले सोडून अफगाणिस्तानच्या नव्या सत्ताधीशाचा म्हणजे बबरक कारमालचा बंगला होता. तो अर्थातच तेथे राहात नसे, पण त्याचे वडील व भाऊ तेथे राहात असत

कारमालच्या फितुरीमुळेच रशियन्स अफगाणिस्तानात आले, अशी सगळ्या अफगाणांची भावना होती नुसती भावनाच नाही तर त्याबद्दल लोकांच्या मनात कारमालबद्दल राग होता, घृणा निर्माण झाली होती कारमालला भीती होती की त्या रागापोटी कोणी अफगाण त्याच्या भावाला वा त्याच्या वडलाना जीवानिशी मारणार तर नाही? काही इजा तर पोहोचवणार नाही? तेव्हा त्यांना खाना-ए-खल्कमध्ये राहायला नेण्याकरता स्वतः कारमाल त्या सात आठ टँक्सनिशी पहाटेचा आपल्या घरी आला होता कारमालने आपल्या भावा-वडिलाना खूप गळ घातली पण ते काही खाना-ए-खल्कमध्ये जायला तयार होईनात. सर्वसामान्य अफगाणाप्रमाणे त्या भावा-वडिलांचा पण कारमालवर फार राग होता त्यांनी कारमालची खूप निंदा केली व त्याच्या बरोबर खाना ए-खल्कमध्ये जायला नकार दिला

हे सगळे जसं आम्हाला कळलं तसं सगळ्या अफगाणाना पण कळाल. बबरक कारमालच्या भावा-वडिलाबद्दल त्यांना अभिमान वाटू लागला त्यांचे म्हातारे वडील व धाकटा भाऊ अगदी मोकळेपणी गावात फिरत, बाजार-हाट करत पण त्यांना कोणी कधी इजा करायचा प्रयत्न केला नाही किंवा अपमानास्पद वागणूकही दिली नाही

कारमालबद्दल कोणीही आदराने बोलत नसत आमचा घरमालक तर त्याला अगदी लहानपणापासून ओळखत होता. तो कारमालची 'पादशहा—पादशहा' म्हणून कुचेष्टा करत असे

पण ह्या सगळ्या नंतरच्या गोष्टी त्या दिवशी सकाळी मात्र त्या रशियन टँक्सच्या गडगडण्याने आम्हा सगळ्यांची अगदी भंबेरी उडाली होती इंग्रजीत म्हणतात त्याप्रमाणे युद्ध अगदी आमच्या 'दारा'शी आलं होत की काय? मीही प्रथम खिडकीतूनच बाहेरचं पाहात होतो. घरमालक बाहेर कंपाऊंडमधे आला तसा मलाही धीर आला मी पण घरा-बाहेर आलो, व कंपाऊंडात असलेल्या झाडाच्या जाड बुंध्याआडून पाहू लागलो

चार-पाच अजस्त्र टँक्स आमच्या घरासमोर उभे होते ते थाबले असले तरी त्याचं घडघडण कानावर आवेगाने आदळत होते. ते दृश्य भयानक असले तरी रोमाचकारी होत. अशा वेळी आपल्या फिल्म कॅमेराचा उपयोग करायचा नाही तर केव्हा? असा विचार मनात आला आणि कॅमेरा आणण्याकरता मी लगोलग घरात गेलो.

कॅमेरा बॅगेतून काढणार तेवढ्यात मनात आल की आपण रशियन टँक्स 'शूट' करणार म्हणतो आहोत. पण रशियनांनी मलाच 'शूट' केलं तर? कारण मी जरी झाडाआडून फक्त कॅमेराच वापरणार होतो तरी त्यांना काही वेगळा संशय आला तर? आणि संशय आला की ते प्रथम तडातडा गोळीबार करणार आणि मग चौकशी-बिवकशी मी आपल्या जीवाला फुकाफुकी मुकलो असतो तेव्हा तो विचार सोडून दिला व कॅमेरा परत बॅगेत ठेवून दिला फिल्म घेण्याच्या हौशीपायी काय वाटेल ते होऊ शकल असत !

एकदा आम्ही मराठी मडळी अशीच गप्पा मारत बसलो असता, दिवाळीला आपण काहीतरी खास कार्यक्रम द्यावा अशी कल्पना निघाली आता आपण लोक कार्यक्रम देणार म्हणजे तमाशाचाच—ज्याला आजकाल लोकनाट्य म्हणतात.

तमाशाची कल्पना अशी होती की कृष्ण, पेंद्या, गौळणी मार्फत येथल्या हिंदी लोकाचे आयुष्य, त्यातले बारकावे, वगैरे गोष्टी चटकदारपणे मांडाव्यात, कुठे अफगाण गाणी टाकावीत व घटकाभर लोकांच मनोरंजन करावं आमच्यात प्रतिभासारखी सिद्धहस्त लेखिका होतीच. फिल्म-डिव्हिजनचे वैद्य होते बाकी आम्ही मडळी भार वाहायला होतोच

संहिता चागली, काम करणारे हुषार व उत्साही त्यामुळे तमाशाचा प्रयोग अपेक्षेपेक्षा जास्त रगला सगळा प्रयोगभर लोक नुसते खदखदा हसत होते हा प्रयोग इतका यशस्वी व लोकप्रिय झाला की, लोक-आग्रहास्तव त्याचा आणखी एकच प्रयोग करायला लागला.

तमाशा तसा सगळ्याना फार आवडला. पण त्यात आम्ही आयटेकवाल्यांची व वकिलातीतल्या लोकाची थोडी टिंगलटवाळी केलेली असल्यामुळे काही लोक उगाचच नाराज झाले व 'आम्ही राजदूताकडे तक्रार करतो.' असा धाक दाखवू लागले. ह्याच्या उलट वकिलातीतल्या एका प्रथम सचिवानं "तुम्ही वकिलातीच्या लोकांची आणखी चपी करा, त्याकरता मी तुम्हाला खरे घडलेले प्रसग देतो" असं सागितल

काही उत्तर भारतीय व पजाबी कृष्णाच असं रूप दाखवल म्हणून नाराज झाले. महाराष्ट्रातल्या लोकांना तमाशातली कृष्णाची वेगवेगळी रूपं पाहण्याची सवय असते, तशी ती बाकीच्याना नसते त्यामुळे ते लोक फार चिडून उठले व रागानं आमच्यावर टीका करू लागले

ह्या उत्तर भारतीय व पजाबी हिंदूंचा राग कुणी काढला असेल तर हैदराबादच्या डॉक्टर

नकवी नावाच्या मुसलमान प्राध्यापकान ! आहे की नाही मजा ?

कृष्णाची दोन रूपं डॉ. नकवींनी त्याना समजावून सांगितली गीता सांगणारा भगवान श्रीकृष्ण हे त्याचं एक रूप आणि गोकुळात पेंद्या आणि गोपींबरोबर रासक्रीडा करणारा कृष्ण हे त्याचं दुसरं रूप ह्या लोकनायक गोपालकृष्ण सर्वसामान्य लोकांप्रमाणे चालतो, बोलतो व वागतो सर्वसामान्य माणसाप्रमाणं गुण-दोषानी युक्त असा कृष्ण दाखवला तरी त्यात कृष्णाची बदनामी करण्याचा हेतू नसतो ही एक तऱ्हेची खेळी आहे महाराष्ट्रात ह्याला कित्येक वर्षांची परंपरा आहे. तमाशात अमुक एक विषय येऊ शकतो, तमुक एक येऊ शकत नाही असं नाही राजकीय, सामाजिक असा कोणताही विषय तमाशाला चालतो.

हे सगळं ऐकल्यावर आमच्या उत्तर भारतीय व पंजाबी टीकाकाराचं समाधान झालं की नाही ते कळल नाही. पण त्यानी राजदूतांकडे तक्रारही केली नाही. ह्या निमित्ताने आम्हाला डॉ नकवीसारखा चांगला मित्र मात्र मिळाला

तमाशाच्या यशामुळे आम्हाला फार उत्साह आला त्या उत्साहाच्या भरात मी ' भगवान कृष्ण खडे है ।' नावाचा जर भगवान कृष्ण निवडणुकीला उभे राहिले तर काय होईल ह्या कल्पनेवर एक तमाशा लिहिला त्याप्रमाणे तालमी सुरू झाल्या व तो खिसमसच्या समारंभात म्हणजे २५ डिसेंबरला स्टेजवर आणायचे ठरवले. पण... तो ' पण ' योग्य वेळी सांगेन.

राजदूताच्या वाड्यावर जेवायला बोलावल जाणं हे काबूलमध्ये फार मानाचं समजल जायच जवळ जवळ पाच पन्नास लोकाना रात्रीच्या भोजनाच आमंत्रण होत अर्थात आम्ही त्या मानकऱ्यात होतोच, एवढंच नाही तर खाना झाल्यावर ज्या काही आठ-दहा लोकाना मागं थांबायला सांगितल गेल, त्यांतही आम्ही होतो हे आणखीनच मानाचं समजल जायच !

आम्ही आठ-दहा लोक माग राहिलो होतो ते थोडा थट्टा-विनोद करण्याकरता, कोणी गाणीबिणी म्हणणार असतील तर त्याकरता प्रथम राजदूतीण बाईंनी गाण म्हटल. सगळ्या मोठ्या अधिकाऱ्यांच्या आणि राजदूताच्या बायकांची आपला आवाज अगदी लतादिदी-सारखा आहे अशी भावना असते त्यामुळे त्या अगदी मोकळेपणानं गाऊन घेतात त्यांचं कौतुक करायला आमच्यासारखे चांदीचे चमचे होतेच

बाईंचं गाण झाल्यावर बुवाना गाणं म्हणायचा आग्रह झाला म्हणजे आम्हीच केला पण डायरेक्टली राजदूताना नाही तर बाईसाहेबांच्या थ्रू ! मग बाईंच व बुवाचं आपसात लाडीगोडीच बोलणं झालं. आम्ही ते सगळं कौतुकानं पाहिल. योग्य तो आग्रह करून झाल्यावर साहेबानी गाणं म्हटल. अर्थात त्याचही अव्वाच्या सव्वा कौतुक झालं असं कौतुक करून घेण्याकरता तर असले खाने देत नसतील ? असा प्रश्न उगाचच माझ्या मनात येऊन गेला.

'प्रतिभा'चा आवाज चांगला व बहादूरशहा 'जफर' ह्या मोगल बादशहाच्या शायरीचा तिनं बराच अभ्यास पण केला होता त्या शायराची "न किसीकी आँख का नूर हूँ !" ही गजल तिने म्हटली. त्यानंतर राजदूतांच्या सरदार निजी सचिवान व त्याच्या बायकोनं पंजाबी ढंगाचे 'टप्पे' म्हटले. टप्पे म्हणजे आपल्याकडले सवाल-जबाब. हा कार्यक्रम चांगलाच रंगला

आत्तापर्यंत विमानातून बॉम्बस् वगैरे टाकले जायचे पण गेले दोन दिवस पत्रकं टाकली जात होती प्रथम आम्हाला वाटलं की ही फारसीतली पत्रकं बंडखोर मंडळी टाकताहेत. पण नंतर कळलं की सरकारनच ती पत्रकं टाकली होती.

त्या पत्रकांत रात्रीचे घरासमोरचे दिवे लावू नयेत, (खरं म्हणजे घरासमोरचे दिवे लावले पाहिजेत हा सरकारी नियम होता) खिडक्यांच्या काचांना कागद चिटकवावेत वगैरे सूचना होत्या थोडक्यात म्हणजे हवाई हल्ला होण्याची भीती असली म्हणजे कशा सूचना दिल्या जातात, तशा ह्या सूचना होत्या

पत्रकं टाकली गेली त्याचबरोबर टी.व्ही व रेडियोवर त्याच सूचना परत परत सांगायला सुरुवात झाली ते ऐकून आम्ही चांगलेच चरकलो. म्हणजे आता बंडखोर हवाई-हल्ला करणार आहेत की काय ? ही कल्पना मनात येताच आम्ही चटपटलो आणि मोठी चिंता वाटू लागली आम्हालाच नव्हे तर इतर हिंदी लोकांना आणि अफगाणांनादेखील. त्या चिंतेमुळे मोठं बेदिलीचं वातावरण निर्माण झालं, मोठी घबराट उडाली

बंडखोर हवाई हल्ला करणार म्हणजे कोणत्या तरी मोठ्या राष्ट्राच्या मदतीनेच करणार हे स्पष्ट होतं आणि मोठं राष्ट्र म्हणजे अमेरिकाच, दुसरं कोण ? आणि एकदा अमेरिका युद्धात पडली म्हणजे महायुद्धच पेटणार ! एक वेळ महायुद्ध परवडलं पण व्हिएटनाम झाला नाही म्हणजे मिळवली

व्हिएटनाममधल्या दोन्ही बाजूच्या क्रौर्य कथा आम्ही वाचल्या होत्या त्यावरच्या फिल्मस् पाहिल्या होत्या. जे पूर्वी वाचलं होतं व चित्रात बघितलं होतं ते आता इथं प्रत्यक्षात पाहायला मिळणार, एवढंच नव्हे तर त्याची झळही आम्हाला लागायचा संभव होता आणि नुसती झळच नाही तर कदाचित आम्ही त्या वणव्यात होरपळूनही निघालो असतो

पण आमच्या आणि अफगाणांच्या सुदैवानं तसं काही झालं नाही अफगाणिस्तानचं व्हिएटनाम झालं नाही, तो अफगाणिस्तानच राहिला

साम्यवादी धर्माला अफूची गोळी मानतात. नवी राज्यसत्ता साम्यवादी विचाराची

असल्यामुळे त्या नव्या सत्तेचेही विचार तसेच होते. त्या विचारानेच नूर महमद तराकीन आपल्या नावातल महंमद हे नाव काढून टाकलं तो आता फक्त नूर तराकी अर्थात कॉम्रेड नूर तराकी झाला होता.

पूर्वी कोणताही सरकारी कार्यक्रम सुरू होण्याआधी कुराणातले ठराविक कलमे वाचले जायचे नव्या सरकारन ती पद्धत बद केली.

अमीनही साम्यवादीच व धर्म ही अफूची गोळी आहे असं मानणारा. पण ह्या अफूच्या गोळीचा आपल्या भल्याकरता का उपयोग करून घेऊ नये ? ह्या विचाराचा त्याने सत्तेवर येता-येताच लोकाना खूष करण्यासाठी सगळ्या कार्यक्रमाच्या आधी कुराणातले कलमे वाचण्याची पद्धत परत सुरू केली एवढच नव्हे तर देशाच नाव नुसत रिपब्लिक होतं त्याचं ' इस्लामिक रिपब्लिक ' असं केलं ह्यामाग नुसत्या अफगाणानाच नव्हे तर सौदी अरेबिया, इराण, इराक वगैरे इस्लामिक देशानाही खूष करायचा विचार होता

शेवटचा मोगल बादशहा बहादूरशहा ' जफर ' ह्याच्या जीवनावर प्रतिभाने 'बदनसीब' ही कादबरी लिहिली होती ते पुस्तक आता प्रसिद्ध झाल होत व प्रकाशकानी त्याच्या दोन प्रती पाठवल्या होत्या.

सगळ्या बाबतीत माझा उत्साह दांडगा, तेव्हा मी ठरवलं की ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाचा मोठा समारंभ करायचा, दणक्यात मोठी पार्टी करायची, चांगली दगल उडवून द्यायची. प्रतिभा चागलीच संकोची, तिला असं स्वत भोवती दिवे ओवळून घेण बर वाटेना. पण मी म्हटलं, स्वत भोवती असे दिवे ओवाळून घेतल्याशिवाय आपला चेहरा लोकाना दिसणार तरी कसा ?

तेव्हा चागली सत्तर-ऐंशी मडळी कॉकटेलला बोलावली त्यात आमची मित्रमडळी तर होतीच पण शत्रुमंडळी पण होती राजदूत व बाईंना खास निमत्रण होतं

अपेक्षेप्रमाणे सगळे आमन्त्रित लोक आले. मित्रपक्ष व शत्रुपक्ष सुद्धा शत्रुपक्षाचे लोक आपसात कुजबुजत होते की राजदूतसाहेब काही येणार नाहीत त्याना अशा किरकोळ कार्यक्रमाला यायला कुठे वेळ मिळणार आहे ? एका दृष्टीने त्यांच म्हणण बरोबर होतं. राजदूतांना ज्या वेळी मी आमत्रण द्यायला गेलो त्या वेळी त्यानी ह्या कार्यक्रमाला यायला जमेल की नाही ह्याबद्दल संशय व्यक्त केला होता. कारण त्याच संध्याकाळी त्याना रशियन वकिलाच्या निरोप समारंभाला जायचं होतं.

पण त्यानी जमवल होत अगदी अर्ध्या तासाकरता का होईना ते व बाई येऊन गेले. आम्ही प्रतिभेची आत्तापर्यंत प्रसिद्ध झालेली पाचही पुस्तक बाहेर काढून ठेवली होती आलेल्या पाहुण्यांना ती दाखवत होतो, तशी ती राजदूतांना व बाईंना पण दाखवली व सर्वांकडून कोड-कौतुक करून घेतले

२८२१९

रशियन राजदूताची फेयर-वेल पार्टी असतानासुद्धा राजदूत बाईसह आले त्याचा आम्हाला फार आनंद झाला. आम्हाला आनंद झाला तसा शत्रुपक्षाच्या लोकाना दु:ख झालं. खरं म्हणजे ह्यात आम्हाला इतका आनंद होण्यासारखं काहीही नव्हतं, तर त्या लोकाना दु ख. समाज लहान असला की वृत्तीपण सकुचित होते की काय ?

अफगाणिस्तानात जाणाऱ्या काय किंवा मध्यपूर्वेतल्या इस्लामी देशांत जाणाऱ्या काय, हिंदी मुसलमानाची वृत्ती इतर हिंदी लोकापेक्षा फार वेगळी असते. त्यामुळे त्यांना फार मानसिक त्रास होतो ह्या देशातून जाणारे हिंदू तर हे जाणूनच असतात की हे बहुसंख्य मुस्लिम लोकसंख्या असलेले देश आहेत व आपल्याला त्याच्या तत्राने वागावे लागेल, थोडे दबूनच राहायला लागेल.

पण हिंदी मुसलमानाची मनोधारणा फार वेगळी असते त्यांना वाटते की आपण भारतासारख्या मुस्लिम अल्पसंख्य असलेल्या देशातून आलो आहोत, तेव्हा आपल्याला काही खास वेगळी वागणूक मिळावी. पण तसं काही होत नाही. अफगाणांना हिंदी मुसलमान काही खास आहेत असंच मुळी वाटत नाही इजिप्तमधले मुसलमान तर हिंदी मुसलमानाला मुसलमानच मानायला तयार नसतात आणि वेगळी वागणूक द्यायची म्हणजे काय करायच ? हा प्रश्न राहतोच

हे सगळं सागायचं कारण म्हणजे इथल्या इंडिया स्कूलमध्ये कोणी खान नावाचे हिंदी-मुस्लिम गृहस्थ शिक्षक म्हणून आले. मूळचे ते मुंबईच्या भेंडी बाजारातले तेथून त डेहराडूनच्या शाळेत गेले. तिथ काही वर्षं ते शिकत होते आता ते काबूलला आले होते. खानसाहेब काबूलला आले ते मी वर सांगितलेल्या खास मनोवृत्तीनं ते आले ती वेळही फार चांगली नव्हती सगळीकडे गडबड व गोंधळ होता त्यात ह्या खानसाहेबांना विचारतो कोण ? आणि खास वागणूक देतो कोण ? तेव्हा ते मोठे दु:खी-कष्टी झाले आणि ते आपली मुसलमानी दु:ख माझ्यासारख्या एका हिंदूला सागू लागले !

हिंदुस्थानातल्या मुसलमानाना त्यांना बाहेरच्या मुस्लिम जगात काय किंमत आहे हे कळल्याशिवाय त्याची 'बाहेर' पाहण्याची वृत्ती जाणार नाही

आता आमचा हा चौथा हिवाळा सुरू झाला होता. नव्याचे नऊ दिवस त्याचप्रमाणे थंडीचे दोन हिवाळे असं म्हणायला हरकत नाही पहिला हिवाळा सहन करायची मानसिक, शारीरिक व आर्थिक तयारी नसते त्यामुळे जरी त्रास होत असला तरी नावीन्यामुळे त्या थंडीचे कौतुक वाटलं असतं. ती सहन होऊ शकते एवढंच नाही तर तिची मजाच वाटते.

दुसऱ्या हिवाळ्यात वुलनचे कपडे वगैरे शिवून घेतलेले असतात. ते घालून फिरण्याची

मोठी ऐटी वाटते नवा–नवा सूट, बर्फात फिरण्याला योग्य असे बूट, स्वेटर्स, आतून बनियनसारखा घालण्याचा उनी डॉवर वगैरे घालून मोठे गुबगुबीत वाटायला लागते. त्यातून खाण्याकरता वेगवेगळी फळफळावळ आणि पिण्याकरिता विकत का होईना पण वकिलातीतून मिळणाऱ्या स्कॉचच्या बाटल्या, ह्यामुळे स्वतःच गुबगुबीत व्हायला होते

तिसऱ्या हिवाळ्यात सृष्टीचं कौतुक अगदी कमी होतं सगळ्या बाबतीत तोचतोपणा जाणवतो तेच नेहमीच खाण, तेच नेहमीच पिण आणि तोच नेहमीचा बर्फ आणि त्याच्या-करिता करावी लागणारी कपड्यालत्त्याची तीच तयारी आवश्यक ती खरेदी करून झालेली असते परदेशातून मागवायच्या फ्रिज, वॉशिंग मशीनसारख्या गोष्टी मागवून झालेल्या असतात सगळ्याच गोष्टीतलं नावीन्य कमी झालेल असत. तरी बरं आमच्या तिसऱ्या वर्षी राजकीय घडामोडीमुळे आयुष्य वेगळ झालेलं होत

चौथ्या वर्षाच्या हिवाळ्यात बर्फ आणि थंडीशिवाय काही जाणवत नव्हतं इथं जवळ-जवळ तीन ते चार फूट बर्फ जमत आणि काही वेळा तर तपमान उणे एकोणतीस डिग्री इतक खाली जात शून्य डिग्रीला पाण्याचं बर्फ होत हे लक्षात असल म्हणजे उणे एकोणतीस डिग्रीज म्हणजे किती घनघोर थंडी असेल ह्याची महाराष्ट्राच्या लोकानी फक्त कल्पनाच करायला हवी. अशा त्या थंडीमुळे सगळयाच भावना जणू गोठून गेल्या होत्या.

इतकी थंडी होती व आमच्या भावना बधिर झाल्या होत्या तरी नव्या राज्यकर्त्यांचं व बडखोराच तस नव्हतं. त्यांच्यात गरमा–गरमी, हाणामाऱ्या वगैरे चालू होत्याच.

सत्तेवर असणाऱ्या सुन्नी, ताजीक वगैरे लोकाचा इथल्या शिया पथीय लोकावरचा राग अगदी इतिहास काळापासूनचा आहे अफगाणिस्तानात इराणी लोकाचा काटा काढतात तर इराणमध्ये अफगाणाचा ! कारण इराणी लोक शिया आहेत व अफगाण सुन्नी

अफगाणिस्तानात आलेले नवे सरकार साम्यवादी असले तरी वृत्तीने सुन्नीच होते त्यांना शिया लोकांवरचा राग काढायला आता चांगली सधी मिळाली होती. कोणत्याही कुत्र्याला गोळी घालण्याआधी त्याला लूत लागली आहे असं सागावं अशी एक इंग्रजी म्हण आहे तसंच येथे कोणाही शियाला तो देशाचा शत्रू आहे, बडखोरांना मिळाला आहे असं म्हणाव व गोळी घालावी असं चालल होत.

आमच्या ऑफिसमधला खोजा अरेफ हा शिया पथीय आपल्याकडे बोहरी मुसलमान असतात तसलेच हे खोजा लोक चागले पैसेवाले, व्यापार–उदीम करणारे, गोरे, सुशिक्षित, सुसंस्कृत. त्या खोजा अरेफच्या जवळपासच्या नातेवाइकांतली जवळ जवळ पधरा वीस मोठी पुरुष आणि स्त्रिया ह्या नव्या राजवटीच्या क्रौर्याला बळी पडली होती त्याची चाळीस ते पन्नास मुलं निराधार झाली होती तेव्हा राहिलेल्या कुटुबियानी सांभाळ करण्याकरिता म्हणून ती अनाथ मुल आपसात वाटून घेतली

ही झाली श्रीमत खोजा लोकाची गोष्ट गरीब हाजरा लोकाची स्थिती आणखीनच दयनीय होती. आमचा घरगडी ताजमहंमद हाजरा म्हणजे शिया होता त्याच्या एका

कुटुंबातली सात आठ माणस मारली गेली होती
शिया–सुनी हे एकाच इस्लाम धर्मांचे दोन पंथ तरी त्यांच्यात एवढं वैर व तेढ मग हिंदु मुसलमानांत वैर आहे त्याचं एवढं वेगळेपण का वाटाव ?

काबूल शहरात नेहमीप्रमाणे बातम्यांचा व अफवांचा सुकाळ आहे पाकिस्तानला जोडून असलेल्या अफगाण प्रांतातून बंडखोरांचा जोर वाढतो आहे, त्यांनी त्या भागातली बरीच गावे काबीज केली आहेत, अशा तऱ्हेच्या बातम्या होत्या. अफवा अशा होत्या की, त्यातले काही बंडखोर काबूल शहरात आले आहेत व त्यांच्या सरकारविरोधी कारवाया सुरू झाल्या आहेत

पण ही नुसती अफवा निघाली नाही एका संध्याकाळी एक रशियन जोडपे भाजी मार्केटात काही खरेदी करीत असताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला व त्यात ती दोघ जबर जखमी झाली. लगेच सगळ्या शहरात अतिशय तंग वातावरण निर्माण झाल ज्या भागात हा खुनाचा प्रयत्न झाला त्या भागाची अगदी कसून तपासणी झाली अगदी घरा-घरात जाऊन पडदा पद्धत असल्यामुळे अफगाण सैनिक घरांतून जायला नाखूष असत. तेव्हा तपासणी करण्याच्या आधी घरातली सगळी बायकामाणस बाहेर काढली जात तशी ही मंडळी बाहेर आली की मग घराच्या झडतीला सुरुवात करत असत

बंडखोराना दिवसाढवळ्या उजळ माथ्याने शहरातून फिरण शक्यच नव्हत तेव्हा त्यांच्या कारवाया रात्रीच्या चालत. अगदी कर्फ्यू असतानासुद्धा कर्फ्यू काळात रशियन व अफगाण सैनिक फक्त मोठमोठ्या रस्त्यांवरून गस्त घालत मोठाल्या चौका-चौकात लष्करी टँक्स उभे करून पाळत ठेवत. पण काबूल शहर जुन आणि नवंसुद्धा गल्ल्या-बोळांच व लहान लहान रस्त्यांचं आहे तेव्हा बंडखोरावर लक्ष ठेवण सैनिकांना अवघड जात असे. बंडखोर त्याचा बरोबर फायदा उठवत असत

त्यावर अफगाण सरकारन एक उपाय काढला. गावाच्या मध्यभागी एक लहानशी टेकडी होती तिच्यावर अफगाण टी व्ही.चा रिले-टॉवर होता तेथे एक सर्च-लाईट लावला गेला रात्री कर्फ्यू सुरू झाली की हा सर्च-लाईट गावावर टाकण्यात येत असे एकाच जागी नाही तर सारखा फिरता त्यामुळे गावात कुठं काही वेगळ चालल असल की त्या टेकडीवर दुर्बिण लावून बसलेल्या सैनिकाच्या ते लक्षात येत असे मग ते तस बिनतारीने त्या त्या विभागातल्या सेना-अधिकाऱ्यांना कळवत मग रात्रभर धावाधाव, धरपकड, गोळीबार ह्यांचा धुमाकूळ चालत असे त्यामुळे रात्रीचा गोळीबार होण्याची, बंदुकीच्या गोळयांच्या व हॅण्ड-ग्रेनेडच्या आवाजाची सवय होऊन गेली

आमचा मागला तमाशा चांगला रंगला व अतिशय लोकप्रिय झाला होता त्यामुळे आमचा उत्साह अनेक गुणित झाला होता, आणि नवा तमाशा करण्याकरता मन सळसळू लागले

आमचा उत्साही चमू तयार होताच फक्त त्यात एका बंगाली बाईची भरती झाली. ती काळी-सावळी, चांगली गोल-मटोल पण अतिशय उत्साही होती ती नृत्य पण चांगलं करायची त्याचा तमाशात उपयोग करून घ्यायचं आम्ही ठरवलं

ह्या वेळचा तमाशा मी लिहिला होता नाव होत 'भगवान कृष्ण खडे है!' भगवान कृष्ण जरी आज निवडणुकीला उभे राहिले तरी त्यांना पक्षाचं तिकीट, अल्प संख्याकांकरता राखीव जागा, मतदारांना द्यायला लागणारे पैसे ह्या सगळ्या गोष्टींतून कस जाव लागेल, ह्याच मजेशीर चित्रण केलं होतं त्यातून हिंदुस्थानातली निवडणूक हा विषय त्या वेळी अगदी गरमागरम होता

एकोणीसशे ऐंशी साल सहिन्या दोन महिन्यात उजाडणार होतं राष्ट्रपतींनी सार्वत्रिक निवडणुका जाहीर केल्या होत्या त्या चार जानेवारीला होणार होत्या येथे निवडणुका होणार नव्हत्या तरी त्याचं वातावरण तयार झालं होत त्या वातावरणात आमच्या तमाशाच्या तालमी मोठ्या जोमात चालल्या होत्या पण आता नवीनच आपत्ती निर्माण झाली होती.

गेले तीन चार दिवस अगदी डासांसारखी विमाने काबूल शहराभोवती घोंगावत होती एक विमान यायचे, शहरावर चक्कर मारायचे व विमानतळावर उतरायचे तीन-चार मिनिटांत परत दुसरे विमान यायचे, शहरावर चक्कर मारायचे व तेही विमानतळावर उतरायचे तोपर्यंत तिथं आधीच आलेल्या विमानाची उड्डाणांची तयारी झालेली असायची ते गावावर चक्कर मारून निघून जायचं तोपर्यंत आणखी एक नवीन विमान शहरावर चक्कर मारायला लागल असायच

अगदी डोक फिरायची वेळ आली एक मिनिटाची शांतता नाही की उसत नाही. काय चाललं आहे ते कळत नव्हत प्रतिभा सारख सांगत होती की हे काही साध. प्रकरण नाही आहे, काहीतरी मोठी गडबड होणार आहे. आम्ही सगळ्यांनी ते हसण्यावारी नेल. एक मित्र तर म्हणाला, "अहो कसली मोठी भानगड नि कसलं काय! अफगाण वैमानिकाच काही तरी शिक्षण चालू असेल आणि तुमच्यातल्या लेखिकेला वाटतय की काही तरी मोठं घडणार आहे" त्या वेळी प्रतिभा निरुत्तर झाली तरी तिचं समाधान झाल नाही. काहीतरी होणार आहे नक्की अशी तिची भुणभुण माझ्यामागे चालूच राहिली

विमानांची एवढ्या मोठ्या प्रमाणात ये-जा चालली होती, सारं काबूल शहर त्याने गजून गेल होत, तरी पण त्याबाबत अफगाण टी व्ही व रेडिओ अगदी मूग गिळून बसला होता बी. बी सी व व्हाईस ऑफ अमेरिका सांगत होता की, रशियन सैन्य मोठ्या प्रमाणात काबूल शहरात उतरत आहे, अगदी रणगाड्यानिशी पण त्यांच्या सांगण्यावर कोणाचाही विश्वास बसणं अवघड होत सध्याचा सारा अफगाणिस्तान रशियाच्या संपूर्ण

वर्चस्वाखाली होता, तेव्हा सैन्य पाठवून रशियाचा आणखी फायदा तो काय होणार असा सगळ्याचा प्रश्न त्यामुळे बी बी सी वा व्हाइस ऑफ अमेरिकेच सांगणं कुणी गंभीरपणे घेतलच नाही.

पण डोक्यावर घोंगावणारी विमानं काही कमी झाली नव्हती आमचा ताज महंमद तर त्या घोंगावणाऱ्या आवाजानं अगदी वेडा होऊन जाण्याची वेळ आली होती "आम्हाला मारायच असेल तर आमच्यावर चक्क बॉम्बस टाका म्हणावं" तो कातावून म्हणाला, "पण असं विमानाच घोंगावण नको !" पण ही स्थिती फक्त ताज महंमदची झाली नव्हती तर तशी ती काबूलमधल्या साऱ्या जनतेची झाली होती.

आणि एक दिवस ते विमान-पर्व संपलं सगळीकडे अगदी शांत शांत झाल. विमानांच्या त्या घरघरणाऱ्या आवाजाची इतकी सवय झाली होती की, आता त्या शांततेचा पण त्रास होऊ लागला.

आम्हा आयटेकच्या लोकांत हिंदू, मुस्लिम, शीख, इसाई असे सगळे होते. डिसेंबर महिन्याचे शेवटचे दिवस म्हणजे ख्रिसमस साजरा करण्याचे दिवस. वकिलातीत ख्रिसमसचा सण साजरा करण्याकरता मोठा कार्यक्रम आयोजित केला गेला होता त्यात आमचा नवा तमाशा पण होणार होता

वकिलातीत असा सार्वजनिक कार्यक्रम होणार होता तर आमचे इसाई बधू आपआपल्या मित्रमंडळींना घरी पार्टी देऊन ख्रिसमस साजरा करत होते अठ्ठावीस डिसेंबरला मेजर डिसोझान आपल्या घरी ख्रिसमस पार्टी दिली भारतीय सैन्यातले काही अधिकारी आयटेक कार्यक्रमाखाली काबूलला आले होते ते होते मुख्यत्वेकरून सैन्यातल्या शिक्षण विभागातले मेजर डिसोझा हा त्यातलाच.

डिसोझान दिलेल्या पार्टीला आम्ही काहीतरी तीस-चाळीस मोठी माणसं होतो ज्याना आपल्या मुलाना घरी ठेवता येण्यासारखं नव्हतं ते मुलासह आले होते आमची मुलं मोठी होती त्यांना घरीच ठेवून आम्ही आलो होतो.

पार्टीत नेहमीप्रमाणे चार-पाच ग्रुप्स पडले गप्पा-टप्पा, हसण-खिदळण चालल होत थोडक्यात म्हणजे पार्टी अगदी रंगात आली होती ओल्या आणि रंगीत पेयाचा—तोही अस्सल स्कॉचचा पुरवठा असल्यावर पार्टी न रंगली तरच नवल

तर अशी ती पार्टी रंगात आली असताना बाहेर मोठा धमाका झाला आता बाहेर धमाका होण्यात विशेष असं काही नव्हतं. गेली दोन वर्षं असल्या धमाक्यांची, बंदुका व बॉम्बसच्या आवाजांची आम्हाला अगदी सवय होऊन गेली होती पण आत्ताचा धमाका फार जोरदार होता डिसोझाच्या घराजवळच टी.व्ही अन् रेडियो स्टेशन होत त्यामुळे त्या धमाक्याला विशिष्ट अर्थ पण होता बडखोर प्रथम टी व्ही व रेडियोवरच हल्ला करणार हे

स्पष्ट होतं

धमाक्यानंतर बदुकीचे आवाज पण ऐकू यायला लागले, अगदी फैरीवर फैरी आणि त्या हसत्या खेळत्या पार्टीत कमालीचं गांभीर्य पसरल गप्पा बद झाल्या अेल्या आणि रंगीत पेयाचे ग्लास हातातल्या हातातच राहिले तोंड सर्व अर्थांनी बद झाली

डिसोझाचे सैन्यातले काही मित्र व मी असे आम्ही बाहेर पडलो, तर बाहेर भयाण अंधाराशिवाय काही दिसल नाही गोळ्याचे आवाज मधून मधून येत होते. परत बद होत होते. परत एकदा गोळ्यांचे आवाज सुरू झाले तशी डिसोझा म्हणाला, "तुम्ही सगळे आत जा हा कॅप्टन शर्मा आणि मी पुढे जाऊन जरा पाहणी करून येतो."

डिसोझा आणि शर्मा शिक्षण विभागातले असले तरी त्यांना पाहणी करण्याच सैनिकी शिक्षण दिलेलं होतं सांगितल्याप्रमाणे हे दोघे गुडूप अधारात निघून गेले व आम्ही आत आलो

आतले लोक आमची वाटच पाहात होते आमच्या चेहऱ्यांवरून काहीतरी गभीर प्रकार झाला असावा असा त्यानी अदाज केला त्यांच्या अंदाजात आणखी भर पडली ती टी व्ही. व टेलिफोन मृतप्राय पडल्यामुळे जी मंडळी आपल्या मुला-बाळाना घरी ठेवून आली होती ती फार चिंतातुर झाली त्यांना बाहेर पडता येत नव्हत की टेलिफोनवरून मुलाशी संपर्क साधता येत नव्हता. त्यामुळे वातावरण आणखीनच तणावपूर्ण झाल होत

आम्ही बाहेरून जाऊन आलो होतो तेव्हा आम्ही बाहेरच्या परिस्थितीबद्दल काहीतरी सागावं अशी त्या सगळ्या लोकाची अपेक्षा. पण बाहेरून जाऊन आलो होतो, एवढाच त्यांच्या आमच्यातला फरक होता आम्हालासुद्धा बाहेर काय झाले आहे ह्याची काहीही कल्पना नव्हती खर काय झालं आहे ते मेजर डिसोझा आणि कॅप्टन शर्मा परत येईपर्यंत कळणं शक्य नव्हत

तग वातावरण अतंग करण जरुरीचं होतं. नाहीतर बाहेर काहीतरी भयकर घडल आहे ह्या कल्पनेनंच तिथं जमलेल्यात बेदिली माजली असती तेव्हा माझ्या ग्लासात शिल्लक राहिलेली व्हिस्की मी एका घोटात संपवून मिसेस डिसोझाकडे आणखीची मागणी करू लागलो

इतक्या गभीर प्रसंगीसुद्धा मी असा खेळीमेळीनं वागतो आहे हे बऱ्याच जणांना आवडले नाही मलाही ते पटत नव्हत पण प्राप्त परिस्थितीत गभीर राहून काही फायदा तर होणार नव्हताच, उलट सगळ्याची घाबरगुंडी उडाली असती अस मला वाटल म्हणून हा असा माझा खेळकरपणा! तशीच पाच-दहा मिनिट गेली माझ्या हास्यविनोदान बऱ्याच जणांच्या ओठी हास्य आले असले तरी त्यांच्या पोटी व्हिस्की आणि भीती ह्याचं मिश्रण आहे हे कोणीही ओळखलं असत

डिसोझा आणि शर्मा परत आले. बाहेर काय झाले होते त्याचा त्यानाही अदाज करता आला नव्हता पण आता थोडा वेळ शात आहे तर त्याचा फायदा घेऊन सगळ्यांनी

घरोघर निघून जावं असं त्यांनी सुचवलं

लगेच एकेका विभागात राहणाऱ्याचे ग्रुप्स पडले टाटा, बाय-बाय वगैरे न करता जो तो ठरलेल्या गाडीत जाऊन बसला आमच्या भागात राहणाऱ्या एका गुजराथी मित्राच्या गाडीत आम्ही दहा-बारा जण अगदी कोंबून–कोंबून बसलो, आणि गाडी निघाली

आम्ही बारक्या रस्त्यावर होतो तोपर्यंत डिसोझाच्या घराजवळच टी व्ही आणि रेडियो स्टेशन आम्हाला दिसलं नव्हतं पण मोठ्या रस्त्यावर आल्यावर मात्र ते सूर्य-प्रकाशाइतकं स्पष्ट दिसू लागलं तेथे मोठी आग लागली होती मघा जो मोठा धमाका झाला होता त्यानंच लागलेली ही आग असावी मुख्य इमारतीला काही झालं नसलं तरी अंगणातल्या गोडाऊनच्या इमारतीवर बॉम्ब पडून मोठी आग लागली होती, आणि त्या आगीमुळं टी.व्ही -रेडियो स्टेशन अगदी उजळून निघालं होतं.

एक एक करत त्या गुजराथी मित्रानं आम्हा सगळयाना घरोघर सोडलं. रस्त्यावर अगदी शुकशुकाट होता. काही वेगळं दिसलं नाही की काही वेगळं जाणवलं नाही कदाचित तो धमाका इथपर्यंत जाणवलासुद्धा नसेल आम्ही आपल्या घरी अगदी सुखरूप येऊन पोहोचलो

दहा-पंधरा मिनिटापूर्वी हसतखेळत असलेले आम्ही आता दाही दिशाना पांगलो होतो आमच्यातले कितीजण सुखरूप पोहोचले किंवा कोणाला काही झाले का ? हे कळायला काहीच मार्ग नव्हता टेलिफोन नाकाम झाल्यामुळे एकमेकांची खबरबात घेणं पण शक्य नव्हतं तेव्हा मनाशी चुटपुटत राहिलो. ती रात्र तशीच घालवली म्हणजे ती आपोआपच गुजरली.

नेहमीप्रमाणे हे घडलं होतं गुरुवारी दुसरा दिवस उजाडला तो शुक्रवारचा ! म्हणजे सुट्टीचा !

सकाळी सकाळी थोरल्या मुलाचा मित्र आला. त्या दोघांच्या सायकली होत्या त्या घेऊन गावात चक्कर मारायला म्हणून ते दोघं बाहेर पडले

थोरल्याला आम्ही काहीतरी सहा-सात महिन्यापूर्वी नवी सायकल घेऊन दिली होती. त्या सायकलीची पण एक कथाच झाली

एके दिवशी तो सायकलवरून येत असता त्याला एका मिलिटरीच्या ट्रकचा धक्का लागला तो पडला व थोडा जखमी झाला तशी आजूबाजूला जमलेल्या लोकानी त्याला इस्पितळात पोहोचवलं. तेथे असलेल्या एका सरदारजीला मुलाने घरचा फोन नंबर दिला व फोन करायला सांगितलं त्याप्रमाणे त्यानं प्रतिभाला कळवलं मी कचेरीत, असा फोन आलेला बरं त्या सरदारजीनं ॲक्सिडेन्ट झाला आहे म्हणजे काय झालं आहे ते सांगितलंच नव्हतं, त्यामुळे प्रतिभा अगदी बावचळून गेली तिनं मला कचेरीत फोन करायचा प्रयत्न केला. पण कचेरीतले फोन योग्य वेळी कधी उपयोगी पडले आहेत ?

तेव्हा ती स्वतःच कचेरीत आली तिला मोठी धाप लागली होती व चेहरा कावरा-

बावरा झाला होता तिची ती स्थिती बघून काहीतरी अमंगल घडलं असावं अशी मला शंका आलीच प्रतिभाने सगळं काही सांगताच मी, दास व खोजा अरेफ तातडीनं हॉस्पिटलकडे निघालो

हॉस्पिटलला पोहोचायला जवळ जवळ दहा-बारा मिनिटं लागली. ॲक्सिडेन्ट झाला आहे एवढच फक्त आम्हाला कळलं होतं आता ॲक्सिडेन्ट म्हणजे काय वाटेल ते असू शकत त्यातून मुलगा सायकलवर व त्याला आर्मीच्या ट्रकनं धक्का दिलेला ! मन चिंती ते वैरी न चिंती ह्या म्हणीप्रमाणे ती काही मिनिट अगदी वैऱ्यासारखी गेली

हॉस्पिटलात गेलो व ॲक्सिडेन्ट विभागात जाऊ लागलो तर समोरच्या कॉरिडॉरमधून आमचा मुलगाच येताना दिसला ! त्याला तस सुखरूप पाहून मनाला जो आनंद झाला त्या आनंदाची फक्त पुनर्जन्माच्या आनंदाबरोबर तुलना करता येईल.

मुलाला घेऊन आम्ही हॉस्पिटलातून बाहेर पडणार तेवढ्यात ज्या ट्रकनं मुलाला धक्का दिला होता, त्या ट्रकचा ड्रायव्हर आमच्या जवळ आला त्याचा चेहरा पार पडला होता. आम्ही पोलिसात काय तक्रार करतो आहोत त्यावर त्याला होणारी शिक्षा अवलंबून होती. कारण ॲक्सिडेन्ट होण्यात त्याची चूक होती त्याची नोकरी तर गेली असतीच वर त्याला दोन चार वर्षांचा तुरुंगवास पण घडला असता आणि इथले तुरुंग म्हणजे नरक बरा असं म्हणाव असे ! आमचा मुलगा आम्हाला परत मिळाला होता, अगदी सुखरूप मिळाला होता त्या ड्रायव्हरची चूक असो-नसो, त्याला काही शिक्षा होण्यात आम्हाला स्वारस्य नव्हतं तेव्हा आम्ही पोलिसांत काहीही तक्रार करणार नाही आहोत म्हणून त्याला सांगितल खरं म्हणजे आम्ही खोजा अरेफला सांगितल, त्याने ते भाषांतर करून त्या ड्रायव्हरला सांगितल त्यामुळे खोजा अरेफ त्याला सांगत असताना त्या ड्रायव्हरचा चेहरा आम्हाला चांगला न्याहाळता आला त्याच्या चेहऱ्यावर जो सुटकेचा आनद दिसला त्याचे वर्णन करणं शक्य नाही. फाशीच्या तख्तावरून एखादा सुटला तर त्याचा चेहरा कसा होईल ? त्या वेळी त्या ड्रायव्हरच्या चेहऱ्यावर जो आनद दिसला तसा पूर्वी कधी बघितला नव्हता व सुदैवान पुढेही कधी बघायचा प्रसंग आला नाही

अफगाणिस्तानात हाच एक अनुभव यायचा राहिला होता, तोही आला

त्या शुक्रवारी सकाळी-सकाळी माझा मुलगा व त्याचा मित्र सायकलवरून चक्कर मारायला म्हणून गेले मुलगा काहीतरी तासभरात परत आला परत आला त्या वेळी त्याच सारं अंग नुसत थरथर कापत होत आणि त्याच्या तोंडून एक शब्द फुटत नव्हता त्या वेळी तो अठरा एक वर्षांचा होता, म्हणजे काही फार लहान होता असं नाही. पण त्यान जे बाहेर बघितलं होत ते बघून कोणीही थरथर कापला असता, कोणाचीही बोबडी वळली असती

पाच एक मिनिटांनतर त्याला वाचा फुटली " बाबा, गावात शेकड्यानी रशियन्स आले

आहेत. कोपऱ्याकोपऱ्यावर त्यांचे अवाढव्य रणगाडे उभे आहेत ' "

जे होणार होणार म्हणून बी. बी सी आणि व्हाईस ऑफ अमेरिका इतके दिवस सांगत होता व काहीतरी अघटित घडणार म्हणून प्रतिभेला संशय येत होता, ते शेवटी घडलं होत रशियन फौजा हंगेरीत कशा घुसल्या त्याबद्दल आम्ही वर्तमानपत्रात वाचलं होतं आता तेच अफगाणिस्तानात घडलं होत चार दिवसापूर्वी जी सतत विमानाची घर-घर ऐकू येत होती ती ह्या रशियन सैन्य व त्यांचे रणगाडे वगैरे आणणाऱ्या विमानांची होती तर ! पण नतर झालेल्या घटनांवरून असं वाटतं की, ती घरघर नुसती विमानाची नव्हती तर ! ती अफगाणिस्तानला मरणाच्या आधी लागलेली घरघर होती !

मुलान रशियन सैन्याच इतर वर्णन केल्यानतर आम्हाला घरात बसण शक्यच नव्हत तेव्हा मुलाला घरीच थांबवून मी आणि प्रतिभा कॅमेरा घेऊन लगबगीन निघालो टॅक्सी पकडली व खाना-ए-खल्कच्या बाजूला जायला सांगितले खाना ए-खल्कच्या समोरच्या रस्त्यावर कोणालाही जाऊ देण्यात येत नव्हतं तेव्हा आम्ही त्या रस्त्यावरच्या एका बाजूच्या चौराहीला उतरलो त्या चौराहीवर गोल आकाराची मोठी बाग होती त्याला लागून बरेच रशियन सैनिक व टॅक्स् उभे होते. काही सैनिक गवतावर पडून विश्राती घेत होते, काही हातात स्टेनगन्स् घेऊन उभे होते त्याच्या जवळ जाण्याची हिंमत होत नव्हती लाबून फिल्म घेण्यात काही अर्थ नव्हता

तेव्हा आम्ही तिथून निघालो व टॅक्सीवाल्याला काबूल शहराच्या उत्तरी भागाकडे गाडी घ्यायला सांगितले त्या भागाकडे जाणाऱ्या रस्त्याचे नाव सलाग वट असं होत.

सलाग हे ठिकाण उत्तर अफगाणिस्तानातल व काही हजार मीटर्स उचीवरच तिथे असलेल्या पर्वतात रशियाने एक मोठा रस्ता व तेवढाच मोठा बोगदा अफगाणिस्तानला 'भेट' म्हणून बाधून दिला होता त्यामुळे उत्तर अफगाणिस्तानातून दक्षिणेत तडक येण्याची सोय झाली खरी पण त्याचा फायदा खरा रशियालाच मिळाला कारण तोच रस्ता पुढे उत्तरेकडे जाऊन रशियाला मिळत होता

उत्तर-काबूलमधून जाणाऱ्या ह्या सलाग-वटवरती पुष्कळ दुकान, सिनेमाघरं, वगैरे होती आम्ही तिथे पोहोचलो आणि बघतो तो काय ? रस्त्याच्या एका बाजूला रणगाड्याची माळच माळ ' एका मागून एक असे चागले पन्नास साठ रणगाडे उभे होते. रशियन सैनिक खाली उतरून आपसात गप्पा-गोष्टी करत उभे होते काहीजण सिगरेटी पीत होते अफगाण लोक थव्या-थव्याने उभे होते आणि ह्या सगळ्याकडे विस्फारलेल्या नजरेने पाहात होतं आपसात काही बोलण-चालण नव्हतंच आत्तापर्यंत त्यानी कित्येक 'कू' पाहिले होते कित्येक राजसत्ता उलथवल्या गेल्या होत्या पण ते सगळे अफगाणां अफगाणातच होतं. असं बाहेरच सैन्य आलेल त्यानी कधी पाहिलं नव्हत त्यामुळे त्याची अगदी वाचाच बद झाली होती.

टॅक्सीवाल्याला तशीच गाडी पुढे घ्यायला सांगितली "आता मात्र आमचा देश

बुडाला, अगदी पार बुडाला " टॅक्सीवाल्यान टॅक्सी पुढे नेत आपल दु:ख व्यक्त केल.

पुढल्या चौकापाशी आम्ही टॅक्सी सोडली काही अफगाण मुलं त्या रशियन सैनिकांना अमेरिकन व इंग्लिश सिगारेटी मोठ्या चढ्या किंमतीला विकत होती. त्या रशियन सैनिकांनी आयुष्यात प्रथमच इतक्या चांगल्या व भारीपैकी सिगारेटी पाहिल्या असाव्यात त्यामुळे ते तशा चढ्या किंमतीलाही पाकिटच्या पाकीट विकत घेत होते

ते सैनिक अफगाण मुलांशी मोकळेपणान बोलताना पाहून आश्चर्य वाटल. नतर कळल की ते रशियाच्या दक्षिण भागातले आहेत, मुसलमान आहेत व फारसी बोलणारे आहेत. त्याना म्हणे अस सांगितल गेल होत की, अमेरिकन्स अफगाणावर फार मोठ्या प्रमाणावर जुलूम जबरदस्ती करताहेत व अफगाणांना मदत करण्याकरता त्यांना पाठवण्यात आल आहे

रस्त्यावर रशियन सैनिक सिगारेटी विकत घेताहेत, त्याच्या मागे रणगाडे उभे आहेत, अफगाण मोठी गर्दी करून हे सगळ पाहताहेत, ह्या सगळ्यांची फिल्म घ्यावी असा विचार आला पण तो आचारात आणण्याआधी त्या रशियन सैनिकाना विचारलेलं बर म्हणून त्यांच्यातल्या एका अधिकाऱ्याला कॅमेरा दाखवून फिल्म घेऊ का, म्हणून फारसीमध्ये विचारलं, तर त्यांनी आमचं बोलण त्याना कळत नाही आहे, असं सोंग केल आता आम्ही हातात कॅमेरा घेऊन जेवणाबद्दल का विचारात होतो? तेव्हा जवळच उभ्या असलेल्या अफगाण पोलिस अधिकाऱ्याकडे जाऊन 'फिल्म घेऊ का?' म्हणून विचारल

"ह्यात फिल्म घेण्यासारख काय आहे?" म्हणून तो आमच्यावरच खेकसला त्याची मनःस्थिती व चीड आम्ही समजू शकत होतो त्यामुळे आम्ही त्याच्याशी जास्त वाद घातला नाही.

सध्याकाळी टी.व्ही.वर अमीन मारला गेल्याची व रेव्होल्यूशनरी कौन्सिलनं रशियन सेना मदतीला बोलावल्याची व बबरक कारमाल सदर-ए-रियासत, सेक्रेटरी...वगैरे वगैरे झाल्याचं सागण्यात आल. अमीन अमेरिकेशी कशी हातमिळवणी करत होता व कसा देशाचा द्रोह करत होता, ह्याच रसभरित वर्णन केल गेलं अमीन कसा मारला गेला, केव्हा मारला गेला, कोणी मारला, ह्याबद्दल मात्र एक चकार शब्दही काढला गेला नाही

नतर कळाले ते असे नूर महमद तराकी सदर ए-रियासत असताना खाना-ए-खल्क-मध्ये राहात असे तिथं राहण धोक्याच आहे असं सागून रशियनांनी अमीनला गावापासून पंधरा-सोळा मीटर दूर असलेल्या व मागे सांगितलेल्या दारुलमान भागातल्या राज प्रासादात राहायला नेल खाना-ए-खल्क अगदी गावात भरवस्तीत असल्यामुळे तिथ थोड काही खुट्ट झाल तरी त्याचे पडसाद गावात उठत. पण आता दारुलामान ह्या प्रासादात काय चालल आहे ह्याचा पत्ता लागत नसे.

रशियन सेना अफगाणिस्तानात घुसण्याच्या आधल्या रात्रीची गोष्ट. त्या रात्री अमीनन

नेहमीप्रमाणे आपलं जेवण घेतलं. थोड्या वेळानंतर त्याला अस्वस्थ वाटायला लागलं रशियन डॉक्टर्स तिथं होतेच तपासणी अंती त्यांना असं आढळून आलं की अमीनवर विषप्रयोग करण्यात आला आहे हा आपल्याच लोकांनी केला आहे हे रशियन डॉक्टरांना माहीत नव्हतं. त्यांना वाटलं की कोणा अफगाणाचं ते कृत्य असावं तेव्हा त्यांनी तातडीने उपचार करायला सुरुवात केली त्यात त्यांना यशही येत चाललं होतं तेवढ्यात त्यांना 'उपचार करू नका' असा आदेश आला त्यांनी त्याप्रमाणे उपचार थांबवला परिणामतः अमीन मृत्यू पावला. थोड्याच वेळात अमीनचे सहकारी पण मारले गेले

आमच्या एका मित्राने अमीन रक्तपाताशिवाय मरेल असं भविष्य केल्याचं मागे सांगितलं आहेच. त्याचं भविष्य अशा रीतीनं खरं होणार होतं

अमीनच्या मरण्याचं कोणाला दुःखही नव्हतं वा सुखही नव्हतं दुःख नसण्याचं कारण स्पष्टच आहे. सुख वाटलं नाही ह्याचं कारण हा गेला तरी ह्याच्या जागी ह्याचाच भाऊ येणार ह्याची लोकांना खात्री होती. कम्युनिस्ट राजवटीची ही एक खासियत आहे त्यांचे सगळे राज्यकर्ते अगदी एका माळेचे मणी असतात त्यामुळे ते बदलले तरी तसा काही फारसा फरक पडत नाही

आता ह्या वेळी जो 'मणि' आला होता त्याचं नाव बबरक कारमाल! त्याची सदर-ए-रियासत म्हणून निवड अगदी एकमताने झाली होती एकमताने म्हणजे मॉस्कोहून आलेल्या 'एका' मताने'

एकेकाळी हा बबरक कारमाल अगदी समतोल विचाराचा म्हणून प्रसिद्ध होता जाहीर शहाच्या काळात तो प्रथम विद्यार्थ्यांचा पुढारी होता नतर अफगाण विधानसभेचा सभासद झाला नंतर तो अफगाण कम्युनिस्ट चळवळीत शिरला व त्याच्या 'परचम' पक्षाचा पुढारी झाला नवी साम्यवादी राजवट आली त्या वेळी खल्क पक्षाचा तराकी राज्यप्रमुख झाला व त्याच पक्षाचा अमीन एक उपप्रमुख तर परचम पक्षाचा कारमाल दुसरा उप-प्रमुख झाला पुढे त्या दोघा उपप्रमुखात लठ्ठा-लठ्ठी सुरू झाली तेव्हा अमीनने कारमालला पूर्व युरोपातल्या कोणा देशात राजदूत म्हणून पाठवण्याची व्यवस्था केली

आता हाच तो बबरक कारमाल अफगाणिस्तानचा राज्य-प्रमुख म्हणून परत आला होता त्याला कोणी आणि कधी परत बोलावला व तो राज्यप्रमुख म्हणून कोणी निवडला, ह्या गोष्टींचा कधीच पत्ता लागला नाही मधे जी मिनिटा-मिनिटाला रशियन विमानं येत होती, त्यातल्या एकातून तो आला असावा किंवा अमीन मारला गेल्याचं पक्कं कळल्यावर तो आला असेल

आमचा तो शुक्रवार कसा गेला हे सांगितलंच आहे शनिवारी कचेरीत गेलो तर तिथं अगदी सुतकी वातावरण! साम्यवादी पक्षाचे कार्यकर्तेसुद्धा ह्या रौरवी आक्रमणामुळे चिडून गेले होते आता आपला देश कायमचा गुलाम झाला अशीच सगळ्यांची भावना झाली होती दीडएक वर्षापूर्वी असलेला ह्या क्रांतिकारकांचा उत्साह कुठल्या कुठे मावळला

होता. अगदी म्हाताऱ्या बाबा वहिदपासून तो अठरा एकोणीस वर्षांच्या तरुण मुलापर्यंत सगळे उदास व हवालदील झाले होते

बाबा वहिदने आपल्याच नव्हे तर साऱ्या अफगाणांच्या भावना व मनातला कल्लोळ एका वाक्यात व्यक्त केला "मी पिंजऱ्यातल्या एखाद्या मैनेसारखा आहे मला काही दिसत नाही, काही ऐकू येत नाही." बाबा वहिदचीच का? सगळ्या अफगाणिस्तानची 'मैना' झाली होती

झालं होतं ते फार भयंकर होतं जवळ जवळ ऐंशी ते नव्वद हजार शौरवी सैनिक अफगाणिस्तानात आले होते. हिंदुस्थान अफगाणिस्तानपेक्षा जवळ जवळ सात आठ पटींनी मोठा, तरीसुद्धा इंग्रजांचे तिथे इतकं मोठं 'गोरं' सैन्य नव्हतं.

"इतके हजारोंनी शौरवी आले आहेत" खोजा अरेफ मोठ्या खिन्नपणे म्हणाला, "आता आमचं काय होणार आहे तेच कळत नाही"

ह्या उलट हुसेन नावाचा गोरा, बुटका पण तगडा अफगाण म्हणाला, "हे शौरवी आले आहेत ते बरच झाल आता ते आमच्या डोळ्यासमोर राहतील व आमची चीड जागती ठेवतील त्या चिडीनं आम्ही जास्त प्राणपणानं लढू"

कोणत्याही देशातल्या ऐतिहासिक घटनांचे व आपल्या हिंदी राजदूतांचे काय ग्रह आहेत कळत नाही, पण कुठल्याही देशात महत्त्वाची घटना घडत असता आमचे राजदूत नेमके गैरहजर असतात मग तो बांगला देश असो, इजिप्त असो, इंडोनेशिया असो वा अफगाणिस्तान असो.

ह्या घटनेच्या वेळीही असच झाल. इकडे दर दोन-तीन मिनिटाला एक अशी विमान उतरताहेत, तिकडे व्हाईस-ऑफ-अमेरिका व बी बी सी. काहीतरी महत्त्वाच होणार आहे म्हणून सांगताहेत, अशा वेळी राजदूतसाहेबांनी काबूलमध्ये थांबायला नको होतं?

ते नेमके ह्याच वेळी राजदूतसाहेब आपल्या आणि हवाईदलाच्या सल्लागाराच्या कुटुंबासह सहलीला म्हणून जलालाबाद ह्या पाकिस्तानी सीमेवर असलेल्या गावी गेले तेथे बुद्धकालीन गुफा व मूर्ती पाहण्यात ह्यांना रस! नशिब चागलं म्हणून ते गुरुवारी दुपारीच परत आले नाहीतर भारत सरकारला दुसऱ्या राजदूतानी दिलेल्या अहवालावरच समाधान मानाव लागलं असतं

एवढ मोठ रशियन सैन्य अफगाणिस्तानात घुसल, त्याचा अर्थातच सगळ्या जगात फार गवगवा झाला अमेरिकेने व पश्चिमी राष्ट्रांनी तर फारच केला युनोमध्ये प्रश्न निघाला त्या वेळी भारतासारख्या रशियाच्या मित्रराष्ट्रांची फार पचाईत झाली रशिया भारताचा

नुसता मित्रच नाही तर आश्रयदाता पण आहे काश्मीर प्रश्नावर वेळ पडली त्या वेळी व्हेटो वापरून रशियाने भारताची बाजू राखली होती तेव्हा रशियाच्या विरुद्ध मतदान करण भारताला परवडण्यासारख नव्हत. त्यामुळे 'कोणीही कुठल्याही देशात हस्तक्षेप करू नये' असं मोघम आवाहन भारतानं केल

एवढ मोठं सैन्य, काही शेकडो टँक्स व जवळ जवळ दोन-तीन डझन विमान पाठवणं म्हणजे काही सोपी गोष्ट नव्हती ह्या सगळ्याकरता रशियाला काही लाख रुबल्स खर्च करायला लागले असणार व पुढेही तसे खर्च करायला लागणार होते. वर पश्चिमी राष्ट्रांना रशियाविरुद्ध आरडा-ओरडी करायला एक साधन मिळाल मग रशियानं अस सैन्य घुसवायची खरच काही गरज होती का? हा प्रश्न आमच्यासारख्या छोट्या छोट्यांना पडला तसा बड्या-बड्यांनाही पडला व तसा तो शेवटपर्यंत पडलेलाच राहिला

रशियाची अफगाणिस्तानवरची पकड गेल्या दोन-चार वर्षांतली नव्हती. गेली जवळजवळ सत्तर-ऐंशी वर्षं रशिया अफगाणिस्तानवरची पकड जमवत होता त्याला एक ऐतिहासिक परिस्थिती कारणीभूत झाली होती

अफगाणांच व इंग्रजांचं अगदी १८५७ च्या आधीपासूनच वैर होतं तेव्हा आपल्या सैन्याच आधुनिकीकरण करण्याकरता अफगाणानी जर्मनांशी मैत्री केली जर्मनांचा अफगाणिस्तानवर कित्येक वर्षं चांगला पगडा होता. पुढे जर्मन पहिले महायुद्ध हरले तेव्हा त्यांच्याऐवजी अफगाणांनी रशियाशी मैत्री केली, कारण त्यांना इंग्रजांशी संबंध नको होता.

ह्याच काळात रशियात राज्यक्रांती झाली त्या वेळी अमानुल्ला हा अफगाणिस्तानचा अमीर होता खरं म्हणजे साम्यवादी रशियाने अमीर अमानुल्लाच्या विरुद्ध असायला हवं. पण अमानुल्ला प्रगतिवादी आहे म्हणून लेनिनन त्याच कौतुक केल तेव्हापासून रशियन अफगाण 'मैत्रीला' सुरुवात झाली

मग ही मैत्री रशियानं आपल्या पद्धतीन वाढवत नेली सलांग-बट व तिथला मोठा बोगदा रशियाने बांधलाच पण त्याची देखभालही ते करायचे म्हणजे रशियातून काबूलपर्यंत सरळपणे येण्याचा मार्ग रशियाच्या ताब्यात! चोराच्या हातात तिजोरीची चावी!

अफगाणिस्तानात पेट्रोल मिळत हे फार थोड्यांना माहीत असेल, आणि ते साहजिकच आहे कारण अफगाणाना आवश्यक असेल तेवढ पेट्रोल ठेवून बाकी सगळं रशिया घेत. अफगाणांना ते जगाच्या बाजारात विकता येत नाही विहिरीतून तेल काढायच, ते शुद्ध करायचं ही सगळी कामं रशिया करत म्हणजे तेलाबाबतच्या सगळ्या नाड्या रशियाच्या ताब्यात!

अफगाण सैन्य, त्यांच हवाई दलसुद्धा रशियन पद्धतीच शिक्षण घेतलेलं व रशियन युद्ध-सामग्री वापरणारं. काबूल शहराचा मास्टर-प्लॅन रशियनांनी बनवला होता, त्याचा फायदा रशियन सैनिकाना ह्या घुसखोरीच्या वेळी फार झाला कारण सगळ्या शहराचे व परिसराचे नकाशे त्याच्याजवळ होते

अफगाण-रशिया मैत्रीच्या कराराप्रमाणे शेकडो अफगाण विद्यार्थी रशियात शिकत असतात. तांत्रिक शिक्षणाबरोबर त्या विद्यार्थ्यांच्या मेंदूची पण चांगली ‘धुलाई’ होते त्यातले कित्येक विद्यार्थी रशियन मुलींशी लग्न करून त्यांना अफगाणिस्तानात आणतात म्हणजे रशिया अगदी अफगाण स्वैपाकघरापर्यंत पोहोचतो खरच एखाद राष्ट्र अंकित कसं करावं हे रशियापासून शिकावं

ह्या सगळ्यामुळ भारताचा रशियाबरोबर काही मैत्रीचा करार झाला आहे असं कुठ वाचल की माझं मन धास्तावतं, आणि डोळ्यासमोर अफगाणिस्तान उभा राहतो पण माझं व माझ्यासारख्याच कोण ऐकेल? राजीव गांधी ज्याच नेहमी कौतुक करतात त्या एक-विसाव्या शतकात आपण जेव्हा जाऊ त्या वेळी ते आपल्याला कदाचित कळेल पण त्या वेळी फार उशीर झाला असेल!

अफगाणिस्तानच्या राजकारणात तर रशिया पहिल्यापासूनच रस घेत होता दाऊद-खान काही रशियाचा मित्र नव्हता पण त्याने ज्या वेळी जाहीर शहाला पदच्युत केलं व स्वतः सर्वसत्ताधीश बनला, त्या वेळी त्याला रशियान नुसत्या शुभेच्छा दिल्या नाहीत, तर त्याच्या मदतीकरता आपलं सैन्य व आपली विमान तयार ठेवली होती.

कम्युनिस्ट सत्ता येण्यापूर्वीसुद्धा रशियाचा अफगाणिस्तानवर किती पगडा व हुकमत होती ह्याची आम्हा स्वतःलाच चांगली प्रचिती आली

आम्ही सगळी घरची मंडळी शहरवालीची गाडी घेऊन उत्तर अफगाणिस्तानात असलेल्या बल्ख, मदारेशरीफ वगैरे गावी गेलो होतो त्या गावाच्या उत्तरेला अमु नदी ही नदी म्हणजे रशिया व अफगाणिस्तानची सरहद्द म्हणजे इकडे अफगाणिस्तान व तिकडे सोव्हिएट रशिया आम्ही अमु नदीच्या ऐलतीरावर पोहोचलो तर पैलतीरी एका उंच पाढऱ्या खांबावर रशियाचा लाल बावटा मोठ्या डौलानं फडकत होता आम्ही पक्के कम्युनिस्टद्वेष्टे तरीही तो हातोडा-विळांकित लाल भडक बावटा पाहून आमच हृदय उचंबळून आल! त्या उचंबळण्यामागे रशियन क्रांतीचा, इतिहास, लेनिनचं व्यक्तिमत्त्व, रशियनानी दुसऱ्या महायुद्धात हालअपेष्टा सहन करून हिटलरच्या सैन्याला दिलेल तोंड आणि मिळवलेला विजय हे सारं होतं

पण हे उचंबळण वगैरे नंतरच्या प्रकारामुळे अगदी कमी झाल मला ऐलतीरावरचं म्हणजे अफगाण हद्दीत असलेलं नदीवरचं बंदर पाहायच होत पण तिथले रशियन सैनिक मला ते बघू देईनात खरं म्हणजे मी काबूल शहरवालीतला, शहरवालीची गाडी घेऊन गेलेला, पण मला परवानगी मिळेना मी तिथल्या उच्च रशियन अधिकाऱ्याना जाऊन भेटलो खूप रदबदली केली, पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

हे सगळ सांगण्याचा मथितार्थ एवढाच की रशियन सैन्य अफगाणिस्तानात येण्याआधी सुद्धा रशियाचा त्या देशावर संपूर्ण ताबा होता. मग रशियाने हे लाखभर सैन्य काय मिळवण्याकरता म्हणून पाठवलं असेल?

ह्याचे एक कारण नंतर कळाले व ते योग्यही वाटते त्या वेळी इराणमध्ये शहाची सत्ता उलथवून खोमेनी व त्याची माणसं सत्तेवर आली होती अमेरिका आपल्या सैन्यबळानिशी तिथं हस्तक्षेप करण्याचा त्या वेळी फार संभव होता, आणि एकदा अमेरिकन सैन्य इराण-मध्ये आलं असत म्हणजे थेट अफगाणिस्तानच्या पश्चिमेच्या सीमेला येऊन भिडल असतं आणि एकदा तसं सीमेला येऊन भिडल्यावर मग अफगाणिस्तानात शिरायला काय अवकाश ? तेव्हा ते टाळण्याकरता रशियाने आधीच आपलं सैन्य अफगाणिस्तानात घुसवल व त्या लाख सैन्यापैकी जवळ जवळ ऐंशी टक्के सैन्य अफगाणिस्तानमधल्या इराण सीमेपाशी नेऊन ठेवल असं असूनसुद्धा अमेरिकेनं व पाकिस्ताननं रशियन सैन्या पासून पाकिस्तानला फार मोठा धोका निर्माण झाला आहे, अशी ओरड करायला सुरुवात केली

रशियात तीस वर्षं राहिलेल्या एका अमेरिकन राजनीतितज्ज्ञाच तर असं म्हणण होतं की, रशियाच्या ह्या घुसखोरीबद्दल बिलकुल आरडा-ओरडी करू नये कारण जर तशी आरडाओरडी केली तर रशिया तो प्रतिष्ठेचा प्रश्न करेल व काही झाल तरी आपलं सैन्य काढून घेणार नाही

पण त्या सज्जन माणसाच कोणीही ऐकलं नाही उलट त्या घुसखोरीबद्दल चिक्कार आरडा-ओरडी केली त्यामुळे रशियालाही अफगाणिस्तानात घट्टपणे पाय रोवून राहणं भाग पडल कदाचित रशिया अफगाणिस्तानात अडकून पडावा अशीच अमेरिकेची इच्छा असावी ! ह्या अमेरिकन राजकारण्यांच काही सांगवत नाही

अफगाणिस्तानात रशियन सैन्य घुसल त्याचा सगळ्यात मोठा फायदा पाकिस्तानला व व्यक्तिश: झिया उल हकला झाला. अफगाण निर्वासित फार मोठ्या संख्येने पाकिस्तानात गेले. त्यांना मदत म्हणून अमेरिकेन व अरब राष्ट्रांनी फार मोठं आर्थिक साहाय्य केल. लाखो डॉलर्सची मदत दिली ती सगळी मदत पाकिस्तानमार्फतच दिली गेली पाकिस्ताननं त्यातला आपला वाटा काढून घेतला हे वेगळं सांगायला नकोच.

झिया-उल हक पाकिस्तानात फार अप्रिय झाला होता व दिवसेंदिवस जास्तच अप्रिय होत होता अमेरिका त्याच्या जागी दुसऱ्या कोणा योग्य माणसाच्या शोधात होती पण आता अफगाणिस्तानात इतकी गडबड चालली असताना पाकिस्तानात खांदेपालट करणं योग्य ठरल नसत त्यामुळं झिया-उल-हकला जीवदान मिळालं होतं हा त्याचा वैयक्तिक फायदा

अफगाणिस्तानातून जोपर्यंत रशियन सैन्य जात नाही तोपर्यंत झिया-उल-हक काही हलवला जाणार नाही

▾

हे सगळ झाल आंतरराष्ट्रीय स्तरावरच व मोठमोठ्या राष्ट्रांबद्दलच आम्हा काबूलमध्ये

असणाऱ्यांना मात्र ह्या रशियन सेनेचा त्रास असा काही झाला नाही. कर्फ्यू रात्री आठ वाजता सुरू व्हायची पण ती फार जाचक नव्हती. साधारण दोनचार दिवसाआड मनोहर वैद्य आमच्याकडे संध्याकाळचे गप्पा मारायला म्हणून यायचे. ते एकटेच होते. आम्ही दोघ समव्यसनी असल्यामुळे आमच्या गप्पा खूप रंगायच्या. त्या रात्री बारा एकपर्यंत चालायच्या. मग अशा त्या भीषण वेळी व साक्षात कर्फ्यूचा अंमल चालला असता ते गल्लीबोळातून आपल्या घरी जायचे. एक-दोनदा पोलिसांनी त्यांना हटकलेसुद्धा. पण हिंदी ' नफर ' बघून सोडून दिलं होतं.

एक दिवस सकाळचे असे मी, प्रतिभा आणि वैद्य बाजारातून जात असता आम्ही पाकिस्तानी आहोत का ? म्हणून आम्हाला साध्या कपड्यातल्या पोलिसांनी हटकले. आम्ही दोघही काळे-सावळे, दाढीवाले व प्रतिभा अशी बिगर टिळेवाली, तेव्हा त्यांचं हटकणं योग्यच होतं. "आम्ही हिंदी आहोत, घरी आलात तर पासपोर्ट दाखवू " असं सांगितल्यावर ते निघून गेले.

आमच्या मराठी चमूच व माझं वैयक्तिक नुकसान म्हणजे ह्या रशियन घुसखोरीमुळे माझा ' भगवान कृष्ण खडे है ' हा तमाशा काही होऊ शकला नाही. तो बारगळला तो बारगळलाच. मला कोणत्याही कामात यश म्हणून मिळत नाही, माझं नशीब असंच खत्रुड आहे, असं माझं नेहमी कुरकुरणं असतं. पण माझा हा तमाशा बाद करायला रशियाला ऐंशी नव्वद हजारांचं सैन्य पाठवायला लागलं हे बघून माझं मलाच कौतुक वाटू लागलं !

आज डिसेंबर १९७९ चा शेवटचा दिवस म्हणजे ३१ डिसेंबरची रात्र. इथली परिस्थिती अशी होती की आता अफगाणिस्तानात परत नेहमीचा सूर्य उगवेल की नाही ह्याबद्दल संशय यावा.

३१ डिसेंबरची रात्र आम्ही दिल्लीला असल्यापासून मोठ्या प्रमाणात साजरी करत होतो. तोच कित्ता येथे पण गिरवला होता. काबूलमधल्या आमच्या ह्या पार्टीज खूप प्रसिद्धी पावल्या होत्या. पण ह्या वेळी दोन तीन दिवसांपूर्वीच इतका मोठा उत्पात झाला होता, शिवाय आठ वाजेपासून कर्फ्यू ! जुन्या वर्षाला बिदा करायचं म्हटलं तरी कसं करणार ?

पण तशा त्या रात्रीही पट्टे मनोहर वैद्य आले आणि त्याही परिस्थितीत त्यानी प्रतिभाकरता पुष्प गुच्छ आणला होता ! उगाच नाही मी त्याना ' फ्रेंच हृदय असलेला मराठी माणूस ' असं म्हणत होतो ते. तेव्हा आम्ही तिघानी आपआपल्या परीनं ती रात्र साजरी केली.

जुन्या राजवटीप्रमाणे नव्या राजवटीत कैदी सोडले जात होते त्याचप्रमाणे जुन्या राजवटीच्या पद्धतीप्रमाणे आपल्या विरोधी लोकांना तुरुंगात टाकण्याचं सत्र पण चाललं

होत. अर्थात ह्या वेळी खल्क पक्षाच्या म्हणजे अमीनच्या पक्षाच्या लोकांची पाळी होती

ज्याचा संशय येईल त्या कोणालाही त्याच्या घरून वा कचेरीतून उचलून नेलं जात होत जशी अमीनची माणसं पकडून नेली जात होती, त्याचप्रमाणे काही निरपराध माणसं पण पकडली जात होती, तुरुंगात डांबली जात होती, काही जीवानिशी मारली जात होती.

जगण्याला काही किंमत नाही व मरणाला तर त्याहूनही नाही हे सत्य कम्युनिस्ट राजवटीत अगदी पूर्णपणे पटतं.

त्या दिवशी मी कचेरीत गेलो तो तिथे चिक्कार गोंधळ माजलेला. अमीनच्या वेळी प्रेसिडेन्ट म्हणून नियुक्त केलेला एक पार्टीचा कार्यकर्ता आदल्या रात्रीपासून गायब झाला होता एखादा माणूस 'गायब' होण ह्याचा काहीही अर्थ होऊ शकला असता. त्याची शौरवी बायको रडत भेकत कचेरीत आली होती, आणि कचेरीतल्या लोकांना त्याचा काही तरी शोध घ्या म्हणून विनवण्या करत होती पण कचेरीतले लोक तिच्याकरता काय करू शकणार होते? तोपर्यंत पोक्रोस्कि वगैरे शौरवी आलेच त्यांनी ताबडतोब रशियन वकिलातीला फोन करून चौकशीला सुरवात केली बाकी अफगाणांना मात्र कमालीचा आनंद झाला होता बरी ह्या शौरवी बाईची जिरली असे भाव त्यांच्या चेहऱ्यांवर दिसत होते

थोड्या वेळान त्या गायब प्रेसिडेन्टचा पत्ता लागला त्या बाईच्या सुदैवान तो मारला गेला नव्हता, फक्त डांबला गेला होता नतर त्याला सोडूनही देण्यात आलं

अफगाणिस्तानात असताना इतके नाना तऱ्हेचे लोक भेटले, देशी आणि परदेशी, पण अफगाण माणसाची शौरवी बायको भेटण्याचा काही योग आला नाही. एकतर आम्हाला रशियन भाषा येत नव्हती आणि नवी सत्ता आल्यापासून पार्टीज वगैरे अगदी बंद झाल्या होत्या त्यामुळे एखाद्या रशियन स्त्रीला एकदर अफगाण जीवनाविषयी काय वाटतं ते कळायच राहूनच गेलं

शौरवी बायकोवाला प्रेसिडेन्ट पकडण्याचा व सोडण्याचा प्रकार झाल्यानतरची गोष्ट. एक दिवस अगदी सकाळी सकाळी तो माझ्या खोलीत आला पूर्वी मी मोठ्या हॉलमधे अफगाण व हिंदी सहकाऱ्यांबरोबर बसत असे, आता मला वेगळी खोली देण्यात आली होती

प्रेसिडेन्ट माझ्या खोलीत आला व तराकी, अमीन, कारमाल ह्यांच्याविषयी बोलू लागला अस कधी पूर्वी घडल नव्हत म्हणजे पूर्वी प्रेसिडेन्ट माझ्याकडे यायचे, पण फक्त कचेरीच्या कामाकरता. राजकारणाबद्दल आम्ही कधी बोललो नव्हतो आणि तसं बोलण योग्यही झालं नसत

प्रेसिडेन्ट सागू लागला. मलाही उत्सुकता होतीच तेव्हा मी मोठं मन लावून ऐकू लागलो

"मी तराकीचा फार अभिमानी आहे. तो मारला गेल्यानंतरही तीन-चार दिवस मी

त्याचा फोटो ठेवला होता. पण त्यानंतर माझा नाइलाज झाला अमीन फार वाईट माणूस. अमेरिकेचा हस्तक ”

थोडक्यात म्हणजे आपण अमीनच्या पक्षाचे आहोत असं जे कचेरीत पसरलं आहे ते सगळं खोटं आहे, हे त्याच्या सगळ्या सांगण्याचा हेतू . मी म्हटलं, “ अरे बाबा, मग त्यानं काय फरक पडणार आहे ? तू कोणाचा का असेनास ” अर्थात ते सगळं मनातल्या मनात तोंडावर मात्र मला त्याचं म्हणणं पटल्यासारखं दाखवलं त्यामुळे त्याला फार समाधान वाटलं

आता कारमालचं राज्य सुरू झालं होतं. तराकीन वा अमीनन कधीही न घेतलेली परदेशीय वृत्तपत्रकारांची परिषद त्यानं घेतली त्या परिषदेचे टी.व्ही.वर प्रसारण पण केले सगळ्या पश्चिमी राष्ट्रांचे पत्रकार आले होते, त्यात स्त्रिया पण होत्या एवढा मोठा हॉल, पण तो ह्या सगळ्या पत्रकारानी खचाखच भरून गेला होता प्रश्नावर प्रश्न विचारले जात होते.

बहुतेक प्रश्न रशियन सैन्याला कुणी बोलावलं, ह्याबाबत होते. आपल्याला अफगाण सरकारनं बोलावलं म्हणून आपण अफगाणिस्तानात आलो, ती घुसखोरी वा आक्रमण नव्हत, असं रशियन्स सांगत होते.

आणि आता त्याबाबतच्या प्रश्नांना उत्तरं देता देता कारमालची तारांबळ होत होती रशियन सैन्याला बोलावलं कुणी ? ह्या प्रश्नाला कारमालचं उत्तर होतं, “ रेव्हल्युशनरी कौन्सिलनं ”

“ पण रशियन्स आले त्या वेळी अमीन तर जिवंत होता, व तो प्रेसिडेन्ट होता त्याच्या संमतीशिवाय रेव्हल्युशनरी कौन्सिल परक्या देशाला कसं बोलावू शकत होतं ?

ह्या प्रश्नामुळे कारमाल कोंडीत सापडला. रशियन आले त्या वेळी अमीन जिवंत होता, तेव्हा त्याच्या संमतीनं रशियन सैन्याला बोलावलं म्हणावं तर त्याला अमेरिकेचा हस्तक आहे म्हणून विष पाजून मारलं होतं, आणि जर तो अमेरिकेचा हस्तक असेल तर रेव्हल्युशनरी कौन्सिलनं त्याला अध्यक्षपदावरून काढलं का नाही ? मारला जाईपर्यंत अमीन अध्यक्ष होताच.

आता ह्यावर कारमाल उत्तर तरी काय देणार ? इतकं बद्दू आणि खोटं नाणं चालणार तरी कसं !

“ ह्या सगळ्या भानगडीत किती रशियन्स मारले गेले ? ” ह्या प्रश्नाला कारमालचं उत्तर, “ एकही नाही ! ” ह्या त्याच्या उत्तराची अफगाणांनी खूप टिंगल केली कारण इथल्या लोकानी कित्येक रशियन सैनिकांची प्रेतं स्वतःच्या डोळ्यांनी पाहिली होती

ह्या पत्रकार परिषदेचा फार वाईट परिणाम झाला. तो धुऊन काढण्याकरता काही

दिवसातच एक दुसरी पत्रकार परिषद भरवली गेली ह्या परिषदेला रशिया, पूर्व युरोपियन राष्ट्र व हिंदुस्थानसारख्या मित्रराष्ट्रांचे प्रतिनिधी आले होते

मित्रराष्ट्राच्या प्रतिनिधींनी आपल्या मित्रत्वाला जागून कारमालला फार सोयीचे प्रश्न विचारले पण असे 'सोयीचे' प्रश्न फार थोडे असल्याकारणाने परिषद वेळेआधीच संपली मागल्या परिषदेच्या वेळी प्रश्न होते पण वेळ नव्हता, त्या वेळी वेळ होता पण प्रश्न नव्हते !

ह्या सगळ्यामुळे परिषद फार बेचव व अळणी झाली अजूनी वेळ आहे पण प्रश्नच नाहीत, हे बघून कारमाल उभा राहिला व "आता तुमचे प्रश्न संपले असतील तर मी माझ क्रातिकार्य करायला जातो" म्हणून निघून गेला

हे उत्तरही फार हास्यास्पद झालं का नाही होणार ? बाहेर एक लाख शौरवी सैन्य उभ होतं आणि हा गृहस्थ क्रांतिकार्य करायला जातो म्हणून सांगत होता.

मी १९७६ साळच्या फेब्रुवारी महिन्याच्या सहा तारखेला काबूलला आलो होतो आमच्या प्रोग्रामखाली आलेल्याची साधारणपणे पाच वर्षांपर्यंत राहायची मुदत असते त्या हिशोबाने मी येथे फेब्रुवारी १९८१ पर्यंत राहायला पाहिजे होते पण सध्याची परिस्थिती पाहता भारत सरकार इतक्या अधिकाऱ्यांची व त्यांच्या कुटुंबियांची जबाबदारी घ्यायला तयार नव्हत त्यातून एका फुटबॉल कोचची जी करुण कहाणी झाली, त्यामुळे तर भारत सरकारनं जास्तीत जास्त लोकांना परत पाठवावयाच ठरवल

हा फुटबॉल-शिक्षक अफगाण टीमला घेऊन रशियाला काही मैत्री-मॅचेस् खेळायला म्हणून गेला होता. जाताना ते सगळे विमानाने गेले होते. परत येताना त्यांच्या बरोबर रशियात विकत घेतलेले टी व्ही वगैरे सारखे भारी सामान होते म्हणून ते बसने परत येत होते

ते सलांग-वट वरून येत असताना बंडखोरांनी त्या बसला गराडा घातला व बसमधल्या सगळ्या अफगाण्यांना व ह्या हिंदी शिक्षकालाही जिवानिशी मारून टाकल अर्थात हा सगळा अदाज पण ज्या अर्थी ती टीम परत आली नाही व त्या शिक्षकाचा पण पत्ता लागला नाही त्या अर्थी ती सगळीजणं मारली गेली असणार हाच अदाज करणं बरोबर होत

त्या शिक्षकाची बायको व मुल काबूलमध्येच होती बायको बिचारी दररोज वकिलातीत येऊन रडे-भेके व आपल्या नवऱ्याची बातमी काढायचा प्रयत्न करी पण वकिलात तरी काय करणार ? आधीच हा हिवाळ्याचा मोसम, म्हणजे उत्तर अफगाणिस्तानात कमालीचं बर्फ पडण्याचे दिवस. अशा वेळी उत्तरेत जाऊन त्या शिक्षकाची चौकशी कोण करणार होत ? वकिलातीकडे तशी काही यंत्रणा नव्हती, आणि अफगाण सरकारसमोर बाकी

इतके प्रश्न उभे होते की त्याना ह्या हिंदी शिक्षकाच्या प्रकरणाकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. आणि एखादा माणूस मारला गेल्याच त्याना कौतुकही नव्हत

ह्या प्रकरणामुळे वकिलातीन ज्यांची तीन वर्षं होत होती त्याना तीन वर्षांनी, ज्याना चार वर्षं होत आली होती त्याना चार वर्षं पूर्ण होताच परत भारतात पाठवायचाच ठरवल व त्याप्रमाणे त्या त्या अधिकाऱ्याला व अफगाण सरकारला तसं कळवायला सुरुवात केली

सहा फेब्रुवारीपासून माझी येथली नेमणूक संपते आहे, तेव्हा मी परत जाण्याची तयारी ठेवावी असे मला पत्र आले पत्र पाहताच थोड वाईट तर वाटलच पण बी सिंग मला मागल्या वर्षीच पाठवायला निघाला होता तरीसुद्धा मी इथं राहू शकलो ह्याचाच मला जास्त आनद झाला होता

फक्त ताबडतोब परत जाण्यात एक अडचण होती माझा थोरला मुलगा बारावीला होता त्याची परीक्षा मार्चअखेरपर्यंत चालणार होती आत्ताच भारतात परत गेलो असतो तर त्याला फार त्रास झाला असता तेव्हा इथ मार्चअखेरपर्यंत थाबण भागच होत

राजदूताची म्हणजे सी सिंगांची व आमची आता चागलीच जान–पहेचान झाली होती आमच्या येथल्या राहण्याच्या मुदतीत दोन महिन्यांची वाढ करण्याचं त्यांच्या हातात होत व आम्ही विनती केली असती तर ते तशी विनती मान्य करायला तयारही झाले असते पण आपल्या खासगी ओळखीचा असा फायदा करून घेण मला योग्य वाटलं नाही तेव्हा मी दोन महिन्यांची रजा मंजूर करून घेतली व स्वतःच्या खर्चाने काबूलला राहिलो

माझ्या परत जाण्याबाबतच पत्र शहरवालला पण मिळाल पण आता आणखीच एक नवीन शहरवाल आला होता त्याला मी फक्त एक–दोनदा भेटलो होतो त्यामुळे मी परत जाण्याबद्दल त्याला काही वाटलं असेल असं वाटत नाही त्यातून एकंदर परिस्थिती इतकी डबघाईची झाली होती की, त्याची स्वतःचीच शहरवाल म्हणून राहण्याची शाश्वती नव्हती, तेथे तो माझ्या राहण्या-जाण्याची काय फिकीर करणार ?

पण ज्या वेळी आमच्या प्रेसिडेंटला माझ्या जाण्याबद्दल कळालं त्या वेळी तो माझ्याकडे मोठ्या तावातावाने आला व म्हणू लागला, " आता कोठे आमच्या नव्या सरकारनं मोठ्या-मोठ्या योजना हाती घेतल्या आहेत आणि अशा वेळी नेमका तू परत जात आहेस ? " माझ्याप्रमाणे इतर बरेच भारतीय तंत्रज्ञ परत जाणार आहेत हे यालाही कळलं असाव तो पुढे म्हणाला, " अशा महत्वाच्या वेळी इतके सगळे भारतीय परत जाताहेत, ह्याचा आम्ही अर्थ तरी काय करायचा ? "

तुमच्या देशात आता जीवाची शाश्वती राहिली नाही आहे, म्हणून आम्हाला परत पाठवण्यात येत आहे हे त्याला सांगणे शक्यच नव्हतं. " आम्ही अधे–मधे तुमचा देश सोडून जात नाही आहोत " मी त्याचे सांत्वन करीत म्हटल, " ज्यांची तीन वर्षे झाली आहेत, वा चार वर्षे झाली आहेत, त्यांनाच परत पाठवण्यात येत आहे आणि आम्ही गेलो

तरी आमच्या जागी दुसरे कोणीतरी येतीलच." असं काहीबाही सांगून मी त्याची बोळवण केली

त्याचं माझं विशेष पटत नव्हतं तरी गेले काही महिने आम्ही बरोबर काम केल्यामुळे नाही म्हटलं तरी थोडी आपुलकी निर्माण झाली होती "मी माझ्यातर्फे तुला येथे ठेवण्याचा प्रयत्न करतोच बघ " तो जाता जाता म्हणाला.

"जरूर कर" मी उत्तरलो "माझी पण इथे काम करण्याची खूप इच्छा आहे "

पण ते होणे नव्हते. भारत सरकारने अगदी पक्का निर्णय घेतला होता. मी तर भारतात परत आलोच पण माझ्या जागी कोणीही नेमला गेला नाही.

एकदा एखादं गाव सोडायचं ठरलं म्हणजे त्या गावाकडे पाहायची दृष्टी व वृत्ती अगदी बदलून जाते त्यापूर्वीही मी दिल्ली, कलकत्ता, मणिपूर, शिलाँग असंच तीन-चार वर्षं राहून सोडलं होतं. गाव सोडताना साधारण एकाच तऱ्हेची भावना होती त्या गावाविषयी एक प्रकारची अनास्था वाटू लागते तेथलं आयुष्य एकदम अळणी वाटायला लागतं तीच पूर्वीची दुकानं, तीच पूर्वीची माणसं पण ती सगळी परकी वाटू लागतात. वाटतं, आता त्यांच्याशी आपल्याला काही देणं–घेणं नाही, आता त्यांच्यात कशाला रस घ्या

नव्या राजवटीमुळे नेहमीच्या आयुष्यात तर फरक पडला होताच पण ज्याला सोशल लाईफ म्हणता येईल त्यावर पण परिणाम झाला होता पूर्वी कोणी मायदेशी परत जायचा म्हणजे त्याला पुष्कळ निरोप-पार्ट्या दिल्या जात तीन-चार वर्षं एका गावी राहिलं असल्या-कारणानं काही जण चांगले जवळचे मित्र बनलेले असत त्या व त्यांच्या बायका सुद्धा भारतात परत गेल्यावर सगळे विखुरले जातात, परत साधं भेटणं सुद्धा शक्य नसतं तेव्हा अशा निरोप पार्ट्यांना फार महत्त्व येतं. त्यामुळे अशा पार्टीज देणं व घेणं हे काबुली आयुष्याचं एक अविभाज्य अंग बनलं होतं

पण आता परिस्थिती साफ बदलली होती पैसा जरी पूर्वीसारखा मिळत होता तरी मनाला शांतता नव्हती भारत सरकारच्या निर्णयामुळे एकाच वेळी फार मोठ्या संख्येनं भारतीय तज्ञ परत जाणार होते त्यामुळे निरोप देणारे थोडे व जाणारे पुष्कळजण अशी स्थिती निर्माण झाली होती. त्यातून आठ वाजताची कर्फ्यू असायची, त्यामुळे रात्रीच्या पार्टीज बाद झाल्या होत्या ज्या काही करायच्या त्या दिवसा उरकून घ्यायला लागत होत्या

आज आम्हाला 'बड्या' घरच्या दुपारच्या जेवणाचं निमंत्रण होतं बड्या घरचे म्हणजे राजदूताच्या घरचे

आम्ही फक्त पाचच जण पाहुणे होतो. अमेरिकन राजदूत डब्ज मारला गेल्यानंतर

त्याच काम पाहणारा ॲमस्टुझ म्हणून चार्ज-डी-ॲफेअर्स होता सध्या डब्ज प्रकरणा नंतर अमेरिकेनं आपल इथल इन्फर्मेशन सेंटर तर बद केलच पण सगळ्या अमेरिकन बायका-पोराना मायदेशी पाठवून दिल होत म्हणून ॲमस्टुझ एकटाच आला होता

येथल्या यु. एन च्या कचेरीत काम करणारा एक भारतीय आता काबूल सोडून चालला होता तो व त्याची बायको व प्रतिभा आणि मी अशी मोजकी माणस होतो

जेवण अगदी विलायतेत पाळल्या जाणाऱ्या पद्धतीप्रमाणे होतं प्रथम दिवसा पिण्यास योग्य अशी पेय दिली गेली ती घेत असताना इकडल्या तिकडल्या गप्पा झाल्या अर्थात त्यात राजकारण नव्हतं. मी आर्किटेक्ट आहे म्हटल्यावर अफगाण आर्किटेक्चरवर बोलण झालं. काबूल म्युनिसिपालिटीच्या पुढे ॲमस्टुझन काय काय योजना आहेत वगैरे चौकशी केली

नंतर आम्ही जेवायला बसलो जेवण टेबलावरच होत वाढायला बेअरा होता प्रथम फ्रेंच वाईन दिली गेली मग जेवण वाढल गेल. माझ्या डाव्या हाताला अमेरिकन चार्ज–डी-अफेअर्स होता तर समोर राजदूत पत्नी होत्या जेवताना भारतीय कपड्यांच्या पद्धती-बद्दल बोलण निघाल बाई म्हणाल्या, " भारतीय पद्धतीत अंग जितक छान तऱ्हेनं झाकलं जात तितक बाकी कोणत्याही पद्धतीत झाकल जात नाही."

हे सगळ सागणाऱ्या बाईचं पोलक इतकं तग व कमी कापडात शिवलेल होतं की मनाला कितीही आवरलं तरी जे काही दिसायला नको ते अगदी ठसठशीतपणे मला व त्या अमेरिकी साहेबाला दिसत होतं तरीही बाई म्हणत होत्या की अग झाकायला हिंदी पद्धत सगळ्यात उत्तम म्हणून ! बाईंच्या बोलण्यावर काही उत्तर देणं शक्यच नव्हत फक्त मी आणि तो ॲमस्टुझ एकमेकांकडे पाहून मिष्किलपणे हसलो

जेवणानतर परत थोड्या वेळ गप्पा व कॉफी झाली ह्या वेळी मात्र ॲमस्टुझन रशियन्स पाकिस्तान सरहद्दीवरच्या बंडखोरावर विषारी पावडर असलेले बॉम्बज् टाकत आहे वगैरे सांगितल ..ती पावडर जर अंगाला चिकटली तर सगळ्या शरीराची कातडी जळून जातात वगैरे धक्कादायक माहिती पण दिली

इतर गप्पात पॅकिंगचा पण विषय निघाला. त्याची मुबईला कॉन्स्यूलर म्हणून बदली झाली होती. त्याची बायको घाईघाईन अमेरिकेला निघून गेली होती व ती परस्पर मुंबईला येणार होती त्यामुळे घरातल्या सगळ्या सामानाच्या पॅकिंगची जबाबदारी ॲमस्टुझवर पडली होती

" बायको असली म्हणजे पॅकिंगच्या वेळी फारच सोयीच होत " तो सागू लागला. " आता ती नाही तर कोणती गोष्ट टाकायची अन् कोणती ठेवायची ते ठरवता–ठरवता नाकी नऊ येतात आपण एखादी गोष्ट फालतू आहे म्हणून टाकायची आणि बायकोला नेमकी तिच हवी असायची, म्हणजे मग तिची भुणभूण सुरू. "

" मग तुम्ही काय केलत ? " राजदूतानी विचारलं

" मी सगळयाच गोष्टी पॅक केल्या एकही सोडली नाही. काय वरचा खर्च स्वत ला

करायला लागेल तो लागेल पण नंतर बायकोचं बोलणं ऐकायला नको."

आम्ही सगळे अशा अनुभवातून गेलो होतो त्यामुळे त्याची अडचण समजू शकत होतो त्यानी काढलेला उपाय आम्हाला आवडला व पटलासुद्धा आम्ही सगळ्यानी तोंडभर हसून त्याच्या शहाणपणाचं कौतुक केलं.

आम्ही परत जाणार म्हणून आमच्या वृत्तीत फरक पडला असला तरी आजूबाजूच्या राजकीय वातावरणात वा नेमेची येणाऱ्या हिवाळ्यात काहीच फरक पडला नव्हता. उलट ह्या वेळी बर्फ लवकर पडू लागलं होतं व खूप मोठ्या प्रमाणात पडत होतं

आज अगदी एक वेगळा अफगाण गृहस्थ घरी आला. गोरा, घारा, उंच पण अगदी फाटक्या अंगाचा त्याचं नाव महंमद वकिल. तो कोठल्यातरी शाळेत शिक्षक होता अशा शिक्षकाची व माझी कुठे भेट झाली कुणास ठाऊक, पण झाली होती खरी व एकदा घरी येऊन जा म्हणून मी त्याला म्हटलं होतं.

त्या महमद वकिलाकडे अफगाण लोक-कथांचा फार मोठा साठा होता त्याने तशा काही कथा सांगितल्या त्या आम्ही टेप करून घेतल्या बाबर, अहमदशहा अब्दालीच्या काही कथा आहेत का विचारल्यावर तो थोडा सैरभैर झाला. बहुधा त्या कथातून हिंदूबद्दल वाईट-साईट असावं नंतर कधीतरी सांगेन म्हणून तो जो पळाला तो परत आलाच नाही

नवीन सरकार आता मन लावून कामाला लागलं आहे. तराकी सरकारनं आल्या-आल्या रोज ए-बैराग म्हणजे ध्वजदिन साजरा करून देशाचा झेंडा बदलला होता लोकांनी त्या विरुद्ध फार मोठं काहूर माजवलं होतं हे सगळ माहित असल्यामुळे कारमालन परत एकदा राष्ट्र-ध्वज बदलायचं ठरवलं पण ह्या वेळी फरक असा की त्यानी नव्या ध्वजाबाबत लोकांकडून सूचना मागवल्या त्यांना ह्या फरकात सामील करून घेतलं.

मागे मी काबूल शहराच्या उत्तरेला एक मोठं पार्क डिझाईन केलं होतं त्याचं काम सुरू झालं अन् दाऊदखान गडगडला होता. तराकी आणि अमीन नवं राज्य प्रस्थापित करण्यात इतके व्यस्त होते की त्यांना पार्क वगैरेसारख्या गोष्टीकडे लक्ष द्यायला वेळ मिळाला नाही कारमालनं त्या पार्कचं काम हाती घ्यावं असं फर्मान काढलं आणि त्या पार्कच्याही उत्तरेला असलेल्या प्रवेशद्वारावर २७ एप्रिल १९७८ ला जी क्रान्ती झाली त्याची यादगार म्हणजे आठवण म्हणून एक भव्य स्तंभ उभारावा अशी सूचना केली.

हिंदुस्थानातल्या पूर्वीच्या साऱ्या शहरांतून दिल्लीकडे तोंड करून एक दरवाजा असे, त्याला 'दिल्ली-दरवाजा' म्हणत. मास्कोकडे तोंड असलेल्या ह्या प्रवेशद्वाराला 'मास्को-दरवाजा' असं मी म्हणू लागलो ह्या तिथल्या स्तंभाचं डिझाईन हे माझं अफगाणिस्तानातलं शेवटचं महत्त्वाचं काम.

हे सगळं होता होता फेब्रुवारी महिन्याचा पहिला आठवडा उजाडला. ह्या सहा तारखेपासून माझा व शहरवालीचा ऋणानुबंध संपणार होता. तसा मी काबूलमध्ये आणखी दीड एक महिना राहणार होतो, पण तो रजेवर म्हणून.

शहरवालनं त्याच्या कचेरीत माझा निरोप समारंभ आयोजित केला. खरं म्हणजे अशा तऱ्हेचे समारंभ साजरे करण्यासारखं ना बाहेर वातावरण होतं, ना कोणाची मनःस्थिती होती. पण मी भारत सरकारचा एक वरिष्ठ अधिकारी होतो. तेव्हा कर्तव्य म्हणून का होईना समारंभ करणं त्यांना भाग होतं. ह्या समारंभाला शहरवाल, नायबशहरवाल व शहरवालीतली काही अधिकारी मंडळी हजर होती. ही सगळी मंडळी मला नवीन होती व मी त्यांना. मला ओळखणारा फक्त सिराज होता. हा सिराज म्हणजे अमीर अमानुल्लाचा पुतण्या. ह्याची नवीन राजवटीत काय दैना झाली होती, ते मागे सांगितलेच आहे.

प्रथम थोडे खाणं व चहा झाला. मला देण्यात येणारं प्रेझेंट विकत आणण्याकरता शहरवालीतल्या कुणाला तरी बाजारात पाठवलं होतं. तो पठ्ठ्या अजुनी आलाच नव्हता. शहरवालनं आपल्या भाषणात प्रेझेंट देता आलं नाही ह्याबद्दल मोठी दिलगिरी व्यक्त केली. सिराज त्याच्या भाषणाचा अनुवाद करत होता.

" प्रेझेंट देता आलं नाही ह्याचं फार काही मनाला लावून घेऊ नका. " मी आपल्या उत्तराच्या भाषणात म्हटलं, " असली प्रेझेंटस् पुष्कळ वेळा हरवतात, फुटतात वा खराब होतात. पण तुम्ही अफगाण लोकांनी गेल्या चार वर्षांत जे प्रेम व आदर मला दिला आहे तो माझ्या मनात कायमचा राहील. त्या भावना कधी खराब होणार नाहीत, हरवणार नाहीत, फुटणार नाहीत. "

ह्या समारंभाच्या प्रसंगी मला पहिल्या शहरवालची म्हणजे डॉ. नूरजादची फार आठवण आली व आज तो असता तर ? त्याच बरोबर ज्या जुन्या अफगाण मित्रांची वाताहत झाली होती तेही मनात आले. आता कुठे असतील ? मुळात ' असतील 'च का ? आत्ताच्या समारंभाला जमलेल्यांचं व माझं काही नातंच जुळलं नव्हतं. तेव्हा त्यांच्याशी नाममात्र हस्तांदोलन झालं.

मी जाणार ह्याचं खरं वाईट वाटलं ते सिराजला. आपलं मन मोकळं करता येईल असा सगळ्या शहरवालीत मी एकटाच होतो. शहरवालीतच का कदाचित साऱ्या काबूलमध्येसुद्धा. त्याने नुसतं हस्तांदोलन केलं नाही तर मला भरल्या अंतःकरणानं मिठी मारली व त्यांच्या पद्धतीप्रमाणे माझ्या गालांचं चुंबन घेतलं. त्या वेळी मला त्या चुंबनपद्धतीचं रहस्य वा महत्त्व कळलं व पटलं.

खरंच, आपल्या खोल भावना व्यक्त करायला चुंबनासारखं दुसरं काही नाही.

सिराजच्या भव्य व दणगट देहाला मिठी मारताना ह्याचं पुढं काय होणार आहे ? असं माझ्या मनात आलं. ह्याला पण ' हार्ट-ॲटॅक ' येईल, की सरळ सरळ गोळ्या घालून ठार मारतील, की अमीराचा पुतण्या म्हणून आयुष्यभराचं तुरुंगात डांबतील ?

का आजूबाजूची परिस्थिती पाहून ह्याचच हृदय फाटून जाईल ?

आता हे लिहीत असतानासुद्धा माझं मन भरून आलं आहे सिराजची, डॉ. नूरजादची, आमच्या घरमालकाची, जरिफाची, पयंडाची आठवण आली की मन अगदी सैरभैर होतं वाटतं त्यांना भेटण्याकरता, त्यांची ख्यालीखुशाली समजण्याकरता तरी परत एकदा काबूलला जायला मिळावं.

•

माझ्या शहरवालीतल्या शेवटच्या दिवशी प्रेसिडेन्टनं आमच्या कचेरीतच निरोप दिला. ह्या समारंभाला सगळे हिंदी, अफगाण, शौरवी सहकारी जमले होते. जवळ जवळ ८०–९० लोक होते.

जसे काही अफगाण आमच्या बरोबर काम करत असत, तसे काही शौरवी लोकाबरोबर पण करत असत त्यांतले काहीजण मला नेहमी ‘ खारजी ’ म्हणजे ‘ परदेशातला ’ म्हणून उगाचच टोचत समारंभ सुरू होण्या आधी सुद्धा त्यानी ‘ काय खारजी नफर आता परत जाणार का ? ’ म्हणून वास्तपुस्त केली होती

प्रथम एक दोन अफगाण बोलले. नंतर प्रेसिडेन्ट बोलला त्याची भाषण अशा प्रसंगी नेहमी होतात त्याच धर्तीची होती पोक्रोस्कि किंवा कोणी शौरवी बोलायचा प्रश्नच नव्हता. शेवटी मी बोलायला उठलो मला गेली चार वर्षं फार चांगली वागणूक दिल्याबद्दल त्याचे आभार मानले व पुढे म्हणालो,

“ मला तुमच्यातले पुष्कळजण ‘ खारजी ’ म्हणतात खारजी म्हणजे दुसऱ्या देशातला व दाखला म्हणजे अफगाण हे अर्थ आता जुने झाले आहेत अफगाणिस्तानाबद्दल ज्याला प्रेम आहे, त्या देशाचं जो हित पाहातो तो ‘अफगाण’ मग तो हिंदी नफर असू दे नाहीतर शौरवी ह्याच्या उलट दाखला असूनही जो देशद्रोह करतो, शत्रूला मदत करतो तो ‘ खारजी ’ म्हणजे परका समजा असे कितीतरी ‘ खारजी ’ असलेले अफगाण मी तुम्हाला दाखवून देईन

“ गेल्या चार वर्षांत मी काही काम केलं, त्याकरता भाडलो, तंडलो ते फक्त अफगाणांच्या प्रेमापोटी व त्यांच्या फायद्याचं होईल ते करण्याकरता. त्या दृष्टीनं मी खरा दाखला आहे म्हणजे अफगाण आहे ”

समारंभ संपल्यावर मला खारजी म्हणणाऱ्यांतला एक तरुण माझ्याजवळ आला व मोठ्या प्रेमानं माझा हात दाबून म्हणाला, “ तू फार गंभीरपणे घेतलंस आमचं बोलणं, आम्ही तुला सहज चिडवण्याकरता म्हणत होतो, मजेनं ”

“ मजा व चेष्टा मलाही समजते ” मी त्याला जबाब दिला “ पण ते जाऊ दे मी खारजी कोण आणि दाखला कोण हे सांगितलं ते पटलं की नाही ? ”

“ पटलं अगदी चांगलंच पटलं ! ” त्यानं उत्तर दिलं ते उत्तर सध्याच्या अफगाण

राज्यकर्त्याला उद्देशून होतं हे स्पष्टच होतं

त्याच दिवशी संध्याकाळी ह्या राजदूताच्या आधी जे राजदूत इथे होते—म्हणजे बी सिंग, त्यानी सगळ्या आयटेकवाल्यांची एक बैठक घेतली बी सिंग आता परदेशी व्यवहार खात्यातले एक सेक्रेटरी झाले होते नव्या अफगाण सरकारशी भारत सरकारतर्फे बोलणी करण्याकरता ते आले होते त्यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीबद्दल एक लबे-चवडे भाषण ठोकले व कुणाला काही प्रश्न विचारायचे असतील तर विचारा म्हणून आवाहन केलं आता इथल्या राजकीय परिस्थितीवर केलेल्या भाषणावर आमचे आयटेकचे लोक काय प्रश्न विचारणार कपाळ ?

शेवटी एका पजाबी सहकाऱ्याने प्रश्न विचारला, पण तो राजकीय परिस्थितीबाबत नव्हता, तर आम्हाला मिळणाऱ्या भत्त्याबाबतचा होता. तो प्रश्न ऐकून मोठा हशा पिकला बी सिंगना आपण ही कोणापुढे गीता गायली ? असा प्रश्न पडला. ते थोड रागान व थोडं चेष्टेनं म्हणाले, "काही झाल तरी आपले सरकारी नोकर पगाराच्या आणि भत्त्याच्या पलीकडचं काही पाहू शकत नाहीत हेच खरं '

माझ आणि सिंगाच मधे बरंच वाकड आल होत तरी त्यांचा माझा पत्रव्यवहार चालू होता इंदिरा गांधी परत सत्तेवर येतील हे त्याचं भविष्य खर ठरल्याबद्दल मी त्याचं कौतुक केल होतं पण भरल्या सभेत ते त्याबद्दल मला काही सागू शकत नव्हते. तेव्हा मीटिंग सपता सपता, "रानडे, तुला काही प्रश्न विचारायचे नाहीत ?" म्हणून चौकशी केली.

एवढ्या शभर-सव्वाशे लोकांत त्यानी फक्त माझीच चौकशी केली ह्याचा अर्थ मी त्याच्याशी पत्र-व्यवहार करत होतो, तो त्याना आवडला होता असा मी केला.

हे सगळं झालं त्याच्या दुसऱ्या दिवसाची गोष्ट. त्या दिवसापासून मी अफगाण सरकारच्या सेवेतून मुक्त झालो होतो. संध्याकाळी आम्ही जवळ राहणाऱ्या एका मित्राच्या घरी गेलो गप्पा-टप्पा झाल्या कर्फ्यू सुरू होण्याच्या आधी घरी पोहोचावे म्हणून साडे-सातच्या सुमारास त्याच्याकडून निघालो तिथ आलेला दुसरा मित्र पण आमच्या बरोबर बाहेर पडला

साडे-सातच झाले होते तरी बाहेर बराच अंधार झाला होता सरकारच्या फतव्या-प्रमाणे घरांच्या प्रवेशाशी नेहमी असणारे दिवे पण नव्हते खूप बर्फ-वृष्टी होऊन गेली होती रस्त्यात गुडघा गुडघा बर्फ साचलं होत. आमच्या बरोबर बाहेर पडलेल्या मित्राची छोटी गाडी होती "इतक्या बर्फाचे पायी-पायी कुठे जाता ? चला तुम्हाला सोडतो "

तो म्हणाला. म्हटलं आज हा चांगला वाहनयोग दिसतोय तर तो सोडा कशाला ? पण ते वाहन मला तडक स्वर्गाला घेऊन गेलं असतं ही त्या वेळी काय कल्पना ? मी आणि प्रतिभा मागे व तो मित्र आणि त्याची बायको पुढे असे आम्ही निघालो

आमचा घरासमोरचा रस्ता फार मोठा असा नव्हता घरापर्यंत पोहोचलो तर आमच्या घराच्या दोन घरं अलीकडे एक मोठी गाडी उभी होती आम्हाला वाटलं ती बर्फात रुतली आहे बाजूनी गाडी काढणं बर्फामुळे शक्य नव्हतं तेव्हा मी मित्राला म्हटलं, "आम्हाला इथच सोड, आम्ही चालत जाऊ तू गाडी रिव्हर्स करून घे." हे सांगून मी गाडीतून खाली उतरलो मी सुटाबुटात होतो, त्यावर वाढलेली दाढी त्यामुळे नुसतं बघून मी कोणत्या देशाचा आहे हे ठरवणं अवघड गेलं असतं

मी गाडीतून खाली उतरत होतो, तोपर्यंत पुढल्या गाडीतला माणूस पण उतरला, आणि नुसताच उतरला होता असं नाही तर माझ्यावर पिस्तुल रोखून उभा राहिला आम्हा दोघांत फार तर सहा-सात फुटाचं अंतर असेल ! मी गाडीतून उतरण्याच्या मागे असल्यामुळे त्या माणसाकडं माझं लक्ष नव्हतं, तेव्हा समोर कुणी पिस्तुल घेऊन उभा आहे हे मला जाणवावं कसं ?

पण प्रतिभाला, माझ्या मित्राला व त्याच्या बायकोला गाडीच्या प्रकाशात तो माणूस स्पष्ट दिसत होता त्याच्या हातात पिस्तुल आहे हे पाहताच ते सारे किंचाळले तोपर्यंत प्रतिभापण खाली उतरली सुदैवाने तिनं स्लॅक्स् वगैरे न घालता साडी नेसली होती तिला पाहताच हातात पिस्तुल तसंच ठेवून त्या माणसानं, "आप लोग हिन्दी है ?" असं विचारलं. आम्ही 'हो' म्हणताच त्याने पिस्तुल खिशात ठेवलं व म्हणाला, "तो फिर आप हमारे दोस्त हैं ! कहाँ जा रहे हो ?"

आम्ही त्याला तिथूनच आमचं घर दाखवलं व मित्राला परत जायला सांगितलं तो गेला तशी मी त्या माणसाला, "तुमची गाडी बर्फात अडकली आहे का ? ढकलायला काही मदत करू का ?" म्हणून विचारू लागलो एवढा मोठा जीवावरचा प्रसंग टळला होता, तरी त्या वेळी मला त्याची जाणिवच झाली नव्हती "तू नसत्या भानगडीत पडू नकोस, आपलं सरळ घरी चल" असं प्रतिभा म्हणत होती त्या माणसानं पण मी त्याला काही मदत करावी अशी उत्सुकता दाखवली नाही तेव्हा आम्ही घरी आलो

नंतर मी झाल्या गोष्टीचा विचार करू लागलो तेव्हा कुठे त्या प्रसंगाचं गांभीर्य माझ्या लक्षात येऊ लागलं, आणि मी अगदी मरता मरता वाचलो ह्याची मला जाणीव झाली मला पाहताच त्यानं गोळ्या झाडल्या असत्या तर ? किंवा त्यानं प्रतिभा हिन्दी आहे हे ओळखलं नसतं तर ? किंवा त्याच वेळी मी हातरुमाल वगैरे काढण्याकरता खिशात हात घातला असता आणि त्याला मी पिस्तुल काढतो आहे असा संशय येऊन त्याने लगोलग गोळ्या झाडल्या असत्या तर ? ह्या सगळ्या तरतराचा एकच अर्थ होता. तो म्हणजे मी त्या दिवशी जीवानिशी मारला गेलो असतो इतक्या जवळून म्हणजे जेमतेम सात-

आठ फुटावरून त्याचा काही नेम चुकला नसता वेळ आली होती पण त्या वेळी नेमका काळच गायब झाला असावा !

तो माणूस कोण होता, त्याचा मात्र काही पत्ता लागला नाही त्याची गाडी आमच्या आधीच काही मिनिट येऊन थांबली असावी व मागोमाग आमची गाडी पाहून त्याला आम्ही त्याचा पाठलाग करतो आहोत असा संशय आला असावा. म्हणूनच त्याने खाली उतरून पिस्तुल रोखल असाव

एक तर तो बंडखोरांपैकी कुणीतरी असेल किंवा कोणी स्मगलर तरी असेल पण ज्या अर्थी आम्ही हिन्दी आहोत हे कळल्यावर त्याने सोडून दिलं त्या अर्थी तो बंडखोरांपैकीच कोणीतरी असावा

एका ज्योतिष जाणणाऱ्या मित्रान मला परदेशात मृत्यू आहे असं भविष्य सांगितल होतं निदान ह्या वेळी तरी ते खर झाल नाही, ह्याचा मला आणि आमच्या घरच्या मंडळींना खूप आनद झाला

काही वेगळ झाल किंवा काही वेगळ दिसल तर तसं वकिलातीला कळवण्याबद्दल आम्हाला आदेश होते तेव्हा मी वकिलातीतल्या प्रथम सचिवाला भेटलो

हा अधिकारी म्हणजे एक नमुना होता. उत्तर प्रदेशातला, उंच, हडकुळा, खालच्या जागेवरून वर चढत गेलेल्या अधिकाऱ्यांची एक खास वृत्ती असते. त्यांना कोणत्याही गोष्टीचं आश्चर्य, वा आनद म्हणून वाटत नाही कोठल्याही गोष्टीबद्दल आत्मीयता, रस वाटण त्याच्या प्रवृत्तीच्या बाहेरच असतं क्रोध, राग, लोभ त्यांनी जिंकलेले असतात अर्थात मत्सर व काम हे मात्र त्याचे सुटलेले नसतात

हा गृहस्थ पार्टीजमधून स्वत ची मती गुग होऊन जाईपर्यन्त प्यायचा असं प्याल्यावर पार्टीला आलेल्या कोणा कनिष्ठ अधिकाऱ्याला बोलवायचा व त्याला, हे काम का झालं नाही, त्या कामाच काय झाल, वगैरे प्रश्न विचारायचा अगदी भर पार्टीत त्या बिचाऱ्या कनिष्ठ अधिकाऱ्याला उलटून काही बोलताही येत नसे

अशा त्या अधिकाऱ्याला मी जे काही घडल होतं ते सांगितलं त्याने पण सगळ शात-पणे ऐकून घेतल भगवान कृष्णाने आत्म्याचं वर्णन, ज्याला कधी क्षती पोहोचत नाही, त्याला वारा वाहून नेत नाही की आग चटका देऊ शकत नाही असं केलं आहे ते वर्णन सगळ्या सरकारी अधिकाऱ्यांना शंभर टक्के लागू पडत

माझ्या ह्या प्रकरणात वकिलात काही करू शकणार नाही ह्याची मला चांगली कल्पना होती पण कळवल नसत तर तुम्ही एवढं जीवावरच प्रकरण होऊनही का कळवल नाहीत, असं त्यांनीच वर विचारल असतं म्हणून हे वकिलातीत जाणं व सांगण ते सगळं सांगण्याचा त्याच्यावर अर्थातच काहीही परिणाम झाला नाही खर म्हणजे तो गृहस्थ मला चागलं ओळखत होता, त्याने माझ्या सागण्यात थोडा तरी रस घ्यावा की नाही? निदान मी मारलो गेलो नाही ह्याचा आनद दाखवावा की नाही? नाव नको. मी गेलो,

मी सांगितलं व मी परत आलो !

कर्फ्यूच्या वेळात रशियन सैनिक रस्त्यावरची लहानसहान दुकानं फोडतात व त्यातल्या अमेरिकी सिगारेटस व चॉकलेट्स पळवतात, असे बोललं जायचं त्यांना आपल्या देशात असल्या गोष्टी पाहायलासुद्धा मिळत नसतील तेव्हा काबूलमध्ये मिळालेली ही संधी ते थोडेच सोडणार होते !

पण दोन दिवसांपूर्वी जो प्रकार झाला त्यात मात्र येथला हिंदी समाज पार हादरून गेला

साधारणपणे रात्री आठच्या सुमारास म्हणजे कर्फ्यू सुरू होण्याच्या सुमारास रशियन रणगाडे चौका–चौकात येऊन उभे राहात. कर्फ्यू फार कडक नव्हता, त्यामुळे लोकांची ये–जा साडे–आठ नऊपर्यंत चालत असे. त्यानंतर मात्र सगळीकडे अगदी सामसूम होऊन जात असे, तो सकाळी जवळ जवळ ५ वाजेपर्यंत राहात असे तशी एकदा सामसूम झाली की त्या रशियन सैनिकांना व अधिकाऱ्यांना काही काम राहात नसे.

त्या रात्री काय झालं की याकुब–चौकात राहणाऱ्या एका हिंदी माणसाच्या घरी चार रशियन अधिकारी आले त्याच्या घरी कुणी बायका–माणसं नाही आहेत असं कळल्यावर त्यांनी " तुमच्याकडे बसून ड्रिंक्स घेऊ का ? " म्हणून त्या हिंदी माणसाला विचारलं ते चार थोराड रशियन अधिकारी दारात उभे असलेले बघूनच हा हिंदी नफर गारद झाला होता ! त्यांना तो नाही काय म्हणतो ? तास–दीड तास हे लोक थांबतील व जातील असाही त्याचा कयास असेल व म्हणून त्याने ' हो ' म्हटले असेल त्याने ' हो ' म्हणताच ते रशियन अधिकारी परत आपल्या टँक्समध्ये गेले व दारूच्या बाटल्या व खाण्याचं सामान घेऊन आले. ह्याच्याकडे त्यांनी फक्त दारू पिण्याकरता ग्लासेस व बसायला खुर्च्या मागितल्या व ' तू जाऊन झोप ' म्हणून सांगितलं व स्वत: प्यायला बसले

अकरा वाजले, बारा वाजले तरी ह्यांचं खाणं–पिणं व गप्पा मारणं चालूच होतं तसा त्यांनी ह्याला काही त्रास दिला नाही पण दारू प्यालेल्या माणसाचं काय सांगवतं ? त्यातून रशियन्स ! तगडे, उंचे–पुरे व लष्करी अधिकारी ! दारू चढल्यामुळे जर कुणाचं डोचकं फिरलं आणि त्यानं गोळ्या झाडायला सुरुवात केली तर ? किंवा गप्पा मारता मारता त्या चौघात काही बाचाबाची झाली आणि ते हातघाईवर आले तर ? अर्थात हे सगळं त्या हिंदी माणसाच्या मनात आलेले विचार त्याला रशियन अधिकाऱ्यांनी " आत जाऊन झोप " म्हणून सांगितलं असलं तरी त्याला झोप तर यायला हवी ? डोळे सताड उघडे ठेवून तो आपल्या बेडरूममध्ये येरझारा घालत होता. पण त्या अधिकाऱ्यांचं ह्याच्याकडे लक्षच नव्हतं ते आपल्या पिण्यातच मशगुल होते.

चांगला दीड वाजत आला. आता मात्र त्या हिंदी माणसाचं रबर ताणून ताणून तुटायला

आल. त्याच्याकडे फोन होता पण त्या रशियनाच्या देखत फोन करणार तरी कसा ? शेवटी तो शेजाऱ्याच्या फ्लॅटवर गेला व तिथून आपल्या वकिलातीच्या अधिकाऱ्याला फोन केला. आता रात्रीचे दीड वाजत आले होते, अशा अवेळी तो अधिकारी तरी काय करणार होता ? त्यातून बाहेर कर्फ्यू ? तेव्हा त्या अधिकाऱ्याने त्याला अफगाण पोलिस अधिकाऱ्याचा फोन नंबर दिला

अफगाण असले तरी पोलिसच ते. त्यांनी ह्याचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं व तेवढ्याच शांतपणे सांगितलं, "आत्ता काही करता यायचं नाही, सकाळपर्यंत थांबा "

तेव्हा हा बिचारा मुठीत जीव घेऊन रामनामाचा जप करत बसला. शेवटी एकदाची ती जीवघेणी रात्र संपली व दिवस उजाडला दिवस उजाडला तसे ते रशियन अधिकारी उठले फर्निचर जागच्या जागी लावून ठेवलं, घर स्वच्छ केलं ग्लासेस, प्लेटस धुऊन पुसून जागच्याजागी ठेवल्या व त्या माणसाचे आभार मानून निघून गेले.

आता हे वाचताना असं वाटेल की ते रशियन्स फार चांगले वागले, त्यात त्या माणसाने इतकं घाबरण्यासारखं काय होतं ? पण एखाद्या गोष्टीबद्दल नंतर वाचणं वेगळं व त्या परिस्थितीत स्वतः सापडणं वेगळं हे रशियन्स आपल्याला काही करतील ह्या कल्पनेने तो इतका घाबरून गेला होता की ते काही करत नाही आहेत, कोणत्याही तऱ्हेचा गोंधळ घालायचा वा कोणालाही त्रास द्यायचा त्यांचा हेतू नाही आहे हे दिसत असूनसुद्धा तो आपल्या मनाला तसं पटवून देऊ शकत नव्हता

ह्या प्रकरणाची त्या माणसानं इतकी हाय खाल्ली की तो खरंच आजारी पडला व नंतरच्या आठवड्यातच रजा घेऊन भारतात सुट्टीवर निघून गेला

दुसऱ्याच आठवड्यात सगळ्या आयटेकवाल्यांची सभा झाली दिवस फार वाईट येणार आहेत असा गंभीर भाव सगळ्यांच्या चेहऱ्यावर होता आमच्यात जे ग्रुप-लीडर्स होते, त्यांना तर जास्त गंभीर व्हायला ही नामी संधी मिळाली.

परत असं काही झालं तर काय करावं ? ह्याबद्दल खूप खल झाला रशियन सैनिक घराघरात घुसतील व लुटालूट करतील असाही अंदाज काहीजणांनी व्यक्त केला. त्यावर उपाय म्हणून सगळ्यांनी आपल्या घरातली किंमती चीजवस्तू वकिलातीत आणून टाकावी अशीही सूचना आली पण उद्या जर वकिलातीवरच बॉम्ब पडला तर ? वकिलात काही नुकसान भरपाई करून द्यायला तयार झाली नसती

आणखी एक अशी सूचना आली की ग्रुप-लीडर्सना वॉकी-टॉकी द्यावी म्हणजे त्यांना आपसात व वकिलातीशी संबंध ठेवता येईल मी प्रश्न उपस्थित केला की असा संबंध प्रस्थापित करून होणार काय ? त्या गृहस्थाने वकिलातीच्या अधिकाऱ्याला फोन केला होताच की ? त्याला कुठं मदत मिळाली ? मग नुसता संबंध जोडून मिळणार काय होणार होतं ? वॉकी टॉकीचा खर्च कोण करेल ? असा प्रश्न एकानं उपस्थित केला वकिलात असा खर्च करायला असमर्थ होती व ग्रुप-लीडर्स आपल्या पैशानी वॉकी-टॉकी घ्यायला तयार

नव्हते थोडक्यात म्हणजे पूर्वीसारखच सगळं चालणार होत सुदैवानं परत तसा किंवा कोणताच प्रकार झाला नाही पण त्या प्रकरणामुळे हिंदी बाधवाची चर्चा करण्याची खुमखुमी मात्र अगदी मनसोक्त पुरी झाली

आमच्या गल्लीत राहणाऱ्या कारमालच्या बापाला आज कारमाल भेटायला येणार होता. प्रथम त्याच्या घराच्या आजूबाजूला रशियन आणि अफगाण सैनिक येऊन उभे राहिले मग तीनचार रणगाडे आले. काही वेळान एका मोठ्या रशियन गाडीतून कारमाल आला.

आमच्या घरमालकाने बबरक कारमालला अगदी लहानपणापासून पाहिल होत बबरक आपल्या घरी आला आहे म्हटल्यावर आमचा घरमालक त्याला भेटायला म्हणून निघाला पण तिथे जाण्याआधी आमच्याकडे येऊन कुचेष्टेने "अफगाणिस्तानच्या नव्या पादशहाला भेटून येतो" म्हणून सांगून गेला

पूर्वीसुद्धा बबरकने आपल्या बापाभावाला राजवाड्यावर राहायला बोलावल होतं. एकतर त्याला बापा भावाच्या जीवाला काही भीती आहे असं वाटत होत दुसरं म्हणजे त्यांना आताच आपल ऐश्वर्य दाखवाव, आपला राजवाडा दाखवावा असंही बबरकच्या मनात आलं असाव पूर्वीसुद्धा बापाने नकार दिला होता व आता पण दिला. मुलाच्या ऐश्वर्याचा लोभ त्या बापाला सुटला नाही राजवाड्यात राहण्याचा मोह त्याला झाला नाही! आपल्या मुलान रशियन लोकाना बोलावल ह्याबद्दलचा राग बापाच्या मनात अजूनी होता शेवटपर्यंत तो बाप सर्वसामान्य अफगाणांसारखा राहिला

आम्ही आता परत जाण्याचे दिवस मोजू लागलो आमच्या सामानाची बांधाबाध सुरू झाली ह्या तंत्रात नागपूरचे छत्रे व प्रिंटिंग प्रेसमधले वैद्य अगदी तज्ज्ञ होते त्यांच्याच मदतीने आमच बांधाबांधीचं काम अगदी बिनबोभाट पार पडल

कसं कोणास ठाऊक पण आमच्या पूर्वीच्या ड्रायव्हरला म्हणजे गुल-अमीरला आम्ही जाणार असल्याचं कळलं तेव्हा तो लगोलग भेटायला म्हणून आला. त्याचं आमचं फार छान जमल होतं. मागे जेव्हा आम्ही बल्ख, मदारे शरीफला गेलो होतो त्या वेळी ह्यानेच गाडी नेली होती. त्या वेळी त्याची बायको व दोन मुलं पण आमच्याबरोबर होती त्या उत्तर अफगाणिस्तानच्या भेटीतला हा सांगण्यासारखा किस्सा

आमची नेहमीची ऑफिसची 'व्होल्गा' ही स्टेशन-वॅगन घेऊन आम्ही उत्तरेला गेलो होतो गुल अमीर बरोबर पुढे मी, मागल्या सीटसवर प्रतिभा व मुलं व त्याच्या मागच्या सीटसवर गुल अमीरची बायको व मुल असं आम्ही बसत होतो.

गुल अमीर व त्याची बायको अशिक्षित व जुन्या वळणाचे तेव्हा त्याची बायको बुरखा

घालायची आम्ही काबूल शहराबाहेर काही योजने गेलो तेव्हा गुल अमीरने तिला आपला बुरखा काढायला सांगितला प्रथम तिने बरेच आढेवेढे घेतले पण प्रतिभाने व गुल अमीरने खूप आग्रह केल्यावर तिने बुरखा काढला त्यानं ती खूप आनदी झालेली दिसली व अगदी मोकळेपणानं वागू लागली रस्त्यात आम्ही एके ठिकाणी थाबलो, तेव्हा इतराबरोबर तिचे फोटो पण काढले.

आमचा प्रवास सुरू झाला आता गुल अमीरची बायको प्रतिभाशी मोकळेपणी बोलायला गप्पा मारायला लागली. करता करता आमची गाडी कुठल्यातरी गावातून जाऊ लागली ती आपला बुरखाच अगदी विसरून गेली होती. पण ते गुल अमीरच्या लक्षात आलं तो तिच्यावर एकदम 'बुरखा घे' म्हणून जोरात खेकसला. त्या वेळी त्या बाईचा चेहरा जो काय पडला आहे म्हणून सागू? मघाशी 'बुरखा काढ' म्हणून अट्टाहास करणारा हाच का तो गुल अमीर? ह्याअर्थी मी त्याच्याकडे पाहिल पण त्याचही एका अर्थी बरोबर होत आता तो त्याच्या समाजात आला होता त्याला त्या समाजात तोंड दाखवायच असेल तर त्याकरता बायकोच तोंड झाकणं आवश्यक होत

हल्ली मी दिवसभर घरीच असे मी आर्किटेक्चरवर काही लिखाण केलं होतं ते टाईप करत बसत असे. थोरल्या मुलाची परीक्षा जवळ आल्यामुळे त्यालाही शाळा नव्हती. तोही घरीच असे

असा सकाळच्या साडेनऊ दहाचा सुमार असेल. आम्ही तिघही आपआपल्या कामात होतो तर अगदी जवर असा स्टेनगनच्या गोळ्या सुटल्याचा आवाज ऐकू आला तशी मी आणि मुलगा लगबगीनं रस्त्यावर आलो रस्त्याच्या कोपऱ्यावर गर्दी जमली होती मुलगा म्हणाला, "बाबा, पाहून येऊ का, काय झालय ते?" मी म्हटल, "जा, पण काळजी घे व भिंतीभिंतीच्या बाजूने जा"

तशी मुलगा गेला व थोड्या वेळात परत येऊन कोपऱ्यावर काय झाल होत ते सागू लागला सैनिकांकडे जाड बंदुका, स्टेनगन्स होत्या तशाच पार्टीच्या कार्यकर्त्यांना पण स्टेनगन्स, पिस्तुल, बंदुका दिल्या होत्या कोपऱ्यावरच्या घरात कोणी बंडखोर आले आहेत असे काही कार्यकर्त्यांना कळल ते घर एक मजली होत कार्यकर्ते शेजारच्या घराच्या छतावर दबा धरून बसले बडखोराना त्याची काही कल्पना नव्हती ते बाहेर पडले तशी छतावर बसलेल्यानी त्यांच्यावर गोळ्या चालवल्या. एकजण मरून पडला, एकाच्या दंडाला गोळ्या लागल्या व त्याचा शर्ट रक्तानं अगदी भिजून निघाला.

मुलाच हे सगळं सागणं होईपर्यंत आमचा घरमालक आमच्याकडे आला मी मुलाला कोपऱ्यावरची 'गंमत' पाहायला परवानगी दिली ह्याबद्दल त्याने माझी खूप कानउघाडणी केली "अशा गोळीबारात कधी काय होईल ते सांगवत का! रस्त्यात असलेले लोक

घरात येऊन बसतात आणि तू चांगला घरात असलेल्या मुलाला अगदी कोपऱ्यापर्यंत पाठवलास? काय म्हणाव तुला?"

ते सगळं ऐकून माझी चूकच नाही तर अगदी घोडचूक झाल्याचं माझ्या लक्षात आलं. पण त्याला परवानगी देताना मी असा विचार केला होता की, आजूबाजूला इतकं काही घडत असताना आपण डोक्यावर कांबळं ओढून घरात का बसायच? ह्याच वृत्तीनं मी स्वत आयुष्यात आतापर्यंत वागत आलो होतो. तेव्हा मुलाला तशी परवानगी देणं अगदी माझ्या स्वभावाप्रमाणेच होतं.

हे सगळं जरी खरं असलं तरी स्वत' स्वत'चा जीव धोक्यात घालणं आणि आपल्या मुलाला तसा घालू देणं ह्यात फार फरक आहे हे मी उत्साहाच्या भरात अगदी विसरून गेलो होतो

गेल्या काही आठवड्यांपासून बंडखोर अफगाणांनी एक नवीनच तंत्र अंगीकारलं होतं. त्याला गांधी-तंत्र म्हणजे महात्मा गांधी तंत्र म्हणता येईल आपल्याकडे महात्मा गांधींचे तंत्र व त्याचे मार्ग बदनाम झाले आहेत. इंग्रजासारखे सज्जन राज्यकर्ते होते म्हणूनच महात्माजींचे सत्याग्रहाचं तंत्र थोडं तरी यशस्वी झालं असे म्हणणारे टीकाकार त्या वेळी होते व आत्ता पण आहेत. पण नि'शस्त्र जनतेला सत्याग्रह, शांततेने मिरवणुका काढणं व अन्यायाविरुद्ध उपास करणं ह्याशिवाय काही मार्गच नसतो हे आफ्रिकेतल्या व अमेरिकेतल्या चळवळींनी जगाला दाखवून दिलं आहे

आता ह्या अफगाणांनी दररोज रात्री आठ वाजता घराच्या छतावर येऊन थाळ्या वाजवायला व 'अल्ला हो अकबर' म्हणून अझान द्यायला सुरुवात केली हे सगळं सरकार-विरोधी भावनाच प्रदर्शन असलं तरी त्याबाबत सरकार काही करू शकत नव्हतं कर्फ्यू होती म्हणून आठनंतर घराबाहेर पडायला बंदी होती, पण घरांच्या छतावर जायला तर नव्हती? तसच थाळ्या वाजवायला पण बंदी नव्हती, आणि 'अल्ला हो अकबर' तर मुसलमानाची धार्मिक घोषणा होती, त्याला बंदी कशी घालणार? त्यामुळे सरकार मोठं पेचात पडलं तेव्हा ज्या घराच्या छतावरून थाळ्या वाजवल्या जात होत्या व 'अल्ला हो अकबर असे नारे दिले जात होते त्या घराघरांतून दिवसा जाऊन अफगाण सैनिक व पोलिस दमदाटी करू लागले, तरी पण लोक हटेनात

ह्या शांततावादी लढा देणाऱ्या मंडळींनी आणखी एक पाऊल पुढे टाकलं आजूबाजूच्या खेड्यापाड्यांतून शेकडो गरीब, अशिक्षित लोक आपल्या बायका–मुलांसह मिरवणुका घेऊन काबूल शहरावर आले त्यात तरुण होते, म्हातारे होते तरुण मुली होत्या तशाच म्हाताऱ्या बायका पण होत्या एरवी घराबाहेर सुद्धा न पडणाऱ्या आणि पडल्या तरी बुरख्याशिवाय घराबाहेर एक पाऊल सुद्धा न टाकणाऱ्या स्त्रिया आज डोक्यावर फक्त

दुपट्टा घेऊन मिरवणुकीत सामील झाल्या होत्या महात्मा गांधींच्या चळवळीत तरी काय असंच झालं होतं

आम्हाला ह्या मिरवणुकीचं कळताच आम्ही घराबाहेर पडलो घराबाहेरच घरमालकाचा मुलगा व सून भेटली मुलगा असाच पंचवीस एक वर्षांचा तर सून वीस एक वर्षांची आम्ही कुठे जातोय हे कळल्यावर ते दोघं पण आमच्या बरोबर यायला तयार झाले. ती सून बुरखा वगैरे तर घेत नव्हतीच पण त्या दिवशी 'स्लॅक्स् व टी शर्ट' घातलेला असल्या-मुळे दुपट्टा पण घेतला नव्हता ती तशीच निघालेली पाहून मालकानं म्हणजे तिच्या सासऱ्याने घाईघाईनं घरातून दुपट्टा आणून दिला. मिरवणुकीत जाण्याकरता निघालेल्या सुनेकरता सासरा दुपट्टा आणून देतो हे दृश्य मनाला भावणारं होतं.

ती मिरवणूक म्हणजे एक बघण्यासारखे दृश्य होते. वर सांगितल्याप्रमाणे सगळी खेडे-गावातली माणसं हातात हिरवे व काळे झेंडे घेतलेले व घोषणा होत्या 'अल्ला हो अकबर' म्हणजे 'देव थोर आहे' ह्या व अशा तऱ्हेच्या ! कडेवर लहान मूल घेऊन त्या बायका काही योजनं पायी पायी आल्या होत्या

हातात शस्त्र असलं तरच सामर्थ्य जाणवतं असं म्हणणाऱ्यांनी ही मिरवणूक बघायलाच हवी होती निशस्त्र लोकांच पण किती बळ असू शकतं ते त्यांना ही मिरवणूक बघून कळलं असतं व पटलंही असतं.

अशा आणखीही मिरवणुका वेगवेगळ्या खेड्या-पाड्यांतून आल्या होत्या त्या सगळ्या मिरवणुका खाना-ए-खल्कवर जाणार होत्या. सैनिक व पोलिस हे सगळं उघड्या डोळ्यांनी पाहात होते असं त्यांनी आयुष्यात कधी पाहिलंच नव्हतं हे लोक काही दगा-धोपा करत नव्हते, सरकारविरोधी घोषणा देत नव्हते, हातात आपल्या धर्माचा झेंडा घेऊन 'अल्ला-हो अकबर' अशा घोषणा देत होते हातात शस्त्र असूनही ते सैनिक व पोलिस काही करू शकत नव्हते. सत्याग्रहाची हीच तर खुबी आहे

ह्या मिरवणुकीवर वेळ पडली तर गोळीबार करावा व त्यांना पांगवावं असा सल्ला सरकारला प्रथम मिळाला होता पण सरकारला शहाणपण सुचलं व त्यांनी गोळीबार-लाठीमार काही केला नाही

अशा मिरवणुकांचा फायदा काय ? आपण सगळे संघटित आहोत अशी भावना लोकात निर्माण होतेच पण त्यापेक्षा जास्त महत्त्वाचं म्हणजे लोकात निर्भयता येते सत्तेबद्दल वाटणारं त्यांचं भय कमी होतं आणि जे लोक निर्भय झाले आहेत त्यांच्यावर कोणाला कधी सत्ता गाजवता आली आहे का ?

आता घरी बसून आवरा-आवर करणं, संध्याकाळी कोणी जेवायला बोलावलं असलं तर तिथं जाणं, नाहीपेक्षा टी व्ही पाहात बसणं हाच कार्यक्रम चालू असे

आज टी व्ही- वर ' खाक ' म्हणजे ' माती ' नावाचा एक छान इराणी सिनेमा पाहिला नेहमीप्रमाणे प्रेमाचा त्रिकोण होता एका श्रीमंत माणसाची बायको त्यांच्या घरात रंगकाम करणाऱ्या माणसाच्या प्रेमात पडते हे कळल्यावर नवरा त्या प्रियकराला गोळी घालून ठार मारतो ते बघून बायको चिडते व त्याच बंदुकीच्या दस्त्याने नवऱ्याचं डोकं चेचून काढते. हे मी फार थोडक्यात सांगितलं सिनेमा घेतला होता फार छान नदीकाठी असलेल्या घरात हे सगळं घडत आपल्याकडे आगगाड्यांचा, त्यांच्या शिट्टयांचा कित्येक सिनेमातून कसा छान उपयोग करून घेतला आहे ? तसाच इथे लहान बोटींचा, मोठ्या आगबोटींचा, त्यांच्या भोंग्याच्या आवाजाचा फार चांगला उपयोग करून घेतला आहे त्या श्रीमंत बाईची व त्या रंगाऱ्याची मैत्री कशी हळूहळू वाढत जाते व त्याचं प्रेमात रूपांतर कस होतं ते फार नाजूकपणे दाखवलं होत. आणि हे सगळं कुठलं ? तर इराणमधलं !

कोणताही देश असो, कोणत्याही धर्मांचे लोक असोत, कोणतीही संस्कृती असो, हा प्रेमाचा त्रिकोण कोणालाही चुकला नाही, हेच खरं.

आता आम्हाला एक एक जण निरोपाचं म्हणून भेटायला यायला लागले होते प्रथम आली जरिफा हातात फुलांचा गुच्छ, प्रत्येक फूल मोठ-टपोरं, तिच्या डोळ्यांसारखं ! कितीतरी वेळ ती बोलत होती ती खोजा अरेफशी लग्न करणार होती हे फार छान झाल अस माझ्या मनात आल

अफगाणिस्तानचं पुढ काय होईल ह्याची चिंता तिने पण व्यक्त केली आता आम्हाला तरी ते कुठे माहीत होतं ? आम्ही तिला अफगाण पद्धतीप्रमाणे ' बामाने खुदा ' केलं म्हणजे ' देव तुझी साथ करो ' असा आशीर्वाद दिला खरंच, देवाशिवाय माणसाला अशी हक्काची साथ कोणी दिली असती ? जाताना तिचे डोळे भरून आले

काही दिवसांनी पायंडा आपल्या बायकोसह आला त्याच्या दुसऱ्या दिवशी आम्ही काबूल सोडणार होतो त्यामुळे वकिलातीच सगळं फर्निचर पाठवून दिलं होतं त्यांना बसायला खुर्च्या पण नव्हत्या. खिडक्यांच्या कट्टयावरच आम्ही बसलो

गेली चार वर्षं आम्ही बरोबर काम करत होतो हुषार, कामात तत्पर असा हा पायंडा, हजरजबाबी पण होता कचेरीत काम करताना, साईटवर जाताना आम्ही कितीतरी लहान मोठ्या गोष्टींवर बोलत असू राजकारण वगैरे गोष्टी तर होत्याच, पण कधी कधी अगदी साध्या साध्या सुद्धा गोष्टी असत

आंघोळीच पाणी किती गरम असावं ह्याबद्दल आमच बोलणं चाललं होत. पायंडा म्हणाला, " आमचेकडे आंघोळीचं पाणी ' शीर-गर्म ' म्हणजे गायीच्या ताज्या दुधाइतकं गरम असावं अस म्हणतात " आपल्याकडे असल्या पाण्याला ' कोमटमोड ' म्हणतात पण त्या शब्दापेक्षा हे ' शीर–गर्म ' प्रकरण मला जास्त भावलं

पायंडाच्या बायकोनं आमच्याकरता स्वत नक्षीकाम केलेला टेबल क्लॉथ आणला होता. पायंडानं अफगाण पद्धतीची सूत काढण्याची टकळी व इतर लहान-सहान लाकडी वस्तू आणल्या होत्या त्याशिवाय त्याने मदारे शरिफ, बल्ख वगैरे ठिकाणचे फोटो पण आम्हाला दिले.

"तुम्ही आत्ताच जाता आहात हे फार चांगल आहे. आता ह्या पुढले दिवस फार वाईट येणार आहेत" पायंडा फार खिन्नपणे म्हणाला

हाच पायंडा आम्ही इंग्रजाचे दोनशे वर्षं कसे गुलाम राहिलो होतो ह्याचं चार वर्षांपूर्वी आश्चर्य व्यक्त करत होता. आता गुलामगिरी म्हणजे काय व कशी जाता जात नाही ते त्याला कळल होतं. अर्थात ह्या वेळी बोलण्याचा तो विषय नव्हता

"पायंडा, मागे तू मला एक वचन दिलं होतंस, लक्षात आहे ना?" मी विचारलं. काहीतरी अडीच-तीन वर्षांपूर्वीची गोष्ट आहे पायंडाची हुषारी वगैरे पाहून पुढंमाग तो ह्या देशात मंत्री वगैरे होईल असं मी म्हटलं होत "तसं झाल तर मी तुम्हाला हिंदुस्थानात जेथे असाल तेथून अफगाण सरकारचा खास अतिथी म्हणून बोलावेन" असं त्यानं उत्तर देऊन तसं वचनही दिलं होतं.

त्याच वचन त्यालाही आठवल त्यावर तो खिन्नपणे हसला आता कुठला मंत्री नी कुठल काय? सार्थ जिवत राहिलो तरी पुष्कळ आहे असा भाव त्याच्या त्या खिन्नपणं हसण्यामाग होता.

'बामाने खुदा' केल्यावर आम्ही अफगाण पद्धतीप्रमाणे मिठ्या मारल्या व एकमेकाच्या गालाची चुंबनं घेतली

दुसऱ्या दिवशीच्या सकाळच आमचं विमान होतं आजची रात्र आम्ही आमचे छत्रे म्हणून सहकारी होते त्याचेकडे काढायची ठरवली होती आणि त्यांच्या शेजारीच राहणाऱ्या जाधवाकडे रात्रीचं जेवण ठरवलं होतं ह्या जाधव आयटेक प्रोग्रामखाली इथल्या सरकारी प्रेसमध्ये आला होता काळा सावळा, हडकुळा, उंच असा हा आनंदी स्वभावाचा जाधव भविष्य पण चांगलं सागत असे त्यामुळे त्याच्याकडे बऱ्याच लोकांची ये जा असे काही दिवसांपूर्वी माझे पण भविष्य त्याने काढून दिले होते एकदा असं परदेशात आल की परत परत परदेशात जावसं वाटतं तेव्हा माझा प्रश्न परदेशात जाण्याबाबतचा होता त्याने जे सागितले ते अगदी महिना-साल बरोबर निघाले व मी परत परदेशात गेलो

छत्रे जाधव वगैरे मडळी येथल्या वजीर अकबर खान ह्या पॉश भागातल्या बरेच फ्लॅट असलेल्या एका चार मजली इमारतीत राहात असत. आम्ही तळमजली बगल्यात राहात होतो का कोणास ठाऊक पण प्रतिभाला अशा फ्लॅटमध्ये राहण्याची फार हौस होती. मी सुद्धा असा एक फ्लॅट मिळवावा असा तिचा माझ्यामागे नेहमी लकडा असे पण आम्हाला

कमीत कमी दोन बेडरूमचा फ्लॅट हवा होता तसे मोठे फ्लॅट बिलकूल उपलब्ध नव्हते. शेवटी एक चांगला चार बेडरूमचा फ्लॅट रिकामा असल्याच कळल वकिलातीनं घरमालकाशी बोलणी पण सुरू केली पण तोपर्यंत नव्या सरकारन आपल्या पार्टीच्या ऑफिसकरता तो फ्लॅट घेऊन टाकला प्रतिभाची ती इच्छा निदान शेवटच्या एक दिवसाकरता तरी पुरी व्हायची होती

आम्ही दुपारचं असं घर सोडणार होतो घरमालकीण, तिचा मुलगा, सून सकाळीच येऊन गेले मालक त्या वेळी कुठे तरी बाहेर गेला होता परत येताच तोही भेटायला आला आमचा घरमालक मोठा बलिष्ठ माणूस होता अफगाण सैन्यातला एका काळचा जनरल ' भव्य छातीचा व बळकट पजांचा तो फार धार्मिक पण होता अगदी सकाळी चार-साडेचारला उठून तो पहिला नमाज पढायचा. नतर किती तरी वेळ तो कुराणाचं मोठ्याने पठण करत असे त्याच कुराण पठण आम्हाला आमच्या बेडरूममधून चांगलं स्पष्ट ऐकू यायचं खर म्हणजे अरबी भाषेतल्या कुराणाचं ते पठण, पण आम्हाला ते संस्कृतातल्या वेदांच्या पठणासारखं वाटायचं.

तो आला तर जड हृदयानं व डोळे पाण्यान भारावूनच. तो निवृत्त झालेला असल्यामुळे घरीच असायचा. प्रतिभेला त्याने फारशी शिकवायचा प्रयत्न केला. त्याच आणि प्रतिभाचं चागल जमल होत त्याने प्रतिभाला छातीशी धरल व म्हणाला, "तुम्ही आत्ताच जाताहात ते बरंच आहे आता ह्या पुढे कसले दिवस येणार आहेत कळत नाही."

बाकीच्यांचं माहीत नाही पण ह्या जनरलचे पुढले दिवस मात्र फार वाईट जाणार आहेत हे स्पष्ट दिसत होत त्याची भली मोठी शेतीवाडी होती पण नव्या कायद्याप्रमाण ती आता कुळांकडे जाणार होती त्यामुळे ह्याला मिळणाऱ्या पेन्शनवर व घरभाड्यावरच गुजारा करणं भाग पडणार होतं सचिवालयात असलेल्या आपल्या सासऱ्यान्च्या मदतीन, घरमालकाचा मुलगा जर्मनीत स्थाईक व्हायच म्हणत होता. म्हणजे राहणार फक्त हा म्हातारा जनरल व तेवढीच म्हातारी असलेली त्याची बायको.

आम्ही त्याला व त्याच्या घरच्या मडळींना 'बामाने खुदा' केलं व चार वर्षं राहिलो होतो ते घर सोडलं

छत्र्यांकडे दुपारच जेवलो. परत त्याना कचेरीत जायच नव्हतच. तेव्हा गप्पा-टप्पा मारत राहिलो काही वेळान आमचा घरगडी ताज महमद भेटायला म्हणून आला मुलाकरता घेतलेली नवी सायकल आम्ही त्याला कमी किंमतीत दिली होती. त्याचप्रमाणे बरेचसे कपडेलत्ते व इतर सामानही दिलं होत त्यामुळे तो फार खूप होता. प्रत्येकाचं आपल-आपलं जीवन किती लहान असतं नाही ? आमच्या जाण्यामुळे त्याला बारीक-सारीक अशा पुष्कळ गोष्टी मिळाल्या होत्या त्याचाच त्याला आनद झाला होता

संध्याकाळी शेजारच्या जाधवाकडे गेलो छत्रे, मनोहर वैद्य, दुसरे वैद्य कुटुब वगैरे मडळी जमली होती. त्याचप्रमाणे आमचा एक पक्का राजस्थानी मित्र व तेवढीच पक्की

मैत्रीण झालेली त्याची बायकोपण भेटायला आले होते

त्या राजस्थानी मित्राची बायको सोडून बाकी ही सगळी विमानतळावर आम्हाला निरोप द्यायला येणार होती ती येणार नव्हती कारण असं कोणी जायला लागले म्हणजे तिला फार रडू येत, अगदी ओक्साबोक्शी रडू येत, तेव्हा विमानतळावर भलतीच शोभा नको म्हणून ती येणार नव्हती

" आपण इथं चार-पाच वर्षांकरता आलो होतो. " मी तिला म्हणालो, " तेव्हा केव्हा-तरी परत जाणार हे नक्की होतंच. त्यातून आपण परत हिंदुस्थानात जाणार, तेव्हा तिथे भेटीचा संभव आहे, संभवच का आपण नक्कीच भेटू—तेव्हा त्यात इतकं रडण्यासारखं काय आहे ? "

" ते सगळं मला पटतं. " ती शांतपणे म्हणाली, " पण आपल्याला पटलेल्या सगळ्या गोष्टी मनाला पटवता येतातच असं नाही. तेव्हा मी काही विमानतळावर येणार नाही, मला माफ करा "

" हरकत नाही, आपण येथेच बामाने खुदा करू या "

कर्फ्यू होता म्हणून सगळे लोक गेले. छत्रे शेजारीच राहात होते. त्यामुळे त्यांना जाण्याची घाई नव्हती. आम्ही चांगले खाल्लो—प्यालो व छत्र्यांकडे येऊन झोपेची आराधना करत गाद्यांवर आडवे झालो.

सकाळी लवकर उठलो जाण्याची तयारी करायला हवी होती झोपून चालणार नव्हतं बाहेर मंद उजाडलं होतं बर्फाची थोडी भुरभूर सुरू झाली होती

" आज चिक्कार बर्फ पडलं आणि त्यामुळे विमान आलं नाही तर किती मजा येईल नाही ? आणखी एक दिवस राहायला मिळेल " प्रतिभा मोठ्या आशावादीपणाने म्हणाली. आम्ही सगळ्यांनी हसून तिच्या बोलण्यास संमती दिली प्रतिभाने तसं म्हटलं असलं, आणि आम्ही संमती दिली असली तरी सगळी तयारी करून विमानतळावर जाणं भागच होतं. विमानतळावर जाईपर्यंत चांगलं उजाडलं तर होतंच पण ऊन पण पडलं होतं. त्यामुळे प्रतिभाचं आणखी एक दिवस राहण्याचं स्वप्न अगदी विरून गेलं.

विमानतळावर बरीच मित्रमंडळी आली होती सगळ्यांशी हातमिळवणी होत होती. काही वेळा ' मंडळीं 'च्या हातात जास्तच वेळ हात राहात होता आपुलकी किती तऱ्हेची व किती थोड्या वेळातही निर्माण होऊ शकते, नाही ?

मित्रांना अफगाण पद्धतीप्रमाणे मिठ्या मारल्या व त्यांच्या गालांचे मुके घेतले आलो त्या वेळी आमच्यातल्या कितीतरी जणांनी ह्या अफगाण पद्धतीची टर उडवली होती पण निरोप द्यायची तिच सगळ्यात योग्य पद्धत आहे असं आता आम्हांला वाटू लागलं होतं.

रोममध्ये असताना रोमन्सप्रमाणे वागावं असं म्हणतात मला वाटतं की रोमन्सप्रमाणे वागावं असं तिथं असताना आपल्याला उत्स्फूर्तपणे वाटायला लागतं !

आता आम्ही मित्र-मंडळींना सोडून फक्त प्रवाशाकरता जो कक्ष होता तेथे आलो.

काचांच्या मोठ्या दारातून ते सगळे लोक आम्हाला दिसत होते व आम्ही त्यांना पण त्याच्या आमच्यात एक अदृश्य तटबंदी होती, ती पार करणं आता आमच्या शक्ती- बाहेरच होत

विमानात जाऊन बसा म्हणून सांगण्यात येताच मुलगा उत्साहानं पुढे निघाला तो मागे वळूनसुद्धा बघत नव्हता. त्याच्यामागे प्रतिभा ती भरल्या डोळ्यानी बाल्कनीत उभ्या असलेल्या मित्रमडळींकडे वळून वळून पाहात होती

प्रतिभाच्या मागोमाग मी. मी एकदा मागे वळून पाहिलं व बाल्कनीत उभ्या असणाऱ्याना हात हलवून निरोप दिला डोळे कोरडेच होते. असं एक दिवस काबूल सोडायचं होतच त्यात रडण्यासारखं, डोळ्याना पाणी येण्यासारख काय आहे ? ही माझी धारणा व वृत्ती

मी विमानाच्या अगदी जवळ जात चाललो होतो दुरून तसं लहानसं वाटणारं विमान आता खूप मोठ्ठ व भव्य वाटू लागलं विमानाच्या पायथ्याशी आलो. आता फक्त पायऱ्या चढायच्या होत्या. तशा त्या चढू लागलो आणि तेव्हा मात्र माझ्या डोळ्याना पाणी आल अगदी रडू म्हणता येईल असं रडू आलं.

काही गोष्टी आपल्याला पटतात पण त्या तशा मनाला पटवण अवघड असतं हेच खरं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २८२९८
ग्रं. ६११९८
REFBK-0026219